**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. दीपक चव्हाण)**

## माहितीच्या मुद्याबाबत

श्री. बालाजी कल्याणकर : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य मी आपल्याला सांगू इच्छितो की, आता सभागृहाची विशेष बैठक आहे. सकाळी ११.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु झाल्यानंतर आपण आपला मुद्दा मांडू शकता.

श्री. बालाजी कल्याणकर : अध्यक्ष महोदय, माझा अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य मला माहिती आहे आपला महत्त्वाचा मुद्दा आहे. संपूर्ण राज्यात तोच विषय आहे. परंतु आपण आपला मुद्दा सकाळी ११.०० वाजता मांडू शकता. तेव्हा मी आपल्याला संधी देतो आता आपण वेळ वाया घालवू नका.

आता लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

**पृ.शी.:** राजगुरुनगर नगरपरिषद हद्दीतील बांधकामाच्या गैरव्यवहाराबाबत

**मु.शी.:** राजगुरुनगर नगरपरिषद हद्दीतील बांधकामाच्या गैरव्यवहाराबाबत या संबंधी श्री. दिलीप मोहिते-पाटील, ॲड. अशोक पवार आणि डॉ. किरण लहामटे वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राजगुरुनगर नगरपरिषद हद्दीतील गट नंबर ३१४/१ व ३१४/३ मध्ये बांधकाम सुरू आहे, सदर विकासकाने सन २०१४ साली क्षेत्र १२ आर चा नकाशा मंजूर करताना मो.र.न.१०३४८/१३ हा मोजणी नकाशा जोडून बांधकाम परवानगी मिळविणे, तसेच सन २०१७ साली संबंधित जागा मालक व विकासकाने सन २०१३ सालच्या मोजणीची बनावट प्रत बनवून त्यावर शासनाचे व भूमि अभिलेख कार्यालयाचे बनावट सही शिक्के तयार करून २४ आर क्षेत्राचा आराखडा व बांधकाम परवानगी राजगुरुनगर नगरपरिषद यांच्याकडून मिळविली असणे, गट नंबर ३१४ ला लगत महाराष्ट्र शासनाचा गट नंबर ३०७ हा हुतात्मा राजगुरू स्मारकाचा असणे, त्यामुळे गट नंबर ३१४ ला लागून ३०७ हा गट दाखवायला हवा परंतु सदर विकासकाने केलेल्या मोजण्यामध्ये लगत धारकामध्ये कुठेच ३०७ हा गट दाखवला गेला नसणे, तसेच शासनाची जागा बळकावून तेथे वाणिज्य स्वरूपाची इमारत उभी केली तसेच सदर बांधकाम परवानगी मिळवताना सादर केलेली कागदपत्रे ही बनावट व क्षेत्र १२ आर ची असून त्यावर क्षेत्र २४ आर ची बांधकाम परवानगी राजगुरुनगर नगरपरिषदेकडून मिळविणे, सदर बाब तत्कालीन मुख्याधिकारी, श्री.प्रकाश पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली असता मुख्याधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन ९३२९९/२०२० दाखल केले

श्री. दिलीप मोहिते-पाटील....

असता मुंबई उच्च न्यायालयाने सर्व तक्रारी अर्ज मुख्याधिकारी राजगुरुनगर नगरपरिषद यांना सुनावणी घेऊन आठ आठवड्यात निकाली काढण्याचे आदेश दिले गेले असणे, त्यानुसार मुख्याधिकारी प्रकाश पाटील यांनी सुनावणी घेऊन तक्रारदाराने दिलेले पुरावे व सादर केलेले लेखी युक्तिवाद यांच्यातील ठराविक मुद्दे घेऊन उपस्थित केलेल्या तक्रारी या दुसऱ्या कार्यालयाच्या असून त्याचा या कार्यालयाशी काही संबंध नाही असे सांगण्यात येणे, तसेच राजगुरुनगर नगरपरिषदेच्या कार्यालयाशी संबंधित असलेले कागदपत्रे व पुरावे विचारात न घेता विकासकाबरोबर मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण करून विकासकाच्या बाजूने निकाल देत तक्रारदार यांच्या म्हणण्यात कोणतेही तथ्य नाही असे कळविणे, तरी विकासकाने सादर केलेले बनावट नकाशे राजगुरुनगर नगरपरिषदेचा डीपी प्लॅन त्यामध्ये ३१४ लगत असणारा शासनाचा ३०७ गट असुन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे, तसेच क्षेत्र २४ आर चे चलन हे करोडो रुपयाचे असताना शासनाच्या रहिवाशी आदेशाचा वाणिज्य वापरासाठी चुकीचा वापर करून करोडो रुपयाचा नगरपरिषदेचा महसूल बुडवला असणे, सादर केलेली बनावट फायर एनओसी व तहसील कार्यालयातून बनावट सनद मिळवून त्या सर्व ठिकाणी बिगर शेती आदेश वापरून बँकांकडून कर्ज उपलब्ध करून घेतले असणे, तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे तहसीलदारांनी दिलेली सनद त्यांच्या कार्यालयाकडून दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या आदेशाने रद्द करण्यात आली असणे, भूमी अभिलेख कार्यालयाचे रेकॉर्ड गहाळ करणे त्यामुळे संबंधित विकासकाने विविध ठिकाणी व वेगवेगळ्या प्रकल्पामध्ये भूमी अभिलेख कार्यालयाचे शिक्के व राजमुद्रा बनविल्याचा अहवाल भूमी अभिलेख कार्यालयाने देणे, देशासाठी हसत हसत बलिदान देणारे राजगुरूनगर येथील भूमिपुत्र "हुतात्मा राजगुरू स्मारक" साठी महाराष्ट्र शासन यांचे जागेत सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामामुळे नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, अनधिकृत बांधकाम काढून टाकून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

श्री. प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री दिलीप मोहिते-पाटील : अध्यक्ष महोदय, सदरची लक्षवेधी सूचना ही कालच्या कामकाजपत्रिकेतील ८ क्रमांकाची आणि आजच्या कामकाज पत्रिकेतील १ क्रमांकाची आहे. राजगुरुनगर नगरपरिषद हद्दीतील गट नंगर ३१४/१ व ३१४/३ मध्ये १२ गुंठयावर ज्या विकासकाने बांधकाम नकाशे मंजूर करुन घेतले त्यांची बाजू जुना नाशिक-पुणे हायवे वर पश्चिमेकडील होती. त्यानंतर नविन पुणे-नाशिक हायवेवर श्री. छाजेड नावाच्या गृहस्थाची १२ गुंठे जमीन होती. विकासकाने ती जमीन घेतल्यानंतर दोन्ही मिळून २४ गुंठे जमीन झाली. परंतु विकासकाने ७/१२ च्या उताऱ्यामध्ये करुन ती जमीन २४ गुंठे दाखवली आणि नगरपालिकेचा मंजूर नकाशाला पश्चिमेकडील बाजुने प्रवेश असताना सुद्धा अतिरिक्त बांधकाम केले. खोटे नकाशे केले आणि खोटे रेकॉर्ड, राजमुद्रा तयार केल्या आणि बनावट नकाशे करुन ग्राहकांची आणि नगर परिषदेची फसवणूक केली. तसेच शासकीय कागदपत्रांमध्ये फेरफार केला. भूमि अभिलेख कार्यालयातून ओरिजनल कागदपत्रे गायब केली आणि नव्याने तयार केलेले खोटे दस्ताऐवज, कागदपत्रे आणि नकाशे तिथे ठेवले. अशी अतिशय गंभीर बाब, गुन्हा या विकासकाने केला आहे. त्यामुळे याबाबतीत न्यायालयामध्ये तसेच नगरपालिकेकडे दाद मागितली. त्यावेळेचे नगरपरिषद मुख्याधिकारी श्री. प्रकाश पाटील यांनी सुद्धा या खोटया बाबीवर विश्वास ठेवून त्या विकासकाला वाचविण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणामध्ये अधिकाऱ्यांनी त्याला मदत केली. मग त्यामध्ये भूमि अभिलेख अधिकारी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी असतील तर या सर्वांनीच त्या विकासकाला मदत केली. सदरच्या जागेशेजारी असणारी हुतात्मा राजगुरु स्मारकाची जागा सुद्धा यामध्ये हडप केली. अशा नगर परिषदेच्या हद्दीतील हा बांधकामाचा नकाशा त्वरित रद्द करणे, याची सनद रद्द झालेली आहे. सदरची बेकायदेशीर इमारत ताबडतोब पाडणे आणि सरकारी कागदपत्रांमध्ये जो फेरफार केला त्याबाबत विकासकावर कायदेशीर कारवाई करणे याबाबत माननीय मंत्री कार्यवाही करतील काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य जे मुद्दे मांडलेले आहेत त्यामध्ये निश्चितपणे तथ्य आढळून येते. त्यांनी सांगितले की, सरकारी दस्ताऐवजामध्ये काहीतरी फेरफार करुन खोटे आणि चुकीचे दस्ताऐवज तयार केले.

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे....

ही बाब निश्चितपणे दखल घेण्यासारखी दिसते. कारण की, मोजणी रजिस्टर क्रमांक १०३४८/१३ या अन्वये १२०० चौमी क्षेत्रफळाची मोजणी ही साधारणपणे सन २०१३ साली झालेली आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे....

त्याचीच संगणकीकृत नक्कल सन २०१६ रोजी भूमिअभिलेख कार्यालयाने दिलेली आहे. माझ्याकडे त्याची प्रत उपलब्ध आहे. प्रथमदर्शनी निश्चितपणे चुकीचे दस्तावेज आहे. हे कोणी केले का केले हा वेगळा भाग आहे. सन २०१३ मध्ये १२०० चौ.मी. ची मोजणी झाली होती. त्याचीच नक्कल असेल तर ती १२०० चौ.मी असली पाहिजे. मात्र यामध्ये १२००चौ.मी ऐवजी २४०० चौ.मी दिसत आहे. नक्कल नंबर तोच आहे, मोजणी रजिस्टर नंबरही तोच आहे. यामुळे सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्या प्रमाणे सुरुवातीचे जे कागदपत्र होते त्याची ही नक्कल असूच शकत नाही. या प्रकरणाची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरा विषय बांधकाम पाडता येईल काय, असा होता. नगरपरिषदेने बांधकाम परवानगी रद्द केली होती. ही तारीख माझ्याकडे आहे. सन २०२२ च्या अलिकडे बांधकाम परवानगी नगरपालिकेने रद्द केली. विकासकाने कोर्टात जाऊन नगर मुख्याधिकाऱ्यांच्या आदेशाला स्टे घेतला आहे. कोर्टाने स्टे दिल्यामुळे, ती न्यायप्रविष्ट बाब आहे. मघाशी मी आपल्याला नक्कल दाखवली. मूळ चुकीच्या नक्कलच्या आधारे सनद व इतर कागदपत्रे घेतले होते. उप अधीक्षक, भूमिअभिलेख यांनी सदर नक्कलच रद्द केलेली आहे. यामुळे सनदा देखील रद्द झालेल्या आहेत. विकासक त्याही विरोधात कोर्टात गेला आहे. या बाबत कोर्टाने स्टे दिलेला नाही. दोन्ही बाबी न्यायप्रविष्ट आहेत. यामुळे बांधकाम पाडता येईल का, हे सांगता येणार नाही कारण कोर्टाने स्टे दिलेला आहे. या संबंधी विभागीय आयुक्तांच्या मार्फत चौकशी सुरु आहे. यामधून तथ्य बाहेर येईल. खरे तर कठोर कारवाई करण्यासारखे हे प्रकरण आहे. गट क्र, सर्व्हे क्र.३०७ बाबत अतिक्रमण केले आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. या बाबत जिल्हाधिकारी, पुणे यांना अहवाल पाठविण्याची सूचना केली आहे.

श्री.दिलीप मोहिते –पाटील : अध्यक्ष महोदय, या नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांपासून सर्व लोक त्याचे फितूर आहेत. कोर्टाची नोटीस आल्यानंतर तेथील

असुधारित प्रत

श्री.दिलीप मोहिते –पाटील....

कर्मचाऱ्यांनी ती नोटीस मुख्याधिकाऱ्यांना दाखवली नाही. यामुळे मुख्याधिकाऱ्यांना कोर्टात हजर राहता आले नाही. याचा परिणाम असा झाला की, कोर्टाने एकतर्फी तात्पुरता स्टे दिला असून तो कायम स्वरुपी दिलेला नाही. मुख्याधिकाऱ्यांची बाजू ऐकल्यानंतर निर्णय घेतला जाईल.

अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे. आज सरकारी कार्यालयामध्ये जाऊन तेथील नकाशे बदलायचे, शिक्के बदलायचे व राजमुद्रा असलेला शिक्का बनवून फेरफार करायचे या सारखा दुसरा गंभीर गुन्हा असू शकत नाही. यांनी नकाशे बदलले, ७/१२ बदलला, स्वत: शिक्के तयार केले, खोटया सह्या केल्या. एवढा गंभीर गुन्हा केल्यानंतर पोलीस कारवाई ताबडतोब झाली पाहिजे. आज मोजणी अधिकारी असे सांगतात की, सदरचे रेकॉर्ड उपलब्ध नाही. असे उत्तर त्यांनी लेखी दिले आहे, माहितीच्या अधिकारात दिले आहे. शासकीय रेकॉर्ड ही सर्वात मोठी ठेव आहे. ती कस्टडी आहे. या कस्टडीमधून महत्त्वाचे कागदपत्रे जर गायब होत असतील तर उद्या महाराष्ट्राची ही विधानसभा दुसरा कोणी तरी आपल्या नावावर करुन घेईल. मंत्रालय देखील कोणी तरी आपल्या नावावर करुन घेईल. कागदपत्रे कसे काय गायब होतात, ते मिळत कसे नाहीत ? संबंधित अधिकारी, लोक यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी याबाबत मघाशी सांगितले होते. तेव्हा मी असे सांगितले की, खोटे दस्तावेज तयार करणे गंभीर आहे. न्यायालयाने जरी बांधकाम परवानगीवर स्टे दिलेला असेल, किंवा एका बाबतीत मुख्याधिकाऱ्यांनी जी बांधकाम परवानगी रद्द केली, त्या करिता न्यायालयाने स्टे दिलेला आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.प्राजक्त तनपुरे ....

दुसरा स्टे दिलेला नाही तर दुसरी बाब न्यायप्रविष्ट आहे. ज्या सनद कॅन्सल केल्या ती बाब न्यायप्रविष्ट आहे. परंतु, त्याही पलीकडे जाऊन हा प्रश्न मात्र निश्चितपणे अनुत्तरित राहतो की, अशा प्रकारे खोटे दस्तऐवज प्रोड्युस झालेले आहेत. ते कोणी केले, काय केले परंतु, निश्चितपणे नगरपालिकेला ते दिले गेलेले आहेत. १०३४८/२०१३ हा मोजणी रजिस्टर नंबर असून या एकाच नंबरचे दोन वेगवेगळे दस्तऐवज ते देखील भूमी अभिलेखच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सही, शिक्क्याने दिले गेले आहेत, ही बाब निश्चितपणे गंभीर आहे. याबाबतीत विभागीय स्तरावरील भूमी अभिलेखचे जे अधिकारी असतील त्यांना आम्ही निर्देश देऊ की, हे तपासावे व जे कोणी संबंधित हे तयार करणारे असतील ...

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : ही गंभीर बाब आहे. लवकरात लवकर चौकशी होऊन योग्य ती कारवाई झाली पाहिजे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, तसे नाही.... गुन्हा दाखल करण्याचेच आम्ही त्यामध्ये एफ.आय.आर. दाखल करण्याचेच निर्देश देऊ.... (अडथळा) ... ही बाब खरी आहे की, फ्रॉड्युलंट डॉक्युमेंट देण्यात आलेले आहे. ते भूमी अभिलेखच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे की, त्या विकासकांनी त्यांच्या परस्पर दिले आहे हे, थोडेसे तपासून पहावे लागेल. परंतु, हे अर्ज दिल्याशिवाय मिळत नाहीत. त्यामुळे त्या विकासकांनीच अर्ज दिला असेल की, या नंबरची नक्कल मला मिळावी. त्यामध्ये विकासकाचा देखील काही तरी रोल आहे असे प्रथमदर्शनी वाटण्यास निश्चितपणे जागा आहे. त्यामुळे महिनाभराच्या आत तपासून विकासक व भूमी अभिलेखचे संबंधित जबाबदार अधिकारी या दोघांवर गुन्हा दाखल करण्याचे आम्ही महसूल विभागाला आदेश देऊ.

श्री.दिलीप मोहिते : अध्यक्ष महोदय, ...

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य मंत्री महोदयांनी आता गुन्हा दाखल करण्याबाबतचे सुतोवाच केले आहे.

असुधारित प्रत

श्री.दिलीप मोहिते : अध्यक्ष महोदय, राजमुद्रेचा शिक्का बनविणे, खोटे दस्तऐवज तयार करणे ही गंभीर बाब आहे, त्याकरिता महिना कशाला पाहिजे, सरकार यावर तातडीने कारवाई का करीत नाही, सरकारच्या यामध्ये काय उद्देश आहे?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांकडे याउपर जर अजून काही कागदपत्रे आहेत. ते म्हणत आहेत की, दिलेले आहेत. आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचनांवरील चर्चा संपली की, किंवा आज संध्याकाळी मी त्यांना माझ्या दालनात बोलावून त्यांच्याकडची कागदपत्रे घेतो व तसे निदर्शनास आले तर, तत्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश आम्ही देऊ.

............

**तालिका सभाध्यक्ष** : सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण थोडक्यात प्रश्न विचारुन मंत्री महोदयांकडून उत्तर घ्यावे. कारण आपल्याला ७ लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घ्यावयाच्या आहेत.

............

असुधारित प्रत

**पृ. शी. :** नाशिक जिल्हयातील इगतपुरी-त्र्यंबकेश्वर या आदिवासी मतदार संघात सन २००९ ते २०१४ या कार्यकाळात आदिवासी जलसिंचन उपसा योजना या देवमोगरा सेवाभावी संस्थेमार्फत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार होणे

**मु. शी. :** नाशिक जिल्हयातील इगतपुरी-त्र्यंबकेश्वर या आदिवासी मतदार संघात सन २००९ ते २०१४ या कार्यकाळात आदिवासी जलसिंचन उपसा योजना या देवमोगरा सेवाभावी संस्थेमार्फत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार होणे या संबंधी श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्री. हिरामण खोसकर (इगतपुरी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मृद व जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक जिल्हयातील इगतपुरी-त्र्यंबकेश्वर या आदिवासी मतदार संघात सन २००९ ते २०१४ या कार्यकाळात आदिवासी जलसिंचन उपसा योजना या देवमोगरा सेवाभावी संस्थेमार्फत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याप्रकरणी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या सुमारास मा. उपमुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन देण्यात येणे, सदर प्रकरणासंदर्भात चौकशी सुरु असतांना टाकेहर्ष, आवडे, टाकेदेवगाव यांना सुधारित सुप्रमा देण्यात येणे, मा.सहा.गुणनियंत्रण अधिकारी, दक्षता व गुणनियंत्रण पथक, मृद व जलसंधारण, औरंगाबाद येथील अधिकारी यांनी दिनांक ८ व ९ सप्टेंबर, २०२१ रोजी केलेल्या पाहणी दौऱ्यात १९

श्री.हिरामण खोसकर ...

पैकी १४ योजना अपूर्ण अवस्थेत असल्याचे आढळून येणे, या सर्व योजना अपूर्ण असतांनाही कोट्यावधी रुपयांची देयके काढण्यात येऊन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करणे, यासंदर्भात सर्वसामान्य जनतेने तसेच आदिवासी कोळी महादेव समाज विकास संघटना तसेच विविध आदिवासी संघटनेच्या वतीने मा.मंत्री, राज्यमंत्री यांच्याकडे तक्रारी देऊनही कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

श्री.शंकरराव गडाख (मृद व जलसंधारण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..............

असुधारित प्रत

श्री.हिरामण खोसकर : अध्यक्ष महोदय, इगतपुरी तालुक्यातील इगतपुरी मतदारसंघातील १९ उपसा सिंचन योजना सन २००९ ते सन २०१४ या कार्यकाळात सुरु केलेल्या आहेत. त्यातील लक्ष्मीनगर व आशाकिरण वाडी या दोन योजना पूर्ण आहेत. ६०० एकर क्षेत्र भिजेल या दृष्टीने या योजना केल्या. परंतु, केवळ २५० एकर क्षेत्रच भिजत आहे. उर्वरित ३५० एकर क्षेत्राला पाणी मिळत नाही. ते शेतकरी पाण्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्या संदर्भात आपण काय उपाययोजना करणार याचा मला खुलासा व्हावा.

श्री.शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी व त्र्यंबकेश्वर या दोन तालुक्यात सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे १९ योजना आहेत. त्या १९ योजनांना सन २००९ ते सन २०१४ या कालावधीत मंजुरी देण्यात आली होती. ती मंजुरी दिल्यानंतर जवळपास ४०९७ हेक्टर इतके क्षेत्र ओलिताखाली येणार होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या योजनेतील जवळपास १४ कामे ही त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आहेत. त्यांची प्रशासकीय मान्यतेची किंमत जवळपास ३८ कोटी ४० लाख इतकी आहे. आजपर्यंत या योजनांवर ३५ लाख ४४ हजार इतका खर्च झालेला आहे. ५ कामे इगतपुरी तालुक्यातील आहेत. त्याची प्रशासकीय मान्यता १३ कोटी ३ लाखांची आहे व खर्च जवळपास ९ कोटी ३७ लाख इतका झालेला आहे.

यानंतर श्री.शिंदे....

श्री.शंकरराव गडाख....

१९ पैकी ५ योजनांची कामे पूर्ण झाली त्या हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. तसेच इगतपुरी तालुक्यातील दोन योजना जवळपास पूर्ण झालेल्या आहेत. उर्वरित अपूर्ण योजनांच्या संदर्भात मुख्यमंत्री महोदय व उप मुख्यमंत्री महोदयांकडे सन्माननीय सदस्यांनी तक्रार केली आहे. त्यामुळे दक्षता पथकामार्फत चौकशी करण्यात येत आहे. उक्त चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरहू योजनांच्या बाबतीत पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

श्री.प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, पहिल्या योजनेत ३८ कोटी रुपयांपैकी सुमारे ३५ कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. दुसऱ्या योजनेत १३ पैकी २ कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. ५ कामे पूर्ण झाल्याचे सांगितले आहे. उर्वरित योजनेची सुमारे ८० टक्के कामे पूर्ण झालेली असावयास पाहिजे होती. सन २००९ ते २०१४ या कालावधीतील कामे असून त्यावर पूर्ण निधी खर्च करण्यात आला आहे. परंतु आजतागयात योजनेचा फायदा शेतकऱ्यांना झाला नाही. सदरहू कामांना आता सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे, याचा अर्थ मागील वेळी न केलेल्या कामांचे पुरावे नष्ट करणे असा होतो. आपण दक्षता पथकाच्या माध्यमातून उक्त कामांची चौकशी केली आहे. उक्त लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की, दक्षता पथकाकडून अभिलेखे जुळवून अहवाल तयार करण्यात येईल. अशा पद्धतीने कार्यवाही करता येत नाही. दक्षता पथकास त्या जागेवर जाऊन त्याच दिवशी अभिलेखे पाहून अहवाल तयार करावा लागतो. सदरहू चौकशीस ७ महिन्यांचा कालावधी झाला आहे. सदरहू योजनेचे पैसे पूर्ण काढूनही कामे झाली नसल्याचे लक्षात येत आहे. उक्त लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता याबाबत नमूद केले आहे. ही अधिकाऱ्यांची चाल असते. मंत्री महोदयांनी खोलात जाऊन कार्यवाही करावी. ४,०९७ हेक्टर क्षेत्रातील शेतकऱ्यांना या योजनेची कामे पूर्ण झाल्यावर फायदा होणार आहे. सदरहू सर्व बाबींची चौकशी इतर खात्याच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात यावी.

श्री.प्रशांत बंब...

कारण चौकशी करणारे अधिकारी एकाच विभागाचे असल्याने ऐकमेकांना भेटून पुरावे नष्ट करतात. सदरहू प्रकरणांची चौकशी एक महिन्याच्या आत पूर्ण करुन तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री.शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत विचारणा केली आहे. हे खरे आहे की, व्यय अग्रक्रम समितीने सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. परंतु ज्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, सदरहू योजनांची चौकशी करण्यात येत आहे. त्यानंतर त्यांनी चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर सुधारित प्रशासकीय योजनांच्या बाबतीत निर्णय घेण्यात येईल, असे स्पष्ट कळविले आहे. कागदपत्र जुळत नाहीत, यासंदर्भातील चौकशी सन्माननीय सदस्य आणि समाजिक संस्थांनी केली आहे. दक्षता पथक ८ व ९ सप्टेंबर, २०२१ रोजी स्थळ पाहणीसाठी गेले होते. त्या ठिकाणी त्यांना काही कागदपत्रे आढळले नाही. ६ महिने चौकशी रखडली, हे खरे आहे. परंतु ती पाऊस किंवा कोरोना या कारणांमुळे होऊ शकली नाही, असे सांगण्यात आले आहे. सदरहू चौकशी एक महिन्याच्या आत पूर्ण करुन दोषींविरुध्द कठोरातील कठोर कारवाई करण्यात येईल.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** बालकांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना

**मु.शी.:** बालकांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना या संबंधी सर्वश्री. सर्वश्री. अतुल भातखळकर, योगेश सागर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर (कांदिवली(पूर्व)) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जागतिक युवा तंबाखू सर्वेक्षणामध्ये राज्यातील १३ ते १५ वयोगटातील ५.१ टक्के बालके तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन कर ीत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच १८ वर्षांखालील मुलांना तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास कोटपा कायद्याअंतर्गत बंदी असतानाही त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये शहरी भागातील बालकांच्या तुलनेत ग्रामीण भागातील बालकांना याचे व्यसन झपाट्याने लागत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बालकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता, बालकांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी त्यांच्यात जागृती करण्याची गरज, कोटपा कायद्याचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

डॉ.विश्वजीत कदम (सामाजिक व विशेष सहाय्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, राज्यतील १३ ते १५ वयोगटातील बालकांमध्ये तंबाखूचे व्यसन वाढत चालले आहे, यासंदर्भात उक्त लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे. यामध्ये कोणी कोणतेही राजकारण करण्याचे कारण नाही. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सरकारने २ पानांचे विस्तृत निवेदन केले आहे. सदरहू निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदामध्ये नमूद करण्यात आले आहे की, उक्त वयोगटातील तंबाखू सेवनाचे प्रमाण कमी झाले आहे. केवळ ३५ शाळांमधील ३,५०० विद्यार्थ्यांचा सर्व्हे करण्यात आला आहे. त्या आधारे तंबाखू सेवनाचे प्रमाण कमी झाले असे नमूद करणे थोडे धाडसाचे आहे. सन २००३ मधील तंबाखू विरोधी कायद्यातील तरतुदींच्या अनुसार काम करण्यात आले पाहिजे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.अतुल भातखळकर.....

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "काही शैक्षणिक संस्था यासंदर्भातील नियम पाळत नाहीत." ज्या शैक्षणिक संस्था सदर नियम पाळत नाहीत, त्या संस्थावर शासनाने कोणती कारवाई केलेली आहे?

अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्थेच्या परिसरामध्ये पिवळी रेषा रेखांकीत करण्याचा मानस आहे. आतापर्यंत किती शैक्षणिक संस्थेच्या परिसरामध्ये अशा प्रकारच्या पिवळया रेषा रेखांकीत केलेल्या आहेत? अशा प्रकारच्या कार्यवाहीचा रोडमॅप राज्य शासनाने डोळयासमोर ठेवला आहे काय?

अध्यक्ष महोदय, शैक्षणिक संस्थाच्या परिसरामध्ये तंबाखू मिळत नाही, असे उत्तरामध्ये नमूद केले असले तरी शैक्षणिक संस्थाच्या परिसरामध्ये सर्रासपणे तंबाखू मिळतो. तेथील दुकानदार १७ वर्षाखालील मुलांना देखील तंबाखुची विक्री करीत आहेत. मागील दोन वर्षांमध्ये शासनाने किती दुकानदारावर कारवाई केलेली आहे?

डॉ.विश्वजीत कदम : अध्यक्ष महोदय, जागतिक युवा तंबाखू सर्वेक्षण २०१९ च्या चौथ्या फेरीमध्ये देशात १३ ते १५ वयोगटातील बालके यांचे तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवन करण्याचे प्रमाण ८.५ टक्के आहे. या तुलनेत राज्यातील तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवन करण्याचे प्रमाण ५.१ टक्के असल्याचे आढळून आले आहे.

अध्यक्ष महोदय, याबाबतचे सर्वेक्षण करणारी "International Institute of Population Sciences" नावाची एक स्वायत्त संस्था आहे. ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून केंद्र सरकारच्या Ministry of Health and Family Welfare विभागाच्या आधिपत्याखाली काम करीत आहे. या संस्थेची स्थापना सन १९५६ मध्ये करण्यात आलेली आहे. ही संस्था टाटा ट्रस्टच्या माध्यमातून काम करीत आहे.

डॉ.विश्वजीत कदम.......

अध्यक्ष महोदय, १० वर्षापूर्वी केलेल्या सर्व्हेमध्ये व सन २०१९ मध्ये केलेल्या सर्व्हेमध्ये असा फरक दिसून आला आहे की, तंबाखू किंवा तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करण्याचे प्रमाण जवळ-जवळ ४५ टक्क्यांनी कमी झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यानी सन २००३ मधील कोटपा कायद्याचा उल्लेख केलेला आहे. COTPA कायदा म्हणजे "The Cigarettes and other Tobacco Products (Prohibition of. Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution) Act". केंद्र सरकारने हा कायदा सन २००३ मध्ये पारित केलेला आहे. या कायद्याचे तंतोतंत पालन महाराष्ट्रासह या देशातील सर्व राज्य करीत आहेत.

अध्यक्ष महोदय, नजीकच्या काळात महाराष्ट्रामध्ये रॅन्डम सर्व्हे करण्यात आलेला होता. कोटपा कायदा २००३ अन्वये ग्रामीण भागातील ९५.०० टक्के व शहरी भागातील ८८.२ टक्के शैक्षणिक संस्था या कायद्याच्या कलमांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करीत असल्याचे आढळून आले आहे.

अध्यक्ष महोदय, ज्या संस्था कोटपा कायद्याचे पालन करीत नाहीत, त्यांच्यावर शासनाने काय कारवाई केली असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, कोपटा कायदा हा अतिशय कठोर असा कायदा आहे. या कायद्यांतर्गत तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करीत असलेल्या दुकानांवर दंडात्मक कारवाई करता येते. हा विषय महाराष्ट्र सरकारच्या वेगवेगळया खात्याशी संबंधित आहे. सन २०१९-२० मध्ये गृह विभागाने मुंबईमध्ये कारवाई करुन दीड कोटी रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. सन २०२०-२१ मध्ये केलेल्या कारवाईमध्ये जवळपास ३ कोटी ५४ लाख १२ हजार ७४७ रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. सन २०२१-२२ मधील कारवाईमध्ये ५ कोटी ७१ लाख ४२ हजार ३१३ रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. मागील तीन वर्षांमध्ये मुंबई वगळता महाराष्ट्रामध्ये सरासरी २०-२५ कोटी रुपयांचा दंड वसूल केलेला आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

डॉ. विश्वजीत कदम.....

सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, COTPA कायद्यांतर्गत शैक्षणिक संस्थापासून १०० मीटरच्या बाहेर ही दुकाने असली पाहिजेत. या शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटरच्या आत ही दुकाने असता कामा नयेत. रँडम सर्व्हेच्या माध्यमातून मी सांगितल्याप्रमाणे नियमांचे तंतोतंत पालन केले जात आहे. ज्या ठिकाणी या नियमाचे पालन केले जात नाही, त्याठिकाणी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. यलो लाईनचा प्रश्नही सन्माननीय सदस्यांनी मांडला आहे. तो अतिशय महत्त्वाचा आहे. कोटपा कायद्याचे पालन करण्याकरिता राज्य स्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. त्या समितीची दर चार महिन्यातून एकदा बैठक होत असते. जिल्हा स्तरावरही जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर चार महिन्यातून एक बैठक घेतली जाते. जिल्हाधिकारी हे त्या-त्या जिल्ह्यातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना या कायद्याचे पालन करण्याकरिता सूचना देत असतात. यलो लाईनचेही पालन केले जाते. ज्या ठिकाणी पालन केले जात नाही, तेथे निश्चितपणे कारवाई केली जाते.

श्री. मिहिर कोटेचा : अध्यक्ष महोदय, तंबाखुचे व्यसन हे अनेकांना आहे. परंतु मुंबई शहरामध्ये असे दिसते की, शाळेतील कमी वयोगटातील विद्यार्थी गांजा आणि अंमली पदार्थांचे व्यसन करीत असतात. यामध्ये जसे की, बटन हे अंमलीपदार्थ आहे. हे प्युअर केमिकलयुक्त आहे. ते केवळ १० रुपयांमध्ये उपलब्ध होत असते. याची विक्री शाळेच्या आसपासच्या परिसरामध्ये केली जाते. शाळेच्या आजुबाजुला असलेले दुकानदार गांजाकरिता लागणारा कोनदेखील विकत असतात. मुंबईतील कमी वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये गांजा, बटन याचे सेवन वाढलेले आहे. यासाठी शासनाकडून कोणती पाऊले उचलण्यात आलेली आहे. तसेच यात किती लोकांवर कारवाई करण्यात आली आहे ? तसेच यात जे विद्यार्थी सापडतात त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाकडून कोणत्या योजना जाहीर केल्या आहेत ?

डॉ. विश्वजीत कदम : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. तंबाखू व्यतिरिक्त समाजामध्ये, कमी

डॉ. विश्वजीत कदम .....

वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये अंमलीपदार्थ, जसे की, ड्रग्ज, हशीश, गांजा यांचे आकर्षण आहे. याबाबत गृह विभाग, अन्न व औषध प्रशासन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून संयुक्तपणे प्रिव्हेन्शन करण्याकरिता आणि या अंमलीपदर्थांची विक्री थांबविण्याकरिता सातत्याने कार्यवाही केली जाते. जे विद्यार्थी किंवा मुले या व्यसनाच्या आहारी गेले आहेत, त्यांचे महात्मा गांधी व्यसनमुक्ती केंद्राच्या माध्यमातून पुनर्वसन केले जाते. त्याद्वारे त्यांचे मार्गदर्शन, समुपदेशनाचे करण्याचे काम केले जाते. तसेच व्यसनमुक्तीचे काम करणाऱ्या संस्थांना शासनाकडून दरवर्षी ११ लाख रुपयांपर्यंत विभागांतर्गत प्रोत्साहनपर बक्षिस दिले जाते.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** महाराष्ट्र लोक हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे

**मु.शी. :** महाराष्ट्र लोक हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे या संबंधी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयउचित लोकसेवा देण्याकरीता आणि त्यासंबंधीत बाबींकरीता तरतूद करण्यासाठी दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी महाराष्ट्र लोक हक्क अधिनियम, २०१५ प्रस्थापित करण्यात आला जेणेकरुन नागरिकांना शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचेकडून कामकाजामध्ये होणाऱ्या दप्तर दिरंगाईस आळा बसावा व विहित कालावधीमध्ये सेवा पुरविण्यात यावी हा मुख्य उद्देश असणे, परंतु प्रत्यक्षात मात्र शासनाच्या कोणत्याही विभाग व कार्यालयांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाप्रमाणे कामकाज होत नसून त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास होत असणे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार कोणत्याही साध्या संचिकेवर / प्रकरण / पत्र निर्गमित करण्याकरीता ७ दिवसांत, त्वरीत / तात्काळ संचिकेवर १ दिवसात, तातडीच्या संचिकेवर ४ दिवसांत, खात्याअंतर्गत संचिकेवर ४५ दिवसात व विविध खात्यांशी संबंधीत ३ महिन्यांच्या आत निर्णय देणे बंधनकारक आहे, परंतू प्रत्यक्षात मात्र या कालमर्यादेचे पालन होत नाही, याबाबत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमामध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेले काम किंवा त्यांच्याशी संबंधीत काम पार पाडण्यात, कसूर

असुधारित प्रत

श्री. प्रकाश आबिटकर .....

केल्यास किंवा जाणूनबुजून किंवा हेतू पुरस्सर विलंब केल्यास महाराष्ट्र हक्क अधिनियम कलम १२ पोटकलम (१) अन्वये, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगांच्या कारवाईस पात्र राहतील अशी तरतूद असतानाही याबाबत कोणतीही कार्यवाही संबंधित विभागांकडून न होणे, राज्यात सदरील अधिनियमाचा भंग झाला असल्यास सर्वच विभागांमध्ये किती अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात आली आहे किंवा कसे, यासंदर्भातील माहिती देण्याची आवश्यकता, या सर्व बाबी विचारात घेता राज्यात सामान्य नागरीक, सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांना वेळेत लोकसेवा देण्याकरीता महाराष्ट्र लोक हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी शासनाने करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया.

श्री. दत्तात्रय भरणे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**(प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने राईट टु सर्व्हिस ॲक्ट मंजूर केला आहे. शासकीय कामांमध्ये दिरंगाई न होता पारदर्शी आणि विहित वेळेत लोकांची, जनतेची कामे व्हावीत, याकरिता हा महत्त्वाचा कायदा संमत केला आहे. राईट ऑफ इन्फॉर्मेशन हा कायदा जसा महत्त्वाचा आहे, तशाच प्रकारे राईट टु सर्व्हिस हा कायदा सुद्धा महत्त्वाचा आहे. शासकीय कामामध्ये विलंब होऊ नये याकरिता हा कायदा केलेला आहे. यानुसार शासकीय कामामध्ये विलंब केल्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्यामुळे प्रशासनाचे काम चांगले चालावे व कामामध्ये सुलभता यावी, यादृष्टीने हा कायदा संमत करण्यात आला आहे. परंतु दुर्दैवाने या कायद्याची ज्यांनी योग्य प्रकारे अंमलबजावणी करावयास हवी तेच लोक विलंब करीत असतात. यालाच दफ्तर दिरंगाईचा कायदा असेही म्हटले जाते. कोणत्याही साध्या संचिकेवर सात दिवसांमध्ये निर्णय घेणे बंधनकारक आहे. त्वरीत तात्काळ असलेल्या संचिकेवर एक दिवसामध्ये निर्णय घेणे बंधनकारक आहे. तातडीच्या संचिकेवर चार दिवसांमध्ये निर्णय घेणे बंधनकारक आहे. खात्यांतर्गत असलेल्या संचिकेवर ४५ दिवसांमध्ये निर्णय घेणे बंधनकारक आहे आणि विविध विभागाशी संबंधित असलेल्या संचिकेवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेणे बंधनकारक आहे.

अध्यक्ष महोदय, मी आमदार म्हणून काम करीत आहे. माझ्या जिल्ह्यातील जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग, उप संचालक कार्यालय, तहसिलदार कार्यालय आणि तलाठी यांच्याकडे लोकांच्या कामाची डायरीत नोंद करावयाची असेल तर लोकांना वेठीस धरले जाते. गैर पद्धतीने त्या अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे गेल्यानंतरच लोकांची कामे होतात. या सर्व गोष्टी अतिशय गंभीर आहेत. मला वाटते हा कायदा जर गंभीरपणे हाताळला तर राज्यातील जनतेचे प्रश्न सुटतील. या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली तर राज्यातील सर्व सामान्य लोकांना न्याय मिळेल. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना दोन ते तीन प्रश्न विचारु इच्छितो. या विषयाच्या अनुषंगाने राज्याच्या मुख्य आयुक्तांसोबत एक बैठक आयोजित करावी. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, आपले सरकार या पोर्टलवर काम सुरु असते. ऑनलाईन उत्तर

श्री. प्रकाश आबिटकर .....

द्यावे लागते. परंतु प्रत्येक व्यक्ती आपले सरकार पोर्टलवर प्रश्न मांडू शकत नाही. सामान्य व्यक्तीने शासकीय कार्यालयात एखाद्या कामासाठी अर्ज केल्यानंतर त्यावर तातडीने उत्तर द्यावयास हवे असते. परंतु कार्यालयाकडून उत्तर दिले जात नाही. याबाबतचा निर्णय संबंधित कार्यालयातून घेतला जात नाही.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.प्रकाश आबिटकर.....

अशा सर्व बाबींचा आढावा घेण्यासाठी मुख्य आयुक्तांसोबत आमची बैठक आयोजित करण्यात येईल का ? त्या बैठकीत राज्यातील संपूर्ण आढावा घेता येईल व अनेक प्रश्न मार्गी लागतील.

अध्यक्ष महोदय, यासाठी कोल्हापूर जिल्हा प्रायोगिक तत्त्वावर घेण्यात यावा. आम्ही आमदार म्हणून काम करताना आम्हाला बहुतेक काम हे लोकांना वेठीस धरणाऱ्या यंत्रणेविरोधातच करावे लागते. त्यामुळे कोल्हापूर जिल्हयातील सर्व विभागांमध्ये या कायद्यानुसार कार्यवाही होते किंवा कसे याचा प्रायोगिक तत्त्वावर आढावा घ्यावा. तसेच जे अधिकारी / कर्मचारी चुकीच्या पध्दतीने वागत असतील त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल का ?

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी राज्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंमलात आला. या अधिनियमांतर्गत ५०६ सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. या अधिनियमान्वये राज्यासाठी एक राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त आणि प्रत्येक महसुली विभागासाठी एकेक राज्य सेवा हक्क आयुक्तांची नेमणूक केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, या अधिनियमान्वये अर्ज केल्यानंतर प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन वेळा अपिल करण्याची तरतूद आहे. सन २०२०-२१ मध्ये १३ हजार ६८८ पैकी २४१ अपिल निकाली काढण्यात आले. तसेच द्वितीय अपिलामध्ये ९४ पैकी १७ अपिल निकाली काढण्यात आले. तृतीय अपिलामधील ४०६ पैकी ४०२ निकाली काढण्यात आले व प्रक्रियाधीन अपिले ४ आहेत.

अध्यक्ष महोदय, सन २०१५ मध्ये हा कायदा अस्तित्त्वात आला. दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीपर्यंतची आकडेवारी विचारात घेतली तर सुमारे ९ कोटी ७८ लाख ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ९ कोटी ४० लाख अर्जांवर संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी कारवाई केलेली आहे. त्याची टक्केवारी सुमारे ९६ एवढी आहे.

श्री.दत्तात्रय भरणे.....

अध्यक्ष महोदय, या संदर्भात बैठक आयोजित करावी अशी मागणी सन्माननीय सदस्यांनी केली आहे. त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, सर्व प्रमुख अधिकाऱ्यांसह कोल्हापूर येथे पहिली बैठक घेण्यात येईल.

तसेच या कायद्याची लोकांमध्ये जनजागृती होणे देखील अतिशय महत्त्वाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा विलंबानंतरच्या कारवाईबाबतचा मांडला. परंतु ती बाब दुसऱ्या कायद्याच्या अखत्यारित येते. दिलेल्या अर्जावर किती दिवसांमध्ये कारवाई झाली पाहिजे त्याबाबत कायद्यामध्ये तरतूद आहे. काही ठिकाणी विलंब होत आहे हे निश्चितपणे खरे आहे.

शेवटी मी एवढेच सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे कोल्हापूर येथे बैठक घेण्यात येईल.

श्री.राजेश पवार : अध्यक्ष महोदय, राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून विहित वेळेमध्ये सेवा मिळाली पाहिजे, हा या लक्षवेधी सूचनेचा विषय आहे. सरकारने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा आठवडा केला आहे. असे करताना सकाळी ०९.४५ ते सायंकाळी ०५.४५ ही कार्यालयीन वेळ ठरवून दिलेली आहे. परंतु माझ्या मतदारसंघातील नायगांव आणि उमरी या ठिकाणच्या पंचायत समिती आणि तहसिल कार्यालयांमध्ये मी सकाळी १०.३० वाजता गेलो असता तेथील ८० टक्के कर्मचारी गैरहजर होते. त्यासंदर्भात मी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देखील कल्पना दिली. परंतु त्यांनी या गैरहजर कर्मचाऱ्यांना साधी नोटीस देखील दिली नाही. त्यामुळे मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, यासंदर्भात माहिती घेऊन आपण संबंधितांवर कारवाई करणार का ? तसेच उमरी आणि धर्माबाद या ठिकाणी देवगिरी ट्रेनने कर्मचारी येतात. ग्रामसेवक आणि तलाठी मुख्यालयी राहत नसून ट्रेनच्या वेळेप्रमाणेच ये-जा करतात. त्यामुळे नांदेड जिल्हा व विशेषत: माझ्या नायगांव मतदारसंघातील या प्रश्नांच्या अनुषंगाने बैठक घेऊन संबंधितांवर योग्य कारवाई करणार का ?

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, या बाबत मी सभागृहाला एवढीच माहिती देऊ इच्छितो की, या बाबतीत माहिती घेऊन जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** या विषयाबाबत आपण बैठक आयोजित करावी.

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, यासंबंधी आपण मुंबईला एकत्रित बैठक आयोजित करु. परंतु लोकांना संदेश देण्यासाठी आणि या कायद्याची जनजागृती होण्यासाठी पहिल्यांदा आपण कोल्हापूरला बैठक आयोजित करु आणि त्या बैठकीला सन्माननीय सदस्यांना देखील आमंत्रित करण्यात येईल.

असुधारित प्रत

**पृ. शी.** बजाज वित्त संस्थेने स्थानिक पोलिसांच्या संगनमताने कॅन्सर रुग्णालय असलेला सुचीधाम संकुलातील बंगला बळकावून बेकायदेशीररित्या एन्कॅार कंपनीला विक्री केल्याबाबत.

**मु. शी.** बजाज वित्त संस्थेने स्थानिक पोलिसांच्या संगनमताने कॅन्सर रुग्णालय असलेला सुचीधाम संकुलातील बंगला बळकावून बेकायदेशीररित्या एन्कॅार कंपनीला विक्री केल्याबाबत या विषयासंबंधी श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सुनील प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृह मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील जागृती रुग्णालयाच्या प्रमुख प्रसिद्ध कर्करोग व गायनाकॉलॉजीस्ट विशेषज्ञ व मुंबईसह, देशभरात विविध रुग्णालयात गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या सुप्रसिदध डॉक्टर मिनल कांबळे यांची बजाज फिनसर्व्ह फायनान्स कंपनींने स्थानिक पोलिसांबरोबर संगनमत करुन कॅन्सर रुग्णालय म्हणुन सुरु असलेला त्यांचा सुचीधाम संकुलातील बंगला बळकावून बेकायदेशीररित्या एन्कॅार कंपनीला विक्री करुन आर्थिक घोटाळा केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजी निदर्शनास येणे, सदरहु महिला डॉक्टरने ३ कोटी ६ लाखापैकी ५० टक्के कर्ज अदा केले असतानाही डॉक्टर महिलेचे कॅन्सर रुग्णालय सुरु असलेला दिंडोशी, सुचीधाममधील बंगला बजाज फिनसर्व्ह फायनान्स कंपनीने कागदोपत्री कर्ज थकीत दाखवून, व मालमत्ता सर्फेसींग कायदा, १९८९ चे उल्लंघन व स्थानिक पोलिसांबरोबर संगनमत करुन व मा.न्यायालयाची दिशाभूल व फसवणुक करुन बंगला जप्तीचे आदेश मिळवून सदरहु महिला डॉक्टरचे हात बांधुन मारहाण करुन शारीरीक व मानसिक छळवणुक करुन सदरहु बंगला बेकायदा जप्त केल्याची

श्री. सुनील प्रभू...

धक्कादायक घटना घडणे, सदरहु प्रकरणी दिनांक ३१ मार्च, २०२१ व दिनांक ४ जून, २०२१ रोजी ॲट्रॉसिटी ॲक्ट अन्वये दाखल गुन्ह्यांवर पोलिसांनी, संबंधित २९

आरोपींना अटक करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणेबाबत अद्याप पोलिसांनी कोणतीच कार्यवाही न करणे, यासंदर्भांत दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संबंधित पोलिस अधिकारी यांनी शासनास सादर केलेला अहवाल चुकीचा व दिशाभूल करणारा आणि अर्धसत्य माहितीवर आधारीत असणे, राज्यातील महिलांना सुरक्षा प्रदान करणे व त्यांना न्याय देण्यासाठी नुकतेच आंध्रच्या धरतीवर शक्ती कायदा मंजुर केला असताना, कॅन्सर व गायनाकॉलॉजीस्ट तज्ञ डॉक्टरची मालमत्ता बळकावून त्यांचा मानसिक व शारीरीक छळ करुन झालेला अन्याय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री, शहरे) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, माझी या लक्षवेधी सूचनेच्या उत्तराला हरकत आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी शासनाच्या वतीने येथे जे उत्तर दिले आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, ही घटना माझ्या मतदार संघातील रहिवाशी डॉ.कांबळे यांच्या बाबतीत घडली आहे. त्या परदेशात उच्चशिक्षित अशा कॅन्सरवर रिसर्च करुन आलेल्या डॉक्टर आहेत. त्यांनी स्वत:चे कॅन्सर हॉस्पिटल व्हावे म्हणून हे बंगले विकत घेतले आहेत.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी शासनाने माहिती दिली आहे की, त्यांनी बजाज फायनान्सकडून कर्ज घेतले आणि त्यापैकी ३ कोटी ६ लाख रुपये इतकी रक्कम त्यांनी परतफेड केली आहे. परंतु उत्तरामध्ये असे दिले आहे की, त्यांनी आतापर्यंत कर्जाच्या परतफेडीचा एकही रुपया दिलेला नसल्यामुळे बजाज फायनान्सने ही केस खारीज करण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली. परंतु प्रकरण न्यायप्रविष्ट असताना आणि कोर्टात त्यांनी याबद्दल तक्रार केली असताना त्यांनी एन्कॉर कंपनीला मिळकत विकली तो गैरव्यवहार आहे. बजाज फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्यांवर ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे आणि त्या ॲट्रॉसिटी ॲक्टची कारवाई अद्याप प्रलंबित आहे. पोलिसांनी या डॉक्टर महिलेवर ज्या पध्दतीचे असहकार्य केले, सातत्त्याने विनवणी करुनही त्यांना सहकार्य करण्यात आले नाही. त्यामुळे फायनान्स कंपन्या आर्थिक व्यवहार करुन पोलीस खात्यातील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरुन अशा प्रकारचा बंगला गिळंकृत करण्याच्या दृष्टीने षड्यंत्र करतात, असे माझे मत आहे. म्हणून मंत्री महोदयांनी यावर किती दिवसाच्या आत कारवाई करणार, डॉक्टर कांबळे यांना न्याय कसा देणार आणि ॲट्रॉसिटी ॲक्टची कारवाई अद्याप प्रलंबित का आहे, आरोपीला अटक का झाली नाही, ती बजाज फायनान्स कंपनी आहे म्हणून ही कारवाई होत नाही काय, एन्कॉर कंपनीला ही जागा विकत घेण्याचा अधिकार नाही. आता एन्कॉर कंपनी त्या मिळकतीचे ई प्रणालीद्वारे लिलाव करु पाहत आहे. याबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे असा लिलाव करता येणार नाही. त्यामुळे मंत्री महोदयांनी यावर सविस्तर उत्तर देऊन त्या महिला डॉक्टरवर होत

असुधारित प्रत

असलेला न्याय दूर करुन सरकार म्हणून तिला कोणते संरक्षण देणार आहात, याचे मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे व तात्काळ कोणती कार्यवाही करणार ते सांगावे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, या प्रकरणात डॉक्टर मिनल कांबळे यांनी त्या ठिकाणी फ्लॅट घेतला होता. त्यांचे कर्जाचे हप्ते थकल्यामुळे सरफासी ॲक्टनुसार तो फ्लॅट ताब्यात घेण्यात आला. त्यामुळे हा फ्लॅट ए.आर.सी.कडे जातो. एखादे कर्ज थकले की, त्या बँका ए.आर.सी. नेमत असतात आणि ते ए.आर.सी.कडे जाते. डॉक्टर मिनल या उच्च न्यायालयात गेल्या होत्या. कोर्टामध्ये त्यांनी स्टेटमेंट केले आहे की, आम्ही "out of the Court settlement करतो." ते सेटलमेंट त्यांनी केले. त्यातील पहिला हप्ता देखील त्यांनी भरला. परंतु पुढचा हप्ता न भरल्यामुळे त्या मिळकतीचा ताबा बजाज फायनान्सने घेण्यासाठी पोलिसांना अर्ज केला आणि त्यानुसार पोलिसांनी त्यांना मदत करण्याची भूमिका घेतली.

अध्यक्ष महोदय, आज डॉक्टर मिनल कांबळे यांच्या बाबतीत बोलायचे झाले तर त्यांच्याकडे आर्थिक अडचणी आल्या असतील. परंतु तब्बल १०० वेळा त्यांनी कंट्रोल रुमला फोन केले असतील की मी आत्मदहन करणार आहे किंवा मी स्वत:ला काही तरी करुन घेणार आहे. त्यामुळे या पार्श्वभूमीवर पोलिसांनी सुध्दा त्यांच्यावर काही गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी त्यांच्यावर जवळपास ५ गुन्हे दाखल केले आहेत. ज्या सोसायटीमध्ये हा दवाखाना त्या सुरू करु इच्छितात त्या सोसायटीने सुध्दा त्यांच्यावर काही गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे या सर्व बाबींचा आपण तपास करीत आहोत. त्यांनी ॲट्रॉसिटीचा गुन्हा त्यांनी दाखल केला आहे. प्रोसेसप्रमाणे आपण जातीचा दाखला उपलब्ध करुन घेत आहोत. मागच्या महिन्यात या सर्व बाबी पूर्ण झाल्या आहेत आणि येत्या ८-१० दिवसांमध्ये याची चार्जशीट किंवा संबंधित प्रक्रिया पोलीस निश्चितपणे पूर्ण करतील. ॲट्रॉसिटीच्या बाबतीत आपल्याला दाखला उपलब्ध करावा लागतो. त्यांचे मूळ गाव माढा असल्यामुळे

तेथून जातीचा दाखला उपलब्ध करुन घेतला आहे. मागच्या १० दिवसांपूर्वी तो दाखला मिळालेला आहे आणि म्हणून पुढील प्रक्रियेनुसार त्याबाबतची कार्यवाही पूर्ण होईल.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, हा अत्यंत गंभीर स्वरुपाचा हा प्रश्न आहे आणि मंत्री महोदय उत्तर देताना सांगितले की, ज्या तक्रारकर्त्या आहेत, ज्या व्हीक्टीम आहेत, त्यांच्यावरच गुन्हे दाखल केले आहेत. हे रॅकेट चालते. या फायनान्स कंपन्या कर्ज देतात आणि एखादा हप्ता थांबला तरी पोलीस आणि ते एकत्र येऊन त्या संदर्भातील जबदरस्तीने, बळजबरीने कारवाई करतात. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, एक महिला डॉक्टर, अनुसूचित जातीमधील डॉक्टर आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणामध्ये पोलिसांची भूमिका संशयास्पद राहिली आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री.अतुल भातखळकर....

या संपूर्ण प्रकरणामध्ये पोलिसांची भूमिका संशयास्पद राहिलेली आहे. त्यामुळे मुंबईतील एखादे वरिष्ठ आयपीएस अधिकारी नेमून या प्रकरणामध्ये प्रत्येकाची भूमिका योग्य आणि कायद्याला धरून आहे किंवा नाही अशी चौकशी करण्याचे आदेश माननीय मंत्री देणार काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, कर्जाचे हप्ते फेडण्यात आले नाहीत, असे माननीय मंत्री म्हणाले. कोविडच्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये संपूर्ण अर्थव्यवस्था ढासळलेली आहे. अशा वेळेला त्यांनी फायनान्स कंपनीला विनंती केली की, माझी आर्थिक परिस्थिती खराब आहे त्यामुळे मी हप्ता देऊ शकत नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर म्हणाले त्याप्रमाणे या फायनान्स कंपन्या रॅकेट करुन अशा प्रकारे प्रॉपर्टी ताब्यात घेऊन ज्या पद्धतीने काम करतात त्यातील हा खूप मोठा गुन्हा आहे. केवळ डॉ. मिनल कांबळे या गुन्हेगार आहेत, असे दाखवून पोलिसांची मदत घेऊन त्यांच्यावर दबाव आणून हा बंगला ताब्यात घेण्याच्या दृष्टीने जी कार्यवाही सुरु आहे त्यामध्ये पोलीस सहभागी आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर यांनी जी मागणी केली त्याप्रमाणेच माझी मागणी आहे की, एका वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यामार्फत या विषयाची चौकशी करण्यात यावी आणि डॉ. कांबळे यांना न्याय देण्यात यावा. कारण त्या दलित समाजाच्या आहेत. माननीय मंत्र्यांनी याबाबत निर्देश द्यावेत, अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, दोन्ही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे वस्तुस्थिती आहे. मध्यंतरीच्या काळात आपण बघितले की, फायनान्स कंपन्यावरच आयकर विभागाच्या चौकशा आल्या. एआरसीकडे प्रॉपर्टी द्यायची आणि मग ती तिसऱ्या पार्टीकडून विकत घ्यायची अशा घटना देशामध्ये घडत असतानाचे दुर्दैवाने दिसत आहे. त्यामुळे या सर्वांची चौकशी करणे अभिप्रेत आहे. आता कोविडचे कारण आहे परंतु सन २०१६ पासून हे कर्ज प्रकरण थकीत आहे. त्यामुळे डॉ. मिनल कांबळे यांच्यावर ज्या केसेस झालेल्या आहेत त्या

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील....

सोसायटीने केलेल्या आहेत. तरी देखील सन्माननीय सदस्यांच्या मागणीप्रमाणे वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या माध्यमातून एक वेगळी चौकशी करण्याची भूमिका शासन घेईल.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांच्यावर कारवाई करणे

**मु.शी.:** जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांच्यावर कारवाई करणे या संबंधी श्री. चंद्रकांत निंबा पाटील वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जळगांव जिल्हयातील मुक्ताईनगर तालुका महाराष्ट्र राज्य व मध्यप्रदेशच्या सीमारेषेवर असल्याने या भागात परप्रांतीयांचे अवैध धंदे सुरु असून त्या माध्यमातून तालुक्यातील गुन्हेगारी वाढत असल्याचे निदर्शनास येणे, गेल्या काही काळापासून पोलिसांच्या दुर्लक्षामुळे किंवा आर्थिक हितसंबधामुळे आदिशक्ती श्री संत मुक्ताईच्या पुण्यभूमीमध्ये गुन्हेगारी वाढतांना दिसून येणे, तसेच गावठी कट्टे, हत्यारांची तस्करी, शहरातील भर चौकात तीक्ष्ण हत्यारांचे वार, अवैधरित्या बंदुकीच्या माध्यमातून दहशत माजविण्याचे प्रकार, इतर तालुका व जिल्हयातील तडीपार, मोक्का लावलेल्या गुन्हेगारांचा मुक्त संचार, मागील काळात एका गुन्हेगारांकडे गावठी कट्टा आढळून आल्याबाबतचे प्रकरण दडपण्यात येणे, दिनांक ६ नोव्हेंबर, २०२१ रोजी मुक्ताईनगर तालुक्यातील हलखंडा येथे जबरी दरोडा टाकून एका व्यक्तीचा खून होणे, त्याच दिवशी याच तालुक्यातील कोथळी या गावात श्री. विनोद शिंदे यांच्याकडे दरोडा, दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी कुऱ्हा, ता.मुक्ताईनगर येथे दिनेश जयस्वाल यांचे घरावर दरोडा, गेल्या महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी मुक्ताईनगर शहरात अवैध बनावट दारु विक्रेत्यावंर कारवाई करणे तसेच याच तालुक्यात अवैध बनावट दारुचा कारखाना सुध्दा उध्दवस्त करण्यात येणे, परंतु पोलिस निरिक्षकांकडून आजपावेतो अशी कुठलीच कारवाई होताना दिसत नसल्याने

श्री.चंद्रकांत निंबा पाटील....

या अवैध धंदे व अवैध बनावट दारु विक्रेत्यांशी अर्थपूर्ण संबंध असल्याचा सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण होत असलेला संशय, याकरिता शासनाने मुक्ताईनगर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई.''

श्री. शंभुराज देसाई (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.चंद्रकांत निंबा पाटील : अध्यक्ष महोदय, मी लक्षवेधी सूचनेमध्ये म्हटल्याप्रमाणे माझ्या मुक्ताईनगर मतदारसंघाकडे आपले लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे. मधल्या काळात मी आयजी, डीजी आणि माननीय मुख्यमंत्र्यांना या संदर्भात सर्व वस्तुनिष्ठ माहिती दिल्यानंतरही आजपर्यंत या अधिकाऱ्यांवर कारवाई झालेली नाही. जळगाव जिल्ह्यातील इतर यंत्रणा म्हणजे स्थानिक गुन्हे शाखा तसेच राज्य उत्पादन शुल्क शाखा तिथे येऊन कारवाया करतात. बनावट दारुचे लाखो रुपयांचे मद्य पकडते. पण मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक या संदर्भात दुर्लक्ष करतात. मधल्या काळात मी सांगितले की, तिथे नागमणीच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील एका व्यक्तिचा खून झाला. एवढी महत्त्वाची घटना म्हणजे दरोडा आणि खून झाल्यानंतरही आजपर्यंत त्या अधिकाऱ्याला इथून काढून टाकण्यात आले नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, त्या अधिकाऱ्यावर आता या क्षणी शासनाच्या माध्यमातून त्या अधिकाऱ्याला निलंबित का केले जात नाही ?

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मुक्ताईनगर येथे घडलेल्या दरोडयाचा प्रकार आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेली दारुवरील कारवाई याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. दारुबंदीच्या संदर्भात सन २०२० मध्ये ८४ गुन्हे दाखल केले होते. सन २०२१ मध्ये १०५ गुन्हे दाखल केलेले आहेत. तसेच जुगाराच्या बाबतीत सन २०२० मध्ये २५ गुन्हे होते आणि सन २०२१ मध्ये ३६ गुन्हे दाखल केले होते. सन्माननीय सदस्यांनी त्या ठिकाणी असणाऱ्या नागमणीचा उल्लेख केला. तसेच हलखंडा येथील रस्त्यावर मारहाण झाली त्यामध्ये ९ पैकी ६ आरोपींना अटक केलेली आहे. वरच्या तीन आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक पोलीस आणि जिल्ह्यातील इतर यंत्रणा प्रयत्न करीत आहेत. मुक्ताईनगरच्या हद्दीमध्ये तडीपारीचे प्रस्ताव मी मघाशी सांगितले होते. सन सन २०२० मध्ये असा कोणताही प्रस्ताव नव्हता. सन २०२१ मध्ये एक तडीपारीचा प्रस्ताव दिलेला आहे. मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांच्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, उप विभागीय पोलीस अधिकारी यांची

श्री. शंभुराज देसाई....

तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केलेली आहे. चौकशीमध्ये संबंधीत अधिकारी कुठेही दोषी आढळलेले नाहीत.

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहाची वेळ ५ मिनिटांसाठी वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, एलसीबी यांनी मुक्ताई नगरला येऊन कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेने जळगाव जिल्ह्यात येऊन कारवाई केली. मात्र मुक्ताईनगर पी.आय यांनी कारवाई केली नाही. हे अंतर केवळ ५०० मी आहे. एक्साईज विभागाने कारवाई केली, मात्र पी.आय यांनी कारवाई केली नाही. नागमणीच्या अशा अनेक घटना घडल्या आहेत. यामध्ये अनेकांचे जीव गेलेले आहेत. यांनी केवळ आरोपींना अटक करायचे व त्या लोकांना पुन्हा हे धंदे करण्यास मोकळे सोडायचे काय ? हा गंभीर विषय आहे. या पोलीस निरीक्षकावर निलंबनाची कारवाई होणार आहे काय ?

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, या अधिकाऱ्याची डीवायएसपी यांनी चौकशी केली आहे. या चौकशीमध्ये ते दोषी आढळून आले नाहीत. सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नसेल तर दुसऱ्या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांकडून या अधिकाऱ्याची पुन्हा चौकशी करु. १५ दिवसात चौकशी करुन, जर ते दोषी आढळून आले तर त्यांची इतरत्र बदली केली जाईल.

श्री. किशोर जोरगेवार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी छापील उत्तर दिले आहे. सदनात त्यांनी असे सांगितले की, सन २०२० मध्ये ८४ गुन्हे झाले सन २०२१ मध्ये १०४ गुन्हे झाले. याकडे बारकाईने लक्ष दिले तर असे दिसून येईल की, सन २०२१ मध्ये १०४ गुन्हे झाले असून आरोपी देखील १०४ आहेत. हे ठरवून केल्या सारखे आहे. ८ लाख रुपयांचा मुद्देमाल पकडला गेला आहे. ८ हजार रु. प्रती केस याप्रमाणे ही रक्कम दाखवली आहे. सन २०२१ -२२ मध्ये गुन्हे १२१ आहेत. दर वर्षी २० गुन्ह्यांची वाढ ठरवून झालेली दिसत आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री. किशोर जोरगेवार : अध्यक्ष महोदय, पोलीस स्टेशन मधील अधिकाऱ्याच्या बाबत माझा जो आक्षेप आहे, तो योग्य आहे. सर्व सन्माननीय सदस्यांची विनंती आहे. या अधिकाऱ्याविषयी आमचा आक्षेप आहे. या पोलीस निरीक्षकाला तत्काळ बदलले पाहिजे.

ॲड. आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य पोटतिडिकीने आपल्याला सांगत आहेत. या सदनाला सहवेदना आहे की, नाही ? माझा प्रश्न आहे. जर एक अधिकारी दीड वर्षापासून तेथे आहे. या संबंधी त्याची बदली करुन चौकशी करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांना आपण न्याय द्यावा. त्यांनी हा विषय येथे उपस्थित केलेला आहे. संबंधित अधिकाऱ्याची बदली करुन चौकशी करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, या प्रकरणाची चौकशी केली होती. त्या बाबत समाधान झाले नसल्यास शेजारच्या जिल्ह्यातील दुसऱ्या अधिकाऱ्यामार्फत या पी.आय यांची चौकशी केली जाईल. ( अडथळा ) या प्रकरणामध्ये १५ दिवसाच्या आत चौकशी करुन सन्माननीय सदस्यांची जी तक्रार असेल त्याचा चौकशीमध्ये समावेश करु. दरम्यानच्या काळात तातडीने या अधिकाऱ्याची तेथून बदली केली जाईल.

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक ७ बाबत.</u>

**तालिका सभाध्यक्ष** : आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्र. ७ पुढे ढकलण्यात येत आहे.

---------

**तालिका सभाध्यक्ष** : आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सकाळी १०.४९ ते ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली)

---------

असुधारित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**( अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष )**

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, ....

**उपाध्यक्ष** : माननीय विरोधी पक्ष नेते आपले काय म्हणणे आहे?

**विधान परिषदेचे माननीय विरोधी पक्ष नेते**

**यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याबाबत**

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, या विधानमंडळाचे सन्माननीय सदस्य व विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांच्याबाबत मी कालच हे सांगितले होते की, सरकार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे षडयंत्र करीत आहे. आज त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. ते मजूर संस्थेचे अध्यक्ष होते म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

अध्यक्ष महोदय, या महाराष्ट्रातील कुठलीही मजूर संस्था पहा. त्यामध्ये अर्धे आमदार आहेत. त्यामध्ये सर्व पक्षाचे आमदार आहेत. सर्व पक्षाचे आमदार मजूर संस्थेचे अध्यक्ष आहेत. आपण कुठल्याही बँकेमध्ये मजूर संस्थेमध्ये निवडून आलेले कोण आहेत ते पहावे. ते कोणत्या तरी राजकीय पक्षाचे नेते असतात. मागच्या वेळेस आम्ही बोललो तेव्हा स्वत: माननीय अजितदादांनी मंजूर केले. ते म्हणाले की, हो हे खरे आहे की, या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य हे मजूर संस्थांचे अध्यक्ष आहेत. तरी देखील सूडाच्या भावनेने विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याकरिता अशा प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, ठीक आहे. आम्ही न्यायालयात जाऊ. आम्ही घाबरत नाही. मला माहिती आहे की, तुम्ही कारवाई कराल. काही हरकत नाही. विरोधी पक्ष नेत्यांवर अशा प्रकारे कारवाई होणे असे या सभागृहाच्या इतिहासामध्ये कधी घडले नव्हते. त्यामुळे सरकारला जर असे वाटत असेल की, माननीय श्री.प्रवीण दरेकर यांच्यावर अशा प्रकारचा गुन्हा दाखल करुन तुम्ही आमचा आवाज दाबू शकाल तर

श्री.देवेंद्र फडणवीस ...

तुम्ही तो दाबू शकणार नाही. आमचा आवाज बुलंद राहील. आम्ही विषय मांडू. आज पासून आम्ही सरकारला प्रत्येक ठिकाणच्या मजूर संस्थेचे अध्यक्ष कोणकोण आहेत याची यादी देखील देणार आहोत. मग पाहू की, हे सरकार कोणाकोणावर एफ.आय.आर. दाखल करते ते. अन्यथा या सरकारच्या विरुध्द आणि त्या सर्वांच्या विरुध्द आम्ही न्यायालयात जाऊ.

अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे हे चुकीचे होत आहे. हे बरोबर नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, आम्हाला या संदर्भात माहिती मिळाली पाहिजे. आमचा अधिकार आहे. सरकारने आम्हाला माहिती द्यावी, या संदर्भात आपण निदेशित करावे.

..........

श्री.बालाजी कल्याणकर : अध्यक्ष महोदय, ...

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपले काय म्हणणे आहे?

## माहितीचा मुद्दा

श्री.बालाजी कल्याणकर : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न फार गंभीर आहे. हा तुमचा तसेच सर्व सन्माननीय सदस्यांचा देखील प्रश्न आहे. विजेचा प्रश्न आहे. महावितरणच्या विजेच्या प्रश्न आहे. मंत्री महोदय आता सभागृहात उपस्थित नाहीत. ... (अडथळा)...

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

अध्यक्ष महोदय, विजेचा प्रश्न आहे. भुईमुग, ऊस व हरभरा या पिकांची आता लागवड झालेली आहे. विजेचे कनेक्शन खंडित करण्यात आलेले आहे. मी एकच सांगतो की, महावितरण कंपनी आडमुठेपणा करीत आहे. महावितरण कंपनीला आदेश द्यावेत की, आजच्या आज विजेचे कनेक्शन जोडून देण्यात यावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री.बालाजी कल्याणकर ...

अध्यक्ष महोदय, हा सर्व सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. आज शेतकरी हैराण झालेले आहेत. मार्च महिन्यामध्ये त्यांना पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी देणे आवश्यक आहे. शेतकरी आज हैराण झालेले आहेत. मंत्री महोदयांना सांगण्यात यावे की, आताच्या आता विजेचे कनेक्शन्स जोडण्यात यावेत. सर्व सन्माननीय सदस्यांच्या दृष्टीने हा महत्वाचा प्रश्न आहे. हा शेतकऱ्यांचा प्रश्न आहे, हा तुमचा प्रश्न आहे, माझा प्रश्न आहे .... (अडथळा)...

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत, त्याला आमचे समर्थन आहे. सन्माननीय सदस्य जे बोलत आहेत ते बरोबर आहे. आम्ही त्यांना समर्थन देत आहोत. परंतु, या ठिकाणी आपण पहा की, श्री.गुलाबराव देवकर हे आजही जळगाव मजूर संस्थेचे चेअरमन आहेत. ते राष्ट्रवादीचे नेते आहेत. माझी विनंती आहे, मी आधी विषय मांडलेला आहे. त्या विषयावर आपण सरकारला निदेश द्यावेत. आपण या संदर्भात सरकारला निदेश तरी दिले पाहिजेत.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, या सर्व परिस्थितीवर माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्या बाबतीत सरकार दखल घेऊन, याबाबतीत आपले निवेदन गृह मंत्री महोदय आपणांस माहिती घेऊन देतील.

..........

यानंतर श्री.शिंदे ...

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य यांनी आपल्या आसनावर बसावे.

श्री.बालाजी कल्याणकर : अध्यक्ष महोदय, शेतकरी हवालदिल होत आहेत. त्यांची वीजेची जोडणी खंडित केली आहे ती पुन्हा जोडून देण्यात यावी. हा सर्वात मोठा प्रश्न आहे. माझी विनंती आहे मंत्री महोदयांना निदेश देण्यात यावेत की, सदरहू शेतकरी यांची वीज जोडणी आता तत्काळ जोडून देण्यात यावी.

श्री.चंद्रकांत (दादा) पाटील : अध्यक्ष महोदय, काल सभागृहामध्ये शेतकऱ्यांची वीज जोडणी खंडित करणे, खाजगी वीज कंपन्यांकडून भरमसाठ वीज देयक आकारणे, यासंदर्भात तीन प्रश्न व एक लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे. मी आपणास विनंती केली होती की, अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून हा विषय गळ्याशी आलेला आहे व तो जिकीरीचा झाला आहे. लोक आत्महत्या करीत आहेत, फेसबुक लाईव्ह करुन आत्महत्या करीत आहेत. आपण "वीजेचे प्रश्न" या विषयाच्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा करण्याचे मान्य केले होते. सदरहू चर्चा पुढील आठवड्यात केव्हा तरी करणे उचित नाही. कारण रोज यासंदर्भात घटना घडत आहेत. आज सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून उक्त विषयावर चर्चा सुरु करण्यात यावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, वीजेच्या प्रश्नांवर सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. आज शेतकरी अडणीत आहे. वीज जोडणी खंडित करणे तत्काळ बंद करण्यात यावे. अधिवेशन सुरु असताना अशा प्रकारे वीज जोडण्या खंडित करण्यात येत आहेत. कालही आत्महत्या झाली, परवा दिवशी आत्महत्या झाली आहे, रोज आत्महत्या होत आहेत. आत्महत्या होत असताना राज्य सरकार सावकारी वसुली करीत आहे,

श्री.देवेंद्र फडणवीस...

ती बंद झाली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत वीज जोडण्या खंडित करणे बंद केले पाहिजे. त्यासंदर्भात आता सभागृहात घोषणा करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, वीज जोडण्या खंडित करणे बंद करण्यात यावे, असे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे मत आहे. सन्माननीय सदस्य यांनी मांडलेल्या विषयाला आमचे समर्थन आहे. सरकारने आता घोषणा करावी व वीज जोडणी खंडित करणे तत्काळ बंद करावे, अशी विनंती आहे. तोपर्यंत सभागृहाचे कामकाज थांबविण्यात यावे.

**उपाध्यक्ष** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी ११.०८ ते ११.१३ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)**

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**<u>पॉईंट ऑफ ऑर्डरबाबत</u>**

श्री.अनिल पाटील : अध्यक्ष महोदय, सरकारने उचललेल्या पावलाच्या अनुषंगाने माननीय विरोधी पक्षनेता यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यांनी दिलेल्या माहितीबाबत मला खेद वाटतो आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता यांनी जळगाव जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन श्री.गुलाबराव देवकर यांचा उल्लेख केलेला आहे. या सरकारने माननीय श्री.प्रवीण दरेकर यांच्यावर कारवाई केलेली आहे. माननीय श्री.प्रवीण दरेकर हे मजूर संस्थेचे मजूर सभासद आहेत. माननीय विरोधी पक्ष नेता यांनी जी भूमिका मांडलेली आहे, त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, माननीय श्री. गुलाबराव देवकर हे कोणत्याही मजूर संस्थेचे सभासद नाहीत. माननीय श्री.प्रवीण दरेकर हे मजूर संस्थेचे सभासद आहेत. या मजुराकडे २ कोटी रुपयांची गाडी आहे. ५० कोटी रुपयांच्या बंगल्यामध्ये राहणारा असा उत्कृष्ट मजूर (गोंधळ...) तो योग्य आहे. माननीय श्री.गुलाबराव देवकर यांच्याबाबत केलेला उल्लेख १०० टक्के असत्य स्वरुपाचा आहे, असे मी माननीय विरोधी पक्ष नेता यांना सांगू इच्छितो.

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे ती सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थिगत करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी ११.२० ते ११.३५ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. दीपक चव्हाण)**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ऊर्जा विभागाच्या प्रश्नांवर सर्व सन्माननीय सदस्यांची भावना अतिशय तीव्र आणि योग्य आहे. त्यासाठी सरकारकडून लवकरात लवकर या विषयावर चर्चा घडवून आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आज अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा कामकाजात दर्शविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नियम २९३ अन्वयेचा प्रस्तावही आजच्या कामकाजामध्ये आहे. हे कामकाज सुरु करु द्यावे. मी सांगू इच्छितो की, ऊर्जा विभागाच्या प्रश्नांवर लवकरात लवकर सभागृहात चर्चा घडवून आणली जाईल. याकरिता योग्य व्यवस्था केली जाईल. परंतु आता सभागृहाचे पुढील कामकाज सुरु करु द्यावे. आता प्रश्नोत्तरे चर्चेला घेतली जातील.

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**पृ.शी./मु.शी. :** तोंडी उत्तरे

**राजमाता जिजाऊ रुग्णालयात◌ील (नवी मुंबई) वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाबाबत**

**(१) * ३८३७१ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईच्या ऐरोली येथील साईनाथवाडी परिसरातील श्रीमती जागृती तायडे ही महिला नवी मुंबई महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ रुग्णालयात प्रसुतीकरिता दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी दाखल झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रसुती पश्चात दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी रुग्णालयातून घरी सोडण्यात आल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी पोटात तीव्र वेदना होऊन पुन:श्च त्याच रुग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीअंती प्रसुती शस्त्रक्रिये दरम्यान टाकण्यात आलेले टाके काढून पोटातून कापसाचा गोळा बाहेर काढण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाबाबत सदर महिलेच्या पतीने आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका तसेच रबाळे पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल करुन, सदर प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने तसेच पोलिस विभागाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ रूग्णालय, ऐरोली येथे दि.१४.०१.२०२१ रोजी श्रीमती जागृती रणजित तायडे या महिलेची नैसर्गिक प्रसुती झाली, हे खरे आहे.

ता.प्र.क्र. ३८३७१.....

श्री. एकनाथ शिंदे.....

(२) सदर महिलेची नैसर्गिक प्रसुती झाली असून कुठलीही शस्त्रक्रिया (LSCS) झालेली नाही.

सदर महिलेस दि.१७.०१.२०२१ रोजी डिस्चार्ज देताना कोणत्याही प्रकारचा त्रास जाणवत नव्हता. तथापि, दि.१८.०१.२०२१ रोजी सदर महिलेच्या पोटात दुखत असल्याने पुनश्च: रूग्णालयात दाखल झाली.

सदर रूग्णाची तपासणी केली असता Episiotomy Resuture ची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आल्याने रूग्णावर तसे उपचार करण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) अशा प्रकारची तक्रार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कर्तव्यावर असणाऱ्या स्त्रीरोग तज्ञ यांना नोटीस देण्यात आली.

याबाबत संबंधित डॉक्टरचा खुलासा घेण्यात आला असून खुलाशावरून तक्रारीत तथ्य नसल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

श्रीमती सरोज अहिरे : अध्यक्ष महोदय, ( ....अडथळा...)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

असुधारित प्रत

श्री. महेश शिंदे : अध्यक्ष महोदय, मागील अधिवेशनामध्ये निवेदन करण्यात आले होते की, कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांच्या कृषि पंपाची वीज तोडली जाणार नाही. परंतु आता सर्व ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बंद करुन शेतकऱ्यांवर अन्याय केला जात आहे. अशा प्रकारे चुकीचे काम करण्यात येत आहे. माझी माननीय ऊर्जा मंत्र्यांना विनंती आहे की, या विषयाच्या अनुषंगाने तातडीने सभागृहामध्ये माहिती दिली पाहिजे. सर्वप्रथम राज्यातील शेतकऱ्यांची वीज तोडणी बंद झाली पाहिजे. याबाबत निवेदन करावे, अशी मी विनंती करतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री. बालाजी कल्याणकर : अध्यक्ष महोदय, मी माझ्या वैयक्तीक हितासाठी काहीही मागत नाही. शेतकरी आपले मायबाप आहेत. शेतकऱ्यांची वीज तोडणी बंद झाली पाहिजे. तोडण्यात आलेले वीज कनेक्शन जोडून देण्यात यावे. तसेच या विषयाचे श्रेय कोणीही घेऊ नये. हा शेतकऱ्यांचा प्रश्न आहे.

ॲड. अनिल परब : अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांचा प्रश्न अतिशय ज्वलंत आहे. या सभागृहात लवकरात लवकर वीज या विषयावर सभागृहामध्ये चर्चा घडवून आणली जाईल. या चर्चेअंती शासन योग्यतो निर्णय घेईल.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, अधिवेशनाचा दुसरा आठवडा आता सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. बालाजी कल्याणकर आणि सन्माननीय सदस्य श्री. महेश शिंदे यांनी सांगितल्यानुसार मागील अधिवेशनात माननीय उप मुख्यमंत्री यांनी स्वत: घोषणा केली होती, की मे महिन्यापर्यंत शेतकऱ्याचे वीज कनेक्शन कापले जाणार नाहीत. कालही सांगण्यात आले की, यावर चर्चा केली जाईल. हे सरकार कशावर चर्चा करणार आहे ? रोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. बालाजी कल्याणकर यांनी सांगितल्याप्रमाणे आम्हाला या विषयाचे श्रेय नको. हे श्रेय कोणीही घ्यावे. ते शेतकऱ्यांना द्यावे. परंतु तात्काळ शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापणे बंद करावे. कालही आणि परवाही शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. शेतकरी फेसबूक लाईव्हच्या माध्यमातून आत्महत्या करीत आहेत. हा केवळ विरोधी पक्षाचा विषय नाही. सर्व सभागृहाचे यावर एकमत आहे. माझे म्हणणे असे

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस .....

आहे की, या विषयाच्या श्रेयात विरोधी पक्षाचे नावही घेऊ नये. सत्तारुढ पक्षाने मांडलेल्या प्रस्तावाला तरी किमान प्रतिसाद द्यावा. त्यांचे नाव घेऊन सांगावे की, शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तात्काळ कापणे बंद केले जाईल. शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडणे बंद केले जाईल, असे सरकारने सांगावे.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय विरोधी पक्षनेता यांना सांगू इच्छितो की, आता मंत्री महोदयांनी सभागृहाला अश्वस्थ केले आहे. या विषयावर लवकरात लवकर चर्चा आणली जाईल, असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे आता सभागृहाचे कामकाज करु द्यावे. लवकरात लवकर या विषयावर चर्चा घडवून आणली जाईल, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. त्यामुळे सभागृहाचे पुढील कामकाज सुरु करु द्यावे. (....अडथळा...)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी ११.४० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)**

**तालिका सभाध्यक्ष :** आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी. / मु.शी. :** तदर्थ संयुक्त समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती आदिती तटकरे (विधी व न्याय राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने, "मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना (ज्यात शुश्रुषालय, प्रसुतीगृह, दवाखाने किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो) शासनातर्फे देण्यात आलेली सवलत, मदत, सूट, माफी, इत्यादी आणि या रुग्णालयांमार्फत निर्धन व समाजातील दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया, इत्यादींसाठी करण्यात येणारा खर्च या संदर्भात सखोल तपासणी करुन शासनास शिफारशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या तदर्थ समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी पुणे येथे दिलेल्या भेटी संदर्भातील" अहवाल सभागृहास सादर करते.

**तालिका सभाध्यक्ष :** अहवाल सभागृहास सादर करण्यात आला आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे.

श्री.नरेंद्र भोंडेकर (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता समितीची बैठक झाली.

अशासकीय कामकाजासाठी एकूण अडीच तासांचा वेळ उपलब्ध आहे. विधानसभेकडे पुर:स्थापनार्थ एकूण ०५ अशासकीय विधेयके आहेत. त्यांना १५ मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित १३५ मिनिटांचा वेळ पुढीलप्रमाणे अशासकीय ठरावांना देण्यात यावा.

| | |
|---|---|
| १. श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांचा ठराव क्र.९ | : ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| २. श्री.राजेश एकडे, वि.स.स. यांना ठराव क्र.१८५ | : ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ३. श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. यांचा ठराव क्र.२५५ | : ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात यावा, अशीही समितीने शिफारस केली आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे दुसरे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र भोंडेकर : अध्यक्ष महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे दुसरे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----------

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य हौदात येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी. / मु.शी.** : स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** आज प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सर्व सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

---------

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य हौदात येऊन घोषणा देतच असतात.)

**घोषणा**

**तालिका सभाध्यक्ष :** सर्व माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात आनंद होत आहे की, या सचिवालयातील सीपीए/राजशिष्टाचार कक्षामार्फत तयार करण्यात आलेले "महाराष्ट्र विधानसभा मार्गदर्शिका" हे पुस्तक माननीय विधानसभा सदस्यांना; हजेरीपट ठेवण्यात आलेल्या ठिकाणी आज मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी वितरित करण्यात येत आहे. तरी सर्व माननीय सदस्यांनी आपल्या अभ्यासासाठी तसेच संदर्भासाठी सदर पुस्तक अवश्य प्राप्त करावे, अशी विनंती आहे. "महाराष्ट्र विधानसभा मार्गदर्शिका" या पुस्तकाचे संदर्भमुल्य लक्षात घेता सदर उपयोगी पुस्तक सर्वांना माहिती तसेच संदर्भासाठी कोणत्याही वेळी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या पुस्तकाची पी.डी.एफ. स्वरुपातील प्रत महाराष्ट्र विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात येत आहे. याचा माननीय सदस्यांनी अवश्य लाभ घ्यावा.

सदर पुस्तकात काही त्रुटी आढळल्यास त्याबाबत पुढील आवृत्तीत अवश्यपणे सुधारणा करण्यात येईल. पुस्तकाची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने माननीय सदस्यांच्या काही सूचना / सुधारणा असल्यास त्याचे देखील निश्चितच स्वागत केले जाईल.

------------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य हौदात येऊन घोषणा देतच असतात.)

## घोषणा

**तालिका सभाध्यक्ष :** नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांसाठी लोकसभा सचिवालयातील "पार्लमेंटरी रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट फॉर डेमॉग्रसीस" (PRIDE) या प्रशिक्षण संस्थेतर्फे संसद भवन, नवी दिल्ली येथे संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन दिनांक ५ व ६ एप्रिल, २०२२ रोजी करण्यात आले आहे. या अभ्यासवर्गासाठी समन्वयाची जबाबदारी राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा व वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, विधान भवन, मुंबई यांच्याकडे आहे.

या संसदीय अभ्यास वर्गात सहभागी होण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांनी आपली नावे कळविली आहेत त्यांनी दिनांक ५ व ६ एप्रिल, २०२२ रोजी लोकसभा सचिवालया, नवी दिल्ली येथे होणाऱ्या या अभ्यास वर्गाची नोंद घ्यावी.

------------

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य हौदात येऊन घोषणा देतच असतात.)

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, खरं म्हणजे वीजेच्या प्रश्नावर चर्चा होणे अपेक्षित आहे. त्याचवेळी महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनने मंगळवार दिनांक १५ मार्च २०२२ पासून आझाद मैदान येथे माजी विधान परिषद सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे धरणे आंदोलन सुरू केले आहे. त्याकडे सरकारने लक्ष द्यावे. पण सर्वात महत्त्वाचे असे आहे की, जोपर्यंत वीजेच्या संदर्भात निर्णय होत नाही तोपर्यंत आमच्या सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदार संघात जायचे कसे ?

अध्यक्ष महोदय, आज मतदार संघामध्ये गेल्यानंतर कोणत्याही आमदाराला शेतकरी विचारतात की, आमच्या तोडलेल्या वीजेच्या जोडण्या कधी जोडणार आहात, हा प्रश्न विचारला जातो. रोज फेसबुक लाईव्ह करुन प्रश्न विचारला जातो की, शेतकरी आत्महत्त्या करतो आहे त्या शेतकऱ्याला न्याय मिळणार आहे काय, इतके दिवस झाले आहेत. आम्ही काय मागणी करीत आहोत... आम्ही एवढीच मागणी करतोय की राज्याचे सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी या सभागृहाच्या पटलावर घोषणा केली होती की, मे २०२२ पर्यंत एकही वीजेचे कनेक्शन कापणार नाही. मग अशा परिस्थितीत त्या घोषणेचे काय झाले ? या सभागृहाला काही अधिकार आहेत की नाहीत. या सभागृहाचे काही विशेष हक्क आहेत की नाहीत. या सभागृहाची काही सायन्टीटी आहे की नाही. या सभागृहामध्ये घोषणा करायची आणि सर्रास तिकडे वीजेची कनेक्शन्स कापायची. याबाबत शेतकऱ्यांमध्ये भयानक आक्रोश आहे. या सभागृहामध्ये शेतकऱ्यांचा आक्रोश मांडण्यात आला नाही तर आम्हाला कोणालाच जनता माफ करणार नाही. सत्ताधारी पक्ष असो की विरोधी पक्ष असो, शेतकरी कोणालाच माफ करणार नाही. म्हणून माझी विनंती आहे की, आताच्या आता या क्षणी मंत्री महोदयांना बोलवा आणि या क्षणी मंत्री महोदयांना घोषणा करायला सांगा.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य हौदात येऊन घोषणा देतच असतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, मघाशी मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. आज या सभागृहात माननीय ऊर्जा मंत्री उपस्थित नाहीत. माननीय उप मुख्यमंत्री देखील नाहीत. त्यामुळे या संदर्भात सर्वांशी चर्चा करुन या ठिकाणी...

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, किती शेतकरी मेल्यावर आपण चर्चा करणार आहात, आणि कधी चर्चा करणार आहात ? किती शेतकरी मेल्यावर आपण चर्चा करणार आहात. रोज शेतकरी मरतात. शेतकरी मेल्यावर चर्चा करुन फायदा काय आहे ? या वांझोट्या चर्चेचे काय करायचे ?

**तालिका सभाध्यक्ष :** लवकरात लवकर चर्चा करण्यासाठी सरकारतर्फे प्रयत्न सुरू आहेत.

श्री. देवेंद्र फडणवीस : इतके दिवस झाले या ठिकाणी अधिवेशन सुरू आहे. अधिवेशन सुरू असताना शेतकरी रोज मरतात. शेतकरी मरत असताना या ठिकाणी सत्ता पक्ष झोपला आहे. हे कसे चालेल ? शेतकरी मरत असताना आम्ही या सभागृहात काहीच बोललो नाही तर...

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहातील अशा गोंधळसदृश परिसिथतीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी १.०० वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.०९ ते दुपारी १.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात व सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा आपल्या जागेवर उभे राहून फलक दाखवितात.)

**राज्यातील शेतकऱ्यांची वीज जोडणी कापण्यात येत असल्याबाबत**

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, एका महत्त्वाच्या विषयावर सभागृह स्थगित झाले होते. तो अतिशय महत्त्वाचा विषय आहे. अन्नदाता सुखी भव. जे शेतकरी रक्ताचे पाणी करतात, ताटामध्ये भूक शमविण्यासाठी मेहनत करतात. त्यांचे वीज कनेक्शन कापू नये एवढी एक सर्व प्रमाणिक भावना सर्व सन्माननीय सदस्यांची आहे. अध्यक्ष महोदय, आपण सुद्धा यामध्ये आहात.

**उपाध्यक्ष** : होय.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, राज्याचा अर्थसंकल्प हे एक पवित्र डॉक्युमेंट आहे, हे खरे आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे याबाबत सरकारने निवेदन करावे, सरकारने न्याय द्यावा तसेच सरकारने सदबुद्धीने निर्णय घ्यावा. आपण ज्याचे अन्न खातो त्याच्या अन्नाच्या संदर्भात तशा पद्धतीने निर्णय अपेक्षित आहे. सरकारची ही सामुहिक जबाबदारी आहे त्यामुळे आपण सुद्धा उभे राहून सांगू शकता की, वीज कनेक्शन कापले जाणार नाही. माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ आपण सुद्धा निर्णय सांगू शकता. आमची एवढीच अपेक्षा आहे की, आम्हाला कामकाज चालवायचे आहे. राज्याच्या अर्थसंकल्पाबाबत जनतेच्या इच्छा आणि आकांक्षासंदर्भात आम्हाला त्यांचे भाव व्यक्त करायचे आहेत. आम्ही सभागृह बंद पाडण्यासाठी इथे आलेलो नाही तर सभागृहातून न्याय मिळविण्यासाठी आलो आहे. आता माननीय ऊर्जा मंत्री सभागृहामध्ये आलेले आहेत.

श्री. प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, वीज कापणी विरोधात सभागृहातील फक्त विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे नाही तर सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे सुद्धा एकमत आहे की, ताबडतोब ही वीज कापणी थांबविली पाहिजे.

श्री. प्रकाश सोळंके....

याबाबत सरकार निवेदन किंवा काही निर्णय करणार नसेल तर आपण त्यांना निदेश किंवा आदेश द्यावेत, अशी आमची विनंती आहे.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या विषयाच्या बाबत माननीय ऊर्जा मंत्री निवेदन सादर करतील.

**उपाध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे कारण आता माननीय ऊर्जा मंत्री या विषयावर बोलणार आहेत.

असुधारित प्रत

**पृ.शी. :** राज्यातील शेतकऱ्यांची वीज जोडणी कापण्यात येत असल्याबाबत

**मु.शी.:** राज्यातील शेतकऱ्यांची वीज जोडणी कापण्यात येत असल्याबाबत या संबंधी माननीय उर्जा मंत्र्यांचे निवेदन

डॉ. नितीन राऊत (ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ४७ अन्वये पुढील निवेदन करतो.

अध्यक्ष महोदय, हे अधिवेशन सुरु झाल्यापासून सातत्याने विजेच्या प्रश्नाच्या बाबतीत लक्षवेधी सूचना, अर्धा-तास चर्चा अशा वेगवेगळया संसदीय आयुधांच्या माध्यमातून अनेकवेळा प्रश्न उपस्थित केले आहेत. सभागृहाच्या बाहेर सुद्धा अनेक शेतकऱ्यांनी आणि वीज ग्राहकांनी या संबंधी विचारणा केली. काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी सभागृहामध्ये या विषयावर अनेकवेळा प्रश्न उपस्थित करुन सभागृहाला मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्य श्री. कुणाल पाटील, सन्माननीय सदस्य श्री. बालाजी कल्याणकर, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश सोळंके तसेच विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सुद्धा आपल्या भावना मांडल्या आहेत.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

डॉ.नितीन राऊत ....

या सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन... अध्यक्ष महोदय, मी असे सांगितले की, विरोधी पक्षाने या संबंधी आपल्या भावना मांडल्या आहेत. मला जाणीव आहे की, महावितरण ही शासनाच्या मालकीची कंपनी आहे. या कंपनीद्वारे ३ कोटी ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात येतो. वीज ग्राहकांकडून वीज देयकापोटी प्राप्त होणारे महसूल तसेच शासनाकडून मिळणारे अनुदान हेच महावितरणचे आर्थिक स्त्रोत आहेत. महावितरण कंपनीच्या घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांकडे मार्च, २०२१ अखेर ७,५६८ कोटी रुपये इतकी थकबाकी होती. शहरी व ग्रामीण संस्था यांच्याकडील पथदिवे व पाणी पुरवठा याची थकबाकी जानेवारी, २०२२ अखेर रु. ९०११ कोटी रुपये झालेली आहे. शासकीय कार्यालयांकडून वीज देयकापोटी २०७ कोटी रुपये थकीत आहेत. महावितरणद्वारे कायम स्वरुपी खंडित करण्यात आलेल्या ग्राहकांकडे ७,४२३ कोटी रुपये थकीत आहेत. कृषी पंप ग्राहकांकडे डिसेंबर,२०२० अखेर ४४ हजार ९२० कोटी रुपये झालेले आहेत. हे पाहता, महावितरणच्या विविध वर्गवारीतील सुमारे ६४ हजार कोटी रुपये इतकी प्रचंड थकबाकी झालेली आहे. महावितरण कंपनीने घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांकडे थकबाकी वसुलीसाठी ग्राहकांना थकबाकी भरण्याची सुविधा दिलेली आहे. वसुलीसाठी पाठपुरावा करणे, वीजबिल दुरुस्तीसाठी शिबिरे आयोजित करणे अशा विविध उपाययोजना केल्या गेल्या आहेत. या उपाययोजना करीत असताना जे दर महिन्याला देयके भरतात, त्यांना २ टक्के रिबेट दिले होते. जानेवारी, २०२२ अखेर चालू देयकांच्या वसुली व्यतिरिक्त थकबाकी वसूल करुन घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांची थकबाकी कमी होऊन आता रु. ५ हजार ४५२ कोटी झाली आहे. कायमस्वरुपी वीज खंडित असणाऱ्या ग्राहकांकडील थकबाकी ६ हजार ४२३ कोटी रु. वसुलीकरिता विलासराव देशमुख अभय योजना महावितरण कंपनीने जे कायम जाहीर केली आहे. कृषी पंप ग्राहकांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी ऊर्जा विभागाने कृषी पंप वीज जोडणी धोरण, २०२० जाहीर केले आहे. या धोरणांतर्गत सन २०२४ पर्यंत थकबाकीची रक्कम कृषी ग्राहकांनी टप्प्याटप्प्याने भरण्याची

असुधारित प्रत

डॉ.नितीन राऊत ....

सुविधा दिलेली असून मूळ मुद्दल, व्याज व दंड यामध्ये सवलत जाहीर केली आहे. सदर धोरणाच्या माध्यमातून रु. १५ हजार ९७ कोटी रुपये एवढी रक्कम निर्लेखनाद्वारे व व्याज दंड यामध्ये सूट देऊन थकबाकीची सुधारित रक्कम ३० हजार ७३१ कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे. या करिता कृषी ग्राहकांनी सदर योजनेत सहभाग घेऊन सप्टेंबर, २०२० नंतरची चालू बिले भरणे आवश्यक आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रसार माध्यमातून योजनीची प्रसिध्दी, लोकप्रतिनिधींना सहकार्याचे आवाहन, वीजबिल दुरुस्ती मेळावे इ. उपाययोजना करण्यात आल्या.

अध्यक्ष महोदय, महावितरणने कृषी ग्राहकांकडून वीज बिल वसुलीची मोहीम हाती घेतली असून प्रतिसाद मात्र समाधानकारक नाही. सदर धोरणांतर्गत केवळ रु. २ हजार ३७८ कोटी रकमेचा भरणा महावितरणने केलेला आहे. कृषी ग्राहकांनी या धोरणातील तरतुदी नुसार चालू वीज देयके दिलेली नसतील तरी नाईलाजास्तव कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करावा लागला. काही ठिकाणी वीज पुरवठा खंडित करण्याच्या कारवाईला विरोध झाला, आंदोलने झाली, मोर्चे काढण्यात आले. ही भावना सदनात मांडण्यात आली आहे. आम्ही हे स्वत:हून करीत नाही. महावितरण कंपनीने सद्य:स्थितीत ४७ हजार ३४ कोटी रु. बँकांचे कर्ज, सुमारे २० हजार २६८ कोटी वीज पुरवठादारांची देणी यामुळे महावितरणची आर्थिक स्थिती चिंताग्रस्त झालेली आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

डॉ.नितीन राऊत ...

या पार्श्वभूमीवर महावितरण कंपनीस त्वरित आर्थिक सहाय्य देण्याच्या दृष्टीने सद्य:स्थितीत पथदिवे व सार्वजनिक पाणी पुरवठा यांची थकीत वीज देयके व प्रलंबित अनुदानाच्या रक्कमांपैकी रुपये ८५०० कोटी त्वरित महावितरण कंपनीस उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. महावितरणद्वारा वीज बिलाच्या थकीत रक्कमेची परतफेड ही ६ मासिक हप्त्यांऐवजी १२ मासिक हप्त्यांमध्ये करण्याची लवचिकता देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, कृषी ग्राहकांना दिवसा वीज देण्यासंबंधी तांत्रिक समिती गठित करण्याचा निर्णय देखील घेतलेला आहे. एक महिन्यात त्याचा अहवाल आल्यावर संबंधितांना सूचना देण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, मी आपणांस सांगू इच्छितो की, जानेवारी, २०२० मध्ये माझ्याकडे हे खाते आले. मी या खात्याचा चार्ज स्वीकारला त्यावेळेस मार्च, २०१४ अखेरची थकबाकी १४ हजार १५४.५ कोटी रुपयांची होती. ती सन २०२० अखेर ५९ हजार, १४९ कोटी रुपयांवर गेलेली आहे. हे सर्व या सरकारने केले नाही तर मागच्या सरकारने वीज बिलच दिलेले नाही.

अध्यक्ष महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: देखील सांगितले की, शेतकऱ्यांना आम्ही बिले दिलेली नाहीत. शेतकऱ्यांना आम्ही नियमितपणे वीज दिलेली होती. मी त्याकडे जास्त वळू इच्छित नाही. परंतु, मी आपणांस सांगेन की, राज्यामध्ये जेव्हा लॉकडाऊन लावण्यात आला, तेव्हा लॉकडाऊनमध्ये आम्ही २४ तास वीज पुरवठा केला. कोणालाही वीज खंडित होऊ देणार नाही, अशी परिस्थिती निर्माण केली.

अध्यक्ष महोदय, आमचे विद्युत सैनिक शहीद झाले. कारण ते सडकेवर होते. कुठेही वीज खंडित होऊ नये याकरिता आम्ही काम केले. त्यानंतर बिले देत असतानाही आम्ही अनेक हप्ते दिले, अनेक सुधारणा केल्या. व्ही.सी. वर बैठका घेऊन देखील आम्ही ते काम केलेले आहे.

डॉ.नितीन राऊत ...

अध्यक्ष महोदय, माझ्या हृदयावर ६ स्टेंट्स लावल्यानंतर देखील मी ३ वेळा नागपूर ते मुंबई असा बायरोड प्रवास केलेला आहे आणि बैठका घेऊन यामध्ये दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला. कोकणामध्ये चक्रीवादळ आले, त्यावेळेस आम्ही धावून गेलो. महापूर आला त्यावेळेस देखील आम्ही धावून गेलो. वीज खात्याने, महावितरणने त्या ठिकाणी काम केलेले आहे.... (अडथळा)... मला माझे भाषण पूर्ण करु द्या.

अध्यक्ष महोदय, जगामध्ये कोळशाची टंचाई निर्माण झाली. देशातही कोळशाची टंचाई निर्माण झाली. अनेक राज्यांमध्ये लोडशेडिंग करण्यात आले. परंतु, राज्यात कशाही प्रकारचे लोडशेडिंग मी होऊ दिलेले नाही. आम्ही ग्राहकांना नियमित वीज पुरवठा व्हावा, याबाबतचे धोरण स्वीकारलेले आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांचा प्रश्न आला तर शेतकऱ्यांची पिके उभी आहेत. मी अनेक ठिकाणी दौरे करीत असताना शेतकऱ्यांनी मला देखील निवेदने दिलेली आहेत. मी त्यांना आश्वासित केले होते की, येणाऱ्या काही दिवसांत सभागृहात मी यासंबंधीची घोषणा करेन. ती घोषणा करण्याकरिता मी येथे आलो आहे. शेतकऱ्यांच्या मागणी व अडचणींचा आपण विचार करतो. परंतु, महावितरणचा विचार करीत असताना महावितरणला देखील बँकाचे कर्ज घ्यावे लागते आणि त्याचे व्याज भरावे लागते.

अध्यक्ष महोदय, वीज निर्मिती कंपन्यांकडून आम्ही वीज रोख रक्कमेने विकत घेतो. सद्य:स्थितीत औष्णिक वीज प्रकल्पाची देशांतर्गतची स्थिती अत्यंत बिकट आहे. दीड दिवस, दोन दिवस पुरेल इतका कोळसा आमच्याकडे असतो. त्याचा साठा करावा लागेल, त्याची उपलब्धता करावी लागेल, त्या शिवाय वीज देता येणार नाही. या सर्व बाबींचा विचार करुन आमच्या सरकारने शेतकऱ्यांना प्राथमिकता द्यावी हे उद्दीष्ट समोर ठेवून मी माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री महोदयांसमवेत चर्चा करुन या ठिकाणी सांगू इच्छितो की, वीज पुरवठा खंडित केलेल्या कृषी ग्राहकांची वीज जोडणी पूर्ववत करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. तसेच, थकबाकीपोटी....

असुधारित प्रत

डॉ.नितीन राऊत ...

शेतकऱ्यांच्या हातात पीक येईपर्यंत आगामी ३ महिने कृषी वीज ग्राहकांची वीज तोडणी आम्ही तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, पॉवरलूमच्या लोकांना देखील आम्हाला सबसीडी द्यावी लागते. विदर्भ, मराठवाड्यातील उद्योगांना देखील सबसीडी द्यावी लागते, ते सुध्दा पूर्ववत करण्याचे काम आम्ही करीत आहोत.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

डॉ.नितीन राऊत...

मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य, राज्यातील सर्व खासदार महोदय व सर्व जिल्ह्यांचे माननीय पालक मंत्री, यांना पत्र लिहून विनंती केली आहे की, महावितरण कंपनीची आर्थिक अडचण लक्षात घेऊन सर्व बाबींसंबंधी सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांनी महावितरण कंपनीची थकीत व चालू देयके वेळेवर भरण्यासाठी सहकार्य करावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी शेतकऱ्यांचा व सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचा आक्रोश ऐकून शेतकऱ्यांची वीज जोडणी खंडित न करण्याचा निर्णय घेतला आहे. मी सभागृहाच्या वतीने व विरोधी पक्षाच्या वतीने मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो व अपेक्षा व्यक्त करतो की, आपण घेतलेला निर्णय शेतकऱ्यांच्या हिताचा आहे. अधिवेशन संपल्यानंतरही सदर निर्णय कायम ठेवण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.बालाजी कल्याणकर : अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकारने आज सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून निर्णय घेतला आहे. राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार व महाविकास आघाडी सरकारमधील सर्व मंत्री महोदय व नेते यांच्यासह ऊर्जा मंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज जोडणी खंडित न करण्याचा निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो.

श्री.चंद्रकांत (दादा) पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यापासून अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. तसेच या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. एखादे झाड तोडण्यासाठी प्रहार केले जातात व कोणा एकाच्या प्रहाराने ते झाड शेवटी तुटते. अशा पद्धतीने हा विषय मार्गी लावल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री.बालाजी कल्याणकर यांचे मनापासून अभिनंदन करतो.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, ऊर्जा मंत्री महोदय यांनी राज्यातील शेतकऱ्यांची वीज जोडणी खंडित करण्यासंदर्भात स्थगिती दिली. मी त्याबद्दल मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. राज्यात पाणीपुरवठा सुरु योजना आहेत. त्यामध्ये माणसांच्या पिण्याचा पाण्याचा समावेश आहे. त्यात जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा समावेश करण्यात यावा व पाणीपुरवठा योजना बंद करण्यात येऊ नयेत अशी माझी मागणी आहे.

श्री.कृष्णा खोपडे : अध्यक्ष महोदय, नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्री तथा ऊर्जा मंत्री महोदय डॉ.नितीन राऊत यांनी आज केलेल्या घोषणेचे संपूर्ण सभागृहाने स्वागत केले आहे. ऊर्जा मंत्री महोदय यांनी लॉकडाऊनच्या कालावधीतील वीज देयके माफ करण्याची चार वेळा घोषणा केली होती. यापूर्वी ३०० युनिट व त्यानंतर १०० युनिट त्यानंतर दिल्लीच्या धर्तीवर निर्णय घेण्याबाबत सांगितले. त्यानंतर सर्व वीज देयक माफ करण्यात येणार आहे असे ऊर्जा मंत्री महोदयांनी सांगितले होते. त्या संदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळाने नाकारला. त्यानंतर ऊर्जा मंत्री महोदयांनी सांगितले की, हा अधिकार सरकारचा आहे. परंतु हे सरकार अधिकारी चालवतात की आपण चालवत आहात ? लॉकडाऊनच्या कालावधीतील वीज देयके माफ करण्याची घोषणा करावी अशी आमची मागणी आहे.

--------------

**पृ.शी./मु.शी.:** सदस्यांची अटक व त्यांच्या सुटकेसंबंधी घोषणा

**उपाध्यक्ष** : मला वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून कळविण्यात आले आहे की, श्री.देवेंद्र फडणवीस, माननीय विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा तसेच विधासनभा सदस्य श्री.नितेश राणे, ॲड.आशिष शेलार, ॲड.राहूल नार्वेकर, सर्वश्री चंद्रकांत पाटील, मंगलप्रभात लोढा, जयकुमार रावल, गिरीश महाजन, प्रशांत ठाकूर, मंगेश चव्हाण, सुधीर मुनगंटीवार तसेच विधानसभा सदस्या सर्व श्रीमती देवयानी फरांदे, मनिषा चौधरी यांना दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ६९ अन्वये वासुदेव बळवंत फडके चौक (मेट्रो जंक्शन) मुंबई येथे ताब्यात घेण्यात येऊन त्यांना त्याच दिवशी येलोगेट पोलीस ठाणे, मुंबई येथून मुक्त करण्यात आले.

----------

यानंतर श्री.तेलंग...

अप्रकाशित प्रत

**उपाध्यक्ष :** आता यानंतर लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येत आहेत. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आज अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा होणार आहे. त्यामुळे एका लक्षवेधी सूचनेवर फक्त दोन ते तीन उप प्रश्न विचारण्यात यावेत.

असुधारित प्रत

**पृ.शी.:** धुळे जिल्हयातील सुलवाडे, जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेमध्ये बदल करुन नमूद १० गावांतील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणे व उक्त प्रकल्पासाठी अधिग्रहीत केलेल्या जमीन मालकांना योग्य तो मोबदला देण्याबाबत

**मु.शी.:** धुळे जिल्हयातील सुलवाडे, जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेमध्ये बदल करुन नमूद १० गावांतील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणे व उक्त प्रकल्पासाठी अधिग्रहीत केलेल्या जमीन मालकांना योग्य तो मोबदला देण्याबाबतया संबंधी श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"धुळे जिल्हयातील सुलवाडे, जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेंतर्गत शेती संपादित केली असून त्यात धुळे तालुक्यातील वेल्हाणे, कुंडाणे, बाबरे येथील शेतकऱ्यांना अत्यल्प निवाडा घोषित करणे व आश्वासन देऊनही प्रशासनाने निवाडा दुरुस्तीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न करणे, प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत केल्या मात्र मोबदल्याबाबत प्रत्येक भागातील शेतकऱ्यांना वेगवेगळा मोबदला देणे, सोनगीर व सोंडले शिवारात २० ते २५ लाख रुपये एकरी भाव असताना ५ लाख रुपये देखील एकरी भाव न देणे तसेच विहीरी, फळझाडे, घर, बोअरवेल शेड यांचे योग्य मोबदल्यासाठी मुल्यमापन केले जात नसल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या आठवडयादरम्यान धरणाचे काम बंद पाडून बेमुदत

श्री.कुणाल पाटील........

धरणे आंदोलन सुरु करणे व याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांना निवेदन देण्यात येणे, तसेच जवाहर सामाजिक कृतज्ञता ट्रस्ट, धुळे या ट्रस्टने धुळे तालुक्यातील अनेक दुष्काळी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचनासाठी काम केले असून सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेतून दुष्काळी गावांसाठी लाभ देणे शक्य असल्याचा प्राथमिक अभ्यास केलेला असणे, शासनाने बंद पाईपव्दारे सिंचन सुविधा देणेबाबत निर्णय घेतलेला असणे, त्यामुळे प्रकल्पाच्या पाणी वापरात निश्चितपणे बचत होणे, सदर बचतीतून धुळे तालुक्यातील दापुरा, सरवड, लोणकुटे, कापडणे, धमाणे, धमाणी, नगाव बु., बिलाडी, कुंडाणे, वरखेडे व बाळापुर या १० गावातील ४० बंधारे भरल्यास सदर गावांमधील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकणे, या बाबींकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

श्री.जयंत पाटील ( जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

(सन्माननीय सदस्य श्री.रवि राणा हातामध्ये फलक घेऊन वेलमध्ये येतात.)

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.रवि राणा यांना सांगू इच्छितो की, लक्षवेधी सूचना झाल्यानंतर आपणास बोलण्याची संधी देण्यात येईल. त्यामुळे आता आपण आपल्या जागेवर जाऊ बसावे.

श्री.कुणाल पाटील : अध्यक्ष महोदय, धुळे जिल्हयातील सुलवाडे, जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेमधील समस्येकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने सन १९९९ ते सन २००० या काळामध्ये सुलवाडे, जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेला ७९९ कोटी रुपयांच्या प्रशासकीय प्रकल्प अहवालास मान्यता दिली होती. त्यानंतर सन २०१७ मध्ये २४६० कोटी रुपयांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास सुधारित मान्यत ा दिलेली आहे. मोठ्या सिंचन प्रकल्पामध्ये येणारा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे धुळे जिल्ह्याचे स्वरुप बदलणार आहे. विशेष करुन सिंदखेडा तालुका आणि धुळे तालुक्यामधील ३० हजार हेक्टर जमिनीवर सिंचन होणार आहे. या योजनेसाठी २५०० कोटी रुपये खर्च केले जात आहेत. उक्त खर्चामध्ये केंद्र सरकारचा काही वाटा आहे तर राज्य सरकारचा काही वाटा आहे.

अध्यक्ष महोदय, जेव्हा पासून महाविकास आघाडी सरकार सत्तेमध्ये आले, तेव्हापासून या योजनेला अधिक गती प्राप्त झालेली आहे. त्यामुळे सदर प्रकल्प पूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. असे असले तरी यामध्ये काही शेतकऱ्यांच्या दोन समस्या आहेत. त्या समस्या मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सदर शेतकऱ्यांची पहिली समस्या अशी आहे की, माझ्या तालुक्यातील जवळपास १० गावांमध्ये नालाखोलीकरणाच्या माध्यमातून मोठ-मोठे बंधारे उभारण्यात आलेले आहेत. परंतु सद्य:स्थितीत त्या बंधाऱ्यामध्ये पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे या योजनेचा एक पार्ट सदर बंधाऱ्यांमध्ये सोडला तर उक्त बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा उपलब्ध होऊ शकतो. परंतु विभागाने असे म्हटले आहे की, सदर ठिकाणी पाणीसाठा शिल्लक नाही. सदर धरणांमध्ये कालव्याद्वारे पाणी सोडता येईल,

श्री.कुणाल पाटील........

अशी डिझाईन करण्यात आली होती. परंतु आता त्यामध्ये बदल करुन पाईपलाईनद्वारे पाणी सोडण्याचे नियोजन करीत आहोत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची बचत होणार आहे. यामधील बचत झालेले पाणी नाल्याद्वारे बंधाऱ्यामध्ये सोडले तर धुळे तालुक्यातील दापुरा, सरवड, लोणकुटे, कापडणे, धमाणे, धमाणी, नगाव बु., बिलाडी, कुंडाणे, वरखेडे व बाळापूर या १० गावातील ४० बंधारे भरल्यास सदर गावांमधील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो. त्यामुळे सदर प्रकल्पामध्ये सुधारणा करुन सदर १० गावांतील सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न सोडविणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, बिलाडी, कुंडाणे, बाबरे या गावातील जमीन अधिग्रहीत केली जात आहे. परंतु त्या संबंधित शेतकऱ्यांना पुरेसा मोबदला दिला जात नाही. जी जमीन अधिग्रहीत केलेली आहे, त्या जमिनीवर २०-३० वर्षे जुन्या फळ बागा होत्या. अधिग्रहीत जमिनीचा मोबदला देताना फळ बागांचा विचार केलेला नाही. सदर बागा अस्तित्वात नाहीत, असे कागदोपत्री दाखविण्यात आले आहे. परंतु त्या ठिकाणी बागा असल्याचे संबंधित शेतकऱ्यांकडे फोटो देखील उपलब्ध आहेत.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

श्री. कुणाल पाटील....

अध्यक्ष महोदय, १५ ते २० वर्षे जुनी असलेली घरे त्या सर्व्हेमध्ये आलेली नाहीत. त्यामुळे त्यांनाही मोबदला देण्याची आवश्यकता आहे. एक लाख रुपये प्रति एकर असा दर निश्चित केला आहे. आजुबाजूच्या गावामध्ये प्रति एकर २५ लाख रुपयांचा दर मिळत आहे. त्यामुळे यात सुधारणा करुन शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला वाढवून दिला पाहिजे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या फळबागा, घरे यांचा त्यात विचार केला नाही. याहीकरिता वाढीव मोबदला द्यावा लागणार आहे. जलसंपदा विभागाकडून पुन:सर्व्हे करुन शेतकऱ्यांना न्याय देण्यात येणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कुणाल पाटील यांनी दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. अतिरिक्त दहा गावांना पाणी देण्याबाबतचा त्यांचा पहिला प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, ही योजना मूळ कालव्याप्रमाणे तयार करण्यात आली होती. परंतु मंजुरी देतेवेळेस ऐनवेळी या योजनेचे पीडीएन करावे, असा निर्णय झाला होता. त्यामुळे मला खात्री आहे की, यात काही प्रमाणात पाणी शिल्लक असेल. शिल्लक असलेले पाणी सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील दहा गावांना देण्यासाठी पुरेसे असेल तर ते देण्यात येईल किंवा जेवढे पाणी देणे शक्य असेल तेवढे दिले जाईल. यासाठी पुन्हा सर्व्हे करण्याच्या सूचना देण्यात येतील. डिझाईनपेक्षा अतिरिक्त असलेले पाणी प्रस्तावित दहा गावांना देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. अतिरिक्त पाणी जर तीन गावांना उपलब्ध होत असेल तर ते तीन गावांना दिले जाईल आणि ते जर दहा गावांना उपलब्ध होत असेल तर दहा गावांना पाणी दिले जाईल. याबाबत तातडीने आदेश देण्यात येतील. संपूर्ण सर्व्हेक्षण करुन अतिरिक्त होणारे पाणी गृहीत धरुन त्या दहा गावांचे नियोजन करता येईल.

अध्यक्ष महोदय, जमीन अधिग्रहन करीत असताना जामफळ भागामध्ये जे दर दिले आहेत. तेथील जमीन रस्त्याच्या बाजुला असल्यामुळे अधिकचे दर आहेत. सन्माननीय सदस्यांनी जे दर निदर्शनास आणले आहेत त्यामध्ये अधिक तफावत

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील ....

दिसत आहे. काही ठिकाणी २५ लाख रुपये प्रति एकर आणि आतमध्ये असलेल्या जमिनीला कमी दर मिळाले आहेत. जिल्हाधिकारी, महसूल आयुक्त आणि कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी झाडांचा समावेश केला नाही, असे सांगण्यात आले. माझ्या माहितीप्रमाणे सॅटेलाईटद्वारे सर्व्हे करण्यात आला आहे. पूर्वी किती झाडे होती आणि आता किती झाडे आहेत, याची तुलना केली आहे. काही ठिकाणी झाडे नसून केवळ रोपे आहेत. त्यामुळे रोपांचीच किंमत देण्यात आली आहे. काही ठिकाणी झाडे दाखविण्याचे प्रमाणही वाढले आहे, हे सांगणे मला योग्य वाटत नाही. त्यामुळे सॅटेलाईटद्वारे सर्व्हेक्षण करुन क्रॉस व्हेरिफिकेशन करण्याची पद्धत आता सुरु आहे. माननीय कृषि मंत्री श्री. दादाजी भुसे सभागृहात उपस्थित आहेत. त्या विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने ज्यांनी तक्रार केली आहे, त्यांचे पुन्हा सर्व्हेक्षण करण्यात येईल. मूळ आणि जुने झाडे असतील तर कोणावरही अन्याय होणार नाही.

अध्यक्ष महोदय, एकदा अवार्ड घोषित केले असेल तर पुन्हा ते घोषित करता येत नाही. त्यामुळे काही लोकांच्या जमिनीचे दर कमी असल्याचे सांगण्यात येत आहे. त्या भागात असेही आढळून आले आहे की, तेथील व्यवहार अधिक किंमतीचे झाले आहेत. परंतु तपासणी केल्यानंतर असे लक्षात आले की, अधिकच्या दराने पेमेंट करण्यात आलेले नाही. आम्हाला शेतकऱ्यांना नाराज करावयाचे नाही. त्यामुळे काहींनी मागणी करुन, उपोषण केले व धरणे धरलेली आहेत. त्यांच्या मागणीचा पुनर्विचार करुन मार्ग काढण्यात येईल. अवार्ड झाल्यामुळे झाडांबाबत काही निर्णय घेता येईल काय किंवा व्हॅल्युएशनमध्ये काही दोष आहेत काय, हे तपासून पाहिले जाईल. एकदा अवार्ड झाल्यानंतर त्यात पुन्हा काही करता येत नाही. तरीही यातून मार्ग काढण्यासाठी विशेष बाब म्हणून प्रयत्न करण्यात येतील.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्रीमती मोनिका राजळे : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मी अहमदनगर जिल्हयातील माझ्या शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील प्रश्न विचारु इच्छिते. माझ्या मतदारसंघातील ताजनापूर ही योजना सन १९८० मध्ये मंजूर झाली. सदर योजनेच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यातील कामासाठीची टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन कोलकाता येथील एका एजन्सीला हे काम देण्यात आलेले आहे. परंतु सदर एजन्सीने अद्यापपर्यंत काम सुरु केलेले नाही. या योजनेच्या माध्यमातून जायकवाडी धरणातून बंद पाईपद्वारे पाणी आणले जाणार आहे. दुसऱ्या टप्प्याच्या कामासाठी टेंडर प्रक्रिया, वर्क ऑर्डर होऊन देखील काम सुरु होत नाही. याबाबत अधिकाऱ्यांना विचारणा केली असता सांगितले जाते की, "आम्ही सदर कंपनीला नोटीस दिली आहे." त्यामुळे माझा प्रश्न आहे की, योजनेच्या कामामध्ये विलंब करणाऱ्या कंपनीस ब्लॅकलिस्ट केले जाईल का ? तसेच गेल्या वीस-पंचवीस वर्षांपासून प्रलंबित असलेली सदर योजना लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून संबंधितांना सूचना देण्यात येतील का, आणि यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात येईल का ?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेच्या विषयापेक्षा हा वेगळा प्रश्न असल्यामुळे याची माहिती या क्षणी माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, याबाबत मी आज संध्याकाळपर्यंत माहिती घेतो. सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, उद्या सकाळी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण माझ्या दालनात यावे. त्यावेळी मी याबाबत सविस्तर माहिती देईल. कंपनीला काम दिल्यानंतर जबाबदारी असूनही त्यांनी ते वेळेत सुरु केले नसेल तर सदर कंपनीला ब्लॅकलिस्ट करण्यात येईल. किंवा यामध्ये सरकारकडून काही पूर्तता बाकी असल्यास त्याला देखील गती देण्यात येईल.

सन्माननीय सदस्यांनी उद्या प्रश्नोत्तरांचा तास संपल्यानंतर मला दालनात भेटावे. त्यावेळी मी अधिक माहिती देऊ शकेल.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे.

---------

अप्रकाशित प्रत

**पृ.शी.:** मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास आणि म्हाडाच्या विविध प्रश्नांबाबत.

**मु.शी.:** मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास आणि म्हाडाच्या विविध प्रश्नांबाबत श्री.अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, झीशान सिद्दिकी, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. धिरज देशमुख, सुरेश वरपुडकर, विकास ठाकरे, अमित झनक, लहू कानडे, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, बळवंत वानखडे, अबू आजमी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमीन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

“मुंबई हे बेटांचे शहर असणे, या शहरात १६००० पेक्षा जास्त उपकर प्राप्त इमारती जुन्या व जीर्ण असून मोडकळीस आलेल्या असणे, सदर इमारतींना दुरुस्तीची किंवा पुनर्विकास करण्याची गरज असणे, त्यातील जास्तीत जास्त इमारती या दक्षिण मुंबई विभागात असणे, मुंबई शहरात संक्रमण शिबिरांची संख्या खूप कमी असणे, त्यातच म्हाडाच्या कर्मचारी वर्गाची संख्या देखील कमी असणे, विशेषतः मुंबादेवी विधानसभा विभागात अनेक पदे रिक्त असणे, त्यामुळे जुन्या व जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण वेळेत न होणे, इमारतींच्या दुरुस्तीसाठी म्हाडाकडे निधी उपलब्ध नसणे, कामाठीपुरा परिसराचा पुनर्विकासाचा प्रश्न ऐरणीवर असणे, परंतु आजमितीपर्यंत त्यावर कार्यवाही न होणे,

श्री.अमीन पटेल.....

परिणामी इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्विकासात होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

डॉ.जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने केलेल्या निवेदनामध्ये चांगले उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर गृहनिर्माण विभागाने अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत हेही मी सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माझे एकूण सहा प्रश्न आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, मुंबई शहरामधील उपकरप्राप्त जुन्या, जीर्ण व मोडकळीस आलेल्या १६ हजार इमारतींच्या दुरुस्तीसाठी आपण काय कार्यवाही करणार आहात ? कारण दरवर्षी पावसाळयात अशा इमारती कोसळतात व त्यात अनेक लोकांचे मृत्यू होतात. आपण त्यांना तात्पुरती काहीतरी मदत देतो परंतु तेवढयाने हा प्रश्न सुटत नाही. त्यामुळे या इमारतींच्या दुरुस्तीसंदर्भात आपले काय धोरण आहे, ते मंत्री महोदयांनी सांगावे.

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न म्हाडामधील रिक्त पदांच्या संदर्भातील आहे. मोडकळीस आलेल्या इमारतींपैकी सर्वाधिक इमारती माझ्या मुंबादेवी मतदारसंघात आहेत. परंतु त्यावर देखरेख व कार्यवाहीसाठी म्हाडाचे कोणीही जबाबदार अधिकारी नाहीत. सर्व ठिकाणी कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, किती दिवसांमध्ये म्हाडामधील या रिक्त पदांची भरती केली जाईल ?

अध्यक्ष महोदय, मी आज सकाळीच संक्रमण शिबिरांबाबत माहिती घेतली. संक्रमणासाठी मुंबईमध्ये केवळ १८० गाळे रिकामे आहेत. या इमारतींचा पुनर्विकास करायचा आहे, दुरुस्ती करायची आहे परंतु त्यासाठी आवश्यक संक्रमण शिबिरेच नाहीत. मी गेल्या १० वर्षांपासून मागणी करीत आहे की, मुंबईमध्ये नवीन संक्रमण शिबिरे उभारली पाहिजेत. जर आपल्याकडे जागा नसेल तर मुंबई पोर्ट ट्रस्टची जागा केंद्र सरकारकडून घेतली पाहिजे. त्याबाबत सरकारचे काय धोरण आहे ते देखील मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे.

अध्यक्ष महोदय, म्हाडाकडे निधीची अतिशय कमतरता आहे. माननीय मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड व माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे मी आभार मानतो

श्री.अमिन पटेल.....

कारण मागील अधिवेशनामध्ये मी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्यांनी म्हाडाला तातडीने १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला होता. माननीय गृहनिर्माण मंत्री अतिशय इंटरेस्ट घेऊन या विषयामध्ये काम करीत आहेत. परंतु मला या ठिकाणी सांगण्यास खेद वाटतो की, आतापर्यंत माझ्या मतदारसंघातील केवळ ३ इमारतींचे काम सुरु होऊ शकले आहे. सुमारे १६० इमारतींचे काम बाकी आहे. मागील एका वर्षात काहीही काम झालेले नाही. माझी आपणास विनंती आहे की, आपण दिलेल्या १०० कोटी रुपयांमध्ये कोणकोणत्या इमारतींची कामे हाती घेण्यात आली आहेत त्यांची यादी मागवून घेऊन त्याला तात्काळ मंजुरी द्यावी.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमीन पटेल हे या विषयामध्ये नेहमीच भाग घेत असतात. बहूतांशी त्यांचा मतदार संघ जुन्या इमारतींनी भरला आहे. आज मुंबईत १९६४२ इतक्या इमारती सेसच्या आहेत. सन्माननीय सदस्यांच्या मतदार संघातील शंभरटक्के इमारती सेसच्या आहेत. आपण ज्याला संक्रमण शिबीर म्हणतो ते ट्रान्झिट कॅम्प विकसित करणे, हे सध्या म्हाडासमोरील यक्ष प्रश्न आहे. कारण मुंबई शहरात तेवढी जमीन उपलब्ध नाही. मी त्या विभागाचा मंत्री असतानाही एका गोष्टींचा खेद वाटतो की, या ट्रान्झिट कॅम्पमध्ये घुसखोरी होते. मला हे सांगताना मंत्री म्हणूनही अक्षरश: लाज वाटते. कारण एखादा माणूस गावाला गेला की नंतरच्या १० दिवसांनी दुसरा माणूस त्याच्या घरात घुसतो आणि त्याला आपण काढू शकत नाही. हे आताच घडते अशातला भाग नाही तर हे वर्षानूवर्षे घडते. सरकार म्हणून आपण त्याला प्रतिबंधही करु शकत नाही. त्यामुळे याला काय अवस्था म्हणायची हे मला समजत नाही. ट्रान्झिट कॅम्प नको त्यांच्या ताब्यात गेले आणि यामध्ये शंभरटक्के या विभागाची चूक आहे. यामध्ये त्या रेंट कलेक्टरचा हात गुंतलेला असतो. नाही तर असे घडूच शकत नाही. उद्या जर मी एक महिना माझ्या कुटुंबियांना अमेरिकेला घेऊन गेलो आणि परत आलो तर माझ्या घरात दुसरेच लोक राहत असल्याचे दिसते. म्हणजे त्याच्या सामानासकट त्याला बाहेर फेकून देतात. याची उच्चस्तरीय आणि कडक चौकशी होणे फार गरजेचे आहे. यामध्ये जो कोणी जबाबदार असेल त्याला फेकून देणे गरजेचे आहे.

श्री. योगेश सागर : (खाली बसून) आपण निर्णय का घेत नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी माझ्या विभागाची ही अवस्था असूनही लाज वाटते असे म्हणतो. कमकूवत बोलत नाही. त्यामुळे आपण माझ्या बोलण्यात अडथळा करु नका.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय ज्या विभागाचे कॅबिनेट मंत्री आहेत त्या विभागामध्ये कोणकोणती अडचण आहे, लोक घुसखोरी कशी करतात आणि त्याला जबाबदार

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर...

कोण अधिकारी आहेत त्याचे पदनाम सांगतात. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण त्याबद्दल निर्णय करावा. जरी मी बसून बोललो असलो तरी मंत्र्यांनी निर्णय केला पाहिजे. गाऱ्हाणी मांडायची नसतात. ते निर्णय करीत नाहीत म्हणून ही घुसखोरी वाढत राहणार आहे. माझी हरकत अशी आहे की, मंत्री महोदयांनी सत्तेच्या अधिकाराचा वापर करावा. ते सक्षम आहेत. निर्णय करायला आणि त्याची अंमलबजावणी करायला सक्षम आहेत आणि म्हणून त्याचा त्यांनी वापर करावा व निर्णय घ्यावा.

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही घुसखोरी माझ्या काळात झालेली नाही. आपले गृहनिर्माण मंत्री होते तेव्हाही हेच चालू होते. परंतु मी जेव्हा मंत्री म्हणून सभागृहात बोलतो तेव्हा पक्षाभिनिवेश बाजूला ठेऊन बोलतो. ज्यामध्ये मुंबईकरांचा फायदा आहे. माझे घर ॲन्टॉप हिलमध्ये नाही.

श्री. राम कदम : (खाली बसून) सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर यांच्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम कदम यांना मी सांगू इच्छितो की, आपण बसून बोलू नये. अध्यक्ष महोदय, मला संरक्षण द्यावे.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी शांतता राखावी.

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, ट्रान्झिट कॅम्पच्या बाबतीत चौकशी नेमण्याची गरज आहे आणि मी ती चौकशी नेमली आहे. हे ट्रान्झिट कॅम्प आपल्याला खाली करुन घ्यावे लागतील ते काम आपण करु. मुंबईमध्ये मोठमोठे ट्रान्झिट कॅम्प मागाठाणे, कन्नमवार नगर, ॲन्टॉप हिल अशा अनेक ठिकाणी आहेत. पण त्या ठिकाणी जे ३०-४० टक्के घुसखोर आहेत त्यांना घरातून बाहेर काढले की आपल्याला तेथे नियमित जे करायचे आहे ते करता येतील.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

डॉ. जितेंद्र आव्हाड ......

काही घुसखोरांना एक वर्ष ठरवून शासनानेच मान्यता दिलेली आहे की, आता घुसलेले आहेत तर त्यांना राहू द्या. पण हे कधीतरी बंद झाले पाहिजे या उद्देशाने यापुढे तरी घुसखोर घुसणार नाहीत यासाठी मी आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिलेल्या आहेत. जो घुसखोर सापडेल त्यासाठी रेंट कलेक्टर जबाबदार असतील. तशा प्रकारची तक्रार प्राप्त झाली तर रेंट कलेक्टरला घरी बसविण्यात येईल. कारण यामध्ये सरकारी यंत्रणेचा हात असल्याशिवाय घुसखोर घुसत नाहीत. त्यामुळे आपण ज्या ट्रान्झिट कॅम्पबद्दल बोलता तो मुद्दा खूप गंभीर आहे. सरकारकडूनच आता आजूबाजूला कुठे एमएमआरमध्ये जमीन मिळते काय ते बघावे लागेल. जवळपास कुठेतरी ट्रान्झिट कॅम्प बांधावे लागतील. याचे कारण असे आहे की, सर्वात जास्त इमारती पडण्याच्या घटना दक्षिण मुंबई मध्ये घडतात. कारण तिथे १०० ते २०० वर्ष जून्या इमारती आहेत. अशा प्रकारे इमारतीचे वय किती असू शकते. क्रॉफर्ड मार्केट, ताडदेव किंवा माहिम येथे ते लोक राहतात. ते काही कल्याण येथे राहणार नाही. यामुळे त्यांची कुठेतरी जवळच सोय करता येते काय, हे आपल्याला तपासून पाहावे लागेल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, त्यांच्या भागात १०० कोटी रुपयांचा निधी असताना फक्त तीनच इमारतींची दुरुस्ती झाली आहे. त्याबाबत आता माझ्याकडे माहिती नाही. परंतु २४ तासाच्या आत आपल्याला ही सर्व माहिती येईल. याबाबत मी आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांना जरुर विचारेल की, १०० कोटी रुपयांचा निधी असताना इमारत दुरुस्तीसाठी विलंब का लावला ? त्या विलंबाची खरी कारणे असतील तर ठीक आहे. परंतु ती कारणे खरी नसतील तर त्या अधिकाऱ्यांना जाब विचारला जाईल.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी खूप विस्तृत उत्तर दिलेले आहे. पण या घुसखोरांच्या बाबतीत अनेक ट्रान्झिट कॅम्पमध्ये असा व्यवसाय करणारेच लोक, एजंटच आहेत. जसे मुंबई महानगरपालिकेमध्ये.....(अडथळा).. अध्यक्ष महोदय, माझे बोलणे तर पूर्ण होऊ द्या.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मेरा स्पेसिफिक प्रश्न था. सम्माननीय मंत्री महोदय जी, जो पद रिक्त है उसके बारे में आपने मुझे कोई जवाब नहीं दिया है. आने वाले साल में १०० करोड़ रुपये कम होते है. इसलिए मेरा प्रश्न यह है कि उसका बजट म्हाडा को कितना बढ़ाकर देंगे, कितने रुपये की प्रोविजन की जाएगी? ऐसा मेरा दूसरा प्रश्न है. जब सम्माननीय श्री पृथ्वीराज चव्हाण जी मुख्यमंत्री थे, तब उन्होंने पीएमजीपी की इमारतों के लिए १२५ करोड़ रुपये दिए थे. पिछले पांच सालों में पीएमजीपी की इमारतों के लिए पैसा नहीं मिला है. उमरखाड़ी की पीएमजीपी की इमारतों का पुनर्विकास का क्या हुआ ? कामाठीपुरा के पुनर्विकास का काम कब शुरु करेंगे?

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, कामाठीपुरा और पीएमजीपी की इमारतों के बारे में जो प्रश्न पूछा गया है, उसके बारे में मैं आपको आराम से जवाब देता हूं. जो पद रिक्त है उसकी परीक्षा पूरी हो गई है. ५२३ पद भर रहे है और ये पूरे पद भरने के बाद शायद ही ऐसी कोई जगह होगी जहां पर म्हाडा का आदमी काम करते हुए नजर नहीं आएगा. आपके जितने भी पद रिक्त है वह आने वाले तीन महीने में भर दिए जाएंगे. अगले बजट का जो फंड है, सम्माननीय दादा ने कुछ दिया है.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, पुरानी इमारतों के लिए पैसा बहुत कम पड़ रहा है. लोग मर रहे है, कई सालों में एक-एक इमारत में ३५-३५ आदमी मर गए है. म्हाडा को रिपेअर के लिए जो १०० करोड़ रुपये दिए जाते है, वह रकम बहुत कम है. मुंबई की सेस इमारतों में रहने वाले लोगों की ओर से मेरी आपसे हाथ जोड़कर विनती है कि आप कृपया करके म्हाडा को रिपेअर के लिए फंड बढ़ाकर दीजिए. मरने के बाद पांच-पांच लाख रुपये देने से अच्छा है कि जिंदा लोगों को इमारत बनाकर दीजिए. यह बहुत ही पुण्य का काम है. सम्माननीय दादा जी से मेरी विनती है. सम्माननीय दादा, सदन में आपने एक बहुत अच्छा बजट पेश किया है. मेरा प्रश्न यह है कि इन १६ हजार पुरानी इमारतों में रहने वाले लोगों के लिए आप मेहरबानी करके फंड बढ़ाकर दीजिए, ऐसी मेरी विनती है. जब तक आप इसका आश्वासन नहीं देंगे तब तक मैं आपसे विनती करता रहूंगा. मुझे उम्मीद है कि आज आप इस बार माननीय मंत्री

श्री अमिन पटेल....

श्री जितेंद्र आव्हाड साहब की जो मांग है, उसे ध्यान में रखते हुए आप म्हाडा को रिपेअर के लिए फंड बढ़ाकर देंगे, इस बारे में कृपया आप घोषणा कीजिए.

डॉ.जितेंद्र आव्हाड : आप जो १०० करोड़ रुपये फंड की बात कर रहे है, इस बारे में मैं सम्माननीय दादा से बात करके इसको कम से कम २००-२५० करोड़ रुपये तक ले जाने की कोशिश करुंगा. मुझे पूरी उम्मीद है कि सम्माननीय दादा उसे समर्थन देंगे.

(**अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. कुणाल पाटील**)

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, संक्रमण शिबिरामध्ये घुसखोरांचे एजंट कायम काम करीत असतात. माझे ३ स्पेसिफिक प्रश्न आहेत. जेथे संक्रमण शिबिर आहेत तेथे म्हाडाच्या वतीने असे सूचना फलक लावले पाहिजेत की, या संक्रमण शिबिरांची विक्री करता येत नाही, हे बेकायदेशीर आहे. लोक अज्ञानाने १०,१५ ,२० लाख रुपयांमध्ये संक्रमण शिबिरामधील घरे विकत घेतात. नोटराईज्ड करुन पेमेंट घेणारे देखील आपल्याकडे काही लोक आहेत. आरटीआय ॲक्टीव्हिस्ट जे कायम अशा प्रकारे काम करतात त्यांची यादी महापालिकेने वॉर्ड ऑफिसमध्ये लावलेली आहे. त्या प्रमाणे या एजंटची यादी आपण डिस्प्ले करणार काय ? माझा तिसरा प्रश्न आहे की, या संबंधी ज्या तक्रारी आता पर्यंत पोलीस स्टेशनमध्ये आल्या आहेत, त्याचा निपटारा कालबध्द मर्यादेत करण्याचा निर्णय व प्रयत्न केला जाणार आहे काय ?

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर यांनी संक्रमण शिबिराबाबत प्रश्न विचारला आहे. हे एक जाळे असून एजंट ते जाळे विणतो. तो बरोबर गिऱ्हाईक हेरतो. त्यांच्या आपापसातील हे व्यवहार आहेत. घुसखोर हे गरीब लोक आपल्याकडे येतात. आपण त्या तक्रारी पोलीस स्टेशनला फॉरवर्ड करतो. मात्र त्या नंतर काही कारवाई होत आहे असे दिसत नाही. या करिता सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अशा एजंटांची नावे बोर्डावर लावावीत. म्हाडाच्या कार्यालयात सुरक्षित बोर्ड लावला जाईल. यामध्ये मोठी गोष्ट आहे की, गरिबांना हे सर्व माहीत असते. चुकीच्या पद्धतीने आपण घर घेत आहोत, हे चुकीचे आहे. तरी देखील सोप्या पद्धतीने घर मिळते याची लालच त्यांना रोखत नाही. त्यामुळे ते ही क्रिया करतात. ही क्रिया कधी तरी बंद झाली पाहिजे, अशी माझी मनापासून इच्छिा आहे. येत्या २-३ महिन्यात कडक कारवाई करुन हे कायमचे बंद करण्यात येईल.

श्री.अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, .......

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांनी दोन प्रश्न विचारले होते. त्याचे मी उत्तर दिले नव्हते. ते उत्तर देणे गरजेचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : आता लक्षवेधी क्र. ३ चर्चेला घेण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात नवीन विभागीय कार्यालयाच्या निर्मितीस मंजुरी मिळणे

**मु. शी. :** जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात नवीन विभागीय कार्यालयाच्या निर्मितीस मंजुरी मिळणे या संबंधी श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.रविंद्र वायकर ( जोगेश्वरी -पूर्व ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जोगेश्वरी विधानसभा क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'के' पूर्व व 'पी' दक्षिण गोरेगाव या दोन कार्यालयांशी जोडलेले असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे के/पूर्व कार्यालय अंधेरी (पूर्व) येथे कार्यरत असून त्याअंतर्गत येणाऱ्या एकूण १५ प्रभागांपैकी ७२, ७३, ७४, ७७, ७८, ७९ असे सहा प्रभाग जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील असणे, तर पी / दक्षिण हे कार्यालय गोरेगाव (पश्चिम) येथे कार्यरत असून त्याअंतर्गत येणाऱ्या एकूण ८ प्रभागांपैकी ५२ व ५३ हे दोन प्रभाग जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील असणे, जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेची के / पूर्व व पी / दक्षिण ही दोन्ही कार्यालये जवळपास ८ ते ९ कि.मी. दूर असल्याने या कार्यालयात कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून तेथे ये-जा करण्यात त्यांच्या वेळेचा अपव्यय होत असल्याने नागरिक त्रस्त होणे, त्यानुषंगाने जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील आजगावकर मैदान येथील प्लॉट क्रमांक ५१ व ५२ येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नविन कार्यालय सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी

श्री.रविंद्र वायकर ......

यांनी केली असता सदरहू बाब तांत्रिक स्वरूपाची व धोरणात्मक असल्याने या प्रकरणी व्दिसदस्यीय समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर कारवाई करण्यात येईल असे सह आयुक्त (सा.प्र.) यांनी कळविलेले असणे, उक्त जागेवर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नविन विभागीय कार्यालय सुरू होण्यास होत असलेला विलंब तसेच या प्रकरणी येत असलेल्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील पुनमनगर येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मजास मंडई या १० मजली इमारतीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नविन विभागीय कार्यालय सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये केलेली असणे, तसेच याआधी तेथे अगोदर इमारत प्रस्ताव विभागाचे कार्यालय सुरु असणे, सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रभागांच्या नविन रचनेनुसार विभाग कार्यालयांचे विभाजन व पुनर्रचना करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या दोन उपायुक्तांच्या समितीने दिलेल्या अहवालावर विविध गटनेत्यांनी अनेक हरकती, मुद्दे व सूचना उपस्थित केलेल्या असणे, या प्रकरणी दोन सह आयुक्तांच्या समितीकडून अहवाल मागविण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, तथापि सदरहू समितीने आपला अहवाल शासनास अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनास सादर केलेला नसणे, या प्रकरणी अहवाल सादर करण्यास होत असलेला विलंब लक्षात घेता संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कारवाई करून अहवाल लवकरात लवकर सादर करण्याबाबत समितीस निर्देश देण्याबाबत. मा. मुख्यमंत्री यांच्या समवेत पार पडलेल्या बैठ्कीत या प्रस्तावाला संमती देण्यात आली असून मुंबई उपनगर पालकमंत्री यांच्या बैठ्कीत मनपा आयुक्तांनी या मागणीला दुजोरा देणे, असे असतानाही जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील पुनमनगर येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर ......

ठाकरे मजास मंडई या १० मजली इमारतीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नविन विभाग कार्यालयाच्या निर्मितीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून शासन व बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार मागणी करण्यात येणे, या प्रकरणी नविन विभागीय कार्यालयाच्या निर्मितीस मंजूरी मिळणेबाबत होत असलेल्या विलंबामुळे स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण होत असलेली संतापाची भावना, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

श्री. एकनाथ शिंदे (नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. कुणाल पाटील )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये के पूर्व विभाग येथे जवळजवळ साडे १५ नगरसेवक येतात. उत्तरामध्ये नमूद केल्यानुसार, या के पूर्व विभागाची लोकसंख्या ८ लाख२३ हजार ८८५ आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

( सन्माननीय सदस्य सर्वश्री अबू आजमी, रईस शेख, अमिन पटेल

माननीय अध्यक्ष महोदयांसमवेत बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.रविंद्र वायकर ...

परंतु, ही मतदारांची संख्या सांगितलेली आहे. संपूर्ण कुटुबांची लोकसंख्या पकडली तर, जवळजवळ १५ ते १६ लाख इतकी लोकसंख्या आहे. फ्लोटिंग पॉप्युलेशन २० लाख इतके आहे. या २० लाखाच्या लोकसंख्येमध्ये के पूर्व विभाग अंधेरी स्टेशनला लागून आहे. माझा जोगेश्वरी पूर्व हा विधानसभा मतदारसंघ आहे. जोगेश्वरी पूर्व या एका विधानसभा मतदारसंघामध्ये ८ नगरसेवक येतात. त्यातील ६ नगरसेवक हे के पूर्व विभागामध्ये आणि २ नगरसेवक हे पी साऊथमध्ये येतात. माझा विधानसभेचा वॉर्ड हा जवळजवळ ... (अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष(श्री.कुणाल पाटील)**: सन्माननीय सदस्य मी आपल्याला जागेवर बसण्यास सांगितले आहे. पुढच्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा सुरु झालेली असल्याने आता आपल्याला बोलता येणार नाही. आपण आपल्या जागेवर बसावे.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, ६ वॉर्ड हे के इस्टमध्ये येतात. २ वॉर्ड पी साऊथमध्ये येतात.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर आपण जरा थांबावे. मंत्री महोदय आपण दोन मिनिटांमध्ये सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

**पृ.शी.:** मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास आणि म्हाडाच्या विविध प्रश्नांबाबत

**मु.शी.:** मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास आणि म्हाडाच्या विविध प्रश्नांबाबत श्री.अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, झीशान सिद्दिकी, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. धिरज देशमुख, सुरेश वरपुडकर, विकास ठाकरे, अमित झनक, लहू कानडे, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, बळवंत वानखडे, अबू आजमी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( चर्चा पुढे सुरु ...

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, श्री.अमिन पटेल यांनी कामाठीपुरा प्रकल्पाबाबतचा प्रश्न विचारलेला आहे. कामाठीपुरा हा २२ एकरचा प्रकल्प असून त्यामध्ये ८ हजार ३२८ कुटुंब राहत आहेत. कामाठीपुरा प्रकल्पाबाबतची कॅबिनेट नोट पूर्ण झाली असून. येत्या कॅबिनेटमध्ये त्याचा प्रस्ताव येईल. कामाठीपुराची डेव्हलपमेंट येत्या ३ महिन्यांमध्ये सुरु होईल, हे मी या सभागृहामध्ये जाहीर करतो.

( सन्माननीय सदस्य सर्वश्री अबू आजमी, रईस शेख, अमिन पटेल

माननीय अध्यक्ष महोदयांसमवेत बोलण्याचा प्रयत्न करतात.)

डॉ.जितेंद्र आव्हाड ...

अध्यक्ष महोदय, अशाच प्रकारच्या मिल्लत नगरच्या प्रकल्पाबाबत त्यांनी विचारलेले आहे. त्या मिल्लत नगरच्या प्रकल्पाबाबतही आम्ही कॅबिनेटमध्ये परमिशन घेत आहोत. त्याचीही मान्यता केली जाईल. ... (अडथळा)... हा उमरखाडी ...आपण पीएमजीपी कॉलनी सांगत आहात त्या पीएमजीपी कॉलनीमध्ये आता जी परिस्थिती आहे... आता जे कायदे अस्तित्वात आहेत, त्यातून पीएमजीपी कॉलनीचे डेव्हलपमेंट होऊ शकत नाही. त्यासाठी एक वेगळा कायदा आणून आपण पीएमजीपी कॉलनीचे नवीन पध्दतीने डेव्हलपमेंट करुन तेथील रहिवाशांना सुरक्षित ठेवू.

.............

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, आपण आज सकाळी जेव्हा लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घेतल्या त्यावेळी एका लक्षवेधी सूचनेवर ३ प्रश्न विचारावेत, असे सांगितले गेले होते. प्रत्येक लक्षवेधी सूचनेवर आपण ३ प्रश्न विचारले तरच आपण सर्व लक्षवेधी सूचनांवरील चर्चा पूर्ण करु शकतो.

आपले कामकाज अजून बाकी आहे. अर्थसंकल्पावरील चर्चा अपूर्ण आहे. ते कामकाज आपल्याला संपवायचे आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी समजून घेतले पाहिजे. प्रत्येक विषय आपण जेवढा लांबवणार तेवढा तो लांबू शकतो. अनेक संसदीय आयुधे आहेत. आपल्याला असे वाटत असेल की, आपले विषय अपूर्ण राहिला तर अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून आपण आपला विषय उपस्थित करु शकता. आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक ३ वरील चर्चा पुढे सुरु करु.

..........

( सन्माननीय सदस्य श्री.अबू आजमी वेलमध्ये येऊन

माननीय अध्यक्ष महोदयांसमवेत बोलतात)

**पृ.शी.:** जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात नवीन विभागीय कार्यालयाच्या निर्मितीस मंजुरी मिळणे

**मु.शी.:** जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात नवीन विभागीय कार्यालयाच्या निर्मितीस मंजुरी मिळणे या संबंधी श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

( चर्चा पुढे सुरु ...

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. आपण मला मघापासून ३ वेळा बसण्यास सांगितलेले आहे.

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, ....

**तालिका सभाध्यक्ष** : सम्माननीय सदस्य श्री अबू आजमी जी, आप बैठ जाईए. आपसे कहा गया था. आपकी विनती थी कि सम्माननीय सदस्य श्री अमिन पटेल जी को बोलने दीजिए, तो हमने उनको बोलने का मौका दिया है.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, माझ्या विधानसभा मतदारसंघातील ६ नगरसेवक हे के पूर्व विभागात येतात. २ नगरसेवक हे पी साऊथ विभागात येतात. त्यांच्यातील अंतर पाहिले तर अंधेरीला के पूर्व विभाग आहे. त्यामध्ये ९ कि.मी.चे अंतर आहे.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.रविंद्र वायकर....

"पी" साऊथचे अंतर १२ कि.मी. आहे. या वॉर्डचे दोन भाग करण्यात यावेत अशी विनंती मी सन २०१२ पासून आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे करीत आहे. त्यानंतर महानगरपालिकेने या संदर्भात समिती गठीत केली होती. सदरहू समितीच्या माध्यमातून अहवाल सादर करण्यात आले आहेत. या माध्यमातून त्यांनी दोन वॉर्ड करण्यास मान्यता देण्यात येईल असे सांगितले. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी माननीय नगरविकास मंत्री तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका उपस्थित होते. मी ज्या प्लॉटच्या संदर्भात मागणी केली होती, त्याची पाहणी करण्यात येत आहे. माननीय हिंदूहृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मंडईच्या १० मजली इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून त्याचे उद्घाटन करण्यात आले नसताना देखील तेथे वांद्रे येथील इमारत प्रस्तावाचे कार्यालय आणण्यात आले. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये नमूद केले आहे की, खाजगी व्यक्तीस भाडे तत्वावर १ ते ५ माळे देण्यात आले आहेत. याबाबत माझा आक्षेप आहे. सदरहू माळे खाजगी व्यक्तीला कसे काय देता येऊ शकतात ? सदरहू मंडईमध्ये ज्यांना गाळा पाहिजे असतील त्याची मागणी संबंधित लोक करतील. इमारत प्रस्तावाचे कार्यालय त्या इमारतीमध्ये आणण्यात आले आहे. "के" पूर्व वॉर्डचे दोन भाग करावयाचे आहेत. तरी देखील खाजगी विकासकाला सन २०१९ मध्ये इमारतीच्या बांधकामाचे कंत्राट देण्यात आले होते. त्यांना १ ते ३ मजले देण्यात यावेत. खालील टी इमारतीमध्ये १५० कार पार्किंग आहेत. ३ ते १० मजले "के" पूर्व उत्तर व दक्षिण अशी वॉर्डची विभागणी करण्यात येत आहे. त्यातील "के" उत्तर वॉर्डला देण्यात यावेत. माझी अशी मागणी होती की, जोगेश्वरी येथे नवीन वॉर्ड तयार करण्यात यावा. परंतु त्यांनी "के" उत्तर वॉर्ड करु या असे सांगितले आहे. माझी त्यास हरकत नाही. सदरहू इमारतीचे उद्घाटन केव्हा करण्यात येणार आहे ? सदरहू मंडईमध्ये आणखी कोणीही ताबा घेऊ शकते. त्यामुळे निवडणुकीपूर्वी "के" उत्तर वॉर्ड कार्यालय त्या इमारतीमध्ये सुरु करण्यात येणार आहे का ?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली आहे. त्यांनी वॉर्डचे क्षेत्रफळ, लोकसंख्या, वॉर्ड कार्यालयात जाण्यासाठी असलेले अंतर याबाबतची सविस्तर माहिती दिली आहे. हिंदूहृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मंडईमध्ये महानगरपालिकेने लीज करार केलेला आहे. त्यामधील काही भाग भाड्याने दिलेला असून उक्त मंडई अद्याप सुरु करण्यात आली नाही, ही वस्तुस्थिती आहे. या प्रकरणी असलेले करारनामे, डिपॉझीट रक्कम यासंबंधी नागरिकांच्या सोईने महानगरपालिकेने विचार करावा. समितीने त्यांना अहवाल दिला आहे. स्थायी समिती व महासभेचे अधिकार आता आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे आहेत. आता महानगरपालिकेची मुदत संपलेली आहे. गट नेत्यांकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर आयुक्तांनी निर्णय घ्यावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर मागील अनेक वर्षापासून सदरहू मागणी करीत आहेत. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठकही घेण्यात आली. एकंदरीत मोठ्या क्षेत्रांचा विचार करुन नागरिकांसाठी सोयीचे कार्यालय असले पाहिजे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे......

यापूर्वी देखील बिल्डिंग प्रस्तावाचे कार्यालय त्या ठिकाणी आहे. महानगरपालिका आयुक्तांनी लोकप्रतिनिधी व आमदार म्हणून त्यांनी केलेली मागणी पूर्ण करण्यास हरकत नाही. ज्यांनी सदर तीन मजले लीज किंवा भाडेतत्त्वाने घेतलेल आहेत, त्यांनी तेथील जनतेची होत असलेली गैरसोय पाहून सदर तीन मजले बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नवीन विभाग कार्यालयास देण्यास हरकत नाही.

अध्यक्ष महोदय, जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील आजगावकर मैदान येथील प्लॉट क्रमांक ५१ व ५२ येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नवीन कायमस्वरुपी कार्यालय उभारण्यात येणार आहे. तोपर्यंत हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मजास मंडई या १० मजली इमारतीत म्हणजे तात्पुरत्या स्वरुपात लोकांच्या सोयीसाठी किंवा लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून बृहन्मुंबई महानरगपालिकेचे नवीन विभाग कार्यालय सुरु करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना आहेत. कारण आता ते प्रशासक म्हणून काम करीत आहेत. जनतेच्या सोयीच्या दृष्टीने सदर ४ ते १० मजले आयुक्तांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदर ४ ते १० मजल्यांचा करार करण्यात आलेला आहे. परंतु संबंधित व्यक्तीने त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे कार्यालय सुरु केलेले नाही. त्यामुळे सदर ४ ते १० मजले आयुक्त महोदयांनी सदर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नवीन विभाग कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात यावेत. तसेच याबाबतच्या अन्य अडचणी येत असतील तर त्या तपासून त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, आपने मुझे बोलने के लिए समय दिया उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं.

अध्यक्ष महोदय, मेरा इलाका मानखुर्द-शिवाजीनगर है. मुंबई की फुटपाथ से जितने लोग उठाये जाते है, उन सभी को वहां पर भेज दिया जाता है. वहां पर एमएमआरडीए की नटवर पारिख नामक एक वसाहत है. जिसमें २५ से ३० हजार लोग है. वहां पर जो इमारते खाली पड़ी है, उसके सारे दरवाजे, इलेक्ट्रीक की फिटींग, शौचालय की फिटीग, ये सब चोरी हो गया है. वहां पर सुरक्षा के जिए जो लोग रखे

श्री अबू आजमी.......

गए है, उनमें केवल ४-५ लोग काम करते है और वह लोग भी दादागिरी करके सबसे पैसे वसूलते है. वे खुद घर का ताला खोलकर लोगों को इल्लीगल कब्जा देते है. ये मासूम लोग है, गरीब लोग है, जिनके पास घर नहीं है ऐसे लोग है. .....(व्यवधान)... अध्यक्ष महोदय, मैं म्हाडा के बारे में बोल रहा हूं. उनसे पैसे लेकर उनको घर बेच दिया जाता है. उसके बाद जब घर खाली कराना होता है तो उनको कोर्ट से स्टे मिल जाता है. ये क्या तमाशा बना हुआ है? सैंकड़ों घर ऐसे है जिन पर लोगों ने इल्लीगल कब्जा किया है. जिनको लिगल घर मिलना चाहिए उनको घर नहीं मिल रहा है. जहां पर २५-३० हजार लोग रहते है वहां कोई मार्केट नहीं है.

**तालिका सभाध्यक्ष (श्री कुणाल पाटील)** : सम्माननीय सदस्य श्री अबू आजमी जी, आपका ये प्रश्न संबंधित विभाग से थोड़ा हटकर है. आपका विषय म्हाडा से संबंधित है. अभी यहाँ पर नगर विकास विभाग की लक्षवेधी चल रही है. अगली बार जब संधी आएगी तो आपको इस बारे में बोलने का अवसर प्रदान किया जाएगा.

श्री.दिलीप लांडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांनी जो मुद्दा मांडलेला आहे. त्या अनुषंगाने माझा असा प्रश्न आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये एल वार्ड म्हणून प्रशासकीय कार्यालय आहे. या कार्यालयामध्ये मुंबई महानगरपालिकेमार्फत "एल" उत्तर आणि "एल" दक्षिण दोन नवीन कार्यालये करण्याचे नियोजित आहे, हे खरे आहे काय?

अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ज्या ठिकाणी "एल" उत्तर कार्यालय उभारण्यात येणार आहे, त्या ठिकाणचा प्रभाग "एल" दक्षिणमध्ये ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे तेथील लोकांना हे कार्यालय सोडचार किलोमीटर लांब होणार आहे. कारण तेथील लोकांना एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागातील कार्यालयामध्ये जावे लागणार आहे.

श्री.दिलीप लांडे........

अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ज्या प्रभागामध्ये नियोजित कार्यालय आहे, त्या प्रभागातील जनतेला दुसऱ्या कर्यालयामध्ये टाकण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय? जर हे खरे असेल तर त्यात बदल करणार आहात काय?

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिलीप लांडे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबाबत तपासणी करण्यात येईल. जनतेच्या सोयीसाठी निर्णय घेतले जात आहेत. लोकांना त्यांचे काम करण्यासाठी अधिक अंतरावर जावे लागू नये. याबाबत तपासणी करण्यात येईल. सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी जे असेल ते करण्यात येईल.

श्री. फारुक शाह : अध्यक्ष महोदय, धुळे मतदारसंघातील धुळे महानगरपालिकेमध्ये मागील तीन वर्षापासून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे. काही अधिकारी, पदाधिकारी यांनी संगनमत करुन विविध कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे. मंत्री महोदयांकडे मागील तीन वर्षापासून याबाबत लेखी तक्रार केली आहे. त्यावेळेस मंत्री महोदयांनी विभागाच्या प्रधान सचिवांना चौकशी करुन कार्यवाही करण्याचे आदेशित केले आहे. ज्या अधिकारी, पदाधिकाऱ्यांनी संगनमताने भ्रष्टाचार केला आहे, त्याकरिता विशेष चौकशी समिती नियुक्त करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सदरहू लक्षवेधी सूचना ही मुंबई शहराशी संबंधीत आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या लक्षवेधी सूचनेच्या स्कोपमध्ये येत नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत त्यांनी माझ्याकडे एक पत्र द्यावे. त्यानुसार तपासणी करुन निर्णय घेतला जाईल. तसेच सन्माननीय सदस्य श्री. अबु आजमी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्याबाबत एमएमआरडीएच्या आयुक्तांना सूचना दिल्या जातील. ज्याठिकाणी गैरसोय होत असेल, तोडफोड केली असेल तर त्याबाबत एमएमआरडीएच्या आयुक्तांना सूचना दिल्या जातील.

------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** आदिवासी समाजाचे बळजबरीने अमिष दाखवून होणारे धर्मांतरण थांबविणे

**मु.शी. :** आदिवासी समाजाचे बळजबरीने अमिष दाखवून होणारे धर्मांतरण थांबविणे याबाबत सन्माननीय सदस्य प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

प्रा. डॉ. अशोक उईके (राळेगाव) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यातील गोरगरीब आदिवासी जनतेचे बळजबरीने आमिष दाखवून व त्यांना आरोग्याच्या सेवा देऊन होणारे धर्मांतरण रोखण्याकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व ३४२ मध्ये सुधारणा करणे आवश्यक असणे, रामायण, महाभारतापासून छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, झाशीची राणी लक्ष्मीबाई या काळातील आदिवासींचा मोठा इतिहास व पराक्रम असणे, निसर्गप्रेमी आदिवासी समाज खेड्यापाड्यांमध्ये ११ टक्क्याच्या आसपास असून आरोग्य व अन्य सेवा देण्याच्या नावावर आमिष दाखवून बळजबरीने आदिवासींचे धर्मांतरण करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी देशातील पुरातन आदिवासी संस्कृती नष्ट होत असणे, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये अनुसूचित जातीचा माणूस धर्मांतरीत होऊन मूळ संस्कृतीपासून दूर गेला तर त्याच्या अनुसूचित जातीच्या सवलती बंद होणे, तथापि, कलम ३४२ नुसार अनुसूचित जमातीची व्यक्ती धर्मांतरीत होऊन मूळ संस्कृतीपासून दूर गेली तरी त्यांच्या अनुसूचित जमातीच्या सवलती बंद होत नसणे, उलट हा धर्मांतरित आदिवासी व्यक्ती अनुसूचित जमातीचा व अल्पसंख्यांक अशा आरक्षणाचा दुहेरी लाभ घेत असणे, त्यामुळे अनुसूचित

प्रा. डॉ. अशोक उईके ....

जमातीच्या व्यक्तीने कोणत्याही कारणास्तव धर्मांतर केल्यास त्याला अनुसूचित जमातीचे आरक्षण बंद करण्याच्या दृष्टीने संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व ३४२ मध्ये उचित सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ॲड. के.सी.पाडवी (आदिवासी विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

प्रा. डॉ. अशोक उईके : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी केवळ आदिवासी समाजाच्या लोकप्रिय संस्कृतीच्या अधीन राहून उत्तर दिले आहे. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आदिवासी बांधव हे देवपूजक असतात. ते देवाची पुजा करीत असतात. बरा देव, मोठा देवाची पुजा मोहाच्या पानांद्वारे पाणी शिंपडून केली जाते. अशी ही आदर्श संस्कृती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावेत.

प्रा. डॉ. अशोक उईके : अध्यक्ष महोदय, मला या विषयाची पार्श्वभुमी सभागृहाला सांगावी लागेल. ही लक्षवेधी सूचना मांडण्यामागील उद्देश मला सांगावा लागेल.

अध्यक्ष महोदय, आदिवासी समाजाची संस्कृती देव पुजेवर अवलंबून आहे. सहा देव, सात देव, चार देव, अकरा देव आणि समदेव असेल तर त्यामध्ये लग्न होत नाही. अशी ही आदर्श संस्कृती आहे. या सभागृहात विविध विषयांवरील लक्षवेधी सूचनेकरिता वेळ दिला जातो आणि आदिवासी समाजाच्या लक्षवेधीकरिता वेळ दिला जात नाही. हे योग्य नाही. मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. आदर्श संस्कृती असलेल्या आदिवासी समाजाचे धर्मांतर अमिष दाखवून होत आहे. आदिवासी समाजातील बांधवांचे धर्मांतर इस्लाम आणि ख्रिश्चन समाजामध्ये होत आहे. त्यामुळे आदिवासी बांधवाने धर्मांतर केल्यानंतर तो दोन फायदे घेत असतो. तो मूळ आदिवासी समाजाचा असल्यामुळे अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ घेतो व ख्रिश्चन आणि इस्लाम धर्मामध्ये धर्मांतर केल्यामुळे त्याही समाजाचा लाभ किंवा आरक्षण घेत असतो. एकच व्यक्ती दोन प्रकारचे आरक्षण घेत असते.

यानंतर श्री. चौधरी....

अप्रकाशित प्रत

प्रा.डॉ.अशोक उइके.....

सन २०११ च्या जनगणनेनुसार ८० लाख आदिवासी बांधवांनी ख्रिश्चन तर १२ लाख आदिवासींनी इस्लाम धर्म स्विकारला आहे. एवढया प्रचंड प्रमाणात धर्मांतर झाले आहे.

अध्यक्ष महोदय, एखाद्या आदिवासी कुटुंबाने इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मामध्ये धर्मांतर केले असेल आणि तरीही अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रावर सवलती व लाभ मिळवित असेल तर एक शासन निर्णय काढून अशा धर्मांतरितांच्या सवलती बंद करणार का, हा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी बांधवांना घटनेच्या कलम ३४२ नुसार आरक्षण मिळते. परंतु इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म स्विकारलेल्या महाराष्ट्रातील आदिवासी बांधवांना सदर आरक्षणाचा लाभ मिळू नये यासाठी घटनेत सुधारणा करण्यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारकडे शिफारस करणार का ?

ॲड.के.सी.पाडवी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपली भूमिका मांडताना सुरुवात अतिशय चांगली केली की, "आदिवासी समाजाची संस्कृती थोडी वेगळी व चांगली आहे." मी तर असे म्हणेन की, ग्रीक, सुमेरीयन, मेसोपोटामिया, मोहेंजोदडो, इत्यादी संस्कृतींप्रमाणे हे आदिवासी बांधव आजही जगत आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, घटनेतील कलम ३४१ मध्ये अनुसूचित जाती व कलम ३४२ मध्ये अनुसूचित जमातींसंदर्भात तरतुदी आहेत. कलम ३४२ (१) मध्ये धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी Tribal Advisory Council कशी असावी, याबाबत नमूद केलेले आहे. कलम ३४२ (२) मध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये कोणत्या जाती किंवा जमातींचा समावेश करावा याबाबतचा अधिकार केंद्र सरकारला दिलेला आहे. यामध्ये कोणताही बदल झालेला नाही. दिनांक २ मे, १९७५ रोजी केंद्र सरकारने एक धोरण ठरविले व त्यामध्ये म्हटले की, "आदिवासी कोणत्याही धर्मात सामावू शकतात."

ॲड.के.सी.पाडवी.....

त्यांनी असे म्हटलेले आहे की, "If a person claims to be Scheduled Tribe he may profess any religion" याव्यतिरिक्त यामध्ये अद्यापपर्यंत कोणताही बदल झालेला नाही. त्यामुळे पहिला मुद्दा म्हणजे सवलती काढून घेण्याचा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारितील आहे. त्याबाबत आपण येथे काहीही करु शकत नाहीत. तसेच केंद्र सरकारने देखील यासंदर्भात कायदा करताना म्हटलेले आहे की, जो आपली संस्कृती सांभाळून आहे तो आदिवासी समाज आहे. त्यालाच अनुसूचित जमाती प्रवर्ग म्हणतात.

अध्यक्ष महोदय, दिनांक २ डिसेंबर, १९४७ रोजी आदिवासी शब्द टाकावा किंवा टाकू नये याबाबत संविधान समितीच्या बैठकीमध्ये चर्चा सुरु होती. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की, Untouchability सारखा प्रकार घडू नये यासाठी Scheduled Tribe असाच शब्दप्रयोग करावा लागेल. त्यामुळे Scheduled Tribe हा शब्द राहिला. भलेही आदिवासी बांधव परिस्थितीने गरीब असतील परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ते आजही संस्कृतीने श्रीमंत आहेत. त्यांच्या सवलतींबाबत आतापर्यंत केंद्र सरकारने फक्त दिनांक २ मे, १९७५ रोजी सांगितले आहे. त्यामुळे दुसरा काही प्रश्नच येत नाही.

श्री मंगलप्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मेरा प्रश्न इतना ही है कि यह केवल आदिवासी के धर्म सुविधा का सवाल नहीं है. पूरे महाराष्ट्र में बड़े पैमाने पर धर्मांतरण शुरु है. सरकार की तरफ से धर्मांतरण को रोकने के लिए क्या कोई कानून लाया जाएगा? क्रिश्चनों और मुस्लिमों की तरफ से बड़ी संख्या में केवल आदिवासी ही नहीं,तो.... मुंबई शहर में भी धर्मांतरण शुरु है. क्या सरकार धर्मांतरण को रोकने के लिए कोई कानून लाने वाली है ? जैसे कि उत्तरप्रदेश और मध्यप्रदेश में कानून बनाए गए है. वहां पर धर्मांतरण को नॉन कॉग्निजेबल ऑफेन्स डिक्लेअर किया गया है. क्या इसी तरह महाराष्ट्र में भी जबरन धर्मांतरण के बारे में सरकार ऐसा कोई कानून लाने वाली है ?

यानंतर श्री.धुमाळे.....

ॲड के. सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, येथे कोणताही कायदा आणायची गरज नाही. ही संस्कृती आहे. आदिवासींचा धर्म कोणता हे आधी सांगा आणि मग त्यानंतर....

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय काय बोलतात ते त्यांना कळत आहे काय ? भारतीय घटनेने आदिवासी हा हिंदू धर्माचा भाग मानलेला आहे. त्यांच्यामध्ये प्रचार होऊन ते काय लिहितात तो भाग महत्त्वाचा नाही. आपण मंत्री आहात. त्यामुळे आपण जबाबदारीने बोलावे.

ॲड के. सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, याबाबत कोणतीही समिती नेमायची असेल तर ती आपण नेमू शकतो. यासाठी आपल्याला ॲन्थ्रॉपॉलॉजिस्ट लागतील. त्या ॲन्थ्रॉपॉलॉजिस्ट लोकांनी जे मत दिले असेल....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, एका महत्त्वाच्या विषयावर ही लक्षवेधी सूचना आहे. त्याला जर मंत्री महोदयांनी स्पेसिफिक दिले तर जो आशय माजी मंत्री प्रा. अशोक उईके यांनी जो प्रश्न विचारला तो अतिशय स्पष्ट आहे. दऱ्या खोऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर राहणाऱ्या आदिवासी बांधवांचे धर्मांतरण होते. धर्मांतर झाल्यानंतर त्यांना आरक्षणाचा फायदा देता येत नाही. कारण घटनेच्या तरतुदीमध्ये आरक्षण धर्मांतर नाही, हा यामधील स्पेसिफिक भाव आहे. आपल्याकडून इतकीच अपेक्षा आहे की, आदिवासींचे धर्मांतर होऊ नये. मोहापोटी, लालसेपोटी जेव्हा धर्मांतर केले जाते, सेवेचा झेंडा घेऊन धर्मांतर केले जाते तेव्हा अशा लोकांना दोन्हीही फायदे देता येणार नाही, असे संविधानाच्या तरतुदीत नमूद आहे. त्यामुळे आपल्याकडून २ गोष्टींची अपेक्षा आहे. एक म्हणजे या संदर्भात सर्व अधिकाऱ्यांसमवेत बैठक घ्यावी आणि दुसरी म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ मध्ये बदल करण्याच्या दृष्टीने आपण एक सुतोवाच केले. या संदर्भात आपण केंद्र शासनाकडे एक शिष्टमंडळ घेऊन जावू. आपण आपली भावना आणि इच्छा जी असेल ती केंद्र शासनापर्यंत पोहोचवू. पण आपल्या अधिकाऱ्यांनी उत्तर देताना २ मे १९७५ चे जे परिपत्रक सांगितले आहे, त्याच्यावर आक्षेप आहे. ते

श्री. सुधीर मुनगंटीवार...

परिपत्रक आजपर्यंत कोणाच्या लक्षात का आलं नाही ते माहिती नाही. कारण असे परिपत्रक आपल्याला काढताच येत नाही. आपण संविधानाचे डिबेट्स वाचले तर त्यामध्ये धर्माला आरक्षण दिलेले नाही. फक्त आणि फक्त या देशामध्ये ८५ लाख बौध्द धर्मिय आहेत आणि त्यापैकी ६५ लाख बौध्द धर्मिय हे महाराष्ट्रात आहेत.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कुणाल पाटील) :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण कृपया प्रश्न विचारावेत.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आपण केंद्राकडे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ मध्ये बदल करण्यासाठी सर्व आदिवासी आमदारांना केंद्र शासनाकडे घेऊन जाणार आहात काय आणि दुसरा प्रश्न आहे की, आपण या संदर्भात एखादी समिती नेमणार आहात काय ?

ॲड के. सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, मी आधीच सांगितले आहे की, या प्रकरणी एक समिती नेमली जाईल. ॲन्थ्रॉपॉलॉजिस्ट म्हणजे मानव वंश शास्त्रज्ञ यांचे मत घेतले जाईल व त्यानंतर केंद्र शासनाकडे जायचे की नाही याचा निर्णय घेतला जाईल. भारतीय अनुच्छेद ३४२ मध्ये फक्त दोनच प्रावधन आहेत. धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी Tribal Advisory Council (TAC) समिती आहे आणि २ मध्ये यादी कोणती असली पाहिजे, ते नमूद आहे. ती यादी सन १९५० ला झाली, १९५६ मध्ये झाली आणि त्यानंतर १९७६ मध्ये झाली. ती यादी आता पुरेशी आहे. त्यामध्ये जर काही कमी जास्त करायचे असेल तर त्यासाठी टी.आर.टी.ए. प्रावधान आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला की याबाबत समिती नेमली जाईल काय तर त्यावर निश्चितपणे एखादी समिती नेमली जाईल.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

डॉ. अशोक उईके : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी असे उत्तर दिले की, अनुसुचित जनजातीच्या बांधवांना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ नुसार आरक्षण मिळते. अनुसूची ६ नुसार आपण आरक्षणाचा लाभ आणि उपयोग घेतो. माननीय मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, आपल्या अधिकारात आणि अधिकार कक्षेत नसेल तर या समस्त सभागृहाच्या आणि सर्व लोकप्रतिनिधींच्या भावना लक्षात घेता तसेच उद्देश आणि हेतू लक्षात घेता आपण केंद्र शासनाकडे शिफारस करावी. तसेच एक व्यक्ती दोन लाभ घेऊ शकत नाही, असे जाहीर सांगावे एवढीच आमची अपेक्षा होती.

ॲड. के.सी. पाडवी : अध्यक्ष महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ मध्ये असे प्रावधान नाही. अनुच्छेद १५ आणि १६(४) यानुसार सवलती आहेत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ मध्ये फक्त दोनच प्रावधान आहेत. सन्माननीय सदस्य माझे मित्र डॉक्टर आहेत त्यांनी पीएचडी केली असेल मला माहीत नाही. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, या कलमामध्ये कुठेही तशाप्रकारचे प्रावधान नाही.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कुणाल पाटील)** : आता अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा आणि शेवटचा दिवस) घेण्यात येईल.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, आज अर्थसंकल्पावरील चर्चेचा दुसरा दिवस आहे. आपल्यामार्फत माझी सभागृहाला विनंती आहे की, ती चर्चा किती वेळाची ठेवायची हे निश्चित करावे. कारण मी या चर्चेचे उत्तर उद्या प्रश्नोत्तराचा तास झाल्यांनतर देणार आहे. उद्या सकाळी १०.०० ते १०.४५ पर्यंत लक्षवेधी सूचना घ्याव्यात. मग उद्या परत लक्षवेधी सूचना राहणार नाहीत. तसेच उद्या पुरवणी मागण्या सुद्धा घेण्यात येणार आहेत. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव सुद्धा आहे. त्यामुळे आपण याबाबतचा निर्णय घ्या. शेवटी सभागृह जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी आपण ३ तासाचा वेळ ठेवलेला आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, आज आपण अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा होऊ द्यावी आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे उत्तर उद्या घ्यावे. कारण आज रात्री जे प्रश्न उपस्थित झाले किंवा जी आकडेवारी उपस्थित झाली त्यावर त्यांना योग्य पद्धतीने उत्तर देता येईल. त्यामुळे आज उत्तर घेण्याच्या ऐवजी मला व्यक्तिगत रितीने वाटते की, पूर्वी ही चर्चा ७ दिवस चालत होती ती आता आपण २ दिवसच घेत आहोत म्हणून कमीत कमी २ दिवसांमध्ये चांगली चर्चा व्हावी.

असुधारित प्रत

## माहितीच्या मुद्याबाबत

श्री. रवि राणा : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. काल माननीय गृह मंत्र्यांनी जे उत्तर दिले आहे त्यातून आम्हाला न्याय मिळालेला नाही. त्याच्याविरुद्ध आम्ही सभात्याग देखील केला होता. त्यामुळे मी आपल्याला न्याय मागण्यासाठी उभा आहे. ज्या पद्धतीने दिनांक ९ फेब्रुवारी, २०२२ रोजी एक घटना घडली. त्या घटनेमध्ये माझा कोणताही संबंध नव्हता कारण मी दिल्ली येथे होतो. भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ आणि कलम ३५३ सारखा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर तेथील निर्दोष लोकांवर खोटा गुन्हा दाखल करुन त्यांना फसविण्यात आले. मनपा आयुक्त श्री. आष्टीकर यांनी काही राजकीय लोकांच्या सांगण्यावरुन माझ्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ आणि कलम ३५३ सारखा गुन्हा दाखल केला. त्या गुन्ह्यामध्ये अमरावतीमधील प्रतिष्ठित असणाऱ्या अशा अनेक लोकांची नावे दाखल करण्यात आली. त्यावेळेला अमरावतीच्या सी.पी. आरती सिंह यांनी तो गुन्हा दाखल करुन घेतला. मी जो न्याय मागत आहे तो विषय सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांसाठी महत्त्वाचा आहे. अशा प्रकारची वेळ कोणावरही येऊ शकते. राजापेठ येथील श्री. राहुल राऊत या पोलीस इन्स्पेक्टरने ज्या निर्दोष लोकांना अटक केले त्यांना रात्री १.३० वाजता पोलीस कोठडीमध्ये जाऊन धमकी दिली आणि त्यांना व्हिडिओ दाखवत म्हणतात की, हे बघा,मी आताच आमदार रवि राणा यांच्या घरुन आलेलो आहे. ते जर हाती लागले असते तर कशा पद्धतीने कारवाई केली असती हे मी त्यांना दाखवले असते.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय गृह मंत्र्यांनी याची नोंद घ्यावी.

-------

असुधारित प्रत

## कार्यपद्धती विषयक मुद्याबाबत

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझा कार्यपद्धती विषयक मुद्दा आहे. सभागृहामध्ये दोन्ही बाजुचे सन्माननीय सदस्य हे जनतेच्या माध्यमातून निवडून आलेले आहेत. परंतु त्यांना सर्व विषयावर बोलण्याची संधी मिळत नाही. आपण लक्षवेधी सुचनेमध्ये सुद्धा प्रश्न मर्यादित करता. तसेच प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सुद्धा काहीतरी कार्यवाही सुरु असते.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, आता या अधिवेशनाचा दुसरा आठवडा सुरु आहे. या पूर्वीच्या अधिवेशनामध्ये आपण जवळजवळ रोज औचित्याचे मुद्दे घेत होतो. आता कोव्हिडनंतरचे हे पहिलेच मोठे अधिवेशन आहे. सन्माननीय सदस्यांना आपल्या मतदारसंघातील अनेक महत्त्वाचे विषय सदनात मांडावयाचे असतात, त्याकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधायचे असते. या करिता औचित्याचे मुद्दे उद्या पासून चर्चेला घेण्यात यावेत, अशी मी आपल्याला विनंती करतो.

सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा यांच्यावरील कारवाई बाबत

श्री. गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री रवि राणा यांच्या जीवनामध्ये जो प्रसंग आलेला आहे, तो महत्त्वाचा आहे.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. कुणाल पाटील )** : आपण या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहात. सदनामध्ये गृह मंत्री महोदय उपस्थित असताना हा विषय झाला होता. या एकाच विषयावर वारंवार बोलण्यापेक्षा माननीय गृह मंत्री यांच्याकडून योग्य ती दखल घेतली जाईल.

श्री. रवि राणा : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी माननीय गृह मंत्री यांनी चुकीचे, बिनबुडाचे उत्तर देऊन या सदनाची दिशाभूल केली आहे. एका सदस्याला फसवण्यासाठी जर त्यांनी अधिकाऱ्यांना सुपारी दिली असेल तर या संबंधी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी त्याचे उत्तर दिले पाहिजे. माननीय गृह मंत्री यांनी या ठिकाणी चुकीचे उत्तर दिलेले आहे. मला फसवण्यासाठी, अडकवण्यासाठी तसेच माझ्या सोबत जे निर्दोष आहेत, त्यांना अडकवण्यासाठी कलम ३०७ व कलम ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल केला गेला. यावर मला उत्तर पाहिजे. अधिकारी श्री.मनिष ठाकरे व श्री.राहुल राऊत या दोन्ही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाली पाहिजे. त्यांनी चुकीचा गुन्हा दाखल केला आहे. श्री.मनिष ठाकरे त्यावेळी .....

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री सुधीर मुनगंटीवार, या विषयावर सविस्तर चर्चा होऊन माननीय गृह मंत्री यांनी उत्तर दिले होते. एका विषयावर इतक्या वेळा चर्चा होणे योग्य वाटत नाही.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य हा मुद्दा चार – चार वेळा उपस्थित करीत असतील तर विधानसभेच्या दृष्टीने ही गंभीर बाब आहे. या बाबत आपण अध्यक्ष म्हणून निर्देष द्यावेत. या बाबत माननीय गृह मंत्री यांनी निवेदन करावे, सत्य कथन करावे. सत्य स्थितीच्या आधारे निवेदन करावे.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय गृह मंत्री यांनी या विषयावर सदनामध्ये सविस्तर निवेदन केले होते. यावर माननीय गृह मंत्री सविस्तर बोलले आहेत.

असुधारित प्रत

' द कश्मिर फाईल्स ' या चित्रपटाबाबत

श्री. राम कदम : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. शिवरायांच्या महाराष्ट्रातील भिवंडी या शहरात हसीन पीव्हीआर नावाचे थिएटर आहे. येथे ' द कश्मिर फाईल्स ' हा चित्रपट दाखवण्यात आला. हिंदुंच्या भावभावना, त्यांच्यावर कसे अत्याचार झाले, कोणत्या क्रुरतेने त्यांना काश्मिरच्या भूमीतून हुसकावून लावले या संबंधी हा चित्रपट अर्धवट सुरु असताना, तो थांबवण्यात आला. एवढेच नव्हे तर दुसऱ्या दिवशी तो पूर्णपणे बंद केला. माझी आपल्या माध्यमातून राज्याच्या सरकारला विनंती आहे. हा चित्रपट का थांबवला गेला, त्याचे काय कारण होते, तो कोणाला पसंत नव्हता, राज्याच्या सरकारने थिएटर मालकावर काय कारवाई केली ? आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, बुकींग डॉटकॉमवर गेल्यानंतर ' द कश्मिर फाईल्स ' हा चित्रपट हाऊस फुल दाखविला जातो. यामुळे लोकांना तिकीट मिळत नाही. मात्र प्रत्यक्ष थिएटरमध्ये गेल्यानंतर थिएटर रिकामे असते. हे काय षडयंत्र आहे ? महाराष्ट्र शासनाकडे हिंदू बांधव रस्त्यावर उतरुन मागणी करीत आहे की, हा चित्रपट करमुक्त करावा. सन्माननीय सदस्य श्री.मंगलप्रभात लोढा व अनेक सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. आज देखील मुंबईत मेट्रो थिएटरच्या बाहेर मी व माझे सहकारी सन्माननीय सदस्य ॲड राहुल नार्वेकर, आम्ही हिंदु लोकांच्या भावना प्रकट केल्या.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.राम कदम ....

माननीय श्री.अजित पवार सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी ताबडतोब आजच्या आज निर्णय घेऊन या चित्रपटाला टॅक्स फ्री करावे. सर्व थिएटर मालकांच्या असोसिएशनला बोलावून घेऊन महाराष्ट्रामध्ये सर्वांना हा चित्रपट पाहता आला पाहिजे, याकरिता त्याचे अधिकाधिक शो करावेत, अशी माझी मागणी आहे. भिवंडी येथील थिएटरमध्ये हा शो का बंद पाडला, याचीही शासनाने चौकशी करावी.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.कुणाल पाटील)** : शासनाने याची चौकशी करावी.

.........

**तालिका सभाध्यक्ष** : आता आपण सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरुवात करु.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी माझी विनंती आहे की, कपात सूचनेची मुदत वाढवून देण्यात यावी.

**तालिका सभाध्यक्ष** : ही बाब तपासून त्यावर कारवाई करु.

.......

**तालिका सभाध्यक्ष** : आता आपण सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरुवात करुया. ... (अडथळा) ...

**हरकतीचा मुद्दा**

श्री.अतुल बेनके : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास दर्शविणारे अनेक चित्रपट आहेत. आता पावनखिंड हा चित्रपट प्रदर्शित झालेला आहे. महाराष्ट्राचा जाज्वल्य इतिहास दर्शविणारे छत्रपती शिवाजी महाराजांवरील अनेक चित्रपट आहेत. आताचा पावनखिंड हा चित्रपट टॅक्स फ्री करावा, ही

श्री.अतुल बेनके ...

मागणी सोडून दिली व इतर काही तरी मागण्या करायच्या हे चुकीचे आहे. आमची महाराष्ट्राच्या सूपुत्रांची मागणी आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासावरील जेवढे चित्रपट आहेत, ते टॅक्स फ्री करावेत.

............

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितरित्या घोषणा देतात)

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये

जाऊन फलक फडकवित घोषणा देतात)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर काल सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर हे ऑनलेग होते. आता त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

......

असुधारित प्रत

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितरित्या घोषणा देतात)

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये

जाऊन फलक फडकवित घोषणा देतात)

**पृ.शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा
**मु.शी.** : सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु......

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, पंचसूत्री प्रमाणे काल माझा कृषीच्या संदर्भामध्ये एक विषय ... (अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष** : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, सभागृहाचे गांभीर्य पाळण्याकरिता आपण सर्वांनी आपापल्या जागेवर बसावे. आपण अर्थसंकल्पावर चर्चा करीत आहोत. अर्थसंकल्प हा या सभागृहाच्या दृष्टीने, या राज्याच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, यामध्ये आरोग्य सेवेच्या माध्यमातून प्रथम दर्जाचे ट्रॉमा केअर युनिट्स ... (अडथळा)... मुंबई प्रमाणे बाहेर देखील अनेक ठिकाणी असावेत या अनुषंगाने शासनाने निर्णय घेतलेला आहे. ... (अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण फलक खाली करावा. आपण फलक जमा करावा.

श्री.रविंद्र वायकर : नांदेड, अमरावती, खंडाळा, अहमदनगर व सातारा या ठिकाणी प्रत्येकी ५० खाटांचे प्रथम दर्जाचे ट्रॉमा केअर सेंटर स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. ... (अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष** : जोपर्यंत आपण सर्वजण जागेवर बसणार नाहीत, तोपर्यंत चर्चेला सुरुवात होऊ शकत नाही. आपण जागेवर बसावे.

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये

जाऊन फलक फडकवित घोषणा देतात)

श्री.रविंद्र वायकर : राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय अत्यंत स्तुत्य असून खुल्या दिल्याने त्याचे स्वागत केले पाहिजे. अर्थ मंत्री महोदयांनी ... (अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष** : वेलमध्ये असलेल्या सन्माननीय सदस्यांनी तत्काळ जागेवर बसावे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, लिथोट्रिप्सी म्हणजे किडनी स्टोन उपचारासंबंधी अर्थसंकल्पात विचार मांडले आहेत. सदरहू आजार अनेक लोकांना होतो व त्यासाठी खाजगी रुग्णालयात सुमारे २५ ते ३० हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. किडनी स्टोनचा चुरा करण्याची लिथोट्रिप्सी उपचार पद्धत अंमलात आणण्यात येणार आहे.

श्री.चंद्रकांत (दादा) पाटील : अध्यक्ष महोदय, पावनखिंड, फर्जंद अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपट प्रसारित झालेले आहेत त्यांना करमुक्त केले पाहिजे. काश्मिरच्या प्रश्नाबाबत सत्ताधारी सन्माननीय सदस्य यांचे दुमत आहे का, तेथे हिंदूंचे शिरकाण झाले नाही का, हिंदूंवर अन्याय झाले नाहीत का ? ही वस्तुस्थिती मांडणारा काश्मिर फाईल्स हा चित्रपट आहे. हा इतिहास मांडावयाचा नाही का, तो इतिहास शिकवायाचा नाही का ? हा चित्रपट अन्य राज्यांनी करमुक्त केला आहे. आपल्या राज्यातही तो चित्रपट करमुक्त करण्याची मागणी करणे चुकीचे आहे का ? काश्मिर येथे हिंदूंवर अन्याय झाला नाही का, याचे उत्तर सन्माननीय सदस्यांनी द्यावे. अन्यथा काश्मिर येथे हिंदूंना खूप सन्मानाने वागविले आहे, हे मान्य करावे.

श्री.बळवंत वानखडे : अध्यक्ष महोदय, काश्मिर फाईल्स चित्रपट करमुक्त करण्याची मागणी करण्यात येते. त्याप्रमाणे झुंड चित्रपट देखील करमुक्त करण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, लिथोट्रिप्सी उपचारासाठी जो खर्च येतो त्यासाठी शासनाने राज्यातील २०० खाटांच्या सर्व रुग्णालयांमध्ये पुढील ३ वर्षात उक्त उपचार पद्धती सुरु करण्यात येणार असून त्यासाठी शासनाने १७.६० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला मी त्याबद्दल वित्त मंत्री महोदयांचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, नेत्र विभागांचेही श्रेणी वर्धन करण्यात आले आहे. फेको उपचार पद्धतीच्या सहाय्याने नेत्र विकारांवर उपचार करण्यात येतो. त्याकरिता

श्री.रविंद्र वायकर ...

शासनाने पहिल्या टप्प्यात २० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. मी याचे स्वागत करतो. मोतीबिंदू आजारासाठी इंजेक्शन देऊन ऑपरेशन करण्यात येत होते. आता फेको या आधुनिक उपचार पद्धतीच्या सहाय्याने मोतीबिंदू ऑपरेशन करताना इंजेक्शन न देता डोळयांमध्ये ड्रॉप टाकून शस्त्रक्रिया करता येणार आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला यासाठी मी माननीय वित्त मंत्री यांचा आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, महिला व नवजात शिशूंकरिता १०० खाटांचे स्त्री रुग्णालय स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून अकोला व बीड येथे स्त्री रुग्णालयाचे बांधकाम व श्रेणी वर्धनाचे काम हाती घेण्यात आले आहे. मी त्याबद्दल माननीय वित्त मंत्री यांचा आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, शिव आरोग्य योजनेच्या माध्यमातून टेलिमेडिसीन केंद्र स्थापन करण्याची योजना सुरु करण्यात येत आहे. एखाद्या ग्रामीण भागामधील व्यक्तीस उपचाराची गरज असेल व त्याकरिता त्याला माहिती पाहिजे असल्यास टेलिमेडिसीनच्या माध्यमातून व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे औषध व उपचारांची माहिती देण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, पदव्युत्तर पदवी प्रवेश क्षमतेची वाढ करण्यासाठी ३०० एकर जागेमध्ये इंद्रायणी मेडीसीटी उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे. यामागे शासनाचा मानस चांगला आहे. वैद्यकीय संशोधन, औषध उत्पादन, वेलनेस व फिजिओ थेरेपीचा समावेश आहे. फिजिओ थेरेपीस अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. अगोदर फिजिओ थेरेपीचा डिप्लोमा होता. आता त्याचा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात येत असून यापुढे विद्यार्थ्यांना फिजिओ थेरेपी अभ्यासक्रमाची पदवी मिळू शकणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये शासनाने आतापर्यंत नवीन मेडीकल कॉलेज सुरु केले नाही. ते सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे. युक्रेनमध्ये अनेक तरुण वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी गेले होते. त्यांना बाहेर जाण्याची आवश्यकता भासू नये याकरिता

श्री.रविंद्र वायकर ...

मुंबई उपनगरामध्ये मेडिकल कॉलेज सुरु करण्याची मी मागणी केली होती. माझ्या विधानसभा मतदारसंघात पशुसंवर्धन विभागाच्या व्हेटरनरी कॉलेजची जागा आहे, तेथे मेडीकल कॉलेज सुरु करण्याची मी मागणी केली होती.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर.....

कारण मेडिकलचे शिक्षण घेण्यासाठी या देशातील सुमारे २० हजार विद्यार्थी युक्रेनमध्ये गेले होते. परंतु युद्धामुळे ते सर्व विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकून पडले आहेत. युक्रेन या देशामध्ये कमी खर्चामध्ये व कमी फीमध्ये मेडिकलचे शिक्षण दिले जाते आणि त्या देशामध्ये मेडिकलच्या जागा देखील मोठ्या प्रमाणावर असतात. म्हणून त्या देशामध्ये अनेकजण मेडिकलचे शिक्षण घेऊ इच्छितात. त्यामुळे आपल्या देशामध्ये देखील मेडिकलच्या जास्तीत जास्त वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. सदर जागा वाढविण्यासाठी मी मागणी केलेल्या ठिकाणी मेडिकल कॉलेज उभारण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो. सदर ठिकाणी मेडिकल कॉलेज निर्माण केल्यानंतर राज्यातील डॉक्टरांच्या संख्येमध्ये वाढ होईल आणि त्याचा फायदा ग्रामीण भागातील जनतेला होईल.

अध्यक्ष महोदय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कंत्राटी स्वरुपात नियुक्त करण्यात येणाऱ्या प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक यांच्या मानधनामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यात आलेली आहे. पूर्वी मेडिकल कॉलेजमधील प्राध्यापकांना ५० हजार रुपये मानधन दिले जात होते. परंतु आता त्यामध्ये वाढ करुन १ लाख ८६ हजार ते २ लाख ३० हजार रुपये इतके मानधन करण्यात आले आहे. सहाय्यक प्राध्यापकांचे पूर्वीचे मानधन ४० हजार रुपये इतके होते. परंतु आता त्यामध्ये वाढ करुन १ लाख ७० हजार ते २ लाख १० हजार इतके मानधन करण्यात आलेले आहे. प्राध्यापकांच्या मानधनामध्ये वाढ केल्यामुळे जास्तीत जास्त व हुशार प्राध्यापक उपलब्ध होऊ शकतील, असा मला विश्वास आहे.

अध्यक्ष महोदय, मनुष्यबळ विकास हा देखील पंचसुत्रीमधील एक विषय आहे. याबाबीकडे देखील माननीय अर्थ मंत्री यांनी विशेष लक्ष दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मनुष्यबळ विकासांतर्गत एक-एक इनोवेशन हब शासनाकडून स्थापन करण्यात येणार आहे. यासाठी शासनाने ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्यामध्ये खाजगी सहभागातून कौशल्यवर्धन केंद्र उभारुन दरवर्षी ५ हजार विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षण देण्यात येणार आहे.

श्री.रविंद्र वायकर.....

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये टिकून राहायचे असेल तर आपणास या बाबींची अत्यंत गरज आहे. यामध्ये Innovation, Incubation, Eco-system चा उल्लेख देखील आपण केलेला आहे. त्याबद्दल मी आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, गायनसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या नावे आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय सुरु करण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. हे महाविद्यालय सुरु करण्याबाबत कोणाचेही दुमत नाही.

अध्यक्ष महादेय, सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांना माहिती आहे की, शिवसेनाप्रमुख यांच्या माध्यमातून एक अध्यासन सुरु करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु सदर अध्यासन अद्याप सुरु करण्यात आलेले नाही. उक्त अध्यासनास हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आर्ट ॲण्ड कल्चर केंद्र असे नाव देण्याचा प्रस्ताव सादर केला होता. तसेच उक्त अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी तेव्हा ५ कोटी रुपये देण्यात आले होते. याबाबत आता तरी विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकारच्या पंचसुत्रीमध्ये दळणवळनाचा देखील समावेश केलेला आहे. यामध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा दुसरा टप्पा सुरु केलेला आहे. मागील सरकारच्या काळामध्ये पहिल्या टप्प्याची सुरुवात करण्यात आली होती.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

श्री. रविंद्र वायकर....

अध्यक्ष महोदय, दुसऱ्या टप्प्यासाठी सुमारे ७ हजार ५०० कोटी रुपये किंमतीच्या १० हजार कि.मी. लांबीच्या ग्रामीण रस्त्यांच्या कामांना मंजुरी दिली असून सदर कामे पुढील दोन वर्षात करण्यात येणार आहेत. याबाबत मी राज्य सरकारचे आभार व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील या एक काम आहे. जोगेश्वरी जंक्शन येथे मेट्रो – ६ आहे. मेट्रो – ६ प्रकल्पाला मेट्रो – ७ छेदून जात आहे. ट्रॉमा केअर सेंटर येथे एक भुयारी मार्ग व्हावा, अशी मी मागणी केली आहे. तिचा समावेश या अर्थसंकल्पामध्ये करावा. त्याचा उल्लेख माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात करावा, अशी मी विनंती करतो. मेट्रोकरिता ९ रस्त्यांमध्ये भुयारी मार्ग केला आहे. तेथे दोन स्टेशन येत आहेत. त्यामुळे लोकांना येण्या-जाण्यासाठी अडचण होईल. त्यामुळे तेथे भुयारी मार्ग केला तर ही गैरसोय टळेल.

अध्यक्ष महोदय, पंचसुत्रीमधील उद्योगासाठी राज्य सरकारने प्राधान्य दिले आहे. राज्यात ३ हजार मेट्रीक टन ऑक्सिजन उत्पादनाचे उद्दिष्ट होते. राज्यात दररोज जवळपास १३०० मेट्रीक टन ऑक्सिजन उत्पादन निर्मिती होत होती. जवळपास १८०० मेट्रीक टन इतकी प्रतिदिन मागणी होती. कोविड – १९ काळात ऑक्सिजनची मोठ्या प्रमाणात आवश्यकता होती. ती पूर्ण करण्याचा सरकारने संकल्प केला आहे. ३ हजार मेट्रीक टन ऑक्सिजन प्रतिदिन निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. राज्यात मिशन ऑक्सिजन अंतर्गत उद्योग घटकांना प्राधान्य दिले आहे. ३००० मेट्रीक टन ऑक्सिजनचे उद्दिष्ट हे राज्य सरकार पूर्ण करीत आहे. त्याबाबत मी राज्य सरकारचे अभिनंदन करतो. आपल्याकडे आता मुबलक प्रमाणात ऑक्सिजनचा साठा मिळू शकतो.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या ईलेक्ट्रिक वाहन धोरणाची प्रशंसा निती आयोगाने केली आहे. वाढत्या वाहनांचा विचार करता अधिक प्रमाणात वायु प्रदुषण होत आहे. या अनुषंगाने शासनाने ७ हजार ईलेक्ट्रिक वाहन मालकांना त्यांच्या वाहनांच्या किंमती कमी करुन दिल्या आहेत. यामुळे आता कमी प्रमाणत प्रदुषण होईल. तसेच

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर....

नीती आयोगाकडून याची प्रशंसा झालेली आहे. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारने पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न केला आहे. रायगड किल्ल्यासाठी सन २०२२-२३ वर्षाकरिता १०० कोटी रुपयांच्या निधीची उपलब्धता करुन दिली आहे. तसेच रायगड, तोरणा, शिवनेरी, सुधागड, विजयदूर्ग या किल्ल्यांनाही १४ कोटी रुपये व मुंबईतील शिवडी व सेंट जॉर्ज किल्ल्याकरिता ७ कोटी रुपये निधी दिला आहे.

अध्यक्ष महोदय, वाई व कोल्हापूर मार्गे महाबळेश्वरला जाता येते. येथे पर्यटनास चालना द्यावयाची असेल तर तेथे दोन्ही बाजुने रोप-वे केला पाहिजे. वाई येथे वाहनतळ उभारले तर तेथील आजुबाजूच्या गावातील लोकांना यामुळे उद्योगधंदा उपलब्ध होईल. तेथे लोक हॉटेल उभारु शकतील. तसेच महाबळेश्वर येथे प्रचंड प्रमाणत वाहतूक कोंडी होत असते. कोल्हापूर आणि वाई या दोन्ही बाजुने वाहतूक कोंडी होते. मी विनंती करतो की, दोन्ही बाजुने रोप-वे तयार केला तर तेथील आसपासच्या गावांनाही याचा फायदा होईल. महाबळेश्वर शहरात वाहनांमुळे होणारे प्रदुषण, वाहतूक कोंडी कमी प्रमाणात होईल. याबाबत शासनाने विचार करावा.

अध्यक्ष महोदय, राज्यात माथेरान आणि महाबळेश्वर ही दोन थंड हवेची ठिकाणे आहेत. कोकणातील माचाळ येथील थंड हवेचे ठिकाणही शासनाने विकसित करावे. भिलवडे आणि आरवली येथून २० कि.मी. अंतरावर माचाळ हे गाव आहे. हे माचाळ गाव थंड हवेचे ठिकाण आहे. हे ठिकाण विकसित केले तर चांगले होईल. तसेच आरे कॉलनीत ३ हजार १६२ कि.मी. लांबीची जागा आहे. तेथेही शाळा, महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी पर्यटनासाठी येत असतात. आरे कॉलनीतील गार्डनचाही विकास झाला पाहिजे.

श्री. रविंद्र वायकर....

अध्यक्ष महोदय, चिपळून येथील वशिष्ठी नदीमध्ये मोठ्या प्रमाणात मगरी आहेत. तेथे क्रोकोडाईल पार्क करावा. तसेच गोवळकोट किल्ला ते ताज हॉटेल येथेही रोप-वे केला तर पर्यटनाला चालना मिळेल.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर.....

अध्यक्ष महोदय, यावर्षी प्रजासत्ताक दिन सोहळयामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेच्या महाराष्ट्र दलातील ५७ जवानांच्या तुकडीने सन्मान प्राप्त केला आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. अनेक चषके आणि पदके जिंकल्यानंतर एकंदर कामगिरीमध्ये ही तुकडी सर्वोत्तम ठरली आहे. ७ वर्षांच्या अंतराने महाराष्ट्र राज्याने या संचालनामध्ये सर्वोत्तम संचालनाचा चषक मिळविला आहे. माननीय पंतप्रधानांच्या रॅलीदरम्यान सिनिअर अंडर ऑफिसर गितेश दिनकर यांना गार्ड कमांडर म्हणून प्रतिष्ठित पंतप्रधान ध्वजाला सलाम करण्याचा सन्मान देखील मिळाला. हा महाराष्ट्राचा सन्मान आहे व त्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यावेळची लोकसंख्या व कायदे विचारात घेऊन पोलीस स्टेशनची निर्मिती करण्यात आली होती. परंतु आता पोलीस स्टेशन्स् व त्यातील कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत असून पोलीस स्टेशनच्या इमारती अत्यंत मोडकळीस आल्या आहेत. जोगेश्वरी, मेघवाडी, आरे पोलीस स्टेशन्स् यांचा देखील यामध्ये समावेश आहे. याबाबत विचार करुन त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा ही विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

## पॉइंट ऑफ प्रोसिजरबाबत

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी काल तीन तासांचा वेळ ठरवून दिला होता. त्यापैकी ९० मिनिटे विरोधी पक्षाला व ९० मिनिटे सत्ताधारी पक्षाला देण्यात आली होती. परंतु काल माननीय विरोधी पक्षनेते एकटेच ९६ मिनिटे बोलले... (अडथळा...) सन्माननीय सदस्यांना मी विचारु इच्छितो की, आपण असे ठरविले आहे का की कोणाचे काही ऐकूनच घ्यायचे नाही... (अडथळा...) ती संधी मिळवून देण्याचेच काम मी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते काल ९६ मिनिटे बोलले. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार हे ज्येष्ठ सदस्य आहेत. ते आता खाली बसून म्हणत आहेत की, माननीय विरोधी पक्षनेत्यांची वेळ यात पकडली जात नाही. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, तसे नसते. सत्ताधारी पक्षाला देण्यात आलेला वेळ देखील मंत्री महोदयांच्या उत्तरासह असतो.

अध्यक्ष महोदय, माझी आपणास विनंती आहे की आजच्या वेळेचे अशा प्रकारे नियोजन करावे की दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा-निम्मा वेळ मिळेल. दुसरी गोष्ट अशी की, पक्षनिहाय कोणकोणते सदस्य बोलतील याचा एक तक्ता सचिवांनी आपल्याला दिला असेल. मी त्यामध्ये परवा सुधारणा सुचविली होती त्याप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे किंवा कसे हे मला माहिती नाही. परंतु तो तक्ता असा असेल की, भारतीय जनता पक्षाचे सदस्य बोलल्यानंतर शिवसेनेचे सदस्य बोलतील. त्यानंतर पुन्हा भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, अपक्ष... (अडथळा...) म्हणजे भारतीय जनता पक्षाचे ५ सदस्य बोलल्यानंतर सत्ताधारी पक्षातील एकेका सदस्याला संधी मिळते. माझी विनंती आहे की, असे होता कामा नये. प्रत्येक पक्षाच्या सदस्याला एकेकदा संधी मिळाली पाहिजे व हीच खरी पध्दत आहे. दरम्यानच्या काळात यामध्ये चूक झाली होती. अर्थात, आपण त्यामध्ये दुरुस्ती केली असल्यास मी आपले आभार मानतो.

श्री.भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, माझा पॉइंट ऑफ प्रोसिजर असा आहे की, दोन्ही बाजूच्या सदस्यांना निम्मा-निम्मा वेळ मिळावा. तसेच विरोधी पक्षातील एक सदस्य बोलल्यानंतर सत्ताधारी बाजूच्या पक्षनिहाय एकेक सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** या चर्चेसाठी तीन तास वेळ दिलेला आहे. निम्मा वेळ मंत्र्यांच्या उत्तरासह सत्ताधारी पक्षाला व निम्मा वेळ माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणासह विरोधी पक्षाला आहे... (अडथळा...)

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, आपण यावर निर्णय देण्यापूर्वी माझे म्हणणे ऐकून घ्यावे, ही विनंती आहे. निम्मा वेळ सत्तारुढ पक्षाला आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाला दिला जातो त्यावेळी सत्ताधारी पक्षाला देण्यात आलेल्या निम्म्या वेळेमध्ये सर्व राजकीय पक्षांचा समावेश होतो. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना निम्मा-निम्मा वेळ द्यायचा असल्याने सत्ताधारी पक्षाचे एक सदस्य बोलल्यानंतर विरोधी पक्षातील एका सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाते.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार...

अन्यथा काय होईल की आपण जे सांगत आहात त्यामुळे येथील सदस्य १० मिनिटे आणि तिकडचे ५ सदस्य ५० मिनिटे बोलतील.

अध्यक्ष महोदय, मला वाटते की, यावर वेळ खर्च करण्याऐवजी सर्व गटप्रमुखांची बैठक एकदा घेतली पाहिजे. कारण गेली २० वर्षे यावर अनेकदा अनेक निर्णय झाले आहेत. त्यामुळे आपण हे सर्व निर्णय एकत्रित करु. अन्यथा गैरसमज पसरतील.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण)** : ठीक आहे. असे असले तरी आता सर्वच पक्षामध्ये नवीन सदस्य आहेत. सर्वांना बोलण्याची संधी मिळावी. म्हणून आपण आता क्रम लावताना शिवसेना पक्षाचे सदस्य आता बोलले आहेत. त्यानंतर भारतीय जनता पक्षाचे, त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे त्यानंतर कॉंग्रेस आणि त्यानंतर अपक्ष व पुढे भारतीय जनता पक्षाचे सदस्य अशा प्रकारचे आपण सर्वांना बोलण्याची संधी देऊ. आता सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी चर्चेला सुरूवात करावी.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, मी दीड नाही तर दोन तास बोलेन. कारण जनतेच्या हितासाठी शांत राहता येत नाही. गप्प बसता येत नाही आणि सत्तेचा मोह नसल्याने मी २ तास बोलणार आहे.

श्री. भास्कर जाधव : (खाली बसून) मी देखील २ तास बोलेन.

श्री. सुधीर मुनगंटीवार : आपण २ नाही तर २० तास बोलावे. त्यामध्ये काही अडचण नाही. सरकारच्या विरोधात चुका काढण्यासाठी २० तास बोला. आवश्यकता असेल तर निवेदन द्या. तिथे राहता येत नसेल तर आम्ही २५ जणांनी सह्या केल्या आहेत त्यावर आपण एक सही करा.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आता त्यांच्या अर्थसंकल्पावरील भाषणास सुरूवात करावी.

**पृ.शी.:** अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**मु.शी.:** सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरू..

श्री. सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री श्री. अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी, त्यातील काही मुद्यांवर अभिनंदन करीत आणि काही मुद्यांच्या संदर्भात त्यांनी गंभीरता घेत कृती करावी अशी अपेक्षा व्यक्त करुन या चर्चेमध्ये सहभाग घेतो.

अध्यक्ष महोदय, या भाषणाला सुरूवात करण्यापूर्वी मी वित्तमंत्र्यांना विनंती करतो की, "काश्मीर फाईल"च्या टॅक्स फ्रीच्या संदर्भात आताच ९२ आमदारांच्या हस्ताक्षरांचे निवेदन आपल्याला दिले आहे. या सभागृहाच्या भावना आणि ९२ सन्माननीय सदस्यांचा या संदर्भातील भाव लक्षात घेऊन आपण आपल्या उद्याच्या उत्तरामध्ये मग त्यात "पावनखिंड किंवा काश्मीर फाईल" असेल त्या संदर्भात टॅक्स फ्री करण्याचा एक उत्तम निर्णय घ्यावा अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, काल विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय योग्य पध्दतीने या अर्थसंकल्पाच्या संदर्भात मुद्दे उपस्थित केले आहेत. या अर्थसंकल्पातील ज्या उणिवा आहेत, ज्या त्रुटी आहेत त्या सरकारला लक्षात आणून दिल्या. जेव्हा आम्ही सरकारच्या उणिवा किंवा त्रुटी लक्षात आणून देतो त्याचा अर्थ असा आहे की, या सभागृहामध्ये समोरच्या सत्तारुढ पक्षामध्ये बसलेले नेते, मंत्री हे आमचे शत्रू नसून या राज्याच्या जनतेच्या हितासाठी एकत्रितपणे समतोल विकासासाठी सर्व समूह आणि वर्गाच्या हितासाठी आपण एकमेकांशी संवाद केला पाहिजे ही या मागची भावना आहे.

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार...

अध्यक्ष महोदय, ५४८५७७ कोटी ५२ लाख इतक्या रकमेचा राज्याचा अर्थसंकल्प आहे. हा आकडा मोठा आहे. पण हा आकडा जेव्हा आपण अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सभागृहात सांगितला आणि आपल्या अर्थसंकल्पीय भाषणातून घोषणांचा अभ्यास केला तर पहिला मुद्दा असा समोर येतो की, हा अर्थसंकल्प पूर्णपणे "कट बेस" आहे. त्यावर मी मुद्दाम काही उदाहरणे देईल. हा अर्थसंकल्प फसवा आहे. हा फसवा यासाठी आहे की, येथे घोषणा होतात. पण त्या घोषणांची अंमलबजावणी होत नाही.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्प मांडताना अपेक्षा काय असतात तर आपण या अगोदर या सभागृहामध्ये जो भाव व्यक्त केला की अर्थसंकल्प कसा असावा. पण जेव्हा आपल्याला या संदर्भात कृती मिळते तेव्हा अपेक्षा असते की, आपण विसरण्यासाठी "गजनी"चे वंशज नाही. आमची अपेक्षा अशी असते की, आपण या सभागृहात जी भाषणे केली... त्यातील सर्व मुद्दे पूर्ण होतील असे मी म्हणणार नाही. पण त्यापैकी एखाद्या मुद्यावर तरी कृती व्हायला हवी. आपण जेव्हा निवडणुकीमध्ये जनतेसमोर जातो. जनतेच्या समोर जाऊन जी आश्वासने देतो, शपथनामा देतो, वचननामा देतो.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार....

तेव्हा अशी अपेक्षा असते की, यापैकी काही मुद्दे एका वर्षात होणार नाहीत पण पाच वर्षामध्ये समान वाटप होऊन निदान या मुद्यावर तरी अर्थसंकल्पामध्ये प्रतिबिंब दिसावे. परंतु जेव्हा मी या अर्थसंकल्पाकडे पाहतो तेव्हा माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी एक चांगली संधी गमावली असे मला वाटते. दिनांक १ मे, १९६० नंतरचा अतिशय असाधारण परिस्थितीतील हा अर्थसंकल्प होता. जगामध्ये कोरोनाची वैश्विक महामारी सुरु होती. सारे जग स्तब्ध झाले होते. तसेच अर्थचक्र मंद झाले होते. समाज जीवनावर कोरोनाचा जो विपरीत प्रभाव पडला आहे त्याचे प्रश्न, समस्या सुटव्यात यासाठी माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार घोषणा करतील, अशी अपेक्षा होती. परंतु अर्थसंकल्प वाचल्यानंतर असे लक्षात आले की, माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी एक सुमार अर्थसंकल्प मांडला आहे. या अर्थसंकल्पातून सर्वसामान्यांची प्रगती, या राज्याची उन्नती होईल अशी अपेक्षा होती. आपल्याला याची माहिती आहे की, महाराष्ट्र राज्याची बजेट साईज, आर्थिक क्षमता किंवा जीएसडीपी मध्ये जगातील १९३ देशापैकी महाराष्ट्र ३६ व्या क्रमांकावर आहे. आमची अशी अपेक्षा होती की, विश्वगौरव माननीय श्री. नरेंद्र मोदी हे या देशाच्या उन्नती आणि प्रगतीसाठी तसेच हा देश जगाचा कफ्तान व्हावा यासाठी मेहनत, कष्ट, परिश्रम आणि नियोजन करीत आहेत. अशा प्रसंगात या देशाच्या अर्थसंकल्पाच्या प्रगतीमध्ये आमचेही मोठे योगदान असेल अशी आमची अपेक्षा होती. खरे म्हणजे अर्थसंकल्पातील तरतुदी म्हणजे मंदिराचा प्रसाद नव्हे की, जो आला त्याच्या हातात थोडा प्रसाद टाकला. या अर्थसंकल्पामध्ये वेध दिसावा यासाठी तसा वेध घेतला पाहिजे. पण अर्थसंकल्पाकडे बघितले तर महाविकास आघाडी सरकारचे नाव मोठे आणि लक्षण खोटे हे आपल्याला म्हणता येईल.

अध्यक्ष महोदय, याचे वर्णन करायचे झाले तर,

"कसे म्हणावे यास बजेट, कसे म्हणावे यास बजेट, मागचेच मांडले सारे थेट, किती लागले दिवे बुडाशी, लपतो का अंधार, हे कसले सरकार उद्धवा, अजब तुझे सरकार."

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार....

अध्यक्ष महोदय, मी आता आपल्याला काही मुद्दे वाचून दाखवतो. हे मुद्दे वाचल्यानंतर आपण अर्थसंकल्प मांडताना या संदर्भात आपण काय करतो, हे आपल्याला ही कळेल. दिनांक ११ मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पाचे भाषण माझ्या हातात आहे. माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांना पाहिजे असेल तर मी त्यांना तीनही वर्षाचे अर्थसंकल्पिय भाषण देतो. दिनांक ०६ मार्च २०२० रोजी सन २०२०-२१ चा अर्थसंकल्प मांडला होता. या अर्थसंकल्पामध्ये पान क्र. ९, मुद्दा क्र. २४ वर अशी घोषणा केली होती की, पुणे शहराबाहेरील १७० किमीचा रिंगरोड प्रस्तावित करीत असून यावर्षी भूसंपादन करण्यात येईल. यावरुनच मी अर्थसंकल्पामध्ये कट-पेस्ट असे म्हणत होतो. दिनांक ०८ मार्च या दिवशी सन २०२१-२२ चा अर्थसंकल्प अर्थसंकल्प मांडण्यात आला. त्यातील पान क्र. १० मुद्दा क्र. ३७ पुन्हा पुण्याबाहेर चक्राकार मार्ग यावर्षी बांधण्याची सुरुवात करण्यात येईल व याच वर्षी भूसंपादनाचे काम हाती घेण्यात येईल हाच मुद्दा मांडण्यात आला. गजनीला सुद्धा आठवेल. सन २०२२-२३ मध्ये पुन्हा पान क्र. १७ मुद्दा क्र. ७७ वर तेच मांडण्यात आले की, पुणे रिंगरोड प्रकल्पासाठी सुमारे १९०० हेक्टर जमिनीचे संपादन करावयाचे असून १५०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे. मला कधी कधी आश्चर्य वाटते की, मी जे काही इतर मुद्दे देत आहोत तर आपण कट पेस्ट करीत आहात. दरवर्षी एकच मुद्दा येत आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा हा शिर्डी विमानतळाचा आहे. भगवान साईबाबा सुद्धा यातून सुटले नाहीत. सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातील पान क्र. १२, मुद्दा क्र. ४६ वर असे म्हटले आहे की, शिर्डी विमानतळावरील रात्रीच्या उड्डाणाची सुविधा. सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात पुन्हा तेच भाषण पान क्र. २०, मुद्दा क्र. ८७, शिर्डी येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावरील रात्रीच्या उड्डाणाची सुविधा लवकर सुरु करण्यात येईल.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. सुधीर मुनगंटीवार .....

सन २०२१-२२ मधील अर्थसंकल्पीय भाषणातील पृ.क्र. १२, मुद्दा क्र. ४७ मध्ये असे नमूद केले आहे की, अमरावती जिल्ह्यात बेलोरा येथे नवीन टर्मिनल बिल्डींग तसेच रात्रीच्या विमान वाहतुकीची सुविधा उपलब्ध करण्यात येईल. या वर्षीच्या अर्थसंकल्पात पृ.क्र. २०, मुद्दा क्र. ८७ मध्ये असे नमूद केले आहे की, अमरावती विमानतळावर रात्रीची उड्डाण सुविधा सुरु करण्याकरिता नवीन टर्मिनल इमारतीची उभारणी करणे. या ठिकाणी मी केवळ नमूना देत आहे. विस्तृत सांगत नाही. कारण हे सर्व वाचण्यास दोन तास लागतील, एवढया समान तरतुदी या अर्थसंकल्पात केलेल्या आहेत. सन २०२०-२१ या अर्थसंकल्पात पृ.क्र. २३, मुद्दा ७५ यामध्ये असे नमूद केले आहे की, नवी मुंबईतील वाशी येथे आरक्षित भूखंडावर सिडकोकडून महाराष्ट्र भवन उभारण्याचे प्रस्तावित आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३या अर्थसंकल्पातील पान क्र, ३०, मुद्दा क्र. १४३ मध्ये असे नमूद केले आहे की, नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवनकरिता १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. मला आश्चर्य वाटते की, हीच भूमिका शेतकऱ्यांच्या संबंधी घेतली गेली. दि. ६ मार्च, २०२० रोजी अशी घोषणा केली की, नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देऊ. पुन्हा या वर्षीच्या अर्थसंकल्पात तीच घोषणा आहे की, नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० हजार रुपये देऊ. हे काय सुरु आहे ? एखाद्या लहान मुलाला जेवताना एक घास चिऊ ताईचा, एक घास भाऊचा, एक घास ताईचा असे सांगितले जाते. त्याप्रमाणे या बजेटमध्ये असे आहे की काय ? एक वर्ष शिवसेनेचे, एक वर्ष कॉंग्रेसचे, एक वर्ष राष्ट्रवादी कॉंग्रेसचे. ३ वर्षे आपण दिलेले मुद्दे पूर्ण केलेले नाहीत. ही सर्व अर्थसंकल्पाची भाषणे आहेत. या सरकारचा प्रवास येथेच थांबत नाही.

अध्यक्ष महोदय, दि. ८ मार्च, २०२१ रोजीचा अर्थसंकल्प माझ्याकडे आहे. आमचे मित्र सन्माननीय सदस्य आज सत्तारुढ पक्षात आहेत. ते कधी विरोधी पक्षात येतील हे मला माहीत नाही. या संबंधीचे मुद्दे मी वाचून दाखवतो. दि. ८ मार्च २०२१

श्री. सुधीर मुनगंटीवार .....

रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या दिवशी शासनाने घोषणा केली. क्रांतीज्योती

सावित्रीबाई फुले यांच्या नावाने एक हजार ५०० सीएनजी बसेस देण्यात येतील, पान क्र. १९, मुद्दा क्र. ७८ यावर हे नमूद केले आहे. आपले राज्य हे महिला धोरणाच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर राज्य आहे. मुलींच्या शिक्षणासाठी राज्याने अनेक प्रागतिक पावले उचलली आहेत. असेही त्यात सांगण्यात आले. या फर्निचरचे आयुष्य जर ५० वर्षे असेल तर अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या वेळी वाजवून ते २० वर्षात तुटेल एवढे वाजवले. ही योजना क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्या नावाने सुरु करण्यात येईल. या योजनेकरिता शासनाकडून राज्य परिवहन महामंडळास पर्यावरण पूरक दीड हजार सीएनजी व हायब्रीड बसेस प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात येतील असे सांगितले होते. मात्र या करिता एक रुपयाही दिला नाही. मी या संबंधी फाईल वाचली. ती निगेटीव्ह केलेली आहे. सावित्रीबाई फुले यांच्या नावाची ही योजना आहे. कोठे फसवायचे ? एका बाजुला मुलींच्या शिक्षणाची भावना व्यक्त करायची व दुसऱ्या बाजुला फसवायचे. एकही बस दिली नाही. एवढयावरच हे सरकार थांबले नाही. शिवसेनेने मदत केली. आमच्या बद्दल मनात राग होता.

अध्यक्ष महोदय, विकेल ते पिकेल ही योजना शासनाची होती., मागच्या वर्षीच्या अर्थसंकल्पातील पृ.क्र. ६, मुद्दा क्र. १७ मध्ये असे सांगितले की, विकेल ते पिकेल या धोरणांतर्गत शेतमालाची बाजारपेठ व बाजारमुल्याच्या निर्मितीकरिता माननीय बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबविण्यात येईल. याकरिता २१०० कोटी रुपये निश्चित केले. मी या बाबत माहिती घेतली. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पासाठी एक रुपया देखील या क्षणापर्यंत खर्च झालेला नाही. येथेच हे सरकार थांबले नाही.

अध्यक्ष महोदय, आपण मागील २ वर्षे आरोग्यासंबंधी गंभीर चर्चा करीत आहोत. या करिता सरकारने घोषणा केली. हे कोरोनाचे वर्ष आहे. सार्वजनिक

श्री. सुधीर मुनगंटीवार .....

आरोग्य विभागांतर्गत जनतेला उत्तम दर्जाची आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता सुमारे ७ हजार ५०० कोटी रुपये किमतीचा प्रकल्प तयार केला असून तो आम्ही ४ वर्षात पूर्ण करु.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार ....

परंतु, १ रुपयाही खर्च झाला नाही. त्या प्रकल्पाचे अजून काही नामोनिशाण नाही. आपल्याला शिक्षकांनी शिकविताना मानवाच्या उत्क्रांतीचा सिध्दांत सांगितला की, माकडापासून मानवाची उत्क्रांती झाली. परंतु, या फाईलचा प्रवास पाहिला व डार्विन जर मंत्रालयात आला तर तो असे म्हणेल की, मी खोटा होतो. मानवाची उत्क्रांती अजगरापासून झाली आहे, ती माकडापासून झाली नाही, असे सांगितल्याशिवाय तो राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी मागच्या वर्षी दुसरी घोषणा केली. मुद्दा क्रमांक ४, पृष्ठ क्रमांक २, राज्यातील ८ मध्यवर्ती ठिकाणी कार्डियाक कॅथलॅब सुरु करण्यात येतील. तुमच्यासाठी थांबणार आहे काय, कोणाला तरी एकाला निवेदन घेऊन देवाच्या घरी पाठवा व देवाकडून लिहून आणा की, जोपर्यंत या कार्डियाक कॅथलॅब होणार नाहीत, तोपर्यंत कोणालाही हार्टअटॅक येणार नाहीत. आपण कोणाला तरी पाठवा ना.

अध्यक्ष महोदय, दिनांक ८ मार्च रोजी घोषणा केली. परंतु, कार्डियाक कॅथलॅब सोडा, डॉक्टर सोडा, परिचारिका सोडा, यंत्रसामुग्री सोडा केवळ हे प्रस्तावित आहे असा, ५०० रुपयांचा एक टिनाचा बोर्ड देखील वर्ष झाले तरी लावला नाही. तिसरा मुद्दा १५० रुग्णालयांमध्ये कर्करोगाच्या निदानासाठी आवश्यक सुविधा .... पृष्ठ क्रमांक ३, मुद्दा क्रमांक ५. त्या फाईललाच कर्करोग झाला. ती फाईल हललीच नाही. येथेच थांबले नाही.

अध्यक्ष महोदय, फक्त एका योजनेबाबत थोडी घोषणा केली. ती चांगली झाली, चांगली झाली म्हणजे काम झाले. ती घोषणा माननीय श्री.शरद पवार यांच्या नावाने ग्रामसमृध्दी योजनेची होती. गाय-म्हशीचे गोठे बांधणे, पृष्ठ क्रमांक ७, मुद्दा क्रमांक २३. या योजनेंतर्गत काही गोठे बांधले. सन २०२१-२०२२ मध्ये याकरिता साधारणत: ५१ कोटी, १९ लाख, ५१ हजार खर्च झाला व हे गोठे बांधले. बाकी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना मात्र कुठेही स्थान दिले नाही. हे कटपेस्ट असे बजेट दिले.

श्री.सुधीर मुनगंटीवार ....

अध्यक्ष महोदय, खरे तर माननीय श्री.अजित पवार एक गोष्ट खरी आहे की, स्वत:ची पाठ स्वत:ला कधीच पाहता येत नाही. परंतु, स्वत:चे भाषण तर पाहता येते. आपण काय भाषण केले आहे ते पाहण्यास तर अडचण नाही. मी आता माननीय श्री.अजित पवार यांचे भाषण वाचून दाखवतो व मग काय अडचण आहे ते सांगतो. माननीय श्री.अजित पवार यांनी दि.१४ मार्च, २०१८ रोजी दुपारी १३ वाजून ३० मिनिटांनी भाषण केले होते. ते असे म्हणाले की, "कर्नाटक राज्याने स्वतंत्र कृषी अर्थसंकल्प सादर केला. त्याच प्रमाणे महाराष्ट्रात देखील स्वतंत्र कृषी अर्थसंकल्प सादर केला गेला पाहिजे." आम्ही थांबवले का, आम्ही काही अडचणी आणल्या काय, मग ३ वर्षांत स्वतंत्र कृषी अर्थसंकल्प का केला नाही?

अध्यक्ष महोदय, या राज्याचे ३ वर्षांचे हे दुर्दैव आहे की, हे राज्य आता कृषीप्रधान व्यवस्थेकडून खुर्चीप्रधान व्यवस्थेकडे गेले आहे. खुर्चीसाठी जीव गेला तरी बेहत्तर. खुर्चीसाठी तत्व गेले तरी, बेहत्तर. अर्थ मंत्री महोदय म्हणाले होते की, राज्याच्या इतिहासामध्ये इतकी प्रचंड म्हणजे १५ हजार कोटी रुपयांची तूट व ५० हजार कोटी रुपयांची राजकोषीय तूट झाल्याचे आम्ही कधीच ऐकले नव्हते.

अध्यक्ष महोदय, मी माननीय श्री.अजित पवार यांना धन्यवाद देतो की, त्यांनी या भाषणामध्ये जो भाव व्यक्त केला तो भाव जेव्हा मी पिंक बुक पाहतो की, आमची तुटीच्या बाबतीत आज काय अवस्था आहे तेव्हा हे लक्षात येते. त्यांनी १५ हजार कोटी रुपयांच्या तुटीला नावे ठेवली. परंतु, त्यांच्या राज्यातील तुटीचे आकडे पाहिले तर, सन २०२०-२०२१ मध्ये ४१ हजार १४२ कोटीची तूट. तेव्हा तर १५ हजार कोटी रुपयांची तूट झालीच नव्हती, तेव्हा ती तूट फक्त प्रस्तावित केली होती, त्यावर टीका केली गेली. मात्र दुसऱ्याच वर्षी ४१ हजार १४२ कोटी रुपयांची तूट, सन २०२१-२०२२ मध्ये ३० हजार ७२५ कोटींची तूट व या वर्षी २४ हजार, ३५३ कोटींची तूट आहे. राजकोषीय तूट ८९ हजार ५९८ कोटी आहे. सारे रेकॉर्ड आपण मोडत आहात.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.सुधीर मुनगंटीवार....

या सर्व रेकॉर्डवर सभागृहामध्ये टीका करण्यात येत असते. राज्यात भारतीय जनता पार्टी व स्व.हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनाला जनतेने कौल दिला होता. त्यावेळी आमच्या सरकारवर सभागृहात टीका करण्यात येत होती की, राज्य कर्जबाजारी होत आहे. मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, मागील ५ वर्षांमध्ये राज्यावर १ लक्ष ५६ हजार कोटी रुपयांचे कर्ज वाढले व या तीन वर्षांच्या कालावधीत आपण १,९८,५८२ कोटी रुपये कर्ज वाढविण्याचा पराक्रम केला.

अध्यक्ष महोदय, कर्ज वाढले या संदर्भात मी नकारात्मक बोलणार नाही. ही आपली जबाबदारी आहे. ज्यावेळी जनता, समाजाचा एखादा वर्ग अडचणीत असतो, राज्यासमोरील प्रश्न सोडवायचे असतात त्यावेळी मायबाप सरकार म्हणून आपल्यावर जबाबदारी असते.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पामध्ये बेरोजगारीबाबत मोठी घोषणा करण्यात आली नाही. तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात कोणतेही नियोजन नाही, महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात कोणतीही योजना घोषित करण्यात आली नाही, कृषी पंपाच्या वीज जोडणीचे देयक माफ करण्याची घोषणा करण्यात आली नाही. अर्थचक्र मंद झाले आहे. एक किंवा दोन बैठका घेण्यात आल्या आहेत. शेत मजूर, बचतगटांचे कर्ज, बारा बलुतेदार, धानाचा बोनस, पेट्रोल-डिझेलचे भाव, अंगणवाडी सेविकांना मदत, गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शून्य टक्क्याने कर्ज देणे, पायाभूत सुविधा या प्रश्नांच्या संदर्भात अर्थसंकल्पात काही तरतूद केल्याचे दिसून येत नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.जयंत पाटील सभागृहामध्ये आता उपस्थित नाहीत. त्यांनी सदनामध्ये केलेली भाषणे मी वाचली आहेत. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. केवळ घोषणा करण्यात येत आहेत. सामान्य जनतेला पंच पक्वान्नाच्या ताटाचे चित्र दिल्यास त्यातून त्यांचे पोट भरु शकते का ?

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार....

अध्यक्ष महोदय, या सरकारच्या घोषणांच्या संदर्भात मी सदनाला एक गोष्ट सांगू इच्छितो. आम्ही लहान असताना आमच्या शिक्षकांनी आम्हाला एक गोष्ट सांगितली होती की, "दोन व्यक्ती होते. त्यामधील एकाने यात्रेत ५ रुपयांमध्ये दुधी हलवा असा बोर्ड लावून दुकान सुरु केले. दुसऱ्या व्यक्ती या सरकारसारखा होता. त्याने त्या व्यक्तीच्या बाजूला २५ पैशांमध्ये दुधी हलवा असा बोर्ड लावून दुकान सुरु केले. त्यामुळे त्याच्या दुकानात गर्दी झाली. लोक दुकानाच्या आत गेले, प्लेट, चमचा नव्हता, दुधी हलव्याचा तर प्रश्नच नव्हता. २५ पैसे देऊन आत आलेल्या ग्राहकांनी त्या व्यक्तीला सांगितले की, दुकानाबाहेर २५ पैशात दुधी हलवा असा बोर्ड लावला आहे, दुधी हलवा कुठे आहे ? यावर त्याने ग्राहकाला असे सांगितले की, दुकानात एक दुधी लटकली आहे, ती हलवावी. त्याच्या दुकानात दुधी हलव्याची मिठाई नव्हती." अशा पद्धतीने हे सरकार आज वागत आहे.

अध्यक्ष महोदय, या सरकारच्या पंचसुत्रीत ४ लक्ष कोटी रुपयांचा उल्लेख करण्यात आला आहे. मी त्याबाबत माहिती घेतली. ही रक्कम नवीन नसून सरकार जो नियमित खर्च करते त्यात थोडी वाढ करुन मोठे स्वप्न रंगविले आहे. वित्त मंत्री महोदयांना त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी लक्षात आणून दिले पाहिजे होते की, विश्व गौरव श्री.नरेंद्र मोदी यांनी या सरकारला Fiscal Responsibility Budget Management च्या माध्यमातून संधी दिली होती. Ease of Doing Business च्या माध्यमातून राज्य सरकार पुढे गेले तर fiscal deficit च्या नियमात त्यांना सूट देण्यात येईल. One Nation, One Ration Card यासाठी २५ टक्के सूट देऊ. पॉवर सेक्टरमध्ये बदल करण्यासाठी ०.२५ टक्के सूट देऊ. अर्बन लोकल बॉडी रिफॉर्मसाठी ०.२५ सूट देऊ. Fiscal Responsibility Budget Management मध्ये एवढी सूट देऊनही या सुत्राचा उपयोग करण्यात आला नाही. ही गंभीर बाब आहे. राज्य संकटात आहे, जनता संकटात आहे. अशा परिस्थितीत केवळ घोषणा करण्यात आल्या होत्या. या संदर्भात मी एक कविता सदनाला सांगतो. ती पुढील प्रमाणे आहे.

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार....

"गणपत वाणी, विडी पितानी
चावायचाच नुसती काडी
मनाशी म्हणायचा की
या जागेवर बांधीन माडी "

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांना सांगू इच्छितो की, अशा पद्धतीने हे सरकार वागत आहे. आपण २५ आमदार महोदयांची यादी मला द्यावी. सरकार कसे स्थापन करावयाचे ते मी आपल्याला सांगतो.

अध्यक्ष महोदय,या सरकारच्या पंचसुत्रीमधून काही झाले नाही. अर्थसंकल्प मांडताना एखाद्या वर्षी चूक होते, दुसऱ्या वर्षी चूक होते पण तीच चूक तिसऱ्या वर्षी करण्यात येत आहे. अर्थसंकल्प एवढा मोठा करण्यात आला आहे.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार......

मी आपणास एक उदाहरण देऊ इच्छितो. आपल्या सरकारने सन २०२१-२२ मध्ये २६ हजार ६५० कोटी रुपयांचे Non-tax Revenue चे टार्गेट सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र १७ हजार ३०७ कोटी रुपये प्राप्त झाले. म्हणजे ३५ टक्क्यांनी कमी आले. सन २०२०-२१ मध्ये २० हजार ५०६ कोटी रुपयांचे Non-tax Revenue चे टार्गेट सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र १५ हजार ९७५ कोटी रुपये प्राप्त झाले. यावर्षी २७ हजार १२८ कोटी रुपयांचे Non-tax Revenue चे टार्गेट सांगितले आहे. एकदा चूक होऊ शकते. दोन होऊ शकते. परंतु एकच चूक अनेकदा कशी होऊ शकते? या सरकारचे आकलन अनेक वेळा का चुकत आहे, या सरकारचा अंदाज का चुकत आहे? काही अंदाज असाधारण परिस्थितीमध्ये चुकू शकतात, हे मी समजू शकतो.

अध्यक्ष महोदय, आपण अन्य राज्याचा विचार केला तर गुजरात राज्याचा Revenue सरप्लस आहे. मणिपूरसारख्या छोट्या राज्याचा Revenue सरप्लस आहे. इतकेच नव्हेतर गोवासारख्या छोट्या राज्याचा Revenue सरप्लस आहे. महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेला आहे. "जय भवानी जय शिवाजी" एवढे जरी आपण म्हटलो बेशुद्ध माणूस शुद्धीवर येऊ शकतो. ही या राज्याची ऊर्जा आणि ही या राज्याची शक्ती आहे. तरी देखील आपले राज्य Revenue च्या बाबती minus मध्ये जात आहे, ही आपल्यासाठी आश्चर्याची गोष्ट आहे.

अध्यक्ष महोदय, यावर्षी वेतनावर १ लाख ३१ हजार ९८६ कोटी रुपये खर्च होणार आहे. निवृत्ती वेतनावर ५६ हजार ३०० कोटी रुपये खर्च होणार आहे आणि व्याज प्रदानापोटी ४६ हजार ७६३ कोटी रुपये खर्च होणार आहेत. म्हणजे या अर्थसंकल्पामध्ये साधारणत: ४० ते ४५ टक्क्यापेक्षा जास्त भार वेतन, निवृत्ती वेतन व व्याज प्रदानावर जाणार आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार......

अध्यक्ष महोदय, राज्य सरकार वेतन व निवृत्ती वेतनावर २ लाख ३५ हजार ४९ कोटी रुपये खर्च करीत आहे. परंतु शेतकऱ्यांच्या प्रश्नावर खर्च करण्यासाठी या सरकारकडे पैसे नाहीत.

अध्यक्ष महोदय, पेट्रोल व डिझेलचे भाव कमी करण्याबाबत कोणी मोर्चे काढले होते? अर्थसंकल्पाच्या भाग दोनमध्ये पेट्रोल व डिझेलचे भाव कमी करण्याची घोषणा होईल, अशी आम्हाला अपेक्षा होती. राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती देताना आपणच लांबलचक भाषणे केलेली आहेत. त्यावेळी आपणच सांगत होतात की, केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलचे भाव कमी केले पाहिजे. केंद्र सरकारने पेट्रोल ५ रुपये तर डिझेल १० रुपयांची स्वस्त केले आहे. यासाठी केंद्र सरकारला १ लाख ६० हजार रुपयांची तूट सहन करावी लागली आहे. जेव्हा पेट्रोल व डिझेलचे भाव आकाशाला भिडत होते तेव्हा मायबाप सरकारने विचार केला की, १ लाख ६० हजार कोटी रुपयांची तूट झाली तरी चालेल. परंतु जनतेला दिसाला दिला पाहिजे, अशी केंद्र सरकारने भूमिका घेतली होती. आता सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले उपस्थित नाहीत. त्यांनी तर सायकलवर बसून राजभवनामध्ये मोर्चा काढला होता. मी तर देवाला विनंती करतो की, त्यांनी आयुष्यभर सायकलवरच फिरावे. राज्य सरकार पेट्रोल व डिझेलवर सूट देण्यास तयार नाही. ही बाब शरमप्रुफ नाही काय? जसे वॉटरप्रुफ असते, फायरप्रुफ असते तसे हे सरकार शरमप्रुफ नाही काय? यासंदर्भात राज्यावर काहीही जबादारी नाही काय?

अध्यक्ष महोदय, सन २०२०-२१ मध्ये राज्य शासनाने पेट्रोल व डिझेलवर ३४ हजार रुपयांचा कर वसूल केलेला आहे. सन २०२१-२२ मध्ये ४५ हजार कोटी रुपयांचा कर वसूल केला आणि सन २०२२-२३ मध्ये ५० हजार २०० कोटी रुपयांचा कर वसूल केलेला आहे. जेव्हा पेट्रोल व डिझेलवर सूट देण्याची मागणी केली जाते, तेव्हा आपणास सूट देण्याची इच्छा होत नाही. फक्त केंद्र सरकारकडे बोट दाखवायचे, आंदोलने करायची आणि आपल्या अशा कृतीमुळे आपल्याच पक्षातील कार्यकर्ते

श्री.सुधीर मुनगंटीवार......

असंतोष व्यक्त करतात तेव्हा दुसऱ्याकडे बोट दाखवायचे, अशा प्रकारचे काम या राज्यात सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमधील लाभार्थ्यांना अद्याप पैसे देण्यात आलेले नाहीत. आपण सांगत आहात की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा सन्मान महाराष्ट्रातील कोणत्याही जाती-धर्माचा, वर्गाचा, समुहाचा असेल त्यांनी ठेवला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माझ्या हातामध्ये एक सरकारी कागद आहे. यामध्ये असे नमूद केले आहे की, ६ लक्ष ५६ हजार कर्जधारकांना लाभ देण्यासाठी ५ हजार ९७५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. अशी घोषणा भारतीय जनता पार्टीच्या सरकारने केली म्हणून त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यायचा नाही, हे आश्चर्यजनक आहे.

अध्यक्ष महोदय, या राज्यातील कृषी विभागाची पिछेहाट होत आहे. मागील वर्षी ११.६० टक्क्यांनी विकास दर वाढला होता. परंतु यावर्षी मात्र ४.४ टक्क्यांनीच वाढला आहे. हे सरकार फेकू असल्यासारखे वागत आहे. कारण मागील तीन वर्षांपासून जे पैसे द्यावयास पाहिजे होते ते पैसे देखील हे सरकार देत नाही.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार.....

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने कृषि निर्यात धोरणाबाबत निर्णय केला आहे. तो निर्णय कधी पूर्ण होईल, हे मला माहित नाही. आज राज्यातील शेतकरी वाईट अवस्थेत आहे. काही राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये थेट मदत देण्याचे सुरु केले आहे. एकीकडे २ लाख कोटीपेक्षाही अधिक रक्कम वेतन आणि निवृत्तीवेतनावर खर्च केली जाते. शेतकऱ्यांनाही १ कोटी २१ लाख ५५ हजार सीमांतक शेतकरी आहेत. याबाबत काही योजना शासन घोषित करेल, अशी मला अपेक्षा होती.

अध्यक्ष महोदय, राज्यातील ९ टक्के जमीन पडीक आहे. यासंदर्भात राज्य सरकार काही घोषणा करेल, असे वाटले होते. राज्यात मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत आहेत. दिनांक १ जानेवारी, २०१९ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ पर्यंत ६ हजार ९६० आत्महत्या झाल्या आहेत. विधानसभेमध्ये आम्हाला एकेका महत्त्वाच्या विषयावर दोन-दोन तास सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागते. आम्हाला ओरडून सांगावे लागत आहे की, शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापू नये.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागावर बोलण्यापूर्वी माझ्याकडे असलेला काही कागदपत्रे मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्याकडे देतो. शासनाने प्रसिद्ध केलेले ते कागदपत्रे आहेत. कसा आणि किती भ्रष्टाचार होत आहे, याची कल्पनाही आपणास करता येणार नाही. माझ्याकडे दिनांक १३ मार्च, २०२२ रोजीची एक प्रेसनोट आहे. एकात्मिक लोक सर्व्हेक्षण कार्यक्रम, सार्वजनिक आरोग्य विभागाची ही प्रेस नोट आहे. त्यामध्ये सांगण्यात आले की, कोरोना काळात १ लाख ४३ हजार ७५२ लोकांचा मृत्यू झाला आहे. ही शासनाची प्रेसनोट आहे. असे असताना दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी एक तारांकित प्रश्न सभागृहात मांडण्यात आला. त्यात माननीय मंत्री श्री. विजय वडेट्टीवार यांनी उत्तर दिले की, आतापर्यंत कोरोनामध्ये मृत्युमूखी पडलेल्यांचे १ लाख ५४ हजार ५०० अर्ज मंजूर करण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक १३ मार्च, २०२२ रोजी १ लाख ४३ हजार ७५२ लोकांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. असे असताना १ लाख ५४ हजार ५०० अर्ज कसे मंजूर झाले. "अंधेर नगरी, चौपट राजा. टका सेर भाजी, टका सेर खाजा." "अंधळं दळतय आणि ....पीठ खातयं." सरकार अनेक घोषणा करीत आहे. एखाद्या व्यक्तीला चांगले म्हणले म्हणजे त्या व्यक्तीने आयुष्यात कोणतेही वाईट काम केले नाही, असे होत नाही.

अध्यक्ष महोदय, अशा प्रकारे राज्यकारभार सुरु आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन हे नागपूर येथे व्हावयास हवे होते. मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित राहू शकत नाहीत. त्यामुळे मुंबईत अधिवेशन घेतले तर मुख्यमंत्री सभागृहात येतील, असे सांगण्यात आले होते. येथून बाहेर गेल्यावर "बेस्टचे डिजिटल स्वरुप मुंबईकरांना समर्पित" असे बोर्ड जागोजागी लावण्यात आले आहेत. मला वाटते की त्याच्या बाजुलाच आजून एक बोर्ड लावावा व त्यावर लिहावे की, "बेस्ट सीएमचे डिजिटल स्वरुप महाराष्ट्राला समर्पित." याचे कारण आम्हाला त्यांना आता डिजिटल स्वरुपातच पहावे लागत आहे. असेच करावयाचे होते तर नागपूर येथे अधिवेशन का घेण्यात आले नाही ? विदर्भासोबत या सरकारने विश्वासघात केला आहे. या अधिवेशनावर किती खर्च झाला आहे, याची मी तीन दिवसांपासून माहिती मागवित आहे. मागील अर्थसंकल्पामध्ये आमच्या हक्काचे वैधानिक विकास मंडळे काढून घेतली आहेत. विदर्भ, मराठवाड्यामध्ये ३९ टक्के लोकसंख्या आहे. सत्तारुढ पक्षाचे नेते, मंत्री हे शांत बसले असतील. परंतु आमच्यासाठी ती अतिशय चिंताजनक बाब आहे. या सरकारने विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय केला आहे. वैधनिक विकास मंडळ रद्द केले आहे. मराठवाडा आणि विदर्भाचे कवचकुंडले काढून टाकले आहे.

अध्यक्ष महोदय, मी अनेक दिवसांपासून एका गोष्टीचा पाठपुरावा करीत आहे. परंतु सरकारच्या नस्ती डार्विनच्या सिद्धांताप्रमाणे आहेत. मराठवाडा आणि विदर्भामध्ये लोकसंख्येच्या अनुपातात नोकरभरती केली पाहिजे, असा नियम होता. तसेच हा करारातील भागही होता. त्यानुसार नोकरभरती होत होती. परंतु या राज्य

असुधारित प्रत

सरकारने वैधनिक विकास मंडळ रद्द केले आहे. नोकरभरतीसंदर्भात हे राज्य सरकार काही बोलण्यास तयार नाही.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

म्हणजे किराणा दुकानात आपण पाठविलेली वाईन विदर्भातील तरुणांनी पिऊन जीवन फाईन करायचे का ? मराठवाडयाच्या तरुणांनी काय करायचे ?

अध्यक्ष महोदय, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी उत्तर देण्यात आले की, आम्ही अद्याप यासंदर्भात निर्णय घेतलेला नाही. माननीय अर्थमंत्री त्यांच्या भाषणामध्ये विदर्भ आणि मराठवाडयातील नोकर भरतीबाबत निर्णय करणार आहेत किंवा कसे ? याबाबत स्व.यशवंतराव चव्हाणांनी निर्णय घेतला होता. चक्राकार पध्दत रद्द करण्यात आली आहे. माझा या निमित्ताने प्रश्न आहे की, मराठवाडा आणि विदर्भामध्ये जनता नाही का ? विदर्भ आणि मराठवाडयामध्ये मोठया प्रमाणात पदे रिक्त असताना चक्राकार पध्दत का रद्द करण्यात आली ? विदर्भ व मराठवाडयावर अशा प्रकारे का अन्याय केला जात आहे ? १ रुपये युनिट देखील रद्द करण्यात आला.

अध्यक्ष महोदय, सन २०१३ पासून धान पिकासाठी बोनस दिला जातो. हा बोनस देताना नवीन सिस्टीम सुरु करु अशी घोषणा सरकारच्या वतीने करण्यात आली. आम्हाला असे वाटत होते की, भात उत्पादक प्रदेशातील शेतकऱ्यांसाठी अर्थसंकल्पीय भाषणातूनच बोनस जाहीर केला जाईल. परंतु तेथे देखील फसविण्यात आले. एवढेच नव्हे तर सहकारी मंत्र्यांना देखील फसविले जात आहे. मी त्याचे एक उदाहरण देतो. आमच्या चंद्रपूर जिल्हयामध्ये मंत्री महोदयांनी फलक लावून त्यावर लिहिले आहे की, "संताजी जगनाडे महाराज यांच्या समाधीस्थळाच्या पर्यटन विकास कामासाठी माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार यांनी ७४ कोटी रुपयांची मान्यता दिली आहे." तसेच "चंद्रपूरचा वढा या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी ४४ कोटी रुपयांची मान्यता दिली आहे." फलक लावून मंत्री महोदयांनी शाबासकी घेतली. आम्हालाही वाटले की, चांगले झाले. संताजी जगनाडे महाराजांच्या समाधीस्थळासाठी माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार यांनी ७४ कोटी रुपये दिले हे वाचून आनंद झाला. परंतु अर्थसंकल्प मांडताना प्रत्यक्षात भाषण ऐकले त्यावेळी केवळ १० कोटी रुपये दिल्याचे लक्षात आले. म्हणजे संताजी महाराज जगनाडे यांनाही फसविण्यात आले.

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

वढा या तीर्थक्षेत्रासाठी ४४ कोटी रुपये दिल्याचे फलक लावले परंतु तेथे देखील केवळ १० कोटी रुपये देण्यात आले. अर्थसंकल्पामध्ये विदर्भाची अशा पध्दतीने होणारी फसवणूक ही गंभीर बाब आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी केलेले भाषण मी वाचले. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना सायंकाळी ०७ वाजून २१ मिनिटांनी ते म्हणाले होते की, "मी स्वत: रोज आरोग्य खात्याच्या बैठका घेतो". परंतु आज आरोग्य खात्याची अवस्था काय आहे ? माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे म्हणतील की, आमचे सर्वत्र कौतुक केले आहे. परंतु ते केवळ एखाद्या मुद्द्यावर केलेले असेल. एखादा मुलगा जर फिजिकल परीक्षेमध्ये पास झाला असेल तर त्याला मेरीटमध्ये आल्याचे प्रमाणपत्र मिळत नाही... (अडथळा...) अध्यक्ष महोदय, चिंता करु नये, मी जास्त वेळ घेणार नाही. मला माहिती आहे की, सरकारला माझे भाषण ऐकणे कठीण होणार आहे. कारण चुका काढल्यावर सरकारला त्रास होतो याची मला जाणीव आहे.

अध्यक्ष महोदय, मी केवळ शेवटचे दोनच मुद्दे मांडतो. कारण सरकार शरमप्रूफ आहे. आरोग्य विभागासाठी अर्थसंकल्पामध्ये १२ हजार २४३ कोटी रुपये तरतूद करण्यात आली. परंतु आतापर्यंत त्यातील ७७.८६ टक्के खर्च झाला आहे. मी पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयासाठी, प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी एकदा-दोनदा नव्हे तर पन्नास-पन्नास वेळा पत्रे दिली आहेत. परंतु आरोग्यासारख्या गंभीर मुद्द्याच्या संदर्भात देखील सरकार ज्या पध्दतीने वागत आहे ते अतिशय अडचणीचे आहे.

अध्यक्ष महोदय, माणसाने किती दुटप्पी भूमिका घ्यावी याचे आश्चर्य वाटते. या सरकारने दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठक क्रमांक ८६ मध्ये निर्णय घेतला की, "केंद्राची मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक कृती योजना राज्यामध्ये राबविणार. आजकाल मानसिक तणाव, जीवनशैलीतील बदल, सामाजिक व आर्थिक विवंचना आदी कारणांनी मद्यपान आणि अंमली पदार्थांचे सेवन वाढले आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या लागणार आहेत."  परंतु यानंतरच्या १२ व्या बैठकीमध्ये विरुध्द निर्णय घेण्यात आला.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार...

अध्यक्ष महोदय, दिनांक २७ जानेवारी २०२२ रोजी बैठक क्रमांक ९८. बरोबर १२ व्या बैठकीत. १२ चा आकडा काय प्रिय आहे ते माहिती नाही. यांनी महाराष्ट्राचे १२ वाजवायचा संकल्पच केला आहे. सुपर मार्केट, वॉक इन स्टोअरमध्ये सेल्फ इन शॉप पध्दतीने वाईन विक्रीची संकल्पना. याबाबतची कारणे काय दिली आहेत तर वाईनचे परिणामकारक विपणन, मार्केटिंग होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा मोठा निर्णय आहे. विधानसभेमध्ये चहाचा स्टॉल काढून त्या जागी आता वाईन काढायची वेळ आणणार आहेत.

अध्यक्ष महोदय, एकीकडे सरकार म्हणाले की, वाईन म्हणजे दारु नव्हे. दुसरीकडे याच कॅबिनेट नोटमध्ये असे का लिहिता की ज्या जिल्ह्यामध्ये दारुबंदी आहे अशा जिल्ह्यांमध्ये मात्र वाईन विकली जाणार नाही. वाईनमध्ये दारु नव्हे आणि आपल्या भाषेमध्ये वाईन म्हणजे आरोग्यासाठी अतिशय उत्तम असे पेय आहे. माझी मागणी आहे की, आपण हा निर्णय ताबडतोब मागे घ्या. गरीब कुटुंबाला कोरोनाच्या वैश्विक महामारीमध्ये किराणा देऊन त्याचे जीवन फाईन करण्याऐवजी किराणा दुकानातून वाईन विकून सरकार फाईन करण्याचा हा प्रकार आहे. यामधून सरकारची तिजोरी फाईन झाली पाहिजे, असे जे मत आहे त्याला माझा विरोध आहे.

अध्यक्ष महोदय, मला मघाशी येताना एकाने चिठ्ठी दिली की किराणा दुकानामध्ये वाईन विकली जात आहे. त्याचबरोबर त्याचे एक जोक सांगितला की, "रोंगटे खड़े हो जाएंगे. अगर २ अक्तुबर को बापू का जनम दिन ना होता और वह ३१ दिसम्बर को होता, तो रोंगटे खड़े हो जाते." हा त्याचा संदेश आहे. आपण २ ऑक्टोबरला गांधी जयंती साजरी करतो. हा त्याचा संदेश आहे. आपण २ ऑक्टोबरला गांधी जयंती साजरी करतो. सरकार आता शेतकऱ्यांच्या हितासाठी मध्यान्ह भोजनाऐवजी मध्यान्ह पेय योजना आणणार आहे काय की ज्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत होईल. सरकार यातून पैसे कमवित आहे. ००३९ यामध्ये राज्य उत्पादन शुल्क सन २०२१-२२ मध्ये १८ हजार कोटी आणि आता लोकांना वाईन पाजून २२ हजार कोटींचे उत्पन्न उत्पादन शुल्कातून वाढत आहे. उत्पादन शुल्काचे

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार...

उत्पन्न वाढणे म्हणजे सरकारचे निती नियम चुकीच्या पध्दतीचे आहेत असा त्याचा अर्थ होतो. मात्र सरकार तसे करीत आहे. वैद्यकीय जागा भरण्याच्या दृष्टीने जे निर्णय आणि घोषणा होतात. त्याबाबत मदत न करता सरकार ज्या पध्दतीने विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय करता त्याविरुध्द या ठिकाणी सरकारने बदल करण्याची गरज आहे. सरकारकडून तशी अपेक्षा आहे. आता मी शेवटचा मुद्दा मांडतो. मुद्दे खूप आहेत. पण शेवटचा एकच मुद्दा मांडतो.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाची सुरूवात धर्मवीर संभाजी राज्यांच्या माध्यमातून केली. मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, मृत्यूला मारण्याचे धाडस बाळगणारा झुंजार छावा म्हणजे राजे संभाजी. कवि कलश यांचे डोळे काढले होते. त्यांना वाटले होते की, संभाजी राजांच्या मनात यामुळे भिती निर्माण होईल. पण संभाजी राजांच्या मनात यामुळे भिती निर्माण झाली नाही. १३ वर्षाचे धर्मवीर संभाजी राजे.... १३ भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. एक राजा की ज्याचे शास्त्र आणि शस्त्र या दोन्हीवरही प्रभुत्व होते. असे अचाट बुध्दीमान ते होते. रामनगरचे युध्द वयाच्या १६ व्या वर्षी त्यांनी जिंकले. ६० किलोची तलवार घेऊन ते लढले. औरंगजेबाचे सैन्य असेल, मुघल सैन्य संपविण्याचे काम त्यांनी केले. आपल्याकडे प्रस्ताव आला की, औरंगाबादचे नाव संभाजीनगर करावे. काही लोक आम्हाला प्रश्न विचारतात की तुम्ही झोपले होते काय तर मी त्यांना सांगू इच्छितो की, आम्ही झोपले नव्हतो. ५ वर्षे श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखालील सरकार असताना सन २०१६ मध्ये या संदर्भातील कार्यवाही सुरू केली. ती कार्यवाही सुरू करताना त्याबाबतची कागदपत्रे सुप्रीम कोर्टाचे निर्णय हे सर्व गोळा करता करता २०२० उजाडले. आता आपल्याकडे प्रस्ताव आहे. आपण खुर्चीवर किती दिवस राहणार आहात. या देशामध्ये जे आमचे मानबिंदू आहेत, ज्या अस्मिता आहेत त्या संदर्भात निर्णय करणार आहात की नाही. म्हणून मी या संदर्भात मंत्री महोदयांना विनंती करतो. मंत्री महोदयांनी २५० कोटी रुपयांचे स्मारक बांधण्याचा संकल्प केला. मी त्याबद्दल मनापासून अभिनंदन करेल. पण हा संकल्प

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार...

अपूर्ण आहे. तो आपण पूर्ण करावा. मताचे तुष्टीकरण करु नका. मताची लाचारी करु नका. काही आमचे मानबिंदू आणि धर्मबिंदू आहेत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार....

अध्यक्ष महोदय, आता मी शेवटी या भाषणाचा सार सांगत आहे.

"परस्परांची करे वकिली ध्येय त्यांचे फक्त वसुली,
नवाबी हो यांचे थाट, ती कंपनीची आवडे वाट
यांचे बजेट फुसका बार, खोटी ती वचने भारोभार,
महाविकासचे भकास तुणतुणे, जनतेच्या तोंडाला पुसली पाने,
ऑटो-भंगार तीन चाकाचा, जनतेच्या हा नाही कामाचा."

अध्यक्ष महोदय, अशा फसविणाऱ्या, लखनऊच्या भुलभुलैयापेक्षाही जास्त फसविणारा, भुल देणाऱ्या या अर्थसंकल्पाला मी विरोध करतो. यामुळे जनतेने सावध व्हावे असे मी महाराष्ट्राच्या जनतेला आवाहन करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

--------

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सोळंके (माजलगाव) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे. राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी कोविडसारख्या महामारीनंतर अर्थव्यवस्थेला गती मिळावी यासाठी अतिशय सर्वसामावेशक आणि सर्व घटकांना न्याय देणारा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. तसेच मी त्यांचे आभार मानणार आहे की, या अर्थसंकल्पामध्ये एक रुपयाचा सुद्धा नवीन कर लावण्यात आलेला नाही. या उलट भाग २ पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, अनेक सवलतींचा वर्षाव करीत हजारो कोटी रुपयांचा महसूल उडवून सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याची भूमिका माननीय अर्थमंत्र्यांनी घेतलेली आहे. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्यांना ५० हजार रुपये याप्रमाणे जवळपास २० लाख शेतकऱ्यांना १० कोटी रुपयांचा फायदा होणार आहे. त्याचप्रमाणे ३५ हजार शेतकऱ्यांना ९६४ कोटी रुपयांचे भू-विकास बँकेचे कर्जमाफ करण्याची घोषणा केलेली आहे. भू-विकास बँका बंद होऊन आता १५ ते २० वर्षांचा काळ झालेला आहे. परंतु अजूनही ७/१२ वर त्याची थकबाकी दिसत आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना नवीन बँकेचे कर्ज मिळू शकत नाही. ही दुर्दैवी परिस्थिती टाळण्यासाठी या कर्जमाफीची घोषणा माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी केलेली आहे. त्या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी सुद्धा २७५ कोटी रुपयांची घोषणा केलेली आहे. त्याबद्दल निश्चितपणे त्यांचे जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे कमीच आहेत.

अध्यक्ष महोदय, कर सवलतीच्या प्रस्तावामध्ये त्यांनी अभय योजना जाहीर केलेली आहे. या योजनेचा लाभ म्हणजे विविध कर कायद्यांतर्गत वैधानिक आदेशान्वये १० हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे त्यांनी ती पूर्णपणे माफ केलेली आहे. जवळपास १ लाख प्रकरणातील लहान व्यापाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. ज्यांची थकबाकी १० लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे त्या व्यापाऱ्यांनी २० टक्के भरायची आणि ८० टक्के माफ करण्यात येईल असे ही सांगितले. याचा लाभ राज्यातील जवळपास २ लाख २० हजार व्यापाऱ्यांना होणार आहे. सीएनजीवरील मुल्यवर्धित कर हा १०.५ टक्क्यांनी कमी करुन ३ टक्के केलेला आहे. मुद्रांक शुल्काचा कालावधी एक वर्षाच्या ऐवजी ३ वर्ष केलेला आहे. मुद्रांक शुल्कावरील

श्री.प्रकाश सोळंके....

दंडाच्या रकमेमध्ये १५०० कोटी रुपयांचा दंड महसुलीची तुट घेऊन ही योजना जाहीर केलेली आहे. प्रमुख म्हणजे जलवाहतुकीस चालना देण्यासाठी पुढच्या तीन वर्षासाठी त्यांनी कराची सूट दिलेली आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. प्रकाश सोळंके.....

हजारो कोटी रुपयांच्या कराची सूट या अर्थसंकल्पात व्यापारी व सर्वसामान्यांना दिलेली आहे, या करिता मी माननीय उप मुख्यमंत्री यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पात कृषी, आरोग्य, दळणवळण, मनुष्यबळ विकास, उद्योग या बाबत विकासाची पंचसुत्री जाहीर केली असून या करिता येत्या ३ वर्षात ४ लाख कोटी रुपयांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. आपली अर्थव्यवस्था एक ट्रीलियन डॉलर पर्यंत जावी या करिता माननीय वित्त मंत्र्यांचा प्रयत्न आहे.

अध्यक्ष महोदय, पंतप्रधान पीक योजनेच्या संबंधी ज्या अडचणी येतात त्या बाबत सन्माननीय सदस्यांनी अनेकदा विषय उपस्थित केला. विमा कंपन्या कशा प्रकारे मनमानी कारभार करीत आहेत, शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवत आहेत याचे पाढे प्रत्येक अधिवेशनात ऐकायला मिळाले आहेत. मी उदाहरण देतो. माझ्या बीड जिल्ह्यातील खरीप २०२० मध्ये सोयाबीन विम्याकरिता क्लेम मंजूर झाला आहे. मात्र अद्याप त्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाले नाहीत. या ठिकाणी माननीय वित्त मंत्री यांनी संकल्प केला आहे. पंतप्रधानांनी पिकाच्या संबंधी काही बदल सूचवले आहेत. विमा कंपन्यांनी जर ते मान्य केले नाही तर नुकसान भरपाई करिता अन्य पर्याय देऊ. शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी लवकरात लवकर अन्य पर्याय शोधून प्रयत्न करावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, विदर्भ, मराठवाड्यात कापूस व सोयाबीन ही महत्त्वाची पिके आहेत. या करिता एक हजार कोटी रुपयांचा विशेष कृती कार्यक्रम जाहीर केलेला आहे. ३ वर्षात या दोन्ही पिकांचे संशोधन करुन उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांना मदत होणार आहे. माननीय वित्त मंत्री यांना मी विनंती करणार आहे. अमेरिका, चीन या देशात कापसाकरिता बीटी ७ ही सुधारित जात वापरली जाते. आपण मात्र अद्याप बीटी २ वर आहोत. या बीटी २ ला मोठया प्रमाणात रोगाचा सामना करावा लागतो. बियाण्याची ४५० ग्रॅमची पिशवी असते, त्याकरिता जास्तीत जास्त ९०० रुपये आकारावेत असे बंधन आहे. बीटी ७ हे आपल्याकडे लवकरात लवकर आले तर

श्री. प्रकाश सोळंके.....

कापसाच्या उत्पादनामध्ये शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. त्यासाठी बियाण्यांच्या किमतीवर जे निर्बंध आहेत, ते त्वरीत हटवण्याची गरज आहे. तरच शेतकऱ्यांना सुधारित वाण उपलब्ध होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, शेततळयाचे अनुदान ५० टक्के वाढवून ७५ हजार रु. केले आहे. याचा मोठा लाभ सर्वसामान्य शेतकऱ्यांना पावसाचे पाणी साठवण्यासाठी होणार आहे. महिला शेतकऱ्यांसाठी कृषी योजनेमध्ये ३० ऐवजी ५० टक्के राखीव करण्याचा निर्णय घेतला आहे. बाजार समित्यांकडून पायाभूत सुविधांकरिता जे कर्ज घेतले जाते, त्याच्या १०० टक्के व्याजाची भरपाई सरकार करणार आहे. बाजार समितीच्या व शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही घोषणा महत्त्वाची आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री यांनी निर्यात धोरण तयार करु असे जाहीर केले आहे. २१ निर्यातक्षम शेतमालाची निर्यात करण्यासाठी क्लस्टरची घोषणा केली आहे. आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, सध्या महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने, खाजगी कारखाने मोठया प्रमाणात साखरेची निर्यात करीत आहेत.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सोळंके ....

मराठवाड्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील आमच्या कारखान्यांनी या हंगामामध्ये जवळजवळ तीनशे सव्वातीनशे कोटी रुपयांच्या साखरेची निर्यात आतापर्यंत केलेली आहे. परंतु, मराठवाडा व विदर्भातील कारखान्यांची भौगोलिक परिस्थिती आपण पाहिली तर, ते बंदरापासून अतिशय लांब आहेत. पुणे जिल्ह्यातील कारखाने असतील, सातारा असेल, कोल्हापूर असेल, येथील कारखाने बंदरापासून जवळ आहेत. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील एखाद्या कारखान्याला साखरेचा बत्तीसशे-साडेबत्तीसशे भाव मिळतो. आम्हाला एकतीसशे किंवा साडेएकतीसशे भावावर समाधान मानावे लागते. त्यामुळे मला या चर्चेच्या माध्यमातून शासनाला विनंती करावयाची आहे की, बंदरापासून जास्तीच्या अंतरावर असणाऱ्या कारखान्यांना काही ना काही प्रमाणात आपण ट्रान्सपोर्ट सबसीडी दिली तर त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ होऊ शकते. या दृष्टिकोनातून आपण लवकरात लवकर निर्णय करावा, अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती राहणार आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाडा हा सातत्याने जेथे दुष्काळाला तोंड द्यावे लागते, असा एक प्रदेश आहे. या मराठवाड्यामध्ये दुष्काळ पडला की, हजारोंच्या संख्येने टँकर मागवले जातात. कधी कधी तर वर्तमानपत्रामध्ये त्याला टँकरवाडा असेही म्हटले जाते. मराठवाड्यातील दुष्काळ कायमस्वरुपी हटवायचा असेल तर, त्याकरिता एकच उपाय आहे तो म्हणजे कोकणातील पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी उचलून किंवा वळवून ते मराठवाड्यापर्यंत जायकवाडी धरण असेल, माजलगाव धरण असेल किंवा परभणी जिल्ह्यातील धरणे असतील, त्यामध्ये आपण जोपर्यंत आणत नाही, तोपर्यंत मराठवाड्यातील दुष्काळ काही कमी होणार नाही. त्यामुळे शासनाने मराठवाड्यासाठी ही योजना एक कालबध्द कार्यक्रम ठरवून किमान पुढच्या ५ ते ७ वर्षांमध्ये मराठवाड्यातील दुष्काळ हटविण्याच्या दृष्टिकोनातून तातडीने हाती घ्यावी, जाहीर करावी व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कायमस्वरुपी दिलासा देण्याचा प्रयत्न करावा, अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती राहणार आहे.

श्री.प्रकाश सोळंके ...

अध्यक्ष महोदय, मातोश्री ग्रामसमृध्दी शेतपाणंद रस्ते ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण योजना या शासनाने जाहीर केलेली आहे. परंतु, त्याकरिता पुरेसे बजेट उपलब्ध करुन दिल्याशिवाय या योजनेला काही अर्थ राहणार नाही. मला अर्थ मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वपूर्ण निर्णय आपण घेतलेला आहे. यासाठी दरवर्षी किमान ५ हजार कोटी रुपयांचे बजेट आपण जाहीर केले पाहिजे. त्या माध्यमातून प्रत्येक गावात किमान ५ पाणंद रस्ते झाले पाहिजेत, ही भूमिका या शासनाने घेतली पाहिजे, अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन व बांधकाम यासाठी आपण ४ वर्षांमध्ये साडेसात हजार कोटी रुपयांचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्याच्या सेवासुविधा निश्चितपणाने वाढतील. शाळा खोल्या बांधकामाचा विषय हा मराठवाड्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. निजामकालीन शाळांच्या ठिकाणी नवीन शाळा खोली होणे, माध्यमिक शाळेच्या इमारती होणे अतिशय गरजेचे आहे. त्यासाठी डीपीडीसीमध्ये ५ टक्के निधी राखीव ठेवण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. त्याबद्दलही आपले अभिनंदन करावे तेवढे कमी आहे.

अध्यक्ष महोदय, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभागामार्फत गेल्या २ वर्षांमध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत व घरकुल योजनेसाठी निधी मिळालेला नाही. त्यामुळे या योजनेंतर्गत मिळणाऱ्या घरकुलापासून आमचा भटक्या विमुक्त समाजाचा माणूस वंचित राहिलेला आहे.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.प्रकाश सोळंके...

त्यांचे मोठ्या प्रमाणात अर्ज शासनास प्राप्त झाले आहेत. भटक्या विमुक्तांच्या घरकुल योजनेसाठी खास बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी कळकळीची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, या महाविकास आघाडी सरकारने नवीन उद्योग उभारण्यासाठी किंवा वाढविण्यासाठीच्या संदर्भात एक निर्णय घेतला आहे. खाजगी सेक्टरमधील उद्योगांना आजही सुविधा उपलब्ध आहेत. टाटा, बिर्ला, अदानी, अंबानी यांच्यापैकी कोणी उद्योग उभा केला तर त्यांच्या कॅपिटल गुंतवणुकीच्या १०० टक्के सवलत नवीन उद्योगांना मिळते व ८० टक्के सवलत विस्तारीकरणासाठी देण्यात येते. परंतु दुर्दैवाने सहकार क्षेत्राला उक्त सवलत मिळणार नाही, अशा प्रकारचा पवित्रा उद्योग विभागाने घेतला असून तो दुर्दैवी आहे.

अध्यक्ष महोदय, सहकार क्षेत्रात काम करुन माननीय उप मुख्यमंत्री हे या पदापर्यंत आले आहेत. सहकारी क्षेत्रात हजारो शेतकऱ्यांच्या माध्यमातून भाग भांडवल जमा करुन उद्योग उभारण्यात येतो. या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकरी सहकारी साखर कारखाना उभारतात, कापूस उत्पादक शेतकरी सहकारी सूत गिरण्या उभारतात, काही सहकारी कृषि प्रक्रिया उद्योग उभारण्यात येतात. त्यांना प्रोत्साहन न देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून तो बदलण्यात यावा व त्यामध्ये सहकार क्षेत्राचा समावेश करण्यात यावा. अशी माझी सहकार क्षेत्रातील एक कार्यकर्ता या नात्याने आग्रहाची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, वन्य प्राण्यांपासून शेतीचे नुकसान होत असल्याने सौर ऊर्जा कुंपनाची योजना भविष्यात महत्त्वपूर्ण ठरणार आहे. लहान मोठ्या शेतकऱ्यांच्या पिकांची नुकसान होऊ नये याकरिता या याजनेची व्याप्ती जेवढी वाढवता येईल तेवढी वाढविण्याचा निर्णय घेण्यात यावा, अशी माझी आग्रही मागणी आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सोळंके...

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १० हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांचा निर्णय घेतला आहे. त्याकरिता ७,५०० कोटी रुपये निधी २ वर्षात देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे, त्याबद्दल मी सरकारचा आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, हा अर्थसंकल्प विकासाला चालना देणारा, सर्वसामान्य शेतकऱ्याला न्याय देणारा, लहान मोठ्या शेतकऱ्यांना सवलती देणारा आहे. त्याचे मी मनापासून स्वागत करतो. वित्त मंत्री महोदयांचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

अध्यक्ष महोदय, मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

-----------------

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) :** आता बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांची नावे सांगण्यात वेळ घालविणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी चर्चा केली त्यावेळी ठरले आहे. त्यांनी सांगितले आहे की, यासंदर्भात गट नेत्यांची बैठक घेऊन पुढील चर्चेसाठी पक्षाला कशा पद्धतीने संधी द्यावयाची याबाबत निर्णय घेण्यात येईल. याबाबत त्यांना सांगितले आहे. त्यामुळे आता मी सांगितल्यानुसार पद्धत अवलंबिण्यात येत आहे.

----------

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ चा राज्याचा एकूण अर्थसंकल्प हा......

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु करण्यापूर्वी विरोधी पक्षातील एका सन्माननीय सदस्यांनी भाषण केल्यानंतर सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना भाषणाची संधी देण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला होता.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी मघाशी सांगितलेल्या पद्धतीनुसार सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली आहे. आपण सांगितले आहे की, याबाबतचा निर्णय हा गट नेत्यांबरोबर बैठक घेऊन करण्यात येईल. विद्यमान पद्धतीनुसार चर्चा सुरु ठेवण्यास मदत करावी, अशी मी विनंती करतो.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, आपण नवीन पद्धत पाडत आहात. अशी पूर्वी केव्हाही पद्धत नव्हती. सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे भाषण झाल्यानंतर लगेच विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना भाषणाची संधी दिली जाते.

**तालिका सभाध्यक्ष :** नवीन सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी प्राप्त व्हावी, यासाठी आपण या पद्धतीने चर्चा करीत आहोत. गट नेत्यांची बैठक घेऊन त्यामध्ये आपले म्हणणे मांडावे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर.....

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, जेव्हा आपण ही चर्चा पुकारली तेव्हा विरोधी पक्षाला अर्धा वेळ व सत्ताधारी पक्षाला मंत्री महोदयांच्या उत्तरासह अर्धा वेळ देण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. परंतु आपण ही वेळ पाळत नाही. कारण आपण ऐकमेंकाना सहकार्य करतो. आता सत्ताधारी पक्षामध्ये तीन पक्ष आहेत. विरोधी पक्षात एकच पक्ष आहे. सत्ताधारी पक्षातील तीन सन्माननीय सदस्यांनी बोलल्यानंतर विरोधी पक्षातील एका सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळत असेल तर ठरल्याप्रमाणे अर्धा-अर्धा वेळ कसा मिळणार?

**तालिका सभाध्यक्ष :** ज्या प्रमाणे मला वेळेचे नियोजन करुन दिलेले आहे, त्याप्रमाणे मी सन्माननीय सदस्यांना संधी देत आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या वेळेमध्ये कपात केली जाणार नाही. विरोधी पक्षाला जेवढा वेळ देण्यात आलेला आहे, तेवढा वेळ आपणास देण्यात येईल.

श्री.सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अजित पवार यांनी सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प मांडलेला आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपणास बोलण्याची संधी देण्यात येईल. प्रथम आपण आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

श्री.हरीभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, स्वातंत्र्यानंतर जेव्हा विधासभा सुरु झाली तेव्हापासून आतापर्यंत अशा प्रकारचा पायंडा कोणीही पडलेला नाही. सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्याचे भाषण संपल्यानंतर लगेच विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यंना बोलण्याची संधी दिली जाते. सत्ताधारी पक्षामध्ये तीन सरकार

श्री.हरीभाऊ बागडे.......

आहेत काय, असेल तर तसे सभागृहाला सांगावे. प्रत्येक पक्षाचे स्वतंत्र सरकार आहे काय? अशा प्रकारचा नवीन पायंडा पाडू नका, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** परवा जी चर्चा झाली, त्या वेळी देखील असाच क्रम ठेवण्यात आला होता. मी आपणा सर्वांना संधी देतो. त्यामुळे आता आपण खाली बसावे. विरोधी पक्षातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांची वेळ कमी केली जाणार नाही.

श्री.सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प हा ५ लाख ४८ हजार ४६० कोटी रुपयांचा आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येईल. प्रथम आपण आपापल्या आसनावर जाऊन बसावे. सभागृहाचा वेळ वाया घालू नका, अशी मी विनंती करतो. परवा देखील याच क्रमानुसार चर्चा करण्यात आलेली आहे. याबाबतचा मी पुरावा देखील देऊ शकतो.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता यांनी ९६ मिनिटे भाषण केले आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी ४४ मिनिटे भाषण केले आहे. म्हणजे जवळपास दोन नेत्यांनीच अडीच तास भाषण केले आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी......

श्री. अजित पवार......

असे असताना सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश सोळंके यांनी दहा मिनिटे भाषण केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश वरपुडकर आता बोलत आहेत. विरोधी पक्षाचे सन्माननीय नेत्यांनी अडीच तास भाषण केले आहे, हे विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या लक्षात येत नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. सुरेश वरपुडकर यांनी त्यांचे भाषण सुरु करावे. (....अडथळा.....) मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी जागेवर बसावे.

श्री. सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, काल सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. देवेंद्र फडणवीस आणि सन्माननीय माजी वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, हा अर्थसंकल्प फुगवून दाखविला आहे. (......अडथळा......)

**तालिका सभाध्यक्ष :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देणार आहे.

श्री. सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, हा अर्थसंकल्प फुगवून दाखविल्याचे सांगण्यात आले आहे. सन २०१४ मध्ये माननीय श्री. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते. सन २०१४ ते सन २०१९ या काळातील अर्थसंकल्पाचा आकारमान अधिक होता व खर्च कमी होता. (......अडथळ......)

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांची आग्रही मागणी आहे आणि ती नियमानुसार आहे. दोन्ही बाजुच्या एकेका सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. अशी प्रथा कायम ठेवावी. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश वरपुडकर यांचे भाषण झाल्यानंतर दोन्ही बाजुच्या एकेक सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** मी आपणास सांगितले आहे की, विरोधी पक्षाचा वेळ कमी करण्यात येणार नाही. परंतु सर्व नवीन सन्माानीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येकजण पाच-पाच मिनिटे बोलणार आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, यापूर्वीही एक या बाजुचा सदस्य आणि दुसरा समोरील बाजुचा सदस्य, अशी बोलण्याची पद्धत होती.

**तालिका सभाध्यक्ष :** विरोधी पक्षाचा बोलण्याचा वेळ संपला असला तरीही मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देणार आहे. त्यामुळे मी विनंती करतो की, कृपया वेळ वाया घालवू नये.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मी एका मिनिटामध्ये सर्वांचा गैरसमज दूर करतो. पहिली गोष्ट अशी की, दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी समान वेळ मिळाला पाहिजे, या सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर यांच्या मताशी मी सहमत आहे. याबाबत निर्णयही तसाच आहे. राहिला प्रश्न कधी कोणत्या बाजुच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार ? मी सांगू इच्छितो की, माननीय अध्यक्षांसमोर जो चार्ट ठेवण्यात आला आहे, तो पक्षनिहाय वेळेनुसार ठेवण्यात आला आहे. भारतीय जनता पक्षाचे एक सन्माननीय सदस्य आणि सत्तारुढ पक्षाचे एक सन्माननीय सदस्य असा तो चार्ट नाही. जर सुरुवातीला भारतीय जनता पक्षाने सुरुवात केली असेल तर दुसऱ्या क्रमांकावर असलेला शिवसेना पक्ष, तिसऱ्या क्रमांकावरील राष्ट्रवादी – काँग्रेस पक्ष आणि चौथ्या क्रमांकाचा काँग्रेस पक्ष असा तो क्रम आहे. त्यामुळे आपण जे करीत आहात ते योग्य आहे. (.....अडथळा.....)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. सुरेश वरपुडकर यांनी भाषण सुरु करावे. मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, त्यांच्या पक्षाचा वेळ कमी केला जाणार नाही. त्यांचा वेळ जरी संपला असला तरीही मी त्यांना बोलण्याची संधी देईन. परंतु असा नियम करु नये.

श्री. सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, (......अडथळा......)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** आता काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य बोलत आहेत. त्यांच्यानंतर अनुक्रमे शिवसेना, भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येईल.

श्री.सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, सन २०१४ ते २०१९ दरम्यान भारतीय जनता पक्षाचे सरकार होते. सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये काल माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस आणि आज सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी भाग घेतला. बोलताना त्यांनी सांगितले की, महाविकास आघाडी सरकारचा अर्थसंकल्प हा फुगलेला अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पामध्ये जेवढी तरतूद केली जाते प्रत्यक्षात तेवढा खर्च होत नाही. परंतु सन २०१४ ते २०१९ दरम्यान... (अडथळा...)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घ्यायचा आहे. या सभागृहाच्या प्रथा-परंपरेप्रमाणे सत्ताधारी पक्षाचे सदस्य बोलल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांना संधी दिली जाते. त्यामुळे आपण आमच्यावर अन्याय करु नये, अशी आमची विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** मी आपणास सांगू इच्छितो की, आपल्या पक्षासाठी निश्चित करुन देण्यात आलेली पूर्ण वेळ आपल्याला देण्यात येईल. मी मघाशी देखील हे सांगितलेले आहे. त्यामुळे कोणते सदस्य कधी बोलतील याचा विचार करु नका. सर्वांना बोलण्याची संधी दिली जाणार आहे. आपण निश्चिंत राहावे. मी हे देखील सांगू इच्छितो की, वेळ संपली तरीही आपणास संधी देण्यात येईल. त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. आपण चर्चेला सुरुवात करु.

श्री.सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पामध्ये सुमारे ३८ हजार ५४८ कोटी रुपये...(अडथळा...) आघाडी सरकारच्या काळात

असुधारित प्रत

श्री.सुरेश वरपुडकर.....

कोरोनाची साथ आलेली असतानाही अर्थसंकल्प फुगलेला नाही. माननीय वित्त मंत्र्यांनी फार मोठया प्रमाणात खर्च कमी केला आहे. महाराष्ट्राच्या जी.डी.पी. चा विचार केला तर सन २०२०-२१ मध्ये ७.७ टक्क्यांनी घट झाल्याचे दिसते. त्याचप्रमाणे देशाचा जी.डी.पी. देखील ६.७ टक्क्यांनी कमी झालेला आहे. सन २०२०-२१ मध्ये कोरोनाची साथ आली त्यावेळची राज्याची आर्थिक स्थिती पाहिली तर सर्वात कमी जी.डी.पी....(अडथळा...)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, मी वेगळे काहीही केलेले नसून या सभागृहाच्या प्रथेप्रमाणे सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली जात आहे.

श्री.सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, उत्पादन क्षेत्रातील... (अडथळा...)

**तालिका सभाध्यक्ष :** मी मघाशीच सांगितले आहे की, आता काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य बोलत आहेत. त्यांच्यानंतर अनुक्रमे शिवसेना, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येईल.

यानंतर श्री.धुमाळे.....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. अशोक पवार...

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील हे दोन्ही अतिशय ज्येष्ठ सदस्य आहेत.

श्री. अब्दुल सत्तार (महसूल राज्यमंत्री) : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. हरिभाऊ बागडे अध्यक्ष होते त्यावेळी जेव्हा जेव्हा अशी परिस्थिती निर्माण झाली त्यावेळी त्यांनी सांगितले की नंतर त्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देतो. त्यावेळी आम्ही ऐकले. मग आपण आता का ऐकत नाही ?

अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण हा विषय संपवावा. कारण आपल्या सभागृहासमोर आज पुष्कळ कामकाज आहे.

श्री. अशोक पवार : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, हरिभाऊ बागडे हे तिन्ही विरोधी पक्षातील अतिशय ज्येष्ठ सदस्य आहेत. या सभागृहात नवीन आमदार खूप आले आहेत. म्हणून माझी सर्वांना विनंती आहे की, आम्हाला वादविवाद न करता आपल्याकडील सदस्यांची भाषणे आम्ही शांतपणे ऐकतो. त्याबद्दल आपल्याला कधी त्रास देत नाही. काल सभागृहात माननीय विरोधी पक्षनेते उपस्थित होते. त्यावेळी वेळेच्या वाटपाबाबत ठरविले ते माननीय अध्यक्षांकडून आपण समजून घेतले पाहिजे. आमचे दुसरे काहीही म्हणणे नाही. आपल्याला किती वेळ दिला जात आहे आणि आम्हाला किती वेळ दिलेला आहे हे समजून घेऊन त्याचे नियोजन करण्यासाठी आपल्याला ५ मिनिटांचाही अवधी लागणार नाही. त्यामुळे आपण शांतपणे ऐकावे. सन्माननीय सदस्य लगेच बोलत नाहीत. कालची चर्चा रेकॉर्डला आहे. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, वेळेचे नियोजन जे ठरले असेल ते माननीय अध्यक्षांकडून आपण शांतपणे ऐकून घेतले तर फार बरे होईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, कामकाज शांततेने व्हावे, चर्चा व्हावी, संवाद व्हावा, ही सर्वांची नक्कीच भावना आहे. या ठिकाणी आता एकच मुद्दा उपस्थित झाला आहे त्यामध्ये गंभीरता आहे. या अगोदर एक इकडचा आणि एक तिकडचा सदस्य बोलला पाहिजे... वेळेचा प्रश्न आहे. पण आपण ती वाढवू शकतो. खरं म्हणजे ही चर्चा ७ दिवस करायची असते. आपण आता ती २ दिवस करीत आहोत.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** मी सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांना सांगू इच्छितो की, परवा पुरवणी मागण्यांच्या वेळी जेव्हा चर्चा झाली त्यावेळी अशाच क्रमाने चर्चा होती मी या ठिकाणी अध्यक्षस्थानी बसलो होतो. त्यावेळी एक भाजप, नंतर शिवसेना त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस व पुढे काँग्रेस. आपण हे रेकॉर्ड काढून बघा. अशी चर्चा होती. त्याप्रमाणे मी चर्चा सुरू केली आहे. त्यामुळे नवीन वेगळे काही केले नाही. आपण रेकॉर्ड काढून बघा. रेकॉर्डवर जर नसेल तर मी मान्य करतो आणि नसेल तर तुम्हाला मान्य करावे लागेल. आता सन्माननीय सदस्य श्री. सुरेश वरपूडकर यांनी त्यांच्या भाषणास सुरूवात करावी.

श्री. सुरेश वरपूडकर : अध्यक्ष महोदय, आजच्या या अर्थसंकल्पावर सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी....

यानंतर श्रीमती कोळगिरे..

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी.....(अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण जागेवर बसावे.

श्री. सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, सन २०१४ पासून सन २०१८-१९ पर्यंत माननीय माजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे राज्य होते. त्या काळातील राज्याच्या अर्थसंकल्पातील जेवढी प्रोव्हिजन होती तेवढा खर्च झाला आहे काय ? तर तो खर्च झालेला नाही. माननीय वित्त मंत्र्यांनी आताचा अर्थसंकल्प फुगवून सांगितला आहे असे आपण म्हणता. परंतु त्याबाबत मी सांगू इच्छितो की, तो अर्थसंकल्प फुगवून सांगितलेला असला तरी देखील तेवढा खर्च होत नाही. ही परंपरा आपल्या पासून चालत आलेली आहे आणि आताही सुरुच आहे. या अर्थसंकल्पामध्ये वेगवेगळ्या प्रोव्हिजन केलेल्या आपल्याला पाहायला मिळाल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज कर्जमुक्ती ही योजना आपल्या काळात आली होती, आज महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजना आताच्या सरकारच्या काळातील आहे. त्या संदर्भातील सर्वांत चांगला कोणता निकाल चांगला असेल तर तो म्हणजे साधारण,सर्वसामान्य माणूस दरवर्षी जो कर्जपुरवठा करतो, नियमित कर्ज पुरवठा करतो त्याला आपण आता ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्याचे मंजूर केले आहे.

अध्यक्ष महोदय, यामुळे राज्याच्या महसुलात फरक पडलेला असताना शेतकऱ्यांना आपण सातत्याने मदत दिली तर शिवाजी महाराज कर्ज पुरवठा योजना आधीच्या शासनाने सन २००९ पासून आणलेली होती. परंतु सन २००९ च्या पूर्वीच्या शेतकऱ्यांना.....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** पुरवणी मागण्यांवर जी चर्चा झाली त्यावेळी बोलणाऱ्या सदस्यांचा काय क्रम होता ते मी आपल्याला सांगतो. त्यामध्ये सन्माननीय सदस्या प्रा. देवयानी फरांदे, सन्माननीय सदस्या श्रीमती सरोज अहिरे-राष्ट्रवादी पक्ष, सन्माननीय सदस्या श्रीमती प्रतिभा धानोरकर-काँग्रेस पक्ष, सन्माननीय सदस्या श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर-भारतीय जनता पक्ष, सन्माननीय सदस्य श्री. रमेश बोरगावकर-शिवसेना पक्ष, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश सोळंके-राष्ट्रवादी पक्ष, सन्माननीय सदस्या श्रीमती सुलभा खोडके-काँग्रेस पक्ष, सन्माननीय सदस्य श्री. अबू आजमी- समाजवादी पार्टी, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे -शिवसेना पक्ष, सन्माननीय सदस्य श्री. विश्वास भोईर-शिवसेना पक्ष तसेच सन्माननीय सदस्य श्री. धर्मरावबाबा आत्राम-राष्ट्रवादी काँग्रेस अशा प्रकारे क्रम होता. त्यामुळे आता त्यामध्ये काहीही बदल केला नाही. त्या महिला असल्या तरी देखील त्यांना पक्ष आहे.

सर्व सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे, अशी माझी विनंती आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव आता आपले भाषण सुरु करतील.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला अशी विनंती आहे की, आता आपण विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी संधी द्यावी आणि त्यानंतर मला बोलण्याची संधी दिली तरी चालेल. कारण सभागृहामध्ये शांतता राहावी यासाठी मी ही विनंती करीत आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय,आपल्याकडे वेळ कमी असून तो वाया जात आहे. काल माननीय विरोधी पक्ष नेते व आज सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी जवळजवळ २ तास ३० मिनिटे वेळ घेतली असेल. एक सदस्य या बाजूचे व दुसऱ्या बाजूचे एक सदस्य अशा प्रकारे आपण त्यांना ५ मिनिटांचा वेळ द्यावा. अडीच तासातील एक तास मला उत्तर देण्यासाठी लागेल. उर्वरित दीड तासात आमच्या बाजुच्या सदस्यांना वेळ द्यावा. येथून पुढे विरोधी पक्षातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांना कमी वेळ द्यावा व सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांचा वेळ कव्हर करावा.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** सन्माननीय सदस्य श्री.सुरेश वरपुडकर ऑन लेग होते. त्यांचे भाषण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गणेश नाईक आपल्याला मी संधी देतो. आता सन्माननीय सदस्य श्री.सुरेश वरपुडकर यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत

श्री. सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, मी आपल्यलाा धन्यवाद देतो. माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडला आहे. माजी अर्थ मंत्री माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आघाडी शासनाच्या अर्थसंकल्पावर असा आरोप केला की, हा अर्थसंकल्प फुगवलेला असून तेवढा खर्च झालेला नाही. सन २०१४ पासून सन २०१९ पर्यंत पाहिले तर असे दिसून येईल की, जेवढा खर्च दाखवलेला असतो तेवढी रक्कम खर्च झालेली नाही. त्याची आकडेवारी आपल्याकडे आहे. अध्यक्ष महोदय, सन २०१४-१५ मधील अर्थसंकल्पात ६ हजार ३९० कोटी रुपयांनी कमी खर्च झालेला आहे. सन २०१५-१६ मधील अर्थसंकल्पात १७ हजार १४० कोटी रुपयांनी कमी खर्च झाला आहे. माजी मुख्यमंत्री व सन्माननीय माजी वित्त मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी काल असा आरोप केला की, हा अर्थसंकल्प फुगवलेला आहे व खर्च कमी झालेला आहे. सन २०१८-१९ मध्ये ३८ हजार ५४८ कोटी रुपये झाला आहे. ही परंपरा आजची नाही. मागील काळापासून हे सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, अशा अनेक योजना आहेत की, ज्याचा राज्याच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. सन २०२१ मध्ये कोरोना होता. तेव्हा आपल्या राज्यातील मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रामध्ये जीडीपी १२ टक्क्यांनी कमी झाला. सेवा क्षेत्रातील जीडीपी ९ टक्क्यांनी कमी झाला. मात्र कृषी क्षेत्रातील जीडीपी वाढला होता. मॅन्युफॅक्चरिंग व सेवा क्षेत्र सोडून लोक शेतात गेले यामुळे राज्यातील कृषी क्षेत्रातील जीडीपी १५ टक्यांनी वाढला.

अध्यक्ष महोदय, कराच्या संबंधी मी सांगू इच्छितो. सन २०१९-२० मधील महाराष्ट्र राज्याचे उत्पन्न जवळपास २ लाख ८३ हजार १९० कोटी रुपये होते. तेच उत्पन्न कोरोनाच्या काळात फार मोठया प्रमाणात कमी झाले. आघाडी शासनाने आता पर्यंत जिल्हा नियोजन कमिटीच्या निधीमध्ये कोणतीही कपात केलेली नाही. डीपीडीसी मधील सर्व निधी शासनाने दिलेला आहे, या करिता वित्त मंत्री महोदयांचे आपण अभिनंदन केले पाहिजे.

श्री. सुरेश वरपुडकर.....

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपाल यांच्या अभिभाषणात असे नमूद केले आहे की, दि. १८ फेब्रुवारी, २०२० पर्यंत केंद्र शासनाकडून येणारी थकबाकी २९ हजार ९४२ कोटी रुपये होती.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.सुरेश वरपुडकर ...

ही २९ हजार ९४२ कोटी रुपयांची कर्जमाफीची जी बाकी येणार होती त्याची कालमर्यादा फेब्रुवारी महिन्यापर्यंतच होती. ...(अडथळा)... मी जनरल बोलत आहे. आता या जीएसटीच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र शासन व केंद्र शासनालासुध्दा फार वेगळा विचार करण्याची आवश्यकता आहे. कारण जी.एस.टी.ची नुकसानभरपाई केंद्र सरकारला फक्त जून, २०२२ पर्यंतच आहे. आज आपण जे काही प्रकल्प केले ...(अडथळा)... नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजार रुपयांची मदत देण्याबाबतच्या योजनेत काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाची ही योजना सन २००९ पासून पुढे घेतलेली आहे. आघाडी सरकारने त्यापुढे घेतलेली आहे. सन २००९ च्या आधीचे थकबाकीदार शेतकरी बऱ्याच मोठ्या प्रमाणात राहिलेले आहेत. त्यामुळे सर्वसाधारण बँकेचासुध्दा, जिल्हा मध्यवर्ती बँक असेल, राष्ट्रीयकृत बँक असेल त्यांचा एनपीए फार मोठ्या प्रमाणावर वाढत चालला होता. हा एनपीए जर कमी करावयाचा असेल .... आता ५० हजार रुपयांच्या लोभामुळे पुष्कळ लोक थकबाकीदारातून चालू बाकीदार होऊ लागले आहेत. ही योजना कायमची सुरु झाली पाहिजे तर थकबाकी वाढणार नाही.

अध्यक्ष महोदय, ज्या ज्या वेळेस निवडणुका येतात, त्यांना आता जवळपास १-२ वर्षे राहिली आहेत तेव्हा प्रत्येक सरकार कर्जमाफीच्या योजना आणून थकबाकीदारांना कर्जफेड करतो, असे म्हणते. मात्र असे म्हटल्यावर कोणीही कर्ज फेडण्याकरिता बँकेमध्ये येत नाही. त्यामुळे बँकेचा एनपीए फार मोठ्या प्रमाणावर वाढत चाललेला आहे. हा एनपीए कमी करावयाचा असेल तर नियमित कर्जफेड करणाऱ्यांना जी ५० हजार रुपयांची मदत दिली, ती कंटिन्यू सुरु ठेवली पाहिजे, अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

अध्यक्ष महोदय, आज बँकांच्या संदर्भामध्ये राष्ट्रीयकृत बँकाचा एनपीए फार मोठ्या प्रमाणात वाढला तर केंद्र सरकार त्यांना भागभांडवलाकरिता हजारो कोटी रुपयांची मदत करते. परंतु, जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संदर्भामध्ये अनिष्ट तफावतीमुळे

श्री.सुरेश वरपुडकर …

ग्रामीण भागातील सोसायट्यांमध्ये, पतपेढ्यांमध्ये जो असमतोल राहिलेला आहे... अनिष्ट तफावतीमुळे राज्याचा असमतोल हा साडेचार हजार कोटी रुपयांचा आहे...(अडथळा)... हा असमतोल आपल्याला कमी करावयाचा असेल, त्या पतपेढ्या, ज्या ग्रामीण बँकांच्या सोसायट्या आहेत त्या जिवंत ठेवायच्या असतील तर, काही करुन या राज्याने अनिष्ट तफावतीचे प्रमाण कमी करण्याची गरज आहे. बँकांचा एनपीए कमी करण्याच्या दृष्टीकोनातून या सर्वच बँकांना मदत करण्याचे धोरण राज्याने आखले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मातोश्री ग्रामसमृध्दी शेतपाणंद रस्ते योजनेसंदर्भात मी एक गोष्ट आपल्याला सांगू इच्छितो. आज बऱ्याचशा आमदारांनी जेथे जेथे इरिगेशनचा भाग आहे, जेथे ऊसाचे क्षेत्र जास्त आहे... तेथील सर्व लोकांना ऊस नेण्याच्या दृष्टीकोनातून जे शेत रस्ते आहेत त्यावरुन ऊस नेण्यात फार मोठी अडचण येते. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे असेल तर ही योजना अत्यंत महत्वाची आहे. त्यामध्ये केंद्र शासनाच्या मनरेगामधील अकुशलचा भाग व ५ लाख रुपयांचा कुशलचा भाग यामध्ये ॲडिशनल जवळपास ८.८० लाखाचे ...मातोश्री ग्रामसमृध्दी शेतपाणंद रस्ते योजनेतून देखील आहे.

अध्यक्ष महोदय, माझी सरकारला विनंती आहे की, ज्या रस्त्यांचे मातीकाम ऑलरेडी लोकसहभागातून झालेले आहे किंवा आमदार फंडातून किंवा खासदार फंडातून वेगवेगळया फंडातून जे काही मातीकाम ऑलरेडी झालेले आहे त्या रस्त्यांना मनरेगामध्ये, अकुशलमध्ये न घेता कुशल मधील तरतूद आपण त्यामध्ये केली पाहिजे ५ लाख रुपये मनरेगाचे व ८ लाख ८० हजार रुपये ...अशा प्रकारे १५ लाख रुपयांचे एस्टीमेट दिले तर या राज्यातील जास्तीत जास्त रस्ते आपण मजबूत करु शकू. ९०:१० या हेड अंतर्गत आपण मातोश्री ग्रामसमृध्दी शेतपाणंद रस्ते योजनेला निधी देतो. राज्याच्या जिल्हा विनियोजनाचा अकुशलचा भाग जास्त उत्पन्न झाले असेल... व कुशलचा भाग कमी झाला असेल तर त्याला आपण ९०:१० हेड दिलेला आहे. या ९०:१० हेडमध्ये काही जिल्ह्यामध्ये अशा प्रकारचा निधी जेथे आपण

असुधारित प्रत

श्री.सुरेश वरपुडकर …

देऊ शकत नाही, ग्रामीण भागातील विकासासाठी मग ते रस्ते असतील, नाले असतील, वेगवेगळे प्रकल्प असतील या रस्त्यांना देखील ९:१० हेड अंतर्गत .... (अडथळा)... अशाप्रकारचा हा अर्थसंकल्प आहे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.सुरेश वरपुडकर...

या अर्थसंकल्पावर मला बरेच बोलावयाचे आहे, परंतु वेळ कमी आहे.

अध्यक्ष महोदय, महसूली तुटीबाबत मी बोलू इच्छित आहे. यासंदर्भात मागील वर्षी केंद्र शासनाने ४.५ टक्के तूटीची परवानगी दिली होती त्यामधील १.७ टक्के महसूली तूट शिल्ल आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पात ४ टक्के तुटीची परवानगी दिली असून राज्य सरकारने ८ ते ८.५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या अर्थसंकल्पास माझे पूर्णत: समर्थन आहे. हा अर्थसंकल्प कसा किती वाढला, याबाबत वेळे अभावी मला बोलता येणार नाही. त्यासंदर्भातील माझ्याकडे सर्व आकडेवारी आहे.

अध्यक्ष महोदय, परभणी जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी मंत्री मंडळाने ६,५०० कोटी रुपयांचा ठराव मंजूर केला होता, त्यासाठी अर्थसंकल्पाच्या पंचसुत्रीमधील आरोग्य विभागात तरतूद करण्यात आली नाही. उक्त तरतूद पुरवणी अर्थसंकल्पामध्ये करण्यात यावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

----------

**माहितीचा मुद्दा**

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी किती वेळ आहे व त्यामधील विरोधी पक्षाचा किती वेळ शिल्लक, किती सन्माननीय सदस्य बोलणार आहेत, याची माहिती सभागृहाला देण्यात यावी. या चर्चेसाठी २६ मिनिटे शिल्लक असून १३ सन्माननीय सदस्य यांना बोलावयाचे असल्याने प्रत्येकाला २ मिनिटे वेळ देण्यात यावा.

**तालिका सभाध्यक्ष (दीपक चव्हाण) :** विरोधी पक्षाचे ८ सन्माननीय सदस्य बोलणार आहेत.

-------

असुधारित प्रत

श्री.गणेश नाईक (ऐरोली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील माझी भूमिका मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार यांनी अर्थसंकल्पामध्ये नमूद केले आहे की, महाराष्ट्र हे देशातील एक ट्रीलियन डॉलर अर्थव्यवस्था निर्माण करणारे पहिले राज्य ठरेल. एक गोष्ट खरी आहे की, राज्य चालविण्यासाठी राज्याचे आर्थिक स्त्रोत असले पाहिजेत. याबाबत पंचसुत्रीत नमूद करण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, या देशाचे माननीय प्रधान मंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी देशाच्या दहा दिशांचा विचार केला आहे. देशाला भविष्य काळात जगाच्या पाठीवर सामर्थ्यवान करण्याची त्यांची भूमिका आहे. त्याअनुषंगाने त्यांनी पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. आपल्या देशातील उद्योग, व्यापार अशा विविध संस्थांचा विदा हा आपल्या देशातच नव्हे तर सिंगापूर, हाँगकाँग, बँकॉक व चीनमध्येही काही ठिकाणी साठविण्यात आलेला आहे. देशाच्या स्वाभिमानासाठी व सामर्थ्य निर्माण करण्यासाठी माननीय प्रधान मंत्री यांनी निश्चित केले आहे की, या देशाचा देशाबाहेरील संपूर्ण विदा आगामी ३ वर्षात देशात आणावयाचा आहे. त्याकरिता देशातील नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र व चेन्नई या दोन शहरांमध्ये ५ लाख कोटी रुपयांचे विदा केंद्र निर्माण करण्याचे धोरण केंद्र सरकारने हाती घेतले आहे. उर्वरित ५ लाख कोटी रुपयांचे विदा केंद्र देशातील इतर शहरांमध्ये निर्माण करण्यात येणार आहेत. अशा पद्धतीने १५ लाख कोटी रुपयांचे विदा केंद्र आगामी ३ वर्षांच्या कालावधीत निर्माण करण्याचा संकल्प आहे. परंतु यासाठी उद्योगांना बळ देणे आवश्यक आहे. विदा केंद्राच्या संदर्भात राज्य सरकारचे धोरण नाही.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.गणेश नाईक......

पर्यावरण विभागाची मान्यता देण्यासाठी ६ महिन्यांचा कालावधी लागत आहे. परंतु हैद्राबाद व तेलंगणा राज्यामध्ये डाटा सेंटर उभारण्यासाठी लागणारे सर्व ना हरकत प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत दिले जातात. परंतु त्यासाठी या राज्यामध्ये सहा महिन्यांचा कालावधी लागत आहे. त्यामुळे उद्योजक या राज्यामध्ये स्थिरावण्याऐवजी तेलंगणा व हैद्राबाद राज्यामध्ये उद्योगधंदे उभारीत आहेत.

अध्यक्ष महोदय, आता पर्यावरण मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यामुळे त्यांना सांगू इच्छितो की, जे डाटा सेंटर येऊ घातलेले आहेत, त्यांना तेलंगणा व हैद्राबाद राज्याच्या धर्तीवर ३० दिवसांच्या आत सर्व आवश्यक ना हरकत प्रमाणपत्रे दिले तर राज्यामध्ये रोजगार निर्माण होईल. विविध घटकांतील लोकांना स्वत:चा व्यवसाय सुरु करता येईल. हैद्राबाद व तेलंगणा राज्यासारखे धोरण या राज्यामध्ये नसल्यामुळे उद्योजकामध्ये मोठ्या प्रमाणावर निराशा आहे. ५ लाख कोटी रुपये म्हणजे ही छोटी बाब नाही. त्यामुळे लाखो बेरोजगारांना रोजगार निर्माण होणार आहे. ज्या शहरामध्ये अशा प्रकारचे मोठ-मोठे उद्योगधंदे येऊ घातले आहेत, त्या शहरामधील इन्फ्रास्ट्रक्चर वाढविणे निश्चितपणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अजित पवार यांना मी ९ वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. ऐरोली मार्गे काटई पूल येथे पारसिक डोगरामध्ये बोगदा तयार करुन एक ब्रीज निर्माण होत आहे. तशाच प्रकारे तुर्भे ब्रीजवरुन खारघरपर्यंत बोगदा करण्याची आवश्यकता आहे. असे केले तर आता त्या ठिकाणी होणारी वाहनाची कोंडी निश्चितपणे थांबू शकते. वाशी व ऐरोली ब्रीजवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. त्यामुळे अनेकांना दोन-दोन तास थांबावे लागत आहे. म्हणून महापे ते कन्नमवार नगर या मार्गावर एक नवीन ब्रीज करण्याची भूमिका मी मांडली होती. सदर मार्गाचा प्राथमिक सर्व्हे देखील करण्यात आलेला आहे. भविष्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे तेथे येणार असल्यामुळे त्या शहरामध्ये अशा प्रकारच्या पायाभूत सुविधा वाढविण्याची गरज आहे.

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

श्री.गणेश नाईक......

अध्यक्ष महोदय, ऐरोली-वाशी, वाशी-बेलापूर या मार्गावरील कोस्टल रोडच्या कामासाठी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. नवी मुंबई महानरपालिका विविध विकास कामे करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु सदर कामांना राज्य शासनाने निधी उपलब्ध करुन दिला नाही तर सदर कामे पूर्ण करणे शक्य होणार नाही. कारण नवी मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे येऊ घातलेले आहेत. त्यामुळे तेथील विकास कामांना राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. विविध ठिकाणी मोनोरेल व मेट्रोचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. ही निश्चितपणे चांगली गोष्ट आहे. नवी मुंबईमध्ये देखील मेनोरेल व मेट्रोचा प्रसार होणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्यासाठी राज्य शासनाकडून निधी देखील उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने बेलापूर येथे जल वाहतुकीची व्यवस्था केलेली आहे. तसेच यासाठी काही निधीची देखील तरतूद केलेली आहे. तरतूद केलेल्या निधीचे विनियोजन करणे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. सदर निधीचे रचनात्मक काम होणार नसेल तर ठरवलेले उद्दिष्ट देखील पूर्ण होऊ शकत नाही.

अध्यक्ष महोदय, नवी मुंबईमधील लोकांचे राहणीमान उंचावले आहे. त्यामुळे तेथील लोकांना खेळण्यासाठी तेथे क्रीडांगण करण्याची मी मागणी केली होती. नवी मुंबई हे विजेची कमीत कमी चोरी करणारे शहर आहे. सर्वच शहरातील लोक विजेची चोरी करतात, असे मी म्हणत नाही. परंतु नवीन मुंबईमधून महावितरणला अतिशय चांगला महसूल मिळत असताना देखील तेथे अतिशय निकृष्ठ दर्जाची उपकरणे दिली जात आहेत.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. गणेश नाईक.....

ज्या शहरांमधून उत्पन्न मिळते, जेथे चोऱ्या होत नाहीत, त्या शहरातील लोकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. यासाठी निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. नवी मुंबई शहराला मोठा ऐतिहासिक वारसा नाही. नवी मुंबईमध्ये पर्यटन क्षेत्र निर्माण करण्याकरिता डोलीदेव आणि सुलाई देवी या स्थळाचा विकास केला जावा. यासाठी मी निधीची मागणी केली आहे. तेथे रोपवे निर्माण करावा, अशी मी मागणी केली आहे. जगात, देशात आणि राज्यात कोरोनाने थैमान घातले होते. यात कोणी चुका केल्या, कोणी मेहनत घेतली यात मी जाणार नाही. या परिस्थितीत सर्वसामान्य माणसांना दिलासा देण्याची आवश्यकता आहे. शेतकरी, कामगार यांच्या आयुष्यात आर्थिक दुर्बलता आलेली आहे. यावर मात करण्यासाठी राज्य शासनाने त्यांना दिलासा दिला पाहिजे. नियोजन आणि अर्थ हे राज्याचे असले पाहिजे. आता बदलत्या काळानुसार आपणास बदल करावे लागणार आहेत. मी आपल्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. दरवर्षी नवी मुंबई महानगरपालिकेमधील शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या वाढत आहे. परंतु अन्य महानगरपालिकेमध्ये ही पटसंख्या कमी होत आहे. याचे कारण मी सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, आपण सर्वजण मराठी आहोत. त्याचा आपल्याला अभिमान आहे. मराठी भाषा सक्तीची झाली पाहिजे. महानगरपालिका, जिल्हा परिषद, खाजगी शाळांमध्ये मराठी हा विषय सक्तीचा असला पाहिजे. संस्था चालक कोणत्याही धर्माचे असले तरीही मराठी भाषा सक्तीची असली पाहिजे. तसेच आम्ही हिंदी भाषेला राष्ट्रभाषा मानतो. हिंदी हा विषयही सक्तीचा असला पाहिजे. परंतु जगाच्या शिक्षणाची आणि व्यापाराची भाषा ही इंग्रजी आहे. मराठी भाषा विषय, हिंदी भाषा विषय आणि उर्वरित विषय इंग्रजी माध्यमातून शिकविले तर गोरगरिबांच्या मुलांना जगाच्या पाठिवरचे ज्ञान आणि व्यापर करण्याचे सामर्थ मिळेल.

अध्यक्ष महोदय, शहरांमध्ये काही शिक्षण सम्राटांच्या मुठीत शाळा गेल्या आहेत. श्रीमंतांची मुले महागड्या शाळेत शिक्षण घेत असतात. गरिबांच्या मुलांना अशा शाळांमध्ये शिक्षण मिळत नाही. राज्य शासनाचे अनुदान मिळो अथवा न मिळो

असुधारित प्रत

श्री. गणेश नाईक.....

आम्ही नवी मुंबईतील प्रत्येक सेक्टर, वार्डमध्ये इंग्रजी माध्यमाची शाळा निर्माण करीत आहोत. तेथे गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणाचे द्वारे खुले करुन दिले जाणार आहे. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे सर्व सामान्यांना परवडत नाही. राज्य शासनाने याबाबतचे धोरण बदलण्याची गरज आहे. मी प्रॅक्टीकल बोलत आहे. आम्हाला मराठी, हिंदी भाषेचा अभिमान निश्चितपणे आहे. परंतु जगाचे शिक्षण घ्यावयाचे असेल, जगात व्यापार करावयाचा असेल तर गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळाले पाहिजे. तरच ते दर्जेदार आयुष्य जगू शकतील.

अध्यक्ष महोदय, एखादा न्युरो सर्जन किंवा हर्ट सर्जन एकेका दिवशी पाच-पाच लाख रुपयांची कमाई करीत असतो. महानगरपालिका किंवा जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये दर्जेदार सुपर स्पेशलिटी उपचार करणारे डॉक्टर, बेसिक डीए, अलाऊन्सेस आपण त्यांना देऊ शकत नाहीत. म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये आम्ही एक प्रयोग केला आहे. खाजगी रुग्णालयांनाही यात सहभागी करुन घेतले आहे. त्यातील काही भाग त्या रुग्णालयांना दिला आहे. आज नवी मुंबई शहरामध्ये दरवर्षी ८०० रुग्णांना शून्य पैशांनी न्युरो, हर्टचे उपचार दिले जातात. काही रुग्णांचे २० ते २५ लाख रुपयांचे बिल होते. परंतु त्यांच्याकडून एकही रुपया शुल्क आकारले जात नाही. मला वाटते की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून अशाच प्रकारे रुग्णालये बांधून तेथे अपोलो हॉस्पिटल, रिलायन्स हॉस्पीटल यांचा त्यामध्ये सहभाग वाढवावा व गरिबांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.गणेश नाईक.....

मी अहंकाराने नव्हे तर नम्रपणे सांगू इच्छितो की, मी सन २००० साली घोषणा केली होती की, नवी मुंबई महापालिका हद्दीमध्ये पुढील २० वर्षे घरपट्टी, पाणीपट्टी वाढविणार नाही. त्यानुसार अद्यापपर्यंत नवी मुंबई पालिकेने १ पैसाही घरपट्टी, पाणीपट्टी वाढविलेली नाही. असे असताना दुसऱ्या बाजूला वाहतूक, आरोग्य यांच्या दर्जेदार सेवा-सुविधा दिल्या आहेत. तसेच २४ X ७ पाणी पुरवठा केला जातो. माननीय श्री.अजित पवार, स्व.आर.आर. पाटील यांनी या कामी आम्हाला निश्चितपणे मदत केलेली आहे. परंतु ही मदत केवळ धरण घेण्यासाठी होती. त्यासाठीचे कर्ज नवी मुंबई महानगरपालिकेने स्वत: फेडले आहे. अन्य लोकांना देखील धरण घेण्याबाबत सांगितले होते परंतु कोणीही तयार झाले नाही. त्यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेचे केवळ ४० कोटी रुपये बजेट असतानाही ४०० कोटी रुपयांचे धरण घेण्यासाठी मी त्यांना बूस्ट केले होते.

अध्यक्ष महोदय, माझे म्हणणे आहे की, विरोधी पक्षाने टीका करणे आणि सत्ताधारी पक्षाने आपली बाजू मांडणे एवढयापुरतेच राजकारण नाही. अनेकांच्या बलिदानातून हा देश आणि राज्य निर्माण झालेले आहे. आपल्याला मिळालेल्या सुवर्णसंधीचा आपण पुरेपूर वापर केला नाही तर येणारी पिढी आपल्याला माफ करणार नाही. राजकीय भावनेतून मी हे बोलत नाही. नवी मुंबईच्या परिवहन सेवेला देशातील उत्कृष्ट परिवहन सेवेचे पारितोषिक मिळाले आहे. तसेच स्वच्छता, पाणी पुरवठा या सर्व बाबी वाखाणण्याजोग्या आहेत. माझे एवढेच म्हणणे आहे की, नवी मुंबई या शहराला आपण मॉडेल म्हणून पाहिले पाहिजे व राज्यातील इतर ठिकाणीही असेच काम केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाते परंतु तेवढा खर्च केला जात नाही. पूर्वी राजेशाही होती. परंतु आता सरपंच, नगराध्यक्ष, महापौर, मुख्यमंत्री, पंतप्रधान अशा विविध स्तरामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण झाले आहे. जनतेचे हित नजरेसमोर ठेऊन कारभार केला तर निश्चितपणे चांगला विकास होतो.

असुधारित प्रत

श्री.गणेश नाईक.....

अध्यक्ष महोदय, केवळ एकमेकांवर टीका करुन प्रश्न सुटणार नाहीत. आपल्या चुका झाल्या असतील तर कबूल केल्या पाहिजेत व झालेल्या चुकांमधून मार्ग काढला पाहिजे. कोळसा कितीही घासला तरीही तो पांढरा होत नाही तर काळाच राहतो. त्यामुळे कधी तरी एकांतात स्वत:शीच हितगुज साधले पाहिजे की, मी जे करतो ते बरोबर आहे का, मी जे उत्तर देतो ते बरोबर देतो का, मी जे प्रश्न विचारतो ते बरोबर आहेत का ? मी या निमित्ताने एकच सांगू इच्छितो की, जगाच्या पाठीवर सामर्थ्यवान कोणीही नसतो. प्रत्येकाची वेळ येत असते. त्या वेळेचा सदुपयोग केला आणि मिळालेल्या शक्तीचा चांगला वापर केला तर जगाच्या पाठीवर आपल्या आठवणी राहतात. ज्या लोकांनी मिळालेच्या शक्तीचा दुरुपयोग केला त्यांच्याविषयी कालांतराने निर्भर्त्सनेशिवाय काहीही राहत नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार म्हणतील की, नवी मुंबई हे शहर एवढे मजबूत आहे तर आपल्याला कशासाठी निधी हवा आहे ? परंतु नवी मुंबई या शहरातूनच राज्याच्या प्रगतीची द्वारे जातात. कारण गोवा महामार्ग, पुणे शहराला जोडणारे महामार्ग याच शहरातून जातात. दुसऱ्या राज्याला, शहराला जोडणारे रस्ते आहेत परंतु भविष्यात ते अपुरे पडणार आहेत. मी आज या निमित्ताने पुन्हा शब्द देतो की, पुढील २० वर्षे नवी मुंबई महानगरपालिका घरपट्टी, पाणीपट्टी वाढविणार नाही. कारण त्या शहराचे अर्थकारण मला चांगले माहिती आहे. सन १९९५ पासून २०२० पर्यंत गणेश नाईक सारख्या सर्वसामान्य व शेतकरी कुटुंबातून आलेल्या माणसावर तेथील जनतेने विश्वास टाकला होता. सुरुवातीचा महापौर झाला त्यावेळी शहराची लोकसंख्या ४.५ लाख एवढी होती. आता या शहराची लोकसंख्या १४.५ लाख एवढी झाली आहे. असे असतानाही जनतेने वर्षानुवर्षे तोच कौल दिला. जात, धर्म, पंथ या गोष्टी देवाने नव्हे तर आपण बनविलेल्या आहेत. जाती, धर्म, भाषा यांच्या अनुषंगाने वादविवाद घालून कलह निर्माण करण्यापेक्षा मानवतेच्या दृष्टीकोनातून पावले टाकली तर निश्चितपणे विकास होईल.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. गणेश नाईक....

तांत्रिकदृष्ट्या मी हारलो आणि तू जिंकला अशा फुकटच्या गप्पा करण्यापेक्षा जगाच्या पाठीवर मोठमोठे राजे रजवाडे होऊन गेले. ज्यांनी चांगले कर्तृत्व केले त्यांचे लोक नाव घेतात. जे दुष्टपणाने वागले, चुकीच्या मार्गाने वागले त्यांची निर्भत्सना होते. उपमुख्यमंत्री महोदय काल आपण सभागृहात नव्हतात.

श्री अजित पवार : (खाली बसून) काल मी आपले म्हणणे ऐकले.

श्री. गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, डाटा सेंटर च्या अनुषंगाने आपण गांभीर्याने निर्णय घ्यावा. पर्यावरण मंत्री महोदयांना विनंती की, आपण पर्यावरण विभागाच्या परवानग्या लवकर द्याव्यात. राज्य शासनाने याकरिता धोरण बनवावे. हे राज्य आपल्या सर्वांचे आहे. हे राज्य कुण्या एका माणसाचे नाही. कोणत्या धर्माचे नाही, जातीचे नाही, वर्णाचे नाही, पंथाचे नाही. जो या देशावर प्रेम करेल त्याचा हा देश आहे. म्हणून माझे एवढेच म्हणणे आहे की, भविष्यात राज्याच्या, देशाच्या प्रगतीकरिता माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी जे संकल्प सोडले आहेत... त्यांच्या पुढच्या कालखंडामध्ये त्यांनी निर्माण केलेल्या मार्गातून देशाची प्रगती, देशाचे सामर्थ्य कसे निर्माण होईल, हे आपण निश्चितपणे बघावे. जयहिंद, जय महाराष्ट्र !

----------

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी थोडक्यात बोलावे.

श्री. भास्कर जाधव : मला थोडक्यात का ?

**उपाध्यक्ष :** मी सर्वच सनमाननीय सदस्यांना सांगणार आहे. कारण आपल्याकडे ३ तासांचा वेळ आहे आणि बरेच सन्माननीय सदस्य बोलायचे आहेत.

**श्री. भास्कर जाधव :** असं असेल तर मी बोलणार नाही. मी खाली बसतो.

**उपाध्यक्ष :** आपण बोलायचे. पण थोडक्यात बोलावे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, आपण निम्मा निम्मा वेळ ठरवून दिलेला आहे. विरोधी पक्षाचा वेळ संपला की नाही ते जरा तपासावे.

**उपाध्यक्ष :** तोपर्यंत आपण भाषणास सुरूवात करावी.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मी बोलायला लागलो की आपण मला लगेच थांबवाल. आमच्याकडील मी दुसरा वक्ता आहे. उभे राहण्यापूर्वीच आपण आम्हाला डिमॉरलाईज करुन टाकता.

**उपाध्यक्ष :** आता आपण भाषणाला सुरूवात करावी.

असुधारित प्रत

श्री. भास्कर जाधव (गुहागर) अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०२० ते आजतागायत कोरोनासारख्या महामारीने संपूर्ण जगाला, देशाला आणि राज्याला जखडून ठेवले होते. जवळपास २०२०-२१ या वर्षात आपण एकमेकांना भेटत नव्हतो. एकमेकांशी बोलायचे झाले तर अंतर ठेऊन बोलत होतो. एकमेकांना हात मिळविताना आजतागायत आपण विचार करीत होतो. इतके अंतर या कोरोनाने तुमच्या आणि आमच्यामध्ये निर्माण केले होते. या पार्श्वभूमीवर यावेळचा अर्थसंकल्प राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री यांनी महाविकास आघाडी सरकारचा अर्थसंकल्प म्हणून आज महाराष्ट्रासमोर या सभागृहाच्या माध्यमातून सादर केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, कोरोनासारखी महामारी असताना राज्यपालांच्या भाषणामध्ये आपण पाहिले तर त्यांनी असे सांगितले की, १८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत केंद्र सरकारकडून २९९८२ कोटी रुपये महाराष्ट्राचे जीएसटीचे येणे असताना आजचा अर्थसंकल्प राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्र्यांनी कोणत्याही प्रकारचा टॅक्स न वाढविता महाराष्ट्राच्या जनतेला सादर केला आहे. यामधून टॅक्स तर वाढविला नाहीच. पण किती तरी हजारो कोटी रुपयांची सूट दिली. ती आकडेवारी सर्वांच्या समोर आली आहे. ती आकडेवारी सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. म्हणून मला असे वाटते की संपूर्ण देशातील सर्व राज्यात अशा संकट काळामध्ये एकही पैसाचा... म्हणजे आता युक्रेन आणि रशियाचे युध्द सुरू झालेले आहे आणि अशा वेळी तेलाचे दर महाग होतील. त्यामुळे महागाई मोठ्या प्रमाणाात वाढणार आहे. अशा पार्श्वभूमीवर सुध्दा एकही रुपया किंवा एकही टक्का टॅक्स न वाढविता किंबहूना हजारो कोटी रुपयांची सूट देण्याचा अर्थसंकल्प जनतेसाठी सादर केला. मला असे वाटते की, देशामधील हे एकमेव राज्य असेल की ज्याने अशा प्रकारचा अर्थसंकल्प सादर केला.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. कुणाल पाटील)**

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. भास्कर जाधव....

मला वाटते की, देशातील हे एकमेव राज्य असेल की, ज्यांनी अशा प्रकारचा अर्थसंकल्प सादर केला आहे. ४ लाख ३ हजार ७२७ कोटी रुपयांच्या महसुलाचा जमा होणारा अंदाज अशा प्रकारचा हा अर्थसंकल्प आहे. ४ लाख २७ हजार ४८० कोटी रुपये खर्च होतील. त्यामुळे २३ ते २४ हजार रुपयांची कदाचित तूट येऊ शकते. हा अर्थसंकल्प मांडत असताना सन २०२१-२२ चा अर्थसंकल्प आणि राज्याची आर्थिक परिस्थिती बघितली तर जवळपास ११ टक्क्यांनी अधिकची महसुली जमा होऊ शकते. २ लाख ८३ हजार ६५४ कोटी रुपये म्हणजेच एकूण महसुलाच्या ७० टक्के रक्कम ही राज्य स्वत:च्या उत्पन्नातून उभी करणार आहे. १ लाख १९ हजार ७७३ कोटी रुपये म्हणजे १३ टक्के रक्कम केंद्र शासनाच्या विविध योजनांतून महसुली जमा होणार आहे आणि आपल्या राज्यात जे विविध प्रकारचे महसूल जमा होतात त्यातून १७ टक्के रक्कम मिळणार आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याकडे जर १ रुपया यायचा असेल तर तो कोणकोणत्या मार्गाने येतो हे मी सांगतो. १ रुपयांपैकी २७ पैसे ही आपली भांडवली जमा, केंद्रीय कराचा हिस्सा ९ पैसे, केंद्रीय सरकारकडून सहाय्यक म्हणून मिळणारी अनुदाने १२ पैसे, राज्याच्या स्वत:च्या उत्पन्नाच्या व्यतिरिक्त अन्य मार्गाने जो महसूल मिळतो तो ५ पैसे आणि राज्याचा स्वत:चा महसूल.... काल माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, राज्याचा महसूल जमा होण्याची टक्केवारी फक्त ३५ टक्के आहे. तर ही वस्तुस्थिती नाही. राज्याचा स्वत:चा महसूल हा ४७ टक्के आहे. जसा रुपया येतो तसाच जातो कसा याचा विचार केला तर आपल्या राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना ४ पैसे, वेगवेगळे सामाजिक घटक, अन्य कोणत्या संस्था असतील तर त्यांना राज्याच्या एकूण महसूलाच्या ५ टक्के म्हणजे ५ पैसे मदत करतो. आज आपल्या राज्यावर असणारे कर्ज फेडण्यासाठी या १०० पैशातील १० पैसे द्यावे लागतात. त्यावरील व्याजाची रक्कम देण्यासाठी ९ पैसे द्यावे लागतात. तसेच आपल्या राज्यात सन २००५ पूर्वी जी जूनी पेन्शन योजना होती त्यासाठी राज्यातील एकूण जमा होणाऱ्या महसुलाच्या १० पैसे द्यावे लागतात.

असुधारित प्रत

श्री. भास्कर जाधव....

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये जे ११ लाख कर्मचारी आहेत त्यातील जवळपास २ लाख पदे भरायची आहेत. पण आपल्याकडे जे १०० पैसे किंवा १ रुपया जमा होतो त्यातील २४ पैसे हे जुनी पेन्शन योजना सोडून राज्याच्या महसूलाच्या २५ टक्के रक्कम निव्वळ वेतनावर खर्च करावी लागते. महसूली खर्चाच्या योजनांसाठी फक्त २६ पैसे शिल्लक राहतात आणि भांडवली खर्चासाठी १२ पैसे खर्च करावे लागतात. अशा पद्धतीने १ रुपया येतो आणि १ रुपया जातो, ही खऱ्या अर्थाने आपल्या अर्थसंकल्पाची रचना आहे. ही रचना होत असताना राज्याच्या माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितले की, " आमचा अर्थसंकल्प हा पंचसुत्री आहे." त्याला उत्तर देताना राज्याचे माननीय विरोध पक्ष नेते यांनी त्याची अशी संभावना केली, अशा पद्धतीने टिंगळटवाळी केली की, हा अर्थसंकल्प पंचसुत्री नसून कळसुत्री आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी जी पंचसुत्री मांडली त्यातील एक सूत्र कृषी, दुसरे सूत्र आरोग्य, तिसरे सूत्र उद्योग आणि चौथे सूत्र हे दळणवळण आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. भास्कर जाधव ....

राज्यातील जनतेचे आरोग्य, शेतकरी, दळणवळण ही सर्व कळसुत्री आहे. खऱ्या अर्थाने यांना कळ जाण्याचे कारण एकच आहे. माननीय वित्त मंत्री यांनी या अर्थसंकल्पात असे सांगितले की, महाराष्ट्राची अस्मिता व स्फुर्तीस्थान संभाजी महाराज यांच्या स्मृतीदिनी हा अर्थसंकल्प आम्ही मांडत आहोत. महाविकास आघाडी शासना कडून संभाजी राजे यांचे स्मारक उभारण्याकरिता २५० कोटी रुपयांची तरतूद जाहीर केली जात आहे, असे माननीय वित्त मंत्री यांनी जाहीर केले.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी माझी वित्त मंत्री यांना विनंती आहे. आज सदनामध्ये सकाळी काही विशिष्ट सिनेमावरील कर माफ करावा अशी मागणी केली गेली. आम्ही लहानपणापासून छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास वाचत आहोत. मात्र आमच्यासमोर चुकीच्या पद्धतीने, वाईट पद्धतीने हा इतिहास मांडला गेला. संभाजी राजे यांना खलनायक ठरवून, अनेक दूषणे देऊन विकृत इतिहास लिहला गेला. त्यांनी आपल्या आयुष्यात जे केले नाही त्याचाही समावेश करुन इतिहास लिहिला गेला. अनाजी पंत, मोरोजी पंत, राहुजी पंत, प्रल्हाद पंत,बाळाजी पंत,जनार्दनपंत, दत्तोजी पंत, सोमाजी पंत असे पंत तेव्हा होते. ते पंत आजही येथे आहेत. म्हणून यांना सर्व विकृत दिसत आहेत. हे पंत आजही राज्यात आहेत, देशात आहेत. म्हणून महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती, संस्कार, विकृत करण्याचे काम सुरु आहे. पूर्वीचे आजही या राज्यात सुरु आहे. संभाजी महाराज यांना त्या काळात १३ भाषा येत होत्या. त्यांनी आपल्या आयुष्यात एकच पत्नी केली, ज्यांनी ९ वर्षाच्या कारकीर्दीमध्ये एकही किल्ला मोगलांच्या ताब्यात दिलेला नाही. छत्रपती संभाजी महाराज यांनी स्वराज्याकरिता, स्वधर्माकरिता आपल्या आयुष्याची राखरांगोळी, होळी केली. त्याचा विकृत इतिहास लिहिण्याचे काम काहींनी केले आहे. त्यांना वाटत होते की, आम्हालाच लिहिण्याचा, वाचण्याचा अधिकार आहे. त्यांनी संभाजी महाराजांचा विकृत इतिहास लिहिला होता. माननीय खासदार श्री.अमोल कोल्हे यांना

श्री. भास्कर जाधव ....

धन्यवाद दिले पाहिजे. त्यांनी स्वराज्य रक्षक संभाजी ही मालिका तयार करुन त्यात काम केले. कोणत्याही चित्रपटाला करात सवलत द्या किंवा देऊ नका मात्र संभाजी महाराज यांची ही मालिका सह्याद्री सारख्या सरकारी वाहिनीवर पुन्हा पुन्हा स्वखर्चाने शासनाने दाखवली पाहिजे. संभाजी महाराजांना अनाजी पंत, राहुजी पंत, मोरोजी पंत यांनी कशा पद्धतीने छळले, परकीयांना हाताशी धरून आपल्या मराठी राजाचा छळ कशा प्रकारे मांडला हे त्यात दाखवले आहे. जे पूर्वी सुरु होते ते आता देखील सुरु आहे. या महाराष्ट्राला, मराठी माणसाला छळण्याचे काम आजही संपलेले नाही. स्वराज्य रक्षक संभाजी मालिका सह्याद्री वाहिनीवर मोफत पुन्हा पुन्हा दाखवू असे आपण जाहीर करावे.

अध्यक्ष महोदय, काल माननीय विरोधी पक्ष नेते हे भाषण करीत असताना त्यांचा प्रत्येक मुद्दा मी लिहून घेत होतो. त्यांनी सांगितले की, कोव्हिड सेंटर बांधण्यासाठी ज्या कंपन्यांना काम दिले त्यांना कोणताही अनुभव नव्हता. त्यांनी प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार केला. मी विचारु इच्छितो की, राफेल खरेदीचे कंत्राट श्री.अनिल अंबानी यांना दिले. देशाच्या संरक्षणाशी ज्यांनी खेळ केला, त्यांना संरक्षणाची कोणतीही माहिती नव्हती. तरी देखील त्यांच्या कंपनीला राफेल खरेदीचे कंत्राट दिले. तेव्हा त्यांना कोणता अनुभव होता ?

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव ....

एका कोविड सेंटरबद्दल जर तुम्हाला एवढी काळजी होती तर, देशाच्या संरक्षणाबद्दल तुमचे मत काय आहे, या अनुभव नसलेल्या माणसाला, अंबानी सारख्या माणसाला राफेल सारख्या विमानाची खरेदी करण्याची तुम्ही परवानगी दिली, त्याबद्दल तुमचे काय म्हणणे आहे, हे मला त्यांनी सांगितले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, त्यांनी सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले ... (अडथळा).. जाईन. तेवढे शिल्लक राहिले आहे. जाऊन येतो एकदा दिल्लीला.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कुणाल पाटील):** सन्माननीय सदस्यांनी बसून बोलू नये.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये कमीत कमी केसेस झाल्या म्हणून आकडेवारी सांगितली. खरी गोष्ट आहे. त्या कमी झाल्या असतील त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. याचे कारण म्हणजे सन २०२० पासून कोरोनाची साथ आली. त्यावेळेस आपण पाहिले असेल की, एकेकाळी प्रत्येक गोष्टीकरिता डॉक्टर अनेक प्रकारच्या टेस्ट करायला सांगायचे. वेगवेगळी ऑपरेशन्स करायला सांगायचे. वेगवेगळ्या स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हायला सांगायचे. परंतु, गेली दीड-पावणेदोन वर्षे आपले फॅमिली डॉक्टर देखील काही करत नव्हते. 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' ही योजना मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर करेपर्यंत ते लोक काही करीत नव्हते.

अध्यक्ष महोदय, त्यावेळेस लोक हॉस्पिटलमध्ये जास्त दाखल होत नव्हते. दम्याचे रुग्ण, कॅन्सरचे रुग्ण, किडनी आजाराचे रुग्ण, डायलिसीसचे रुग्ण त्यावेळेस हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात दाखल होत नव्हते. त्यामुळे कदाचित त्यावेळेस रुग्ण दाखल होण्याची संख्या कमी असेल. त्यांनी असे सांगितले की, महाराष्ट्रामध्ये जे मृत झालेले लोक आहेत, त्यांना सरकार ५०-५० हजार रुपये देते. त्याचे क्लेम देशातील सर्व राज्यात महाराष्ट्रात जास्त आहेत. होय. असतील सुध्दा.

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव....

अध्यक्ष महोदय, ती आकडेवारी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात देखील माझ्या सरकारने लपविलेली नाही. ती आकडेवारी आमच्या अर्थसंकल्पामध्येसुध्दा माझ्या सरकारने लपविलेली नाही. परंतु, कोणी कितीही लपविले तरी गंगेमध्ये हजारो मृतदेह तरंगताना या देशाने पाहिले आहे. तसे माझ्या महाराष्ट्रामध्ये घडलेले नाही. गुजरातमधील, मध्य प्रदेशमधील, उत्तर प्रदेश मधील लपविलेली आकडेवारी देशासमोर आली, जगासमोर आली. परंतु, माझ्या महाराष्ट्राने मात्र खरीखरी आकडेवारी सांगितली. त्यामुळे खऱ्या अर्थाने पोटदुखी काय असेल तर WHO सारखी जागतिक आरोग्य संघटना असेल, माननीय सर्वोच्च न्यायालय असेल किंवा केंद्र सरकार असेल किंवा माननीय उच्च न्यायालय असेल या सर्वांनी मिळून सांगितले की, पूर्ण देशामध्ये कोरोनावर सर्वात चांगला जर उपचार कोठे झाला असेल तर तो माझ्या महाराष्ट्रामध्ये झाला, हे मला सांगितले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, असे सांगितले गेले की, कोविडचे एवढे-एवढे डोस दिले. तुम्ही काय केले तर, एक इंजेक्शनही तयार करीत नाही. परंतु, परवानगी कोण देत होते? एवढेच कशाला बिहारच्या निवडणुका असताना आपल्या देशातील नागरिकांना डोसेस पुरविण्याऐवजी गल्फ कंट्रीमध्ये मोफत डोसेस देण्याचे काम कोणी केले? त्याचवेळेस माझा महाराष्ट्र, माझ्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व महाविकास आघाडी सरकारने सांगितले होते की, आम्हाला एकही डोस फुकट देऊ नका. आम्ही साडेबारा कोटी डोस आमच्या महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीतून घेणार आहोत. परंतु, आम्हाला आमच्या लोकांना वाचवायचे आहे, हे सांगण्याचे काम माझ्या महाराष्ट्र सरकारने केले, हे तुम्हाला विसरुन चालणार नाही.

अध्यक्ष महोदय, त्यावेळेस असे सांगितले होते की, आज हे सरकार आहे ...(अडथळा)... माझे रेटणे परवडायचे नाही.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी बसून बोलू नये.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षातील माझे सर्वच मित्र या सरकारचे वर्णन करताना सारखे सांगत असतात की, सर्व आमच्याच योजना सुरु

श्री.भास्कर जाधव ...

आहेत. फक्त नावे बदलली गेली आहेत. मी केंद्र सरकार मधील एक-एक योजना वाचू काय? मी केंद्र सरकारच्या एक-एक योजना वाचतो. अध्यक्ष महोदय, वेळ कमी असल्याने आपण सारखे घड्याळाकडे पाहत आहात. त्यामुळे मला माझा मुद्दा डेव्हलप करता येत नाही. माझी अडचण होत आहे. सर्व काँग्रेस सरकारमधल्या, डॉ.मनमोहन सिंह यांच्या कारकीर्दितील सर्व योजना आजही सुरु आहेत. फक्त नावे लावली, तुम्ही बारशी केलीत, तसे तर महाराष्ट्र सरकारने काही केलेले नाही. सातत्याने दारु सरकार, दारु सरकार....

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव...

वाईन विक्री करायला लावणारे हे सरकार आहे. लोकांना नादी लावणारे, दारुडे बनविणारे हे सरकार आहे, असे विरोधी पक्षाकडून सांगण्यात येते. परंतु विरोधी पक्ष मध्य प्रदेशच्या संदर्भात काही बोलत नाही. मॉलमधील वाईन विक्रीचा निर्णय सरकारने मागे घेतला की नाही, याबाबत मला माहिती नाही. पण मध्य प्रदेश सरकारने घराघरामध्ये दारुचा बार सुरु करण्यास परवानगी दिली आहे. ज्यांचे उत्पन्न १ कोटी रुपये आहे त्यांना त्यांच्या घरामध्ये दारुचा बार सुरु करण्यास मध्य प्रदेश सरकारने परवानगी दिली आहे. या राज्यात केवळ मोठ्या मॉलमध्ये वाईन विक्री करण्याचा विचार मांडला गेला आहे.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य काही वेळापूर्वी म्हणत होते की, "जुन्या बाटलीत नवी दारु म्हणा किंवा नव्या बाटलीमध्ये जुनी दारु म्हणा." याचा अर्थ त्यांना एक कबूल करावे लागेल की, आपण बाटली तरी आहात किंवा दारु तरी आहात. आपण जुनी बाटली म्हटले तर आपण बाटली आहात व जुनी दारु म्हटले तर जुनी दारु आहात. हे त्यांनी विसरु नये. आपण यामध्ये जोडले गेले आहात. हे कळत न कळत आपण कबूल करता, हे मला सांगितले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये राज्यातील उद्योगांच्या संदर्भात विचारणा करण्यात आली. केंद्र सरकारच्या रोज नवीन तयार केलेल्या स्टार्ट अप इंडिया, सिट डाऊन इंडिया, स्टँड अप इंडिया, मेक इन इंडिया, रनिंग इंडिया, गो इंडिया यांचे काय झाले, याचे उत्तर या राज्याला व देशाला विरोधी पक्षाने द्यावे.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने सांगितले की, आपण आमच्या ज्या योजनांना विरोध केला होता, आता त्याच योजना चालवित आहात. मागील काळात आधार कार्ड, ईव्हीएम, एमआरईजीएस या योजनांना कोणी विरोध केला होता ? हे संपूर्ण राज्य पाहत आहे. काल ९६ मिनिटे विरोधी पक्षाने भाषणे केली व अनेक मुद्दे उपस्थित केले. सत्ताधाऱ्यांपैकी कोणीही काही हालचाल केली नाही, सहन करण्याची तयारी

श्री.भास्कर जाधव...

दाखविली. आता सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार ४४ मिनिटे बोलले आहेत. परंतु विरोधी पक्षाचे म्हणणे खोटे असल्याने आम्ही मनावर घेतले नाही. मी खरे बोलतो म्हणून विरोधी पक्षाच्या मनाला लागले.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने सांगितले की, आपण आमच्या योजनांना विरोध केला होता. आताच्या केंद्र सरकारने मागील वेळी आधार कार्ड, ईव्हीएम मशीन, जीएसटी, एमआरईजीएस, एफडीआय, रोजगार हमी योजना यांना विरोध केला होता की नाही ? आता केंद्र सरकार त्याच योजना घेऊन मिरवत आहे. आता विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षाला प्रश्न विचारत आहे. "आपले ठेवायचे झाकून आणि दुसऱ्याचे बघायचे वाकून". हे सर्व कशासाठी सुरु आहे ?

अध्यक्ष महोदय, निसर्ग चक्री वादळाने नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना या सरकारने काही दिले नाही, असे विरोधी पक्ष सांगत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार माझे मित्र आहेत. आम्ही सभागृहामध्ये मुद्यांसाठी भांडतो. सभागृहामध्ये व्यक्तीगत वाईटपणा ठेवत नाही आणि ठेवणार नाही, यासंदर्भात मी अनेक सन्माननीय सदस्य यांना सांगत असतो. सन्माननीय सदस्य श्री.अभिमन्यू पवार यांना मी सांगितले की आपण सभागृहात भांडले पाहिजे, सभागृहाबाहेर भांडू नये.

अध्यक्ष महोदय, निसर्ग चक्री वादळ, तोक्ते वादळ राज्यात आले होते. दिनांक २२ व २३ जुलै रोजी महापूर आला होता. त्या सर्व ठिकाणी दोन्ही सभागृहाचे माननीय विरोधी पक्ष नेते भेट देण्यासाठी गेले होते, त्यांनी तेथे भाषणे केली, फोटो काढले, रडण्याची नाटके केली. परंतु त्यांनी केंद्र शासनाकडून त्या नुकसानग्रस्तांसाठी १ रुपया मदत आणली नाही. तोक्ते वादळाने अनेकांचे नुकसान झाले. निसर्ग चक्री वादळाने संपूर्ण कोकण उद्ध्वस्त झाले. दापोली, मंडनगड, गुहागर तालुक्यात जाऊन विरोधी पक्षाने भाषणे केली. आता तेथील नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना केंद्र शासनाने १ रुपया मदत दिल्याचे विरोधी पक्षाने सांगावे. त्यांनी एक रुपया मदत केंद्र शासनाकडून आणली नाही. परंतु माझ्या राज्य सरकारने ६,९५० कोटी रुपये नुकसानग्रस्तांना मदत दिली. त्याबद्दल मला या सरकारचा अभिमान आहे.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)**

श्री.भास्कर जाधव...

अध्यक्ष महोदय, माझ्या काही सूचना आहेत. त्या मी नंतर वेगळया वेळेत मांडणार आहे. मी गप्प बसणारा नाही. मी सरकारची भलावण करणारा माणूस नाही.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** खाली बसून बोललेल्या सन्माननीय सदस्यांकडे आपण लक्ष देऊ नये. आपण माझ्याकडे पाहून भाषण करावे.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये खेळीमेळीचे वातावरण निर्माण होत आहे. तेवढीच मला ते संधी देत आहेत. ती संधी आपण का हिरावून घेत आहात? केरळ आणि तालिळनाडू हे प्रकरण आपल्या लक्षात आले असेल. शेवटी लोकसभा अध्यक्ष माननीय श्री. ओमप्रकाश बिर्ला यांना सांगावे लागले की, "यह ऐसा है, वह वैसा है. तर ते म्हणाले की, "ऐसा है क्या?"

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या नावाने सुरु केलेली योजना अद्याप का कार्यान्वित करण्यात आली नाही, असा प्रश्न विचारण्यात आला. संकटाच्या काळामध्ये राजकारण करायचे नाही, हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. संकटाच्या काळामध्ये, राज्य कोणाचे, पक्ष कोणता हे न पाहता महाराष्ट्रातील जनता महत्त्वाची म्हणून सर्वांनी एकत्र येऊन मदत केल्याचे अनेक उदाहरणे आहेत. या सभागृहातील अशा प्रकारची शेकडो उदाहरणे मी देऊ शकतो. पूर्वीच्या काळी सत्ताधारी कोण आणि विरोधी कोण हे न पाहता ऐकमेकांनी हातात हात घालून या महाराष्ट्राला संकटातून बाहेर काढण्याचे काम केलेले आहे. परंतु मागील कोरोनाच्या काळामध्ये एका नेत्याची सकाळी ९.०० वाजत पत्रकारपरिषद होत होती, दुसऱ्या नेत्याची सकाळी ११.०० वाजता, तिसऱ्या नेत्याची दुपारी १.०० वाजता, चौथ्या नेत्याची दुपारी ३.०० वाजता पत्रकारपरिषद होत होती. या सर्व पत्रकारपरिषदमध्ये आता सरकार पडणार आहे, एका तासाने सरकार पडणार आहे, सरकार पाडण्याच्या अनेक तारखा देण्यात आल्या होत्या. दररोज नवनवीन तारखा दिल्या जात होत्या. परंतु या नेत्यांनी एकाही पत्रकारपरिषदमध्ये असे म्हटले नाही की, सरकार कोणाचे आहे हे महत्त्वाचे नाही. आम्ही दोघे मिळून आमचा अनुभव आणि सरकारची ताकद एक करुन महाराष्ट्रातील जनतेचे प्राण वाचवू.

अध्यक्ष महोदय, मला माझ्या सरकारला देखील सांगायचे आहे की, विरोधी पक्षातील नेते छोट्या छोट्या गोष्टीला राष्ट्रपती राजवट लावण्याबाबतचे भाष्य करीत आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र

श्री.भास्कर जाधव........

आहे, हा छत्रपती संभाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे, हा सावरकरांचा महाराष्ट्र आहे, हा टिळकांचा महाराष्ट्र आहे, हा भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचा महाराष्ट्र आहे. त्यामुळे हा महाराष्ट्र कोणासमोरही झुकणार नाही. दिल्लीपुढे तर कधीही झुकणार नाही. मी सत्ताधारी पक्षातील तिन्ही पक्षांना आवाहन करतो चला आपण महाराष्ट्रामध्ये जाऊ, महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनतेला सात घालू. तटकरी मराठी माणसाला आवाहन करु. संकटामध्ये राजकारण करुन सत्तेसाठी हाफाफलेल्या बोक्यांना जागच्या जागी थांबविण्याचे काम या राज्यातील जनतेला करायला लावू. या महाराष्ट्राच्या स्वाभिमानापुढे व छत्रपतीच्या स्वाभिमानापुढे या देशाला झुकायला लावू.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता यांनी सांगितले की, या राज्यामध्ये कोणताही प्रकल्प उभारीत असताना राज्यातील जनतेला चालू रेडी रेकनर दराच्या चारपट मोबदला देत होतो. परंतु आता आपण चारपट ऐवजी दोनपट मोबदला देण्याबाबतचा निर्णय घेतल्यामुळे आपणास कोण जमीन देणार आहे? मी त्यांना विचारु इच्छितो की, हा कायदा आपण पारित केला होता काय? हा कायदा माननीय पवार साहेबांनी सन २०१३ मध्ये पारित केलेला आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

श्री. भास्कर जाधव .....

माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या पुणे, सातारा, कराड येथील सभांमधील भाषण विरोधकांनी ऐकवे. त्यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, महाराष्ट्रातील जमिनीचा मोबदला चार पटापेक्षा कमी केला नाही, तर राज्यात प्रकल्प होणार नाहीत. हे त्यांनीच सांगितले आहे. त्यामुळेच दोन पटीने मोबदला देण्यात येत आहे. ही बाब विरोधी पक्षांनी लपवून ठेवू नये. विरोधी पक्ष केवळ राज्य सरकारला दोष देत आहे.

अध्यक्ष महोदय, औरंगाबाद शहराचे नाव संभाजीनगर कधी करण्यात येणार आहे, असा प्रश्न वारंवार विचारला जात आहे. मी सांगू इच्छितो की, हे नामांतर हे राज्य सरकार करणारच. राज्य सरकारला हे नामांतर करावेच लागेल. परंतु हा प्रश्न विचारण्याचा अधिकार विरोधी पक्षाला नाही. ज्या शिवसेना पक्षासोबत मागील पाच वर्षे सत्ता उपभोगली, मुख्यमंत्रीही आपल्या पक्षाचे होते, दिल्लीमध्येही आपली सत्ता होती. तेव्हा संभाजी महाराजांबद्दलचे प्रेम का दाखविले नाही ? आजच हे प्रेम आलेले आहे काय ? अशा प्रकारे विरोधकांकडून या सरकारमध्ये भेदाभेद, दरी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु विरोधकांचा हा ढोंगीपणा राज्यातील जनता ओळखून आहे. आम्हीही तो ओळखतो. २५ ते ३० वर्षे राजकारणामध्ये काम केलेले आम्ही आणि २५ वर्षे तुमच्यासोबत राहिलेले शिवसेना पक्ष आहे. पहिल्या लोकांना सत्तेचा अनुभव आणि दुसऱ्या लोकांना आपला अनुभव आहे. त्यामुळे हे मिश्रण अतिशय मजबूत झाले आहे.

अध्यक्ष महोदय, विरोधकांनी माननीय राज्यपालांना भाषण वाचू दिले नाही. त्यावेळचे त्यांनी भाषण वाचले नाही, म्हणजे विरोधकांचे झाकलेले कोंबडे उजाडणार नाही काय ? राज्य सरकारने कोरोना संकटाच्या कार्यकाळात राज्याचा महसूल वाढविला. विधवा महिलांपासून माजी सैनिकांपर्यंत अशा सर्व सामान्यांना मदत करण्याचे काम या सरकारने केले आहे. माझ्याकडे बोलण्यासाठी आणखी मुद्दे आहेत. परंतु वेळेअभावी मला ते मांडता येणार नाहीत.

श्री. भास्कर जाधव .....

अध्यक्ष महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने मी राज्य सरकारचे जाहीर अभिनंदन करतो. देशातील सर्वोत्कृष्ट अर्थसंकल्प माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी मांडला आहे. याबाबत मी त्यांचेही आभार मानतो आणि मी या अर्थसंकल्पाला पाठिंबा देतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

धन्यवाद !

--------

असुधारित प्रत

श्री. हरिभाऊ बागडे (फुलंब्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२- २३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पाच्या सुरुवातीलाच राज्याच्या विकासाकरिता पंचसुत्री माननीय अर्थमंत्री महोदयांनी मांडली आहे. त्यामध्ये कृषि विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, मनुष्यबळ विकास आणि दळणवळण, उद्योग विभागाचा समावेश आहे. या सर्वांवरच मी बोलणार नाही. मी प्रामुख्याने कृषि विभागावर माझे विचार व्यक्त करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, राज्यात अजुनही ६० ते ६५ टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. शेतीला पाणी आणि वीज उपलब्ध झाली तर शेतकऱ्यांना त्यांचे उत्पन्न वाढविण्यास हातभार लागतो. मागील दोन ते तीन वर्षात जलयुक्त शिवाराचे काम झाले आहे. त्यामुळे विहिरींची पाणी पातळी वाढली आहे. परंतु राज्यातील ग्रामीण भागात आजही विजेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आज सकाळी या विषयार वादंग झाल्याचे आपण सर्वांनी पाहिले आहे. शेतकऱ्यांना वीज आणि पाणी मिळाले पाहिजे. ओढा, नाल्याचे खोलीकरण झाले पाहिजे. या खोलीकरणामुळे वाहणारे पाणी थांबते, थांबलेले पाणी जिरते आणि जिरलेले पाणी विहिरीत येते आणि त्या विहिरीतून पिकाला पाणी देता येते. म्हणून ओढा आणि नाल्यांचे खोलीकरण झाले पाहिजे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.हरिभाऊ बागडे.....

अध्यक्ष महोदय, शेतीमाल विक्रीसाठी बाजार समित्यांची योजना माननीय अर्थमंत्र्यांनी मांडली. राज्यामध्ये ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. त्यांच्यासाठी १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असून या रकमेच्या व्याजाची परतफेड देखील सरकार करणार आहे. ही चांगली योजना आणल्याबद्दल मी सरकारचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, ज्या बाजार समितीने स्वत:च्या पायावर उभे राहून विकास केला, साठ-सत्तर लाख रुपये, कोटी रुपये खर्च करुन पाच वर्षांमध्ये चित्र पालटले त्या औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळास हेतुपुरस्सर मुदतवाढ देण्यात आली नाही. केवळ राजकीय हेतूने असे करण्यात आले. मागील दोन-तीन वर्षांच्या काळामध्ये मोठे रस्ते तयार करण्यात आले आहेत, दुकाने बांधण्यात आली आहेत. केवळ दुकानांच्या भाडयातून बाजार समितीचा वर्षभराचा संपूर्ण खर्च निघू शकतो, अशी व्यवस्था केली आहे. शेतकरी व व्यापाऱ्यांकडून एक रुपयाही घेण्याची गरज नाही. कर न आकारता स्वत:च्या उत्पन्नातून ही बाजार समिती स्वत:चा खर्च भागवू शकते. परंतु या बाजार समितीवर प्रशासक मंडळ नेमण्यात आले आहे. तीन पक्षांचे सदस्य त्यामध्ये आहेत. मी देखील चार पक्षाच्या लोकांना एकत्रित घेऊन दुध उत्पादक संघ चालवित आहे. सर्वजण एकत्रित येऊन काम करीत असतील तर चांगले आहे. परंतु नव्या संचालक मंडळाने बाजार समितीची एक जागा पणन संचालकांच्या परवानगीशिवाय विकली. पणन संचालकांनी सांगितले होते की, ही जागा न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांना सांगून विकावी. परंतु तसे करण्यात आले नाही. पोस्ट डेटेड चेक घेऊन सरकारी, बाजार समितीची जागा विकण्यात आली. याबाबत माननीय महसूल राज्यमंत्री यांच्याकडे तक्रार करण्यात आली. माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र दिले की, सदर बाजार समितीमध्ये ५० कोटी रुपये भ्रष्टाचार झाला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारी व भूमी अभिलेख विभागातील अधिकाऱ्यांची समिती गठीत केली.

श्री.हरिभाऊ बागडे.....

परंतु या प्रकरणाला माननीय कॅबिनेट मंत्र्यांनी स्टे दिला. माननीय राज्यमंत्र्यांनी चौकशी करण्याचे आदेश दिल्यावरुन जिल्हाधिकाऱ्यांनी समिती नेमली परंतु माननीय कॅबिनेट मंत्र्यांनी मात्र स्टे दिला, म्हणजे एका बाजूला सरकारच सांगते की भ्रष्टाचार झाला आहे आणि दुसऱ्या बाजूला त्याला पाठीशी घातले जाते. राष्ट्रवादी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष श्री.पांडुरंग तागडे पाटील यांची या समितीमध्ये उप मुख्य प्रशासक म्हणून नेमणूक केलेली आहे. ते माझ्या परिचयाचे व चांगले गृहस्थ आहेत. त्यांनी जिल्हा उप निबंधक यांच्याकडे तक्रार केली की, औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य प्रशासक श्री.जगन्नाथ काळे हे कोणालाही विश्वासात न घेता मनमानीपणे, हुकुमशाही पध्दतीने चुकीची कामे करीत आहेत. तसेच असेही सांगितले की, जिनशी येथील जागा विकली त्याबद्दल देखील आम्हाला काहीही माहिती नाही.

अध्यक्ष महोदय, नियमानुसार कोणताही आर्थिक विषय संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चेला आला पाहिजे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. हरिभाऊ बागडे...

त्या बैठकीच्या अजेंड्यामध्ये ते यायला हवे होते. त्यामध्ये न येता आयत्या वेळेला आर्थिक विषय घेता येत नाही. तरी देखील तो विषय घेतला आणि ते कार्यवृत्त मंजूर करुन ती जागा विकून टाकली. त्यावेळी उपाध्यक्षांनी अशी तक्रार केली की, मी त्या ठरावाला सूचक नव्हतो. परंतु माझे नाव सूचक म्हणून टाकले. गव्हाबरोबर किडेही रगडले जातील असे त्यांचे वाक्य आहे. त्यांनी अशी नाराजी व्यक्त केली. डीडीआर यांनी पणन संचालक यांना पत्र पाठविले की, या संचालक मंडळाला आपण मुदतवाढ देऊ नका. इतकेच नाही तर पूर्वीच्या संचालक मंडळाने ४५० ते ५०० रुपये चौरस फूटाने जागा विकली. सर्व पैसे चेकने घेतले आणि विकास केला. हे नवे प्रशासक मंडळ आले. त्या आधी प्रशासक होता. त्या प्रशासकाने रॉकेलच्या डिलरला... आता रॉकेल तर नाहीच. पण रॉकेल विक्रेत्याला केवळ ७६ रुपये चौरस फूटाने हे प्लॉट विकले आणि खरेद्या करुन दिल्या. आता ४५० ते ५०० रुपये कुठे आणि ७६ रुपये कुठे. किती मोठे नुकसान मार्केट कमिटीचे केले. हे मार्केट कमिटीचे नुकसान कोण भरुन देणार आहे ? मार्केट कमिटीचे नुकसान अधिकारी भरुन देणार आहेत काय, आपण भरुन देणार आहात काय ? मार्केट कमिटीचे पैसे वाया का घालविलेत, याला जबाबदार कोण आणि अशा संचालक मंडळाला पुन्हा पुन्हा मुदतवाढ दिली जाते. मला असे वाटते की, जे संचालक मंडळ झाले त्या संचालक मंडळाला नियुक्त करताना सांगितले की, तुम्हाला कोणताही आर्थिक व्यवहार करण्याची परवानगी नाही. आर्थिक व्यवहार करता येत नाही. तरी ते संचालक मंडळ करते आणि त्याला आपण डोळेझाक करता. त्यांच्यावर कारवाई करीत नाही. त्यांना उलट आपण मुदतवाढ देता. म्हणून याकडे लक्ष दिले पाहिजे, अशी मी उपमुख्यमंत्र्यांना नम्र विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माझा माननीय सहकार मंत्री यांना आग्रह आहे की, त्या ठिकाणी कशा पध्दतीने विकास केला तो पाहण्यासाठी आपण यावे. महाराष्ट्रामध्ये इतक्या कमी वेळात इतका मोठ्या प्रमाणात विकास केला अशी दुसरी कोणतीही मार्केट कमिटी नसेल, असे मी जाणिवपूर्वक आपल्याला सांगतो. उपमुख्यमंत्री

असुधारित प्रत

श्री. हरिभाऊ बागडे...

महोदय आणि सहकार मंत्री महोदय आपण दोघांनीही यावे, अशी मी आपल्याला विनंती करतो. जुन्या संचालक मंडळाने जर काही गैरप्रकार केला असेल तर त्यांच्यावर आपण खुशाल कारवाई करा, त्यांना जेलमध्ये टाका. आमचे काही म्हणणे नाही. परंतु जो विकास केला तो विकास आपण थांबविला आहे. २०० गाळे बांधून तयार आहेत. परंतु त्यावर आता पुढे काम करु देत नाही. आता ते लोकांच्या ताब्यात द्यायचे आहेत. ग्रामीण भागातील ४०० मुलांनी हे गाळे घेतले आहेत. २०० गाळे घेतले आणि २०० राहिले आहेत. ती खेड्यातील मुले आहेत. व्यवसाय करतात. सकाळी मोटरसायकलवर सकाळी येतात. भाजीपाला विकतात. हजार दोन हजार रुपये कमवितात ही तेथे व्यवस्था झाली. खेड्यापाड्यातली पोरं येऊन तेथे स्वत:चे पोट भरतात. त्यांच्या पोटावर पाय देण्याचे काम या संचालक मंडळाने केले. म्हणून ज्या शेतकऱ्याने त्याची १ हेक्टर जमीन मार्केट कमिटीला दिली आणि इतर जमीन विकली. त्याच्या खरेद्या आहेत. तरी तो शेतकरी म्हणतो की माझी जमीन राहिली. कुठेही जमीन शिल्लक राहिली नाही. सर्व खरेद्या आहेत. कोर्टामध्ये त्यांनी चुकीचा नकाशा दिला. मार्केट कमिटी हजर झाली नाही. मार्केट कमिटीतर्फे कोणीही गेले नाही. त्यामुळे खालच्या कोर्टाने एकतर्फी निकाल दिला. त्या निकालावर मार्केट कमिटीचे संचालक मंडळ हायकोर्टामध्ये गेले आणि हायकोर्टाने त्याला शिक्षा दिली. त्याच्यावर केस दाखल केली आणि त्याला काही दिवस जेलमध्ये सुध्दा जावे लागले होते. परंतु अशा माणसाचे ऐकून आणि तेथील माजी आमदाराचे, माजी खसदाराचे ऐकून तुम्ही तेथील विकास बंद केला आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. हरिभाऊ बागडे....

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी आरोग्य विभागाबाबत घोषणा केली आहे. परंतु जनावरांच्या आरोग्यासाठी दवाखाने असून तिथे डॉक्टर नाहीत. त्यामुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात जनावरांच्या डॉक्टारांची व्यवस्था करावी लागेल आणि आपण ती केली पाहिजे. आमच्या भागात पोलीस स्टेशन आहेत. परंतु कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी घरे नाहीत. यासाठी अनेक वर्षापासून मागणी आहे ती आपण पूर्ण केली पाहिजे. आपल्या राज्यामध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजना या दोन्ही योजना सुरु असून सुद्धा आणखी खूप गावे राहिली आहेत. मला आपल्याला विनंती आहे की, उप मुख्यमंत्री ग्रामसडक योजना नावाची अजून एक योजना आपण काढा म्हणजे त्यात अजून गावे निघतील. एवढे बोलून मी माझे भाषण थांबवितो. धन्यवाद!

-------

असुधारित प्रत

श्री. रोहित पवार (कर्जत जामखेड) : अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकारचे माननीय वित्त मंत्री व आमच्या सर्वांचे नेते श्री. अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी अर्थसंकल्प मांडला. त्या अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यासाठी आणि त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. अतिशय अडचणीच्या काळात माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी हा अर्थसंकल्प मांडला आहे. त्यातून नक्कीच सर्वसामान्य लोकांचे हित जोपासण्याचे काम केले गेले आहे. आपण जर बघितले तर आपल्या लक्षात येईल की, यंदाचा अपेक्षित महसूल हा ३.७० लाख कोटी रुपये असताना त्यामध्ये ६० हजार कोटी रुपयांची घट दिसण्याची शक्यता आहे. काल माननीय विरोधी पक्ष नेते बोलत असताना त्यांनी पुरवणी मागण्यांबद्दल काही भाष्य केले. त्यांनी सांगितले की, महाविकास आघाडी सरकारने ६० हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मान्य केल्या. पण हे करीत असताना आम्ही ज्या बाबी ऐकतो त्याचे आम्हाला आश्चर्य वाटते की, भारतीय जनता पक्षाचे सरकार असताना पहिल्या चार वर्षामध्ये त्यांनी १ लाख ५६ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मान्य केल्या होत्या. तसे बघितले तर विधीमंडळाच्या अंदाज समितीने त्यावर चिंता सुद्धा व्यक्त केली होती. तेव्हा बॅलेन्सशिट साईज २ लाख ८२ हजार रुपयांची होती.तेव्हा कोरोनाचा काळ नसताना सुद्धा त्यांनी एवढया मोठया प्रमाणात पुरवणी मागण्या मांडल्या. काल भाषण करीत असताना फक्त राजकीय हेतूने विरोधी पक्षाच्या विरोधात बोलायचे म्हणून त्यांनी वक्तव्य केले. हे होत असताना आपण एक महत्त्वाची बाब समजून घेतली पाहिजे की, येत्या काळात आपल्याला जीएसटी भरपाईचा कालावधी वाढवावा लागेल. माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी जीएसटी परिषदेमध्ये याबाबत मागणी केली. त्या ठिकाणी काही ठराविकच माननीय अर्थमंत्री होते. खास करुन भारतीय जनता पक्ष सोडून इतर पक्षांची सत्ता ज्या ज्या राज्यात आहे त्यांनी हा मुद्दा मांडला होता. खरे म्हणजे विरोधी पक्ष आणि आपण सर्वांनी मिळून हा विषय मांडायला पाहिजे. कारण जुलै, २०२२ रोजी जीएसटी भरपाई किंवा फरक मिळत होता तो बंद होणार आहे. त्याचा आकडा २२ हजार कोटी रुपये आहे. येत्या काळात महाराष्ट्र राज्याचा विकास करायचा असेल तर तो निधी मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे.

श्री. रोहित पवार....

अध्यक्ष महोदय, आपण वर्तमानपत्रामध्ये वाचले असेल की, केंद्र सरकारने एक नवीन कंपनी निर्माण केली आहे. त्यातून ज्या शासकीय जमिनी किंवा शासकीय कंपन्या या नवीन कंपनीमार्फत विकून तो निधी आणला जाईल. तो त्यांचा निर्णय असून देखील आपण त्याचा विरोध केला आहे. आपण समजून घेतले पाहिजे की, बीपीसीएल किंवा आरसीएफ सारख्या केंद्रशासित कंपन्या आपल्या राज्यात आहेत. ३० ते ४० वर्षापूर्वी त्या कंपनीमार्फत युवकांना रोजगाराची संधी मिळाली यासाठी त्यांना आपल्या सरकारने विनामूल्य जमिनी दिल्या होत्या. या जमिनी जर आता केंद्र शासनाने विकल्या तर मग त्यातून आपल्या राज्याला काही हिस्सा मिळणार आहे काय, याबबतीत सुद्धा विचार करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, काल सभागृहामध्ये जीडीपीच्या बाबतीत बोलण्यात आले. त्यामध्ये माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, जीएसटीच्या आधी आणि नंतर बघितले तर आपले राज्य फक्त ३.६३ टक्क्यांनी वाढलेले आहे. त्यामुळे राज्य सरकार सांगते की, १२ टक्क्यांनी वाढेल. इथे असणारे सामान्य माणसे,कामगार या सर्वांच्या प्रयत्नातून आपले राज्य १२ टक्क्यांनी वाढणार आहे त्यावर त्यांनी शंका व्यक्त केली आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. रोहित पवार...

त्यांची शंका जर आपण गृहीत धरली तर माननीय केंद्रीय अर्थ मंत्री यांनी असे सांगितले की, जीडीपी ८.९ टक्क्यांनी वाढणार आहे. म्हणजेच त्यांच्यावरही विरोधी पक्ष नेते यांनी आक्षेप घेतला आहे, असे आपल्याला म्हणण्यास काही हरकत नाही. कोरोनाच्या आधी व नंतर केंद्र शासनाची १.२५ टक्के वाढ झाली असून राज्यातील वाढ ३.६३ टक्के असल्याचे आपल्याला दिसून येत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील दरडोई उत्पन्न बीजेपीच्या काळात गेल्या ५ वर्षात ५३ हजार रुपयांनी वाढले. दर वर्षी १० हजार ६४३ रुपयांनी हे उत्पन्न वाढले. आता महाविकास आघाडी शासनाच्या काळात दरडोई उत्पन्न १४ हजार ४८५ रुपये आहे. म्हणजे कोरोना असताना देखील दरडोई उत्पन्नामध्ये एवढी वाढ झालेली आहे. काल माननीय विरोधी पक्ष नेते यांचे भाषण अभ्यासू होईल, असे आम्हाला वाटले होते मात्र ते केवळ राजकीय भाषण होते असे म्हणावे लागेल.

अध्यक्ष महोदय, Department for Promotion of Industry and Internal Trade हा केंद्र शासनाचा विभाग आहे. गेल्या २ वर्षात या देशात ऑक्टोबर २०१९ ते डिसेंबर २०२१ मध्ये ९ लाख ३४ हजार कोटी रुपये या देशात आले असून त्यातील २६ टक्के रक्कम महाराष्ट्रात आली. या विभागाच्या अंदाजानुसार आपले राज्य संपूर्ण देशात एक नंबरचे राज्य आहे. विरोधी पक्ष नेते सांगत आहेत की, आपले राज्य तिसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र सन २०२१ -२२ मध्ये गुजरात तिसऱ्या क्रमांकावर आहे. IFSC हे सेंटर आपल्या राज्यासाठी होते, ते मुंबईसाठी महत्त्वाचे होते. ते सेंटर गुजरातला जाऊन देखील आज गुजरात राज्य तिसऱ्या क्रमांकावर आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी निर्यातीच्या संबंधी देखील चर्चा केली पाहिजे. देशातील एकूण निर्यातीपैकी आपल्या राज्यातून सन २०१६-१७ मध्ये २४ टक्क्के निर्यात होते. ही आकडेवारी भाजपच्या सरकारच्या काळात २० टक्क्यांपर्यंत होती. कोरोनाचा काळ असतानाही सन २०२०-२१ मध्ये आपल्या राज्यात पुन्हा एकदा

श्री. रोहित पवार...

२२.७ टक्के वाढ झाली. आपल्या देशात ५ जिल्हे असे आहेत की, ज्यामध्ये सर्वात जास्त निर्यात होते. मुंबई, मुंबई उपनगर व पुणे या ३ जिल्ह्यांतून सर्वाधिक निर्यात होते.

अध्यक्ष महोदय, इंजिनिअरींग बाबत मी सांगू इच्छितो की, केवळ पुण्यातूनच २६ हजार कोटी रुपयांचे इंजिनिअरींग प्रॉडक्ट भारतातून निर्यात होतात. काल विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी चर्चा करताना केवळ मुंबई,पुणे येथे निधी आला असे सांगितले. या कंपन्या मुंबई, पुणे, नागपूर, रत्नागिरी, नाशिक येथे आहेत. तेथे काम करणारे केवळ स्थानिक लोक आहेत असे नाही तर संपूर्ण राज्यातील लोक आहेत. हे लोक कष्ट करतात यामुळे आपण निर्यात करु शकतो. या कंपन्यांमुळे आपला विकास होत आहे. समतोल विकास होणे तिकेच महत्त्वाचे आहे. महाविकास आघाडी शासनाच्या माध्यमातून हे नक्की होईल, असा विश्वास मी आपल्याला देतो.

अध्यक्ष महोदय, आपल्या देशातून सॉफ्टवेअर प्रॉडक्ट निर्यात होतात. त्यातील २० टक्के माल म्हणजे ९९ हजार ६३२ कोटी रुपये आपल्या राज्यातून निर्यात होतात. कर्नाटक पहिल्या क्रमांकावर असून आपल्या राज्याचा दुसरा क्रमांक आहे. कोरोनाचा काळ असताना दर वर्षी आपल्या राज्याची वाढ ७ टक्क्यावरून ९ टक्क्यांवर गेली आहे. कर्नाटक राज्याची आकडेवारी १४ टक्क्यांवरून ५ टक्क्यावर आली आहे. मी या ठिकाणी राज्य शासनाला सूचना करु इच्छितो. आपल्याला सॉफ्टवेअरमध्ये लक्ष देणे गरजेचे आहे. पुण्यामध्ये सॉफ्टवेअर इंडस्ट्री स्टेबल झाली. त्याप्रमाणे नाशिक, औरंगाबाद, पनवेल, नागपूर, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर अशा लहान पण महत्त्वाच्या शहरात हा उद्योग येण्यासाठी तेथील युवांना संधी मिळण्याकरिता काही धोरण आणता येईल काय, याचा विचार करावा लागेल.

अध्यक्ष महोदय, Startup Ecosystem बाबत मी सांगू इच्छितो. राज्यात सप्टेंबर २०१९ ते जुलै २०२१ दरम्यान स्टार्ट अप ची संख्या मोठया प्रमाणात वाढली आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.रोहित पवार ...

या काळात स्टार्टअपची संख्या दुप्पटीने वाढलेली असून ती ४३२३ वरुन ९८६४ वर गेली. त्यामध्ये १ लाखापेक्षा अधिक युवकांना रोजगाराची संधी मिळालेली आहे. मला एकच विनंती करावयाची आहे की, स्टार्टअपसाठी जो १०० कोटीचा फंड निर्माण केलेला आहे, त्यामध्ये जशी लागेल तशी टप्प्याटप्प्याने वाढ नक्कीच झाली पाहिजे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तेथे एखाद्या प्रोफेशनल नाही तर एखाद्या तरुण अधिकाऱ्याची नियुक्ती व्हावी. त्यामध्ये कुठल्याही परिस्थितीमध्ये वशिला लागता कामा नये, अशी विनंती मी करतो.

अध्यक्ष महोदय, आपण टेस्लाबद्दल बोलतो. टेस्ला महाराष्ट्रात आली पाहिजे त्यासाठी प्रयत्न झालेच पाहिजेत. परंतु, मला असे वाटते की, टाटा मोटर्स सारखी कंपनी आता इलेक्ट्रिकल व्हेईकल्समध्ये मोठ्या प्रमाणात काम करीत आहे व ती महाराष्ट्रात ऑलरेडी आहे. तिला ताकद देण्यासाठी आपल्याला काय करता येईल, याबाबतसुध्दा विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, एमएसएमईच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर उत्पादनामध्ये एमएसएमईचा वाटा ४५ टक्के आहे. युवक असतील, युवा पिढी असेल त्यामध्ये मोठ्या प्रमाणात काम करीत आहे, स्वत:ची कंपनी निर्माण करीत आहे. त्यांचा निर्यातीमध्ये ४० टक्के वाटा आहे. जी.डी.पी.मध्ये २९ टक्के वाटा आहे. मला सरकारला विनंती करावयाची आहे की, एमएसएमईसाठी स्वतंत्र धोरण करण्याची गरज आहे. एमआयडीसीमध्ये सुध्दा एमएसएमईला एक सेपरेट सेल असावा. आरबीआयच्या एन.के.सिन्हा कमिटीने एमएसएमईच्या बाबतीत खूप चांगल्या सजेशन दिलेल्या आहेत. त्यामध्ये आपण लक्ष घालून एमएसएमईला आपल्याला ताकद कशी देता येईल, हे देखील पाहिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आपला अर्थसंकल्प हा असा एकुलता एक अर्थसंकल्प आहे की, ज्याच्यामध्ये Artificial Intelligence, Nano Technology, Bio-technology बोललो आहोत. या सर्व गोष्टी माननीय श्री.अजित पवार यांनी मांडल्यानंतर आम्ही त्यावर अभ्यास केला. Naukri.com वर पाहिले तर या

श्री.रोहित पवार ...

क्षेत्रामध्ये लाखापेक्षा जास्त नोकऱ्या आहेत. LinkedIn वर पाहिले तर १० हजारपेक्षा जास्त नोकऱ्या आहेत. ड्रोन टेक्नॉलॉजीमध्ये पुढच्या ५ वर्षांमध्ये लाखापेक्षा जास्त नोकऱ्या युवा वर्गाला मिळू शकतात. अतिशय चांगली अशी ही योजना आहे, फक्त विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, शासनाचे ४१७ आयटीआय आहेत, खाजगी ३८१ आयटीआय आहेत, पॉलीटेक्नीक कॉलेजेस आहेत त्यामध्ये आपल्याला हे सर्व कोर्सेस सुरु करता येतील काय, याबाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्ह्यात Skill Upgradation Centre सुरु केले. त्याची अतिशय महत्वाची अशी गरज होती. त्याला चालना दिली, ही चांगली गोष्ट आहे. मला या ठिकाणी माननीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार व सर्व मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, आपल्या महाराष्ट्रामध्ये युवा आयोग स्थापन झाला पाहिजे. युवा आमदार व ४० पेक्षा कमी वयाच्या आमदारांची संख्या ६० पेक्षा जास्त आहे. त्यामुळे आमच्यासाठी शिक्षण क्षेत्रामध्ये, शासनाच्या वेगवेगळ्या विभागामध्ये जे काही होत आहे ते खरेच आमच्यासाठी वापरले जात आहे काय, या जनतेसाठी, युवासाठी वापरले जात आहे का, यावर लक्ष ठेवण्यासाठी आपल्याला येत्या काळामध्ये युवा आयोग स्थापन करावा लागेल.

अध्यक्ष महोदय, रोजगार व तरुणांच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर काल एक विषय मांडला गेला की, बेरोजगारी वाढली आहे. सन २०१६ पासून सप्टेंबर, २०१९ पर्यंत ४४ महिन्यांमध्ये बेरोजगारीचा सरासरी दर पाहिला तर तो ४.८४ टक्के आहे. कोरोनाच्या काळात पाहिले तर, हा दर ५.७१ टक्क्यांवर गेला होता. आता आपण पाहिले तर CMIE यांच्या अनुसार आता जो बेरोजगारीचा दर आहे तो, ४.३ टक्के आहे. भाजपाच्या काळात तो ४.८४ टक्के होता. कोरोनाची एवढी मोठी अडचण असताना देखील आपला बेरोजगारीचा दर हा त्यांच्या काळापेक्षा कमी झालेला आहे.

श्री.रोहित पवार ...

अध्यक्ष महोदय, पर्यावरणाच्या हिशोबाने सीएनजीची पॉलिसी आणली त्यामध्ये सुध्दा रिक्षा चालक, टॅक्सी चालक यांना टॅक्स कमी केल्यामुळे महिन्याला ९०० ते १००० हजार रुपये वाढणार आहेत. त्यानंतर त्या लोकांनासुध्दा नक्कीच मदत होईल.

अध्यक्ष महोदय, मी विनंती करतो की, मला थोडे बोलू द्या. एमपीएससीच्या माध्यमातूनसुध्दा मोठ्या प्रमाणात नवीन भरतीची जाहिरात सरकारने काढलेली आहे. काही महिन्यांपूर्वी मी व माझ्या समवेत अनेक आमदार महोदय माननीय श्री.अजित पवार यांना भेटलो होतो की, नवीन भरती झाली पाहिजे. एमपीएससी आयोगाच्या संदर्भातील काही विषय होते. त्यामध्ये सदस्यसंख्या वाढविली पाहिजे, असे वेगवेगळे विषय त्या ठिकाणी मांडले. २ वर्षे कोरोना असल्यामुळे आपल्याला काही प्रमाणात परीक्षा घेता येत नव्हत्या. परंतु, माननीय श्री.अजित पवार यांनी लक्ष घातल्यानंतर, अधिकाऱ्यांना बोलावल्यानंतर, सरकारने लक्ष घातल्यानंतर गेल्या काही महिन्यांमध्ये एमपीएससीच्या माध्यमातून मुलांना नोकरीच्या नवीन संधी देण्याकरिता मोठ्या प्रमाणात जाहिरात निघालेली आहे.

नंतर श्री.शिंदे ..

श्री.रोहित पवार...

अध्यक्ष महोदय, मला एक महत्त्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे. केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमधील आयएएस वगळता आयबीपीएस, आआरबी अशा विभागात मोठ्या प्रमाणात म्हणजे दरवर्षी १ लाख नोकऱ्या दिल्या जातात. त्यामध्ये राज्याचा वाटा केवळ २ ते २.५ टक्के आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री व माननीय मंत्री श्री.उदय सामंत यांचे समवेत चर्चा केली आहे. या प्रकरणी राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पॉलिटेक्नीक कॉलेज असून तेथे इन्फ्रास्ट्रक्चर उभे आहे. त्याचा वापर संध्याकाळच्या वेळेत होत नाही. आम्ही दिल्लीला गेलो होतो त्यावेळी तेथील तरुणांना भेटलो त्यावेळी सांगितले की, आम्हाला आयएएस होण्याकरिता दिल्ली येथे जावे लागते. मला सरकारला विनंती करावयाची आहे की, पॉलिटेक्नीक महाविद्यालयांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या नोकरीतील दोन ते अडीच टक्के असलेला आपला वाटा वाढविण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील ३० हजार मुले केंद्र सरकारच्या नोकरीत पाठविण्याकरिता प्रयत्न केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या खात्यातील भरती प्रक्रिया टीसीएस कंपनीच्या माध्यमातून राबविली, याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. आरोग्य विभागानेही अशा एजन्सीच्या माध्यमातून भरती प्रक्रिया पार पाडली पाहिजे. मागील ४ वर्षापूर्वी मेगा भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती, त्यानंतर टीईटी परीक्षा घेण्यात आली होती. त्यावेळी अधिकारी किंवा कंपन्यांच्या माध्यमातून लागलेली कीड अद्यापपर्यंत आहे. यामध्ये फरक एवढाच आहे की, या सरकारला ज्यावेळी समजले काही तरी चुकीचे घडत आहे त्यावेळी तत्काळ भरती प्रक्रिया थांबविली. परंतु अगोदरच्या सरकारने ही भरती प्रक्रिया रेटून नेली त्यामुळे अनेक उमेदवारांवर अन्याय झाला.

अध्यक्ष महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, या पुढील काळात चांगल्या यंत्रणेच्या माध्यमातून भरती प्रक्रिया राबविण्यात यावी. तसेच

श्री.रोहित पवार...

एमपीएससीच्या माध्यमातून अधिकाधिक पद भरती करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. भरती प्रक्रिया रद्द झालेल्या ज्या मुलांनी फी किंवा येण्याजाण्यासाठी जो खर्च केला तो परत करण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, अगोदरच्या सरकारच्या काळात बार्टी, महाज्योती, सारथी या संस्थांना फार कमी म्हणजे १०० कोटी रुपये निधी देण्यात येत होता. या सरकारने बार्टीसाठी मागील २-३ वर्षात ४५० कोटी रुपये निधी दिला आहे, सारथी व महाज्योतीसाठी २५०-२५० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्याचा फायदा सामान्य लोकांच्या मुलांना होईल, अशी मी आशा करतो.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागावर अनेक सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केले असल्याने मी याबाबत अधिक बोलणार नाही. केंद्र शासनाच्या प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेबाबत संसदेत विचारणा करण्यात आली होती. त्यावेळी संपूर्ण देशातील ५ लाख लोकांना उक्त योजनेचा फायदा झाल्याचे सांगण्यात आले. राज्य शासनाच्या महात्मा फुले आरोग्यदायी जीवन योजनेंतर्गत राज्यातील ६ लाख पेक्षा अधिक लोकांना फायदा झाला आहे. राजकीय भाषण करावयाचे असेल तर आपण काहीही बोलू शकतो. परंतु आपण सभागृहात योग्यच बोलले पाहिजे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागांतर्गत कॅन्सर, टेलिमेडिसीन, नवीन रुग्णालय या बाबींवरही मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येणार आहे, त्याचे आपण सर्वांनी स्वागत केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, काल सभागृहामध्ये सांगण्यात आले की, राज्यात कोविडमुळे मृत झालेल्या रुग्णांची आकडेवारी लपविण्यात आली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील काही लोक पुणे येथील रुग्णालयात दाखल होते. त्यांनी केलेली नोंदणी रिजेक्ट झाली आहे. पुणे येथे एखाद्या रुग्णाचा मृत्यू झला असेल तर त्यांनी त्यांच्या

असुधारित प्रत

श्री.रोहित पवार...

जिल्ह्यात नोंदणी केली पाहिजे, असे सांगण्यात आले होते. राज्यात एकूण मृतांची संख्या १.४३ लाख होती, २.३८ लाख अर्ज प्राप्त झाले होते त्यापैकी २.२३ लाख अर्जांची छाननी करण्यात आली व १.५४ लाख अर्ज स्वीकारण्यात आले आहेत. यामध्ये ७.५ टक्के अर्ज अधिक आले, असे म्हणता येईल. परंतु गुजरात राज्यातील याच आकडेवारीच्या संदर्भात सांगू इच्छितो की, आपल्या राज्याचा हा आकडा ७ टक्के आहे व गुजरात राज्याचा ६० टक्के आहे. कोविडमुळे मृत झालेल्या रुग्णांची आकडेवारी आपल्या राज्याने लपविली नाही. परंतु भाजप शासीत इतर राज्यांनी उक्त आकडेवारी मोठ्या प्रमाणात लपविली आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री व राज्य सरकारला माझी विनंती आहे की, अंगणवाडी सेविका व आशा सेविका यांच्या मानधनाचा विचार करण्यात यावा. तसेच पोलीस कर्मचारी यांची राहण्याची व्यवस्था व त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांचे चांगले घर असावे याकरिता आताच सेवा देण्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.तेलंग....

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. रोहित पवार : अध्यक्ष महोदय काल माननीय गृहमंत्री यांनी पोलीस भरती केली जाणार असल्याचे सांगितले आहे. मागील काळामध्ये काही कारणास्तव पोलिसांची पदे कमी भरण्यात आलेली आहेत. काही जिल्ह्यांमध्ये लोकसंख्येच्या तुलनेत पोलिसांचे संख्याबल कमी आहे. अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ मोठे आहे. त्या प्रमाणात लोकसंख्या देखील जास्त आहे. तरी देखील त्या जिल्ह्यांमध्ये पोलिसांचे संख्याबळ अत्यंत कमी आहे. त्या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे. तसेच भविष्य काळामध्ये का होईना अहमदनगर जिल्ह्यातील पोलिसांना रहाण्याची व्यवस्था देखील करणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, बोलत असताना युक्रेन येथील परिस्थितीचा विषय समोर आला. महाराष्ट्रातील १२०० विद्यार्थी युक्रेनमध्ये मेडिकलचे शिक्षण घेण्यासाठी गेले होते. परंतु तेथील युद्धाच्या परिस्थितीमुळे त्यांना पुढील शिक्षण घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे शासनाने याचा विचार करून त्यांच्या पुढील शिक्षणासाठी मदत करणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, नीटच्या परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. त्यामुळे टाटा मोटर्स व माझ्या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून राज्यातील गरीब, सर्वसामान्य कुटुंबातील नीट व जेईईचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण देऊन त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यास राज्य शासनाने मदत करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सदर परीक्षांचा विचार करून आम्ही एक छोटा कोर्स सुरू केलेला आहे. या कोर्ससाठी २२८ मुला-मुलींना प्रवेश दिला जाणार आहे. तरी राज्य सरकारला देखील अशा प्रकारे नीट परीक्षेसंदर्भात वेगळी योजना आखता येते काय, याबाबत विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. Intergeneration poverty cycle असेल जसे एखादा रिक्षाचालकांचा मुलगा रिक्षाचालकच होत असेल तर ते योग्य नाही. एखाद्या घरकाम करणाऱ्या महिलेची मुलगी घर कामच करीत असेल तर ते

श्री. रोहित पवार.......

योग्य नाही. त्यामुळे अशा गरीब कुटुंबातील मुला-मुलींना मदत करून त्यांना इतर श्रीमंत विद्यार्थ्यांबरोबर संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने प्रयत्न करावेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शिक्षणासाठी अनेक विद्यार्थ्यांनी कर्ज घेतलेले आहे. आपल्या महाविकास आघाडी सरकारने दोन लाख रुपयापर्यंतचे शेतकऱ्यांचे कर्ज माफ केलेले आहे. त्याच धर्तीवर गरीब विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी घेतलेले कर्ज देखील माफ करण्याची कोणती योजना आखणे शक्य असेल तर त्याबाबत देखील राज्य शासनाने जरूर विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कर्जमाफी संदर्भात काही आकडेवारी देण्यात आलेले आहे. भारतीय जनता पार्टीच्या सरकारने व महाविकास आघाडी सरकारने केलेल्या कर्जमाफीच्या योजनेमधील फरक मी सभागृहाला सांगू इच्छितो. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस सरकारने ३४ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली होती. या महाविकास आघाडी सरकारने ३० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केलेली आहे. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या ३४ हजार कोटी रुपयांपैकी फक्त २० हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेले आहेत. म्हणजे एकूण रकमेच्या ९८ टक्के पैशांचे वाटप केलेले आहे. महाविकास आघाडी सरकारने मात्र ९९.९९ टक्के पैशांचे वाटप केलेले आहे. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या रकमेची घोषणा केली. परंतु प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांना कमी पैशांचे वाटप करण्यात आले आहेत.

अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकारने सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामध्ये नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्यासाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. महाविकास आघाडी सरकारने ३० हजार कोटींची कर्जमाफी केली. त्यामुळे ५२ हजार शेतकऱ्यांनी फायदा होणार आहे. सरासरी विचार केला तर माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या कर्जमाफीमुळे प्रति शेतकऱ्यास ४७ हजार रुपयांची मदत झालेली

असुधारित प्रत

श्री. रोहित पवार.......

आहे. आघाडी सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीमुळे राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला ६० हजार रुपयांची मदत झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, मागील काळामध्ये राज्यामध्ये चक्रीवादळ आले, तेव्हा राज्य शासनाने कोणतीही मदत केली नसल्याचे काही विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्याने म्हटले आहे. परंतु भारतीय जनता पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अनेक आंदोलने केली. परंतु माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी गुजरात येथे जाऊन ॲडव्हान्स एन. डी. आर. एफ. रकमेची घोषणा करतात तेव्हा कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी आंदोलन केलेले नाही. गुजरात राज्यापेक्षा महाराष्ट्रमध्ये चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन देखील माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी गुजरात प्रमाणे महाराष्ट्रामध्ये मदतीची कोणतीही घोषणा केलेली नाही. कोल्हापूर येथे पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे अधिकारी नऊ महिन्यानंतर आले होते. अशाप्रकारचा दुजाभाव महाराष्ट्राच्या बाबतीमध्ये होत आहे. अशावेळी माननीय विरोधी पक्षाने देखील यामध्ये विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते. माननीय विरोधी पक्ष नेता यांनी सावकारी कर्जासंदर्भात भाष्य केलेले आहे. या महाविकास आघाडी सरकारने को-ऑपरेटिव्ह बँकेच्या माध्यमातून १०० टक्के कर्ज देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु राष्ट्रीय बँकेच्या माध्यमातून फक्त ५७ टक्के कर्ज देण्यात आलेले आहे. त्यामुळे राष्ट्रीय बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन जास्तीत जास्त कर्ज वाटपासंदर्भात त्यांच्याशी चर्चा करणे आवश्यक आहे. तसेच रब्बी पिकांसाठी देखील पीक कर्ज धोरण आखण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता व विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्याकडून विदर्भ मराठवाड्यावर अन्याय झाल्याचे सांगितले. या अर्थसंकल्पामध्ये एकूण ४३ घोषणा करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी २८ घोषणा या विदर्भ व मराठवाडा संदर्भातील आहेत. सदर घोषणेमध्ये कृषी संशोधन केंद्र असेल

असुधारित प्रत

श्री. रोहित पवार.......

किंवा मराठवाडा व विदर्भातील कापूस व सोयाबीनमध्ये वाढ होण्याच्या दृष्टिकोनातून निधीची तरतूद केली असेल,

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. रोहित पवार....

असे अनेक विषय आहेत. मला या निमित्ताने जे सातत्याने विदर्भ आणि मराठवाड्याचा विषय मांडतात त्यांना विचारावयाचे आहे की, राष्ट्रीय खनिकर्म आयोग संस्था आणि प्रयोगशाळा नागपूर येथे होती. ती आता गुजरातमध्ये हलविण्यात आली आहे. तेव्हा याचा विरोध या नेत्यांनी का केला नाही ? केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ (सीईईबी) चे कार्यालय नागपूर येथे होते. ते आता दिल्ली येथे नेण्यात आले आहे. याबाबतही भारतीय जनता पक्षाचे नेते काही बोलले नाहीत. त्या पक्षाचे अनेक नेते फायर ब्रँड नेते असतात. परंतु जेव्हा राज्यातील एखादा प्रकल्प किंवा कार्यालय इतर राज्यात नेले जाते तेव्हा हे सर्व नेते शांत बसतात. त्यामुळे मला वाटते की, केवळ राजकीय भाषण करणे योग्य होणार नाही.

अध्यक्ष महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडणार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राजकारण केले जात आहे. या निवडणुकांमुळे अनेक आंदोलने केली जात आहेत. मुंबई हे शहर कोणा एकट्याने उभे केले नाही. येथे सामान्य मराठी माणूस, महाराष्ट्र, मुंबईमध्ये जन्मलेला मग तो गुजराती असला तरीही तो मराठी माणूस आहे. या सर्व लोकांनी मुंबई शहर वाढविले आहे. मुंबईमधील आयएफसी सेंटर हे गुजरात राज्यात नेण्यात आले आहे. गुजरात राज्यात हे सेंटर गेल्यानंतर तेथे एक लाख कोटी रुपयांचा एफडीआय आला आहे. हेच सेंटर आपल्या राज्यात राहिले असते तर याचा फायदा राज्यातील सुशिक्षित युवकांना झाला असता. परंतु हे सेंटर गुजरात राज्यात जात असताना कोणी आंदोलन केले नाही. केंद्र सरकारचे पेटंट डिझाईन आणि ट्रेडमार्कचे कार्यालय दिल्ली येथे गेले आहे. त्यावेळेस विरोध केला नाही. नॅशनल मरिन पोलीस अकादमी पालघर येथे होणार होते. तेही गुजरात राज्यात गेले आहे. यालाही विरोध केला गेला नाही. मुंबई पोर्ट ट्रस्टमधील शीप बिल्डींगचा व्यवसायही गुजरात राज्यात गेला आहे. याबाबतही विरोधकांनी चर्चा केली नाही.

अध्यक्ष महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, ज्यावेळेस अस्मितेचा मुद्दा येतो तेव्हा सत्ताधारी पक्ष

असुधारित प्रत

श्री. रोहित पवार....

बेशुद्ध होतो. आपण सर्वजण शिवरायांचे मावळे आहोत.ज्यावेळेस छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केला जातो तेव्हा केवळ आम्हीच विरोध करीत असतो. भारतीय जनता पक्षाला त्याचा विरोध करता येत नाही. पुणे येथील कार्यक्रमावेळेस छत्रपती शिवाजी महाराजांचे पोस्टर वापरले जाते. परंतु ज्यावेळेस छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले यांचा कोणी अवमान करतो तेव्हा विरोधक शांत बसतात. त्यामुळे मी सांगू इच्छितो की, यात कोणीही राजकारण करु नये.

अध्यक्ष महोदय, मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना एक विनंती करणार आहे. जे थोर व्यक्ती ज्या गावामध्ये जन्मले, ज्या शाळेमध्ये त्यांनी शिक्षण घेतले त्या त्या शाळेला किंवा भागाला एकेक कोटी रुपयांचा निधी दिला पाहिजे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मोठे समाजकार्य केले आहे. माझ्या मतदारसंघात चोंडी हे गाव आहे. त्याठिकाणी शिक्षणासाठी माननीय श्री. अजित पवार यांनी निधी जाहीर केला आहे. तो निधी मिळावा, अशी मी त्यांच्याकडे मागणी करतो. राज्यात अध्यात्मिक क्लस्टर उभारण्यासाठी व अध्यात्म पुढे नेण्यासाठी आणि त्यातून पर्यटन वाढण्यासाठी निधी देता येईल काय, याचाही विचार केला जावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अनेक विषयांवर मला बोलावयाचे आहे. परंतु वेळेअभावी सर्वच विषयांवर बोलता येणार नाही. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

धन्यवाद !

------

असुधारित प्रत

**<u>बुधवार, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजीच्या सभागृहाच्या बैठकीबाबत</u>**

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, या अधिवेशनात दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी सभागृहाचे कामकाज दर्शविण्यात आलेले आहे. परंतु सभागृहाच्या दोन्ही बाजुच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे की, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी होळी सण असल्यामुळे सभागृहाच्या कामकाजास सुट्टी मिळावी. हा विषय कामकाज सल्लागार समितीमधील आहे. परंतु यास जर माननीय अध्यक्षांनी मान्यता दिली तर पुढील कामकाजाबाबत निर्णय घेता येईल.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री यांनी आता एक प्रस्ताव मांडला आहे. कामकाज सल्लागार समितीने ठरविल्यानुसार दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी सभागृहाची बैठक घेण्यात येणार होती. परंतु दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य व नेते मंडळींची चर्चा होऊन दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी होळी या सणानिमित्त सभागृहाचे कामकाज बंद ठेवावे किंवा कसे हा मुद्दा पुढे आला. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे सदर दिवशी सभागृहाचे कामकाज बंद ठेवण्याचे विचाराधीन असेल तर आमची त्याला हरकत नाही. त्यांनी मांडलेल्या प्रस्तावाशी आम्ही सहमत आहोत. परंतु असे करताना हेही सांगू इच्छितो की, पुढील आठवडयातील कामकाज ठरल्याप्रमाणे घेण्यात यावे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी सभागृहाचे कामकाज सुरु ठेवावे किंवा कसे याबाबत माननीय संसदीय कार्य मंत्री ॲड.अनिल परब व सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सभागृहाला विचारणा केली आहे. आपण देखील सभागृहाचा कल ऐकला आहे. आपण याबाबतचा निर्णय लवकर जाहीर केला तर उद्या आपापल्या गावी जाणाऱ्या सन्माननीय सदस्यांना रेल्वेची तिकिटे काढणे सोपे जाईल. त्यामुळे आपणास विनंती आहे की, याबाबतचा निर्णय लवकरात लवकर जाहीर करावा.

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय संसदीय कार्य मंत्री ॲड.अनिल परब यांनी मांडलेल्या प्रस्तावास सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी अनुमोदन दिले आहे. सभागृहाचा कल पाहता सर्वच सन्माननीय सदस्यांची सदर प्रस्तावास मान्यता आहे, असे दिसते. त्यामुळे दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी सभागृहाची बैठक भरणार नाही. सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी सभागृहाचे कामकाज ठरल्याप्रमाणे होईल.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार व माननीय संसदीय कार्य मंत्री ॲड.अनिल परब हे देखील सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आताच संसदीय कार्य मंत्र्यांनी सन्माननीय सदस्य श्री.अनिल पाटील यांना नियम २९३ चा प्रस्ताव मांडण्यास सांगितले आहे.

ॲड.आशिष शेलार.....

परंतु सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले हे देखील प्रस्ताव मांडण्यासाठी उभे आहेत... (अडथळा...) माझी विनंती आहे की, कोणीतरी लवकर प्रस्ताव मांडावा... (अडथळा...)

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, माझा दुसरा मुद्दा आहे. सभागृहामध्ये आता अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु आहे. परंतु अनेक सन्माननीय सदस्यांना अद्याप बोलण्याची संधी मिळालेली नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, अगोदर सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्याची संधी द्यावी व त्यानंतर नियम २९३ चा प्रस्ताव मांडावा.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, अगोदर ठरल्याप्रमाणे सायंकाळी ०५.३० वाजता अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा थांबवून नियम २९३ चा प्रस्ताव मांडला जाणार होता. दोन्ही बाजूचे एकेक सन्माननीय सदस्य बोलल्यानंतर प्रस्तावावरील चर्चेवर एका सन्माननीय सदस्यांना ऑन-लेग ठेऊन पुन्हा अर्थसंकल्पावरील सर्वसाधारणा चर्चा सुरु केली जाईल.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. आता आपण अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा थांबवित आहोत. उर्वरित चर्चा नंतर घेतली जाईल. आता नियम २९३ च्या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात करावी.

यानंतर श्री.धुमाळे.....

अस्वाक्षरित प्रत

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** मी नंतर आपल्याला संधी देतो. आपण ही चर्चा संपविलेली नाही. पुन्हा सुरू करणार आहोत.

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आपण नियम २९३ च्या प्रस्तावासंबंधी असे म्हणता की, सत्ताधारी पक्षाचे आणि विरोधी पक्षाचे एक सन्माननीय सदस्य बोलल्यानंतर पुन्हा अर्थसंकल्पावर चर्चा करु. पण आपल्याला असे करण्याची गरज काय आहे. एकदा बजेटवरील चर्चा पूर्ण होऊ द्यावी.

ॲड अनिल परब (संसदीय कार्य मंत्री) : (खाली बसून) आपण असे केले तर सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव व्यपगत होईल. म्हणून आपण प्रस्तावाला सुरूवात करुन तो ऑनलेग ठेवायचा आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** आता नियम २९३ च्या प्रस्तावावरील चर्चेला सन्माननीय सदस्य श्री. अनिल पाटील यांनी सुरूवात करावी. या प्रस्तावावरील चर्चेसाठी एकूण अडीच तास देण्यात आलेला आहे. निम्मा वेळ विरोधी पक्षासाठी तर निम्मा वेळ सत्ताधारी पक्षासाठी देण्यात आलेला आहे. आता सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

अप्रकाशित प्रत

**पृ.शी. :** ग्रामीण भागातील रस्त्यांची दर्जोन्नती करणे, क्रीडा विकासाला चालना देणे आणि पशुधन विकास करणे

**मु.शी. :** ग्रामीण भागातील रस्त्यांची दर्जोन्नती करणे, क्रीडा विकासाला चालना देणे आणि पशुधन विकास करणे या विषयासंबंधी सर्वश्री अनिल पाटील, सुनिल प्रभू, नाना पटोले, यशवंत माने, भास्कर जाधव, सुरेश वरपुडकर, प्रकाश सोळंके, रविंद्र वायकर, रणजित कांबळे, ॲड माणिकराव कोकाटे, सर्वश्री अजय चौधरी, अमिन पटेल, ॲड अशोक पवार, सर्वश्री दीपक केसरकर, संग्राम थोपटे, दीपक चव्हाण, संजय शिरसाट, कु.प्रणिती शिंदे, श्री. दौलत दरोडा, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री कैलास गोरंट्याल, रोहित पवार, चिमणराव पाटील, अमित झनक, धर्मरावबाबा आत्राम, डॉ.राहुल पाटील, सर्वश्री कुणाल पाटील, संग्राम जगताप, संजय राठोड, शिरिष चौधरी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रताप सरनाईक, सुभाष धोटे, बाळासाहेब आजबे, सदा सरवणकर, श्रीमती सुलभा खोडके, श्री.बाबासाहेब पाटील, डॉ.तानाजी सावंत, सर्वश्री माधवराव जवळगावकर-पाटील, शेखर निकम, अनिल बाबर, पी.एन. पाटील (सडोलीकर), मनोहर चंद्रिकापुरे, राजन साळवी, शिरीषकुमार नाईक, दिलीप बनकर, भरतशेठ गोगावले, राजेश एकडे, सुनिल भुसारा, किशोर पाटील, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री चेतन तुपे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री विकास ठाकरे, अतुल बेनके, ज्ञानराज चौगुले, बळवंत वानखडे, सुनिल शेळके, संजय पोतनीस, राजु पारवे, सुनिल टिंगरे, प्रकाश फातर्पेकर, संजय जगताप, दिलीप मोहिते-पाटील, वैभव नाईक, विक्रमसिंह सावंत, संदिप क्षीरसागर, मंगेश कुडाळकर, सहसराम कोरोटे, राजेश पाटील, प्रकाश आबिटकर, मोहनराव हंबर्डे, अण्णा बनसोडे, सुनिल राऊत, हिरामण खोसकर, मकरंद जाधव-पाटील, कैलास पाटील (घाडगे), धीरज देशमुख, आशुतोष काळे, बालाजी

असुधारित प्रत

कल्याणकर, ऋतुराज पाटील, राजू कारेमोरे, संजय गायकवाड, राजु आवळे, निलेश लंके, सुहास (अण्णा) कांदे, झिशान सिद्दीकी, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री नितीनकुमार देशमुख, लहू कानडे, इंद्रनिल नाईक, संतोष बांगर, मानसिंग नाईक, उदयसिंग राजपूत, चंद्रकांत नवघरे, रमेश बोरनारे, नितीन पवार, विश्वनाथ भोईर, बबनराव शिंदे, प्रकाश सुर्वे, शांताराम मोरे, रमेश लटके, रमेश कोरगावकर, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, महेश शिंदे, ॲड शहाजीबापू पाटील, सर्वश्री योगेश कदम, श्रीमती लता सोनवणे, सर्वश्री प्रदिप जैस्वाल, श्रीनिवास वनगा, दिलीप लांडे वि.स.स. यांचा प्रस्ताव.

श्री. अनिल पाटील (अमळनेर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम २९३ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील अस्तित्वात असलेल्या व दुरावस्था झालेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करणे यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ च्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ या योजनेची टप्प्याटप्प्यात अंमलबजावणी करण्यात आली असणे, प्रथम टप्प्यात रस्ते दर्जोन्नतीसाठी १० हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात येणार असून त्यापैकी सन २०२१-२२ या वर्षात ३ हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात येणे, या प्रकल्पाची एकूण किंमत ७ हजार ५०० कोटी रुपये असणे, सन २०२२-२३ मध्ये ३ हजार कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून रस्त्याच्या कामात निधी कमी पडल्यास नाबार्ड बँक, आशियाई विकास बँक वा तत्सम संस्थेकडून कर्जरुपी निधी उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय सुध्दा शासनाने घेतलेला असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ मध्ये बऱ्याच त्रुटी असून त्या दूर करण्याची आवश्यकता असणे, पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत एकूण ६ हजार ५५० किलोमीटर रस्त्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात २९२५ किलोमीटर बांधकामाला मान्यता प्राप्त झाली असून २०१७७ कोटी रुपये खर्च होणार असणे, ग्रामीण भागातील कोरोनामुक्तीच्या कामाला प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्यातील प्रत्येक महसूली विभागात पहिल्या ३

श्री. अनिल पाटील...

ग्रामपंचायतींना अनुक्रमे ५० लाख, २५ लाख व १५ लाख रुपयांचे बक्षीस देण्याचा शासनाने चांगला निर्णय घेतलेला असणे, राज्यात ५ लाख ४२ हजार ९४४ महिला स्वयंसहाय्यता गट कार्यरत असून ५५ लाख ३५ हजार ४३२ कुटूंबांचा त्यात समावेश करण्यात आला असून ११ हजार १४० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आलेले असणे, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत १० हजार २३१ गटांना २६ कोटी रुपये बीजभांडवल वाटप करण्यात आलेले असणे, ग्रामीण भागातील घरकूलांच्या निर्मितीला गती देण्यासाठी ग्रामीण महाआवास अभियानाचा शासनाने प्रारंभ केला असून आतापर्यंत ४ लाख २५ हजार घरकुले पुर्ण करण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून ५,३९,५२,२६८ इतके मनुष्यबळ निर्मिती करण्यात येणे. स्वच्छ भारत मिशनमधून ८ लाख ७८ हजार ७११ शौचालये बांधण्यात येणे. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतून ५ लाख ७५ हजार १८३ महिलांना गॅस जोडणी देण्यात आलेली असणे, सौभाग्य योजनेतून ५ लाख ७८ हजार १५१ विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या असणे, अनुसूचित जमातींचे बनावट जात वैधता प्रमाणपत्रे सादर करुन इतर जातीच्या उमेदवारांनी शासकीय नोकरी मिळविली असणे, ज्यांनी अशी बनावट जातप्रमाणपत्रे दिली आहेत त्यांच्यावर कार्यवाही करणे आवश्यक असणे, आदिवासी शालेय विद्यार्थींनींना शालेय भत्ता गेल्या २० वर्षापासून प्रत्येक दिवशी १ रुपया देण्यात येतो त्यात वाढ करुन आदिवासी विद्यार्थींनीना कमीतकमी १० रुपये शालेय भत्ता देण्यात येणे. मानव विकास निर्देशांकास उंची देण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ राज्यात सुरु करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतलेला असणे, ऑलिम्पिकसाठी राज्यातील निवड झालेल्या १० खेळाडूंना प्रशिक्षण व सरावासाठी रु. ५ कोटी इतकी आर्थिक सहाय्य करणारे देशातील महाराष्ट्र एकमेव राज्य असून नवीन व्यायाम शाळेच्या बांधकामाची मर्यादा ७ लक्ष रुपयावरुन १२ लक्ष इतकी करण्याची आवश्यकता, नवीन व्यायाम शाळांच्या साहित्य खरेदीसाठी जास्त निधीची तरतूद करण्यात यावी, डीपीसी योजनेअंतर्गत क्रिडांगण विकास योजनेला व्यापक स्वरुप देवून तरतूद ७ लक्ष रुपयावरुन १० लक्ष करण्यात यावी त्यात रनिंग ट्रॅक (Running Track) जॉगिंग ट्रॅक विकसित करावे जेणे करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पोलीस भरती व इतर मैदानी खेळासाठी चालना मिळेल, विदेशी गायींच्या जातीपैकी सर्वात जास्त दूध देणारी गाय होलस्टीन फ्रिजीयन

श्री. अनिल पाटील...

(एका वेतात सरासरी ९ ते १२ हजार लिटर) ही आहे. तसेच भारतीय जातीपैकी सर्वात जास्त दुध देणारी गाय साहीवाल (एका वेतात सरासरी ४ ते ६ हजार लिटर) ही आहे. महाराष्ट्र राज्यातील जातीपैकी सर्वात जास्त दुध देणारी गाय देवणी (एका वेतात १ ते दीड हजार लिटर) ही आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय सध्या पुणे येथील भाग्यलक्ष्मी फार्म, येथे असून भारतीय वातावरणात ही गाय एका वेतात ११५०० लिटर दूध देत आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय राज्यात आणण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची गरज, याबाबत राज्य शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण संपूर्ण प्रस्ताव वाचण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे आपण आपल्या भाषणास सुरूवात करावी.

श्री. अनिल पाटील : अध्यक्ष महोदय, नियम २९३ अन्वये सत्ताधारी पक्षाच्या वतीने जो प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे त्यावर मी माझे मत व्यक्त करणार आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावान्वये आज वेगवेगळ्या विभागावर बजेटच्या माध्यमातून सातत्याने आपल्याला चर्चा ऐकायला मिळते. परंतु ग्रामीण भागाचा विचार करता त्या भागाकडे खऱ्या अर्थाने लक्ष देण्याची आवश्यकता असेल तर ते ग्राम विकास विभागामार्फत देणे आवश्यक आहे. दुसरा विभाग म्हणजे पशुसंवर्धन आहे. युवकांच्या विकासाच्या दृष्टीने क्रीडा विभागाच्या माध्यमातून काम झाले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, हा प्रस्ताव मांडताना मला अतिशय आनंद होत आहे. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून मागील सरकारने देखील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या टप्पा क्रमांक १ मधून चांगल्या पध्दतीने काम करण्याचा प्रयत्न केला आहे. या योजनेतून ग्रामीण भागातील रस्त्यांची दर्जोन्नती करण्याचा प्रयत्न झाला आहे.

असुधारित प्रत

श्री. अनिल पाटील...

रस्त्यांच्या दर्जोन्नती बोलायचे झाले तर जवळपास २ लाख कि.मी. ग्रामीण रस्त्यांची मग ते व्ही.आर.मधील असतील किंवा ओ.डी.आर.मधील असतील. पण २ लाख कि.मी. ग्रामीण रस्त्यांच्या लांबीचे काम ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून हाती घेतले आहे.

अध्यक्ष महोदय, आज राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी वित्त विभागाकडून जवळपास १० हजार कि.मी. रस्त्यांचे दुसऱ्या टप्प्यातील काम करण्याचे नियोजन केले आहे, त्याची आखणी केली आहे. त्यानुसार त्यांनी निधी सुध्दा उपलब्ध करुन दिला आहे. परंतु प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या आधारावर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कामकाज करण्याचा शासनाचा मानस आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. अनिल पाटील....

अध्यक्ष महोदय, आपल्या माध्यमातून माननीय ग्रामविकास मंत्र्यांना माझी एकच विनंती आहे की, व्हीआर किंवा ओडीआर असेल तरी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये काही प्रमाणात २ लाख किमीपैकी १० हजार किमी टप्पा २ मध्ये पूर्ण करता येऊ शकते. परंतु, ग्रामीण भागामध्ये व्हीआर आणि ओडीआरसाठी पैसे कसे उपलब्ध करायचे ही सर्वांत मोठी अडचण आहे. डीपीडीसीच्या माध्यमातून प्रत्येक माननीय पालकमंत्री किंवा जिल्हा नियोजन किंवा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण रस्ते किंवा इतर जिल्हा मार्गांसाठी ३०:५४ किंवा ५०:५४ या हेडखाली थोडे पैसे देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. यासाठी राज्याकडून अर्थसंकल्पामध्ये जे पैसे उपलब्ध करुन दिले जातात जसे सार्वजनिक बांधकाम विभागासाठी १५ हजार कोटी रुपये किंवा इतर कोणत्याही विभागाला ७ हजार कोटी रुपये किंवा ८ हजार कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असतील तर ग्रामविकास विभागामध्ये स्पेसिफिक ज्या रस्त्यांवर मुख्यमंत्री ग्रामसडक योजना किंवा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे काम होत नसेल तर बहुतांश आमदारांना डीपीडीसीच्या माध्यमातून फार न्याय देता येत नाही. मला आपल्याकडून अशी अपेक्षा आहे की, ज्यावेळेला ग्रामपंचायतीमध्ये एखादे जिल्हा परिषद सदस्य,एखादे आमदार किंवा एखादे खासदार जात असतील तर त्याला प्रामख्याने एक प्रश्न विचारला जातो की, "आमच्या रस्त्याचे काय होणार आहे?" परंतु तो रस्ता ग्रामीण किंवा इतर जिल्हामार्ग असतो. त्याला राज्य सरकारच्या बजेटमधून पैसे दिले जात नाहीत. त्याला डीपीडीसीमधून पैसे दिले जातात. परंतु तिथे डीपीडीसीचा निधी तोकडा पडतो. राज्याने असा निर्णय घेतला पाहिजे की, ज्या पद्धतीने राज्य महामार्गाला किंवा प्रमुख जिल्हा मार्गाला जसे राज्य शासनाच्या माध्यमातून पैसे मिळतात तसेच एसआर प्रोग्रॅम व्हीआर आणि ओडीआरसाठी सुद्धा प्राप्त झाला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मी माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे आभार मानतो की, त्यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या बाबतीत माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांच्याशी चर्चा केली. मागच्या अधिवेशनामध्ये त्याची घोषणा झाली. त्यानंतर

असुधारित प्रत

श्री. अनिल पाटील....

कोविडची परिस्थिती निर्माण झाली म्हणून आपल्याला त्या योजनेवर जास्त काम करता आले नाही. परंतु आता त्या कामाला सुरुवात झाली आहे. माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी या बाबतीत सातत्याने बैठका घेतल्या आणि चर्चा केल्या. मागच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये ज्या थोडया त्रुटी दिसत असतील तर त्या कोणत्या माध्यमातून दूर करुन आपल्याला चांगले काम करता येऊ शकते असे त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आणि त्या समस्या सुद्धा जाणून घेतल्या.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून येणाऱ्या काळात ज्या रस्त्यांची निर्मिती होणार आहे त्यासाठी मी माननीय मंत्र्यांना एकच विनंती करणार आहे की, आपल्या माध्मातून लॉन्च होणारी ही योजना तयार होणार आहे त्यासाठी ७५ लाख रुपये प्रतिकिमी रस्ता बनवायचा असेल त्यामध्ये आपण काय काय बनवले पाहिजे हे आम्ही बैठकीमध्ये सजेस्ट केले होते. त्या बैठकीमध्ये सजेस्ट केल्याप्रमाणे आपण ते घ्यावे.

अध्यक्ष महोदय, रस्त्याची एकदा लांबी झाल्यानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर विकास दिसणार आहे. रस्त्यांची निर्मिती होत असताना खरोखर ग्रामीण भागात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून एखादा रस्ता झाल्यानंतर त्या गावाला आनंद प्राप्त होतो. तसेच मोठया प्रमाणावर दळणवळणाची साधने निर्माण होतात. त्या साधनांमध्ये आणि विकासामध्ये मोठया प्रमाणावर भर पडते. या रस्त्यांबरोबर ग्रामविकास विभागाची आणखी एक समस्या अशी आहे की, २ लाख ३ हजार किमी लांबी व्हीआर आणि ओडीआरच्या माध्यमातून प्रत्यक्ष दिसत असली तरी सुद्धा त्यामध्ये अनेक रस्ते असे असतात की, तिथे शेतीची अडचण आलेली असते. त्याबरोबर भू-संपादनाची अडचण आलेली असते. भू-संपादन करायचे असेल तर त्यासाठी पुरेसा पैसा दिला जात नाही. याची सुद्धा आपल्याला व्यवस्था करणे आवश्यक आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

श्री. अनिल पाटील.....

ग्रामीण भागाती रस्ते, शेतशिवार रस्त्यांकरिता राज्य शासन, केंद्र शासनाकडून निधी दिला जाणार आहे. शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असणारे ग्रामीण रस्ते यांची व्यवस्था जर होत असेल तर ते खूप फायद्याचे होईल. एमआरइजीएस, नरेगाच्या माध्यमातून शेतापर्यंत जाणारे शेतशिवार रस्ते येणाऱ्या काळात होणार आहेत. पूर्वी यामध्ये अनेक क्लिष्ट अटी होत्या. यावर विभागातील अधिकाऱ्यांनी अनेक बैठका घेतल्या व या क्लिष्ट अटी आता दूर झाल्या आहेत. याकरिता शासनाचे मी अभिनंदन करतो, आभार मानतो. ग्रामीण भागामध्ये राहणारे, दुर्गम भागातील शेतकरी आपल्या डोक्यावरून २-३ थैल्या खताच्या घेऊन जातात. आपण शहरात राहतो, चांगल्या गाडीत प्रवास करतो मात्र ग्रामीण भागातील शेतकरी पावसात गुडघाभर चिखलातून त्याचे बैलगाडे घेऊन जातो, तेव्हा त्याच्या बैलांचे हाल बघून त्या शेतकऱ्याच्या डोळयात पाणी येते. माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे. राज्य रस्ते, प्रमुख जिल्हा मार्ग आहेत जेवढे महत्त्वाचे आहेत, त्या पेक्षा शेतकऱ्याच्या दृष्टीने शेतात जाणारा शेतशिवार रस्ता अधिक महत्त्वाचा असतो. आपण जवळपास १ लाख कि.मी. शेतशिवार रस्त्यांचा प्रस्ताव मान्यतेकरिता किंवा काम पूर्ण करण्यासाठी हाती घेतला आहे.तो कमी करु नये.

अध्यक्ष महोदय, ३०५४ च्या हेडअंतर्गत जिल्हा परिषदेकडे निधी वर्ग केला जातो. हा निधी डीपीडीसीच्या माध्यमातून दिला जातो. मात्र बऱ्याच अंशी अशी परिस्थिती असते की, तोकड्या यंत्रणेमुळे हा निधी जिल्हा परिषदेमध्ये २-२ वर्षे खर्च होत नाही. या अखर्चित निधी बाबत काही तरी धोरण ठरवावे लागेल. आमची एक विनंती आहे. जिल्हा परिषदेचा हा निधी कमी केला पाहिजे. आमदारांच्या माध्यमातून मी सूचवू इच्छितो, विनंती करतो. माननीय पालक मंत्र्यांच्या माध्यमातून जिल्हा परिषदेकडे ३०५४, ५०५४ हेडअंतर्गत जो निधी दिला जातो तो तो आपल्याकडे ठेवावा. या संबंधी माननीय आमदारांना अधिकार द्यावा. अनेकदा अशी परिस्थिती असते की, डीपीडीसीच्या माध्यमातून जिल्हा परिषदेकडे रस्त्याकरिता निधी दिला

श्री. अनिल पाटील.....

जातो. एखादी जिल्हा परिषद ही ५० तर ६० ते ७० सदस्यांची असते. २५ कोटी रुपये जिल्हा परिषदेकडे रस्त्याच्या कामासाठी निधी दिला तर वेगवेगळया विभागाकरिता त्या सदस्यांमध्ये वाटा पाडावा लागतो व प्रत्येक सदस्याला थोडा – थोडा निधी द्यावा लागतो. डीपीडीसीमधून जो निधी दिला जातो त्याची विभागणी जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीकडे जाते. तेथे गेल्यानंतर प्रत्येक सदस्याला आपल्याला न्याय मिळावा किंवा सदस्सयांना खूष करण्यासाठी थोडा –थोडा निधी दिला जातो. एखाद्या सदस्याला ५० लाख रुपये दिल्यानंतर जिल्हा परिषदेच्या गटामध्ये जर २५ गावे असतील तर तो या सर्व २५ गावांचे समाधान करण्याचा प्रयत्न करतो. हे सर्व आपण आपल्या राजकीय जीवनामध्ये आपण पाहिले असेल. प्रत्येक सदस्य हा आपल्या गावांना, जे त्याच्या गटात येतात त्यांना खूष करण्याकरिता त्याला मिळणारा डीपीडीसीमधील निधी वितरित करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या मतदारसंघाची लांबी जर ५० किमी असेल व त्याला ५० लाख रु. मिळाले असतील तर तो प्रत्येक गावात २-४ लाखाचे काम करण्याचा प्रयत्न करतो.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.अनिल पाटील ...

परंतु, त्या गावामध्ये पोहोचण्यासाठी रस्त्याची लांबी ५ कि.मी. असेल तर तो केवळ ५०० मीटर, ७०० मीटरचा रस्ता करतो. त्यामुळे तो ५०० मीटरचा रस्ता तयार होतो. मात्र मागचा साडेचार कि.मी.चा रस्ता जैसे थे असतो. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, या पैशामध्ये आपण आमदारांना थोडा फार हिस्सा वाढवून दिला किंवा त्यातून दिला कारण आमदारांना पूर्ण तालुका पाहायचा असतो. कुठे तरी ३-४ कि.मी. ची in-tact लेन झाली पाहिजे असा एक विचार करता येऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून फार मोठ्या प्रमाणावर उप मुख्यमंत्री महोदय, मुख्यमंत्री महोदय व ग्रामविकास मंत्री महोदयांनी फार चांगले काम करण्याचा निर्णय तर घेतलेलाच आहे. परंतु, यासाठी निधी उपलब्ध करुन दिला असेल, यासाठी प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न झाले असतील, त्यासाठी लागणारा स्टाफ असेल त्याबाबत ग्रामविकास मंत्री महोदयांना आम्ही एक विनंती केलेली होती.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावाच्या माध्यमातून आपल्याला हे सांगायची इच्छा आहे की, आता समजा एखाद्या तालुक्याकरिता यंत्रणा उभी केली असेल... १५ तालुक्यांचा जळगाव जिल्हा असेल तर, त्या ठिकाणी १३ जणांचा स्टाफ असेल आणि धुळे जिल्हा ४ तालुक्यांचा असेल त्या ठिकाणी देखील १३ लोकांचाच स्टाफ असतो. याचासुध्दा कुठे तरी समतोल आपण राखला पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये सर्वात महत्वाचा विषय असा आहे की, त्यामध्ये आम्ही कितीही ठरविले तरी देखील पाहिजे तशी लांबी प्राप्त होऊ शकत नाही. मानव विकास निर्देशांकानुसार मुख्यमंत्री ग्रामसडक योजना असेल, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना असेल यांची आज त्या त्या जिल्ह्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर कामे झालेली दिसतात.

श्री.अनिल पाटील....

अध्यक्ष महोदय, मानव विकास निर्देशांकाच्या नावाखाली एखाद्या आदिवासी जिल्ह्यामध्ये पैसा मंजूर झाला तर, खरोखर त्या आदिवासी भागामध्ये ते काम होते का तर नाही होत. माझ्या जे लक्षात आले आहे त्यानुसार जर एखाद्या आदिवासी जिल्ह्यामध्ये ४ तालुक्यांपैकी २-३ तालुके आदिवासी असतील तर तो तो पैसा त्या संपूर्ण जिल्ह्यामध्ये रस्त्यांच्या माध्यमातून किंवा लांबी मंजूर करण्याच्या माध्यमातून वितरित केला जातो.

अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे. मी ग्रामविकास मंत्री महोदयांना याबाबतीत फार निवेदने दिली. आपण जो मानव विकास निर्देशांक संपूर्ण महाराष्ट्रात निश्चित केला असेल त्याबाबतीत प्रामुख्याने विचार केला पाहिजे. त्या विधानसभा क्षेत्रातील जो ५० टक्के मानव विकास निर्देशांक असेल ... त्या विधानसभा क्षेत्रातील लोकसंख्येच्या आधारावर निर्णय घेतला पाहिजे. ४ तालुक्यांचा धुळे जिल्हा असेल, नंदूरबार जिल्हा असेल तेथे देखील तेवढेच कि.मी. मंजूर होतात. जळगाव जिल्हा १५ तालुक्यांचा असून देखील त्या ठिकाणीसुध्दा तेवढेच कि.मी. मंजूर होतात. माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे की, आपल्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये समान न्याय झाला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून बक्षिसाच्या बाबतीत आपल्या पंचायतींच्या माध्यमातून जवळपास ५० लाख असतील, २५ लाख असतील... ज्यांनी कोविडच्या परिस्थितीत चांगले काम केले.... त्या ग्रामपंचायतींमध्ये आपण चांगला उपक्रम राबविला. मी खरोखर ग्रामविकास मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो, आभार मानतो. त्यांनी ग्रामपंचायतीला दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून फार चांगले पाऊल उचलले.

अध्यक्ष महोदय, ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून ग्राम पंचायतीसाठी अजून एक चांगले पाऊल उचलले गेले ते म्हणजे आज ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून ग्रामीण पातळीवर जीर्ण अवस्थेत असलेल्या ग्राम पंचायतींची नव्याने निर्मिती केली जाते.

असुधारित प्रत

श्री.अनिल पाटील....

अध्यक्ष महोदय, या सर्व बाबी ज्यावेळेस लक्षात येतात. कोविड सारखी परिस्थिती ज्यावेळेस या राज्याने फार मोठ्या प्रमाणावर पाहिली, अशा वेळेस आपल्या ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून महिला खास करुन ज्या महिलांना फार मोठ्या प्रसंगाला तोंड द्यावे लागले, ज्यांच्या आयुष्यात फार मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण झाल्या असतील, अशा महिला आज छोट्या-छोट्या व्यवसायातून दोन पैसे कमाऊ शकतात. अशा महिलांना पूर्वी केवळ २० हजार रुपयांची मदत प्राप्त होत होती. त्यांना आज ३० हजार रुपयांची मदत ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून दिली जाते. त्यामुळे महिलांना संरक्षण मिळण्याच्या दृष्टिकोनातून व चांगले काम करण्याच्या दृष्टिकोनातून फार मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, कोविड परिस्थितीमध्ये काम करताना सर्वात मोठी अडचण अशी होती की, ....

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.अनिल पाटील...

या कालावधीत कोणी घराबाहेर पडत नव्हते. या कोविड कालावधीत आरोग्य विभाग, पोलीस विभागाकडे लक्ष दिले गेले. महसूल विभागाने काम केल्याचे सांगण्यात येते. कोविड कालावधीत सर्वात चांगले काम ग्रामपंचायत स्तरावरील ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी, महिला कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाड्या यांच्या माध्यमातून प्रत्येक गावातील प्रत्येक व्यक्तीचे संरक्षण करण्याचे काम झाले आहे. वित्त मंत्री महोदयांनी कोविड परिस्थितीत चांगले काम केल्याबद्दल कर्मचाऱ्यांना १ हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आले आहे. त्याप्रमाणे असंघटीत व संघटीत कर्मचाऱ्यांच्या संदर्भात विचार करावा, अशी माझी ग्रामविकास मंत्री महोदयांना विनंती आहे. आशा सेविकांच्या संदर्भात सांगताना आनंद वाटतो की, त्यांनी कोविड कालावधी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता उत्कृष्ट काम राज्यासाठी व त्यांच्या भागासाठी केले आहे.

अध्यक्ष महोदय, पशुसंवर्धन विभागासाठी काही प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. शेतकरी शेतीवर अवलंबून न राहता त्याला जोडधंदा सुरु करण्यासाठी मदत करण्याचा विचार करण्यात यावी. माननीय मंत्री श्री.सुनिल केदार यांचे मी अभिनंदन करतो. त्यांचे पशुसंवर्धन व क्रीडा विभागाच्या विकासासाठी चांगले व प्रामाणिक प्रयत्न सुरु आहेत. परदेशामध्ये होलस्टीन फ्रीजीयन गाय राज्यात आणण्यासाठी त्याकरिता शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी मंत्री महोदय प्रयत्न करीत आहेत. होलस्टीन फ्रीजीयन गाय ११,५०० लिटर दूध एका वेतामध्ये देऊ शकते, अशी माहिती त्यांनी दिली आहे. अशा गायींचे ग्रामीण भागात वितरणासाठी प्रयत्न करता आले तर या शासनाच्या दृष्टीकोनातून फार चांगली गोष्ट होईल.

अध्यक्ष महोदय, मी सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावावर अधिक बोलणार नाही. हा प्रस्ताव आपण सर्वांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावा व त्यावर योग्य निर्णय घेण्यात यावा, अशी विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद !

----------

असुधारित प्रत

डॉ.संजय कुटे : अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी या सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.अनिल पाटील व इतर सन्माननीय सदस्य यांनी म.वि.स.नियम २९३ अन्वये मांडलेल्या ठरावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावामध्ये ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आहेत, त्यासर्वांचे मी अभिनंदन करतो. हा प्रस्ताव एका ओळीत मांडता येऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री.अनिल पाटील यांनी मूळ गाभा विसरुन आपले मुद्दे मांडले आहेत.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे.......

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करणे हेच या प्रस्तावाचा मूळ गाभा आहे. त्यामुळे एका ओळीमध्ये माननीय श्री. नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन केले असते तर हा प्रस्ताव पूर्ण झाला असता. रोज सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत माननीय श्री. नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करणे हे महाविकास आघाडी सरकारचे एक प्रकारे काम झालेले आहे.  या सरकारमधील अनेकजण अतिशय खालच्या शब्दांमध्ये देखील माननीय पंतप्रधान यांच्या बद्दल भाष्य करतात. त्याचा उल्लेख मी येथे करणार नाही. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे व्हिजन व त्यांनी निर्माण केलेल्या योजना या महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडत असताना त्यांचे अभिनंदन करण्याचे साधे सौजन्य देखील सन्माननीय सदस्य श्री. अनिल पाटील यांनी दाखविले नाही. माननीय श्री. नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन व कौतुक करण्याचे दानत या सरकारमध्ये नाही, हे यावरून स्पष्ट होते.

अध्यक्ष महोदय,  सत्ताधारी पक्षांने अशा प्रकारचा प्रस्ताव मांडल्यामुळे मला आनंदच झालेला आहे. या प्रस्तावामध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचा उल्लेख केलेला आहे. या योजनेसाठी  केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जात आहे. ग्रामीण भागातील रस्ते चांगले व्हावेत, हे केंद्र सरकारचे व्हिजन आहे. तसेच सेंट्रल रिझर्व्ह फंडाचा उल्लेख देखील या प्रस्तावामध्ये करण्यात आलेला आहे. ग्रामीण भागामध्ये होत असलेल्या नॅशनल हायवेचा उल्लेख देखील केलेला आहे. मोदी सरकार सत्तेमध्ये येण्यापूर्वी देशातील कोणत्याही तालुक्यामध्ये नॅशनल हायवेचे काम करण्यात आले नव्हते. परंतु आता एका तालुक्यामध्ये दोन-दोन नॅशनल हायवेची कामे करण्यात आलेली आहेत.

अध्यक्ष महोदय,  महिला स्वयंसहाय्यता बचत गटाचा उल्लेख देखील या प्रस्तावामध्ये करण्यात आलेला आहे. सदर व्हिजन हे केंद्र सरकारचेच आहे. पंतप्रधान घरकुल योजनेचा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. स्वच्छ भारत मिशन हे अभियान देखील केंद्र सरकारनेच राबविले आहे.

डॉ. संजय कुटे.......

या अभियानासाठी केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. परंतु या बाबतचा उल्लेख देखील राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावामध्ये केलेला आहे. सौभाग्य योजना ही देखील केंद्र सरकारची योजना आहे. प्रधानमंत्री उज्ज्वला योजना ही देखील केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेतून केंद्र शासनाने देशातील अनेक महिलांना मोफत गॅसचे वाटप केलेले आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. परंतु या योजनेचा उल्लेख या प्रस्तावामध्ये केलेला आहे. उक्त प्रस्तावामध्ये केंद्र सरकारच्या सर्व योजनांचा उल्लेख केल्यानंतर कमीत कमी माननीय श्री. नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करण्याचे सौजन्य दाखविणे आवश्यक होते. परंतु या सरकारने ते सौजन्य दाखविलेले नाही.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, मी उल्लेख केलेल्या योजनेपैकी एकही योजना माननीय डॉ.मनमोहन सिंह यांच्या सरकारने सुरू केलेली नाही. वरील सर्व योजना मागील सात वर्षांमध्ये सुरू करण्यात आलेल्या आहेत. गरिबासाठी गॅस, गरिबासाठी शौचालय, गरिबांसाठी घरकुल या मागील सात वर्षातील योजना आहेत.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, इंदिरा आवास व आदिवासी समाजासाठी काँग्रेस सरकारने काही योजना आखल्या होत्या, याबद्दल माझे दुमत नाही. परंतु देशातील सर्व सामान्यांचा विचार करून माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी सर्वांसाठी घरे या संकल्पनेतून घरकुल योजना सुरू केली आहे.

अध्यक्ष महोदय, उत्तर प्रदेश, मणिपूर, गोवा व उत्तराखंड या राज्यातील जनतेने पुन्हा एकदा माननीय श्री. नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास ठेवलेला. कारण माननीय श्री.नरेंद्र मोदी यांनी वरील प्रकारच्या सर्वसामान्य लोकांच्या उपयोगी असलेल्या योजना आखून त्या अमलात आणलेल्या आहेत.

डॉ. संजय कुटे.......

वरील सदर सर्व योजना केंद्र सरकारने देशातील सर्व राज्यांना लागू केलेल्या आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव केलेला नाही. त्यामुळे केंद्र सरकारच्या सदर योजना देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मागील ५० वर्षांमध्ये काँग्रेस सरकारने गरिबांच्या घरामध्ये दिवा देखील लावू शकले नाही. परंतु माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी केवळ सात वर्षांमध्ये देशातील अनेक गरीबांना मोफत वीज जोडणी देऊन त्यांच्या घरामध्ये प्रकाश निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, जल जीवन मिशन योजना देखील केंद्र सरकारचीच आहे.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सदर योजनेमध्ये राज्याचा हिस्सा असला तरी व्हिजन मात्र केंद्र सरकारचे आहे. शहरांमध्ये प्रत्येक व्यक्तीला २५० ते ३०० लिटर पाणी मिळत होते आणि ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला फक्त ३५ ते ४० लिटर पाणी मिळत होते.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

डॉ. संजय कुटे....

ग्रामीण भागातील जनतेला शुद्ध पाणी मिळाले पाहिजे. प्रत्येक नळाला शुद्ध पाणी मिळाले पाहिजे. यामुळे ही योजना तयार करण्यात आली. या योजनेमुळे सर्वच राज्यांचा फायदा होणार आहे. परंतु दुर्दैवाने मागील वर्षी जल जीवन मिशनकरिता २ हजार कोटी रुपये देण्यात आले होते. त्यावेळेस कोरोना काळ सुरु होता. ही बाब मान्य आहे. कदाचित प्रधान सचिवांनी सहकार्य केले नसेल. त्यावेळेस केवळ २०० कोटी रुपये राज्य शासन खर्च करु शकले.

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे ज्या विषयाबाबत बोलत आहेत तो विषय या चर्चेमध्ये नाही. पाणी पुरवठा विभागावर त्यांना बोलावयाचे असेल तर त्यांनी यासाठी स्वतंत्र चर्चा आयोजित करावी. मला मार्गदर्शन करावे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी जल जीवन मिशन सुरु केले आहे. यात केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा ५०-५० टक्के हिस्सा आहे. तसेच १० टक्के लोक वर्गणीचा हिस्सा यात आहे. सभागृहाच्या पटलावर चुकीची माहिती येऊ नये, म्हणून मी हे बोलत आहे. दुसरे असे की, पंतप्रधान सडक योजना ही माननीय माजी पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग सरकारच्या कार्यकाळात आली आहे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी त्यास उजाळा दिला आहे, ही बाब मला मान्य आहे. मला कोणत्याही वादात जावयाचे नाही. सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे आणि माझ्यासह इतरही अनेक सन्माननीय सदस्य ग्रामीण भागातील आहेत. आपल्या दोघांना जेवढी यातील माहिती आहे तेवढी इतरांना नाही. त्यामुळे २ हजार कोटी रुपये मिळाले, ते का खर्च झाले नाही, याची माहिती मी आपणास वैयक्तीपणे सांगितलेली आहे. मी माजी पाणी पुरवठा मंत्र्यांची नेहमी मदत घेत असतो. हे मी रेकॉर्डवर सांगणार नाही.

डॉ. संजय कुटे : अध्यक्ष महोदय, सभागृहाच्या पटलावर चुकीची माहिती आली आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजना ही स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात सुरु झाली आहे. सभागृहाच्या पटलावर चुकीची माहिती येऊ नये म्हणून मी हे सांगत आहे.

डॉ. संजय कुटे....

अध्यक्ष महोदय, राज्याला केंद्र सरकारच्या योजना आणि माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या व्हिजनमधील ज्या योजना आहेत त्यामधून प्राप्त होणारा निधी योग्य प्रकारे खर्च झाला पाहिजे. केंद्र सरकारकडून अधिकाधिक निधी राज्य सरकारला कशा प्रकारे मिळेल, याचा प्रयत्न राज्य सरकारने केला पाहिजे. परंतु केवळ केंद्र सरकारवर टीका करण्यात येते. महाराष्ट्रात ५ लाख ४२ हजार २९४ महिला स्वयंसेवी बचत गट आहेत. यात ५५ लाख कुटुंबाचा समावेश आहे. यामध्ये ११ हजार १४० कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. या महिला बचत गटांकरिता केंद्र सरकार आणि राज्य सरकार अनुदान देत असते. या बचत गटांकरिता विविध योजना आहेत. उमेदच्या माध्यमातूनही महिला बचत गटांना मदत केली जाते. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या हिश्श्याच्या माध्यमातून बचत गटांकरिता विविध योजना राबविल्या जातात. एमएसएमईच्या माध्यमातून १ कोटी रुपयांचे मायक्रो फायनान्स दिले जाते. हा विभाग माननीय केंद्रीय मंत्री श्री. नारायण राणे यांच्या अधिपत्याखाली आहे. त्याही विभागाकडील निधीकडे लक्ष दिले पाहिजे. शहरी आणि ग्रामीण बचत गटांकरिता एक कोटी रुपयांपर्यंतच्या योजनांचा लाभ मिळू शकतो. या विभागावर लक्ष केंद्रीत केले आणि त्या विभागाच्या योजनांची जिल्हास्तरावर विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत मेळावे आयोजित केले, अधिकाधिक महिला बचत गटांना या विभागाच्या योजनांचा लाभ मिळवून दिला तर अधिक लाभ मिळेल.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकार आणि राज्य सरकार असा भेद न करता आपण देशातील नागरीक आहोत, हे लक्षात ठेवले पाहिजे. देशाचा विचार करुन केंद्र सरकार योजना राबवित असते. केंद्र सरकारच्या योजनांचा अधिकाधिक वाटा राज्यात कशा प्रकारे आणता येईल, महिला बचत गटांना कशा प्रकारे सक्षम करता येईल, यासाठी प्रयत्न केला पाहिजे. ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांसोबत मी देखील काम केले आहे. परंतु या विभागातील काही अधिकारी असे आहेत की, ते काम करु देत

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे....

नाहीत. आज उमेद ही संस्था ठप्प पडलेली आहे. उमेद संस्थेच्या माध्यमातून महिला बचत गटांना बळकट केले पाहिजे. यातून मोठे नेटवर्क तयार होऊ शकते.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

डॉ.संजय कुटे.....

परंतु गती वाढत नाही. जागतिक बँकेकडे कोणता प्रस्ताव पाठवायचा हे आपल्यालाही माहिती असते परंतु कामाला गती मिळाली पाहिजे. प्रधान सचिव व मंत्री महोदय आपण मिळून निर्णय घेतले पाहिजेत. यामध्ये एखादा अधिकारी अडवणूक करीत असेल तर त्यांना विभागामध्ये ठेवता कामा नये. कारण महिला बचत गटांना उभे करण्याचा आपण प्रयत्न करीत असताना असा कारभार होत असेल तर ते योग्य नाही. आपण या बाबीची निश्चितपणे दखल घ्याल, याचीही मला खात्री आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे अर्थकारण पुढे न्यायचे असेल, शहराकडे येणारा लोकांचा लोंढा थांबवायचा असेल तर ग्रामीण भागाचा विकास होणे आवश्यक आहे. मी या ठिकाणी नक्कीच माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांचे नाव दहा वेळा घेणार नाही. परंतु ग्रामीण भागातील विकास कशा प्रकारे करता येईल हे पाहिले पाहिजे. यातील सर्वात महत्त्वाचा घटक रस्ते हा आहे. जेव्हा रस्ते मजबूत, मोठे नसतील तेव्हा छोटे-मोठे उद्योगधंदे देखील तेथे येत नाहीत.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील संग्रामपूर, जळगाव हे तालुके सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी आहेत. एका बाजुने पूर्ण ब्लॉक आहे व मध्य प्रदेश राज्याची सीमा आहे. या दोन तालुक्यांचा विकास करायचा असेल तर पायाभूत सुविधांचा विकास होणे आवश्यक आहे. एका बाजूला डोंगर आहे तर दुसऱ्या बाजूला रेल्वे, महामार्ग यांची कनेक्टिव्हिटी सुमारे ५० किलोमीटर अंतरावर आहे. प्रत्येक गोष्टीसाठी तेथे जावे लागत असेल तर या दोन तालुक्यांचा कसा विकास होईल? त्यामुळे त्या भागातून राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते, इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग जाणे आवश्यक आहे. कारण जेव्हा पायाभूत सुविधा निर्माण होतात त्यावेळी आपोआप विकास होण्यास सुरुवात होते. ग्रामीण भागातील मुलांमध्ये तेवढी क्षमता नक्कीच आहे. स्टार्ट अपच्या माध्यमातून ते पुढे येत आहेत.

असुधारित प्रत

डॉ.संजय कुटे.....

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय महामार्गाचा आणि माझ्या मतदारसंघाचा काहीही संबंध नव्हता. परंतु गेल्या पाच वर्षांमध्ये माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी आणि माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्या माध्यमातून मतदारसंघातून दोन राष्ट्रीय महामार्ग गेले. त्यानंतर रस्त्याच्या बाजूला अनेक छोटे-मोठे उद्योग सुरु झाले आहेत. यामुळे अर्थकारणाला गती मिळत आहे. त्यामुळे रस्ते या घटकावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणली गेली. शहरांमधील रस्ते, कोस्टल रोड झालेच पाहिजेत. कोस्टल रोड होऊ नये, या मताचा मी नाही. परंतु एकटया कोस्टल रोडवर ३० हजार कोटी, ४० हजार कोटी रुपये खर्च केले जात असताना एक गोष्ट आपण विसरतो की एवढया पैशांमध्ये ग्रामीण भागाचा पूर्ण कायापालट होऊ शकतो. त्यामुळे याबाबत देखील विचार करावा लागेल. मागील सरकारच्या काळात नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाचे काम हाती घेण्यात आले. या सरकारने सदर महामार्ग गोंदिया-गडचिरोली पर्यंत वाढविण्याबाबत अर्थसंकल्पामध्ये सूतोवाच केले आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. कारण ग्रामीण भागातून असे रस्त्यांचे जाळे विणले जाण्याची नितांत आवश्यकता आहे. समृध्दी महामार्ग झाल्यानंतर त्याच्या आजुबाजूला शेतीवर आधारित उद्योग उभारले जात आहेत. ॲग्रो व्हिलेजेस तयार होत आहेत. वेअर हाऊसेस येतील, कृषी प्रक्रिया उद्योग येतील व त्यामुळे ग्रामीण भागाचे अर्थकारण वाढेल. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्ते सर्वात महत्त्वाचे आहेत. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, जिल्हा परिषदेकडील रस्त्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. सर्व निधी राज्य महामार्ग आणि एम.डी.आर. साठी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला जात आहे. राज्यामध्ये ग्रामीण मार्ग, इतर जिल्हा मार्ग मोठया प्रमाणात आहेत. हे रस्ते जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येतात. परंतु त्यासाठी जिल्हा परिषदेला अत्यंत तोकडा निधी मिळतो. लेखाशिर्ष ३०५४ अंतर्गत अतिशय कमी निधी येतो. असे असताना ग्रामीण भागातील लोकांच्या रस्त्यांबाबतच्या आशा-आकांक्षा कशा पूर्ण करणार आहात ? ग्रामीण भागातील आमदार मतदारसंघातील कुठेही गेले तरी लोक पहिला प्रश्न विचारतात की,

डॉ.संजय कुटे.....

"भाऊ, आमच्या गावातील रस्ता कधी होणार आहे ? आमच्या गावातील रस्त्यावरुन नीट चालता देखील येत नाही. रस्ता एवढा खराब आहे की, महिलांची हॉस्पिटलमध्ये नेण्यापूर्वीच प्रसुती होते." या प्रश्नांना आम्ही काय उत्तरे द्यायची ? आम्ही चार-चार वेळा आमदार म्हणून निवडून आलो आहोत. परंतु आजही मतदारसंघातील दहा गावांमध्ये जाण्यासाठी रस्ता नसेल तर लोकांचा तरी काय दोष आहे ?

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे...

म्हणून जेव्हा या ठिकाणी राज्याचा अर्थसंकल्प सादर झाला तेव्हा माननीय उपमुख्यमंत्री यांनी सुध्दा सर्वात जास्त या विषयाचा विचार करायला हवा होता. हे ठीक आहे की, आपण आज या प्रस्तावाच्या माध्यमातून त्यावर चर्चा करीत आहोत. पण मला अपेक्षा आहे की, या माध्यमातून ग्रामविकास मंत्री या प्रस्तावाचे उत्तर देण्यापूर्वी माननीय उपमुख्यमंत्री यांच्यासमवेत चर्चा करतील. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी आपल्याला वेगळी काही तरतूद करता येईल काय याचाही विचार होईल. आपण मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा टप्पा क्रमांक २ सुरू करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, मला या गोष्टीचा आनंद आहे की, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून छोट्या छोट्या गावांचे नेटवर्क तयार होत आहे. छोटे छोटे रस्ते जोडण्याचे काम यामधून बऱ्यापैकी होत आहे. एक गाव दुसऱ्या गावाला जोडणे. गाव रस्त्यावर आणणे किंवा त्याच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. आज महराष्ट्रात बरीच गावे आहेत की ज्यांना डांबरीकरण माहिती नाही. माझ्या या बोलण्याला सर्व आमदार सहमत होतील की, बऱ्याच गावांना अद्याप डांबरीकरण माहिती नाही. अंतर्गत रस्ते तर सोडाच. पण गावाचा मुख्य रस्ताही डांबरीकरण झालेला नसलेली गावे आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून आपण जो निधी देण्याचे प्रस्तावित केले आहे ते सर्व आकडे मी आता काही वाचत बसत नाही. कारण यामध्ये त्याची सर्व आकडेवारी दिलेली आहे. पण आपल्याला मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेसाठी आणखी निधी कसा ज्यादाचा देता येईल याचा विचार झाला पाहिजे. १० हजार कि.मी. ऐवजी एका वर्षी २० हजार कि.मी. किंवा २५ हजार कि.मी. रस्ते कसे घेता येतील, याचा प्रयत्न झाला पाहिजे आणि त्यासाठी निधीची आवश्यकता आहे. मला वाटते अर्थमंत्री यामध्ये लक्ष देतील आणि जास्तीत जास्त निधी या कामासाठी कसा मिळेल त्यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे. पण हे करीत असताना माझी ग्रामविकास मंत्र्यांना एकच विनंती आहे. देशाचा विचार करीत असताना माननीय पंतप्रधान कुठेही भेदभाव करीत नाहीत. कारण शेवटी संपूर्ण देश

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे...

एक आहे. त्यामध्ये महाराष्ट्र आहे, गुजरात आहे किंवा इतर कोणताही प्रदेश असो त्या सर्व राज्यांना चांगल्या प्रकारे निधी मिळतो. केंद्राची आकडेवारी आपण समोर ठेऊन बघावे की, महाराष्ट्राला किती निधी मिळाला आणि गुजरातला किती निधी मिळाला. आमच्याजवळ ती आकडेवारी आहे. तोच आनंद मी व्यक्त केला आहे आणि तोच प्रस्ताव आम्ही पुढील आठवड्यात आणणार आहोत आणि तोही आकडेवारीसह असेल. पण आज अचानक या प्रस्तावाची घोषणा झाल्यामुळे आम्ही सारांश मांडत आहोत. आपण आकडेवारी द्यावी. मी त्याच्या खोलात जाणार नाही. परंतु माझी एकच विनंती राहील की, आपण मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा टप्पा २ सुरू करताना ग्रामीण भाग हा ग्रामीणच आहे, तेथे कोणता आमदार आहे किंवा कोणत्या पक्षाचा आहे हे पाहण्यापेक्षा संपूर्ण महाराष्ट्र आपल्याला कश बिल्डअप करता येईल आणि संपूर्ण महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास कसा करता येईल, हे पाहिले पाहिजे. कारण एखादा भाग आपण अशक्त ठेवला किंवा अपंग ठेवला तर महाराष्ट्राचा विकास होणार नाही. त्यामुळे शासनाने अशी भावना ठेवावी. सत्ताधारी आणि विरोधकांच्या बाबतीत १०-२० टक्के त्यामध्ये कमी जास्त प्रमाण झाले तर आम्ही त्यावर बोलणार नाही. पण विरोधक आणि सत्ता हे तेवढ्यापुरते असतात. त्यामुळे माननीय पंतप्रधान ज्याप्रमाणे विकासाचे व्हीजन ठेवतात त्याप्रमाणे आपले व्हीजन असावे, एवढेच मला या माध्यमातून सूचवायचे आहे.

अध्यक्ष महोदय, पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या बाबतीत आपणच म्हटले आहे की, ६५०० कि.मी. रस्त्यांचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला. पहिल्या टप्प्यात त्यातील अर्धे म्हणजे ३००० कि.मी. रस्ते

श्री. अनिल पाटील : (खाली बसून) केंद्राकडून यासाठी निधी आला नाही.

डॉ. संजय कुटे : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जर पंतप्रधान ग्रामसडक योजनेमध्ये एकही रुपयाचा निधी आला नसेल तर ग्रामविकास मंत्री महोदय त्यांच्या उत्तराच्या भाषणातून त्याबाबतची माहिती देतील.

डॉ. संजय कुटे...

अध्यक्ष महोदय, आपल्या प्रस्तावात असे म्हटले आहे की, "पहिल्या टप्प्यात २९२५ किलोमिटर बांधकामाला मान्यता प्राप्त झाली असून २०१७७ कोटी रुपये खर्च होणार असणे". याबाबत आपण कशा पध्दतीने पाठपुरावा करता त्यावरही बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. मी आज उमेदच्या बाबतीत बोलणार नाही. पुढील आठवड्यात आम्ही सविस्तर प्रस्ताव आणू. आपण पाठपुरावा म्हणून केंद्राकडे किती वेळा गेलात ? आपण किती वेळा हा प्रस्ताव मंजूर होण्यासाठी दिल्लीमध्ये जाऊन बसला आहात. आम्हाला तुमच्यापर्यंत निधी मिळण्यासाठी पाठपुरावा करावा लागत नाही काय, ग्रामविकास मंत्र्यांकडे आम्ही २-२ किंवा ३-३ वेळा जाऊन कृपया आमचा हा प्रस्ताव मंजूर करावा, अशी आम्ही मागणी करीत नाही काय ? ३-३ वेळा आम्हाला यावे लागते. त्यामुळे आपण तेथे किती वेळेस जाऊन बसलात ते सांगावे. त्यामुळे ज्याप्रमाणे आपला पाठपुरावा असेल त्याप्रमाणे काम होते. आम्ही तर ४ टर्म असलेले आमदार आहोत. पण तरी देखील आपल्या महाराष्ट्रात सुध्दा कोणताही विभाग असो, त्या ठिकाणी आम्हाला ४-४ वेळा जाऊन पाठपुरावा करावा लागतो आणि तेव्हा कुठे कामे येतात. त्यामुळे आपण एवढे सोपे समजू नये की आम्ही येथेच बसून राहतो आणि निधी येत राहील. निधी आला नाही तर केंद्र शासन निधी देत नाही असे म्हणून आपण टीका करायला मोकळे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे.....

हे योग्य नाही. महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीकोनातून जर आपण आपली मानसिकता बदलली तर आपल्याला त्या योजनांचा लाभ घेता येईल. एसएमई च्या बाबतीत बोलायचे झाले तर ही योजना स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी असून ती १ कोटी रुपयांची आहे. आपण या योजनेचा किती पाठपुरावा केला, किती वेळा बैठका झाल्या आणि किती प्रमाणात केंद्र शासनाचे अधिकारी आणून जिल्ह्यापर्यंत मेळावे घेतले, त्यांचे मार्गदर्शन घेतले आणि त्यातून योजना तयार केल्या. शेवटी पाठपुरावा करण्यासाठी आपण जेवढे पळाल तेवढा फायदा होईल. महाराष्ट्राला फायदा देणारच नाही, असे केंद्र शासन कधीच म्हणू शकणार नाही आणि असे होतच नाही. हे तुम्हाला आणि मलाही माहीत आहे. त्यामुळे या पद्धतीने काम करावे अशी आमची विनंती आहे. आम्ही नकारात्मकतेमध्ये न जाता सकारात्मकच घेत आहोत. या पद्धतीने मोठ्या प्रमाणात रस्त्यांची बांधणी व्हावी. सर्वांना समान न्याय मिळावा मग यामध्ये थोडे कमी जास्त असेल तर आम्ही मान्य करु, तो काही विषय नाही. परंतु एखादा भाग अपंग ठेवायचा हे योग्य होणार नाही. त्याचप्रमाणे आपण कोरोना काळात जी योजना सुरु केली आहे त्याचे ही उत्तर देणे अपेक्षित आहे. ५० लाख रूपये, २५ लाख रुपये, १५ लाख रुपये किती ग्रामपंचायतींना, ग्रामीण भागाला दिले आहेत. त्यामध्ये किती गावे बसले आहेत ? कारण खऱ्या अर्थाने ग्रामीण भागामध्ये कोरोनाचा बचाव करण्यासाठी किंवा रोखण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांनी अतिशय प्रयत्न केले आहेत. त्यामध्ये आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, डॉक्टर्स, स्वयंसेवक तसेच काम करणारे, समाजसेवा करणारे या सर्वांनी उत्कृष्ट काम केलेले आहे. परंतु कोरोना मुक्ती करीत असताना किंवा त्या गावाचा कोरोनापासून बचाव करीत असताना या आशा वर्कर अंगणवाडी सेविका, डॉक्टर्स किंवा त्यांच्या सिस्टर्स यांना प्रोत्साहनपर किती बक्षिसे दिली आहेत ? त्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिले आहे काय किंवा त्यांचे पगार तरी नियमित केले काय ? हा सुद्धा चिंतनाचा विषय आहे. मी त्यावर जास्त बोलणार नाही. कारण आरोग्य विभागावर एक प्रस्ताव येणार आहे.

डॉ. संजय कुटे.....

अध्यक्ष महोदय, घरकुल योजनेवर मी आपले लक्ष वेधणार आहे आणि आपण त्यावर चिंतन करावे, अशी माझी विनंती आहे. पंतप्रधान घरकुल योजना महाराष्ट्रामध्ये सुरु आहे. माझ्या माहितीप्रमाणे यावर्षी 'ड' मध्ये असणाऱ्या घरकुलांची कार्यवाही सुरु झालेली आहे. त्यामध्ये ग्रामपंचायतीनुसार काही उद्दिष्टे दिलेली आहेत. परंतु त्या घरकुल योजनेतील 'ड'भागामध्ये ५० ते ५५ घरकुले आहेत. पण सन २०११-१२ च्या जनगणेनुसार ती योजना सुरु आहे. बऱ्याच ग्रामपंचायतीमध्ये काही अडचणी येतात कारण तिथे गावातील छोटे मोठे राजकारण चालते. त्यामुळे असे निदर्शनास आले की, खरे जे वंचित आणि गरीब आहेत ते काही प्रमाणात वंचितच राहत आहेत. कारण ज्यावेळेस त्यांचे नाव घेण्यात येते तेव्हा त्यांच्यापैकी कोणी शेतावर, कोणी मजुरीवर किंवा कोणी इतर कामासाठी गेलेले असते. त्यामुळे आर्थिक सर्व्हेक्षणात त्यांचे नाव आले नसेल. ते बिचारे तेव्हापासून वंचितच राहिले आहेत. ही केंद्र शासनाची योजना आहे त्यामध्ये केंद्राचा आणि राज्य शासनाचा वाटा दिला जातो, हे ठीक आहे. परंतु नियोजन करणे, ती योजना तयार करणे, राबविणे हे सर्व आपले काम असते. शेवटी पंचायत पातळीवर या बाबी घडत असतात त्यामध्ये प्रत्येक गावातील राजकारणामध्ये गरिबांचा बळी जातो. घरकुलांचे 'ड' पातळीचे उद्दिष्ट पूर्ण होणारच आहे, हे आपल्याला माहीत आहे. केंद्र शासनाच्या सन २०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये ६० लाख घरांचा निधी घोषित झालेला आहे. पुढच्या दोन वर्षात तो निधी वितरीत होणार आहे. महाराष्ट्र राज्याचे ५० हजार घरकूलांचे उद्दिष्ट आहे. मग 'ड' मध्ये ५० हजार घरकुले कशी आली त्यामुळे विचारणा करण्यात आली. मग पुन्हा ग्रामपंचायतमध्ये सर्व्हेक्षणासाठी यादी गेली की, यातील खरोखर लाभार्थी कोणते आहेत हे कळेल. परंतु त्यातही काही ठिकाणी घोळ झाला. त्यानंतर असे लक्षात आले की, त्यात काही श्रीमंत लोक ही बसले असतील. पण खऱ्या अर्थाने गरीब आहेत, ज्यांची एक गुंठा देखील जागा नाही ते खरोखर लाभार्थी आहेत. त्यामुळे आम्ही जळगाव संग्रामपूर शेगाव मध्ये एक महिन्यापूर्वी पुन्हा सर्वेक्षण करायला सांगितले. कारण ग्रामसभेमध्ये 'ड' च्या यादीला मंजूरी द्यायची होती. त्यातून जे लाभार्थी बाहेर काढण्यात आले त्या लाभार्थ्यांचे पुन्हा सर्व्हेक्षण

डॉ. संजय कुटे.....

करुन ते योग्य ते अयोग्य हे खऱ्या अर्थाने ठरवून पुढच्या वेळी केंद्र शासनाकडे तो वेगळा प्रस्ताव आपल्याला पाठवावा लागेल. आता पुनरसर्व्हेक्षणमध्ये ज्या ज्या तालुक्यांनी घरकुलांच्या योजनेतून जे गरीब वंचित राहत आहेत त्यांची नावे पाठवली असतील तर त्यांचा वेगळा प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनाला पाठवावा. जेणेकरुन त्यावर पुढची कार्यवाही करता येईल. पण ते वंचित राहता कामा नये एवढी दक्षता आपण घरकुल योजनेच्या बाबतीत घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे....

स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून राज्यात चांगले काम झाले. ८ लाख ७८ हजार शौचालये बांधण्यात आली. पंतप्रधान योजना असली तरी ती योजना राज्यात राबवणे हे आपले काम आहे. आपण ही योजना चांगली राबवली यामुळे गरिबांपर्यंत शौचालये पोहचली. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून ५ लाख ७५ हजार गॅस जोडणी झाली. सौभाग्य योजनेतून ५ लाख ७८ हजार १५१ मोफत विद्युत जोडणी देण्यात आली.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील गरिबांच्या फार अपेक्षा नसतात. घरकुल, शौचालय, घरात दिवाबत्ती, शौचालय अशा लहान अपेक्षा असतात. त्यांना फार काही नको असते.. या करिता ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी आपण व्हिजन तयार करु शकतो. पंतप्रधान योजनेला जोडून आणखी काही आपल्याला करता येईल काय, कोणते घटक वंचित आहेत काय, जे गरिब आहेत त्यांना कशाची आवश्यकता आहे, याचा विचार केला पाहिजे. या संदर्भात जर आपण ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून आराखडा तयार केला व माननीय अर्थ मंत्री यांना मदत केली तर नवीन २-३ योजना सुरु करता येतील. विविध योजनेच्या माध्यमातून वंचित घटकांचा समावेश करण्यासाठी योजना तयार केली तर महाराष्ट्र देखील देशाच्या विकासाच्या दिशेने जाईल. राजकारण त्याच्या ठिकाणी आहे. केंद्राकडून आपल्याकडे ज्या योजना येतात त्यात जास्तीत जास्त निधी कसा खेचता येईल या करिता प्रयत्न झाला पाहिजे. यासाठी बराच पाठपुरावा करावा लागतो. या करिता एक तरी संबंधित विभागाचा अधिकारी दिल्लीत बसवला व आपण मंत्री महोदय अधून-मधून दिल्लीला गेलात तर निधी येण्याकरिता ज्या त्रुट्या असतील त्या निश्चितपणे पूर्ण होतील, असा आम्हाला विश्वास आहे. या बाबत राज्य शासनाने विचार करावा.

अध्यक्ष महोदय, क्रीडाचा विषय या ठिकाणी मांडलेला आहे. ५ कोटी रु १० खेळाडूंना प्रशिक्षणासाठी दिले जाणार आहेत. क्रीडा क्षेत्रातील भालाफेकमध्ये निरज चोपडा हा हरयिणातील ग्रामीण भगातील मुलगा पुढे आला. त्याने सरावही ग्रामीण

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे....

भागातच केला. ग्रामीण भागातील मुलांमध्ये फार मोठया प्रमाणात स्पार्क आहे. त्यांच्यामध्ये सर्व चांगले गुण आहेत. मात्र त्यांना क्रीडा क्षेत्राकरिता कोणत्या सुविधा दिल्या जातात ? आज क्रीडांगणासाठी ७ लाख रुपये एवढा निधी आहे. हा निधी आपण वाढवला पाहिजे. डीपीडीसीमधून निधी दिला जातो. हा निधी ७ लाख रु.ऐवजी १० लाख रुपये कसा होईल, याचा विचार केला पाहिजे. आज बरेच आधुनिकीकरण झाले आहे. मुलांना जिम आवडू लागली आहे. पोलीस भरती, सैन्य भरती होत असते. ग्रामीण भागातील मुले पळण्याच्या शर्यतीमध्ये देशात बरीच पुढे जात आहेत. भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक यामध्ये ग्रामीण भागातील मुले पुढे जात आहेत. त्यांना चांगल्या सुविधा दिल्या तर ऑलिंपिक पर्यंत ही मुले जाण्यास काहीही अडचण येणार नाही. क्रीडा क्षेत्रात ध्येय ठेवून आमुलाग्र बदल केला पाहिजे. ग्रामीण भागातील चांगले क्रीडा साहित्य किंवा सुविधा कशा देता येतील याचा विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, तालुक्याच्या ठिकाणी क्रीडासंकुलाचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. जागा घेण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. क्रीडा मंत्री महोदय यांचे मी लक्ष वेधू इच्छितो.अनेक नगरपरिषदा किंवा तालुक्याच्या ठिकाणी जागा मिळत नाही. जागा उपलब्ध नसते. आपण ५० लाख रुपयांपर्यत २ ते ३ एकर जागा घेण्यासाठी तरतूद केलेली आहे. हा निधी वाढवण्याची गरज आहे. नगरपरिषदेचे हे क्षेत्र असते. एवढया निधीमध्ये तेथे जागा मिळणार नाही. येथे देखील जागेचे दर वाढले आहे.यामुळे बऱ्याचशा तालुक्यातील क्रीडा संकुल अजूनही वंचित आहेत.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

डॉ.संजय कुटे ...

छोटे छोटे गट असतात किंवा दलित वर्ग असतो, आदिवासी वर्ग असतो, छोटे सीमांत शेतकरी आहेत, त्यांना गाई-म्हशींच्या माध्यमातून दुग्ध व्यवसायास सहाय्य करणे वगैरे वेगवेगळ्या योजना आपल्या विभागामार्फत राबविल्या जातात. त्यामध्ये जगात काय चालले आहे, देशात काय चालले आहे याचा विचार करुन आपण गाई कुठे चांगल्या दर्जाच्या मिळतील, कुठे जास्त दुध देणाऱ्या मिळतील, म्हशी कुठे दर्जेदार मिळतील, वेगवेगळ्या व्हॅरायटीच्या, वेगवेगळ्या जातीच्या गाई व म्हशी असतात. या सर्वांचा अभ्यास करुन आपण निर्णय केला तर ही जी होलस्टीन फ्रिजियन गाय आहे, तिची किंमत जास्त आहे. परंतु, तिच्यापासून इतक्या प्रमाणात दुध मिळते की, तो शेतकरी, छोटा शेतकरी, तो सीमांत शेतकरी, तो गरीब, तो दलित, तो आदिवासी आपले घर चालवू शकतो, एवढे दुध ती गाय आपल्याला देऊ शकते.

अध्यक्ष महोदय, तेवढ्या किंमतीची गाय सहज घेणे गरिबांना शक्य नाही. त्याबाबत अनुदानाच्या योजनेबाबत आपण म्हटलेले आहे. मला असे वाटते माननीय पशु संवर्धन मंत्री जर ऐकत असतील ... मला असे वाटते की, त्यांचा ऐकण्याचा मूड नाही. ते ऐकत नसतील तर आमचे माननीय दादा ऐकतील की, या गाईकरिता अनुदान ... मी खरोखर सांगतो, मी फक्त शेवटचा विषय मांडणार आहे. मी माझा अनुभव सांगतो. माझ्या घरामध्ये मी लहानपणापासून पाहिलेले आहे. दोन एकर शेती होती. साधारण मातीचे घर होते. दोन म्हशी होत्या. दोन म्हशी नाहीत असे मी लहानपणापासून कधी पाहिले नाही. त्या दोन म्हशींच्या दुभत्यावर आमचे शाळेचे सर्व शिक्षण, सर्व पुस्तके, ड्रेस अशा प्रकारे पूर्ण वर्षभराचे अर्थकारण चालायचे. दोन म्हशींपैकी कधी एक दुभती असायची तर दुसरी आटायची. कधी दुसरी दुभती राहायची तर पहिली आटायची. आम्ही दोन म्हशीवर मी लहानपण काढले आहे. गरिबीच्या परिस्थितीत लहानपणी दोन म्हशींवर आमचे घरातील अर्थकारण कसे चालायचे ते मी पाहिले आहे.

डॉ.संजय कुटे ...

अध्यक्ष महोदय, आज ग्रामीण भागातील गरीब शेतकरी, शेत मजूर, दलित यांना याची आवश्यकता आहे. म्हशी असतील, गाई असतील, या चांगल्या दर्जाच्या चांगले दुध देणाऱ्या असल्या पाहिजेत. आपल्याला ज्या ज्या प्रदेशात, देशात जेथून अशा गाई, म्हशी मिळत असतील ... त्याकरिता आपल्या शेतकऱ्यांना किंवा त्या गरीब लोकांना आपण अनुदानाची सोय करणार आहात काय, ती केली पाहिजे अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे. बाकीच्या गोष्टी होत राहतील. परंतु, एका कुटुंबामध्ये जर २ गाई असल्या तर त्यांचे वर्षभराचे खाणेपिणे व त्यांच्या मुलांचे शिक्षण त्या २ गाईंवर होते. बाकीचे तो तेवढ्या २ गाईंवर करत राहतो. त्या २ गाई छोट्या-छोट्या कुटुंबाना आपल्याला कशा देता येतील, याची योजना आपण महाराष्ट्रात लाँच केली तर मला असे वाटते की, हे महाराष्ट्र विकासाकडे, प्रगतीकडे जाणारे व व्हिजन असणारे महाराष्ट्र होईल या पध्दतीने आपण त्याचा विचार करु शकतो.

अध्यक्ष महोदय, मी या प्रस्तावाच्या माध्यमातून जे जे विषय मांडण्यात आले त्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये ७० टक्के विषय हे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या व्हिजनमधून आलेले आहेत. गरिबांची सेवा करीत असताना त्यांना लागणाऱ्या आवश्यक त्या छोट्या छोट्या गोष्टींची सांगड घालून देशभर योजनांचे एक जाळे तयार केले गेले. त्या योजनांची झलक या प्रस्तावामध्ये आहे. मला आनंद आहे की, सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी, सत्ताधारी पक्षाने हा प्रस्ताव आणला. मी त्याकरिता त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. परंतु, हे करीत असताना एवढेच सांगतो की, रोज टीका करण्यापेक्षा आपले मंत्री महोदय आपले अधिकारी प्रत्येक विभागामध्ये पाठपुरावा कसा करतील, केंद्राचा जास्तीत जास्त निधी आपल्या महाराष्ट्राकडे कसा येईल व त्यामध्ये आपल्या योजना समाविष्ट करुन महाराष्ट्राचे व्हिजन ब्रॉड कसे होईल, याबाबत सर्वांनी प्रयत्न करावा, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

........

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण):** आपण आता या म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा थांबवत आहोत. उर्वरित चर्चा नंतर घेण्यात येईल.

...........

**विरोधी पक्षाच्या प्रस्तावाबाबत**

अॅड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आपण दिनांक १७ मार्च, २०२२ होळीची सुट्टी घोषित केली. त्याला सर्वांनी संमती दिली. माननीय श्री.अजित पवार सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना हे माहिती असेल की, गेल्या आठवड्यामध्ये विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा झाली नाही व तो कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात देखील आला नाही. सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा झाली नाही म्हणून गेल्या आठवड्यामध्ये विरोधी पक्षाचा प्रस्ताव देखील कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आला नाही.

अध्यक्ष महोदय, उद्याच्या गुरुवारी सुट्टी असल्यामुळे परत या आठवड्यामधील आमचा प्रस्ताव पेंडिंग राहील. आपण पुढच्या आठवड्यामध्ये भेटणार. तेव्हा आमचा त्या आठवड्यातील गुरुवारचा प्रस्ताव असेल. माझी विनंती एवढीच आहे की, या आठवड्यामध्ये गुरुवारी सुट्टी दिल्यामुळे या आठवड्यातील आमचा गुरुवारचा प्रस्ताव देखील आपण पुढच्या आठवड्यामध्ये दाखवावा.

अध्यक्ष महोदय, पुढच्या आठवड्यामध्ये त्या आठवड्यातील प्रस्ताव तसेच या आठवड्यातील प्रस्ताव असे विरोधी पक्षाचे दोन्ही प्रस्ताव दाखवावे लागतील. आमचा विरोधी पक्षाचा अधिकार जातो. त्यामुळे आमची विनंती आहे की, पुढच्या आठवड्यातील प्रस्ताव तर पुढच्या आठवड्यामध्ये दाखवावाच शिवाय या आठवड्यातील प्रस्ताव देखील पुढच्या आठवड्यामध्ये दाखवावा, असे आपण करावे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, पुढच्या आठवड्यातील विरोधी पक्षाचा प्रस्ताव होणारच आहे. शिवाय नंतर त्यांचा अंतिम आठवडा प्रस्ताव आहेच. त्यामुळे विरोधी पक्षांना चर्चेकरिता दोन प्रस्ताव मिळतच आहेत. ... (अडथळा)... आपला या आठवड्यातील प्रस्ताव गेला, परंतु, अधिवेशन सुरु झाल्यापासून आमचा देखील पहिलाच प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे.

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.अजित पवार...

विरोधी पक्ष स्थगन प्रस्ताव किंवा इतर वेगवेगळ्या मुद्यांच्या अनुषंगाने काही ना काही भूमिका मांडू शकतात. तो त्यांचा अधिकार आहे, त्याबाबत मला बोलावयाचे नाही. सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्य यांना सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाव्यतिरिक्त बोलण्याची संधी नसते. हे आपणास मान्य करावे लागेल. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांच्या मुद्याच्या संदर्भात कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलवून चर्चा करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आम्ही सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाला कधी विरोधी केला नाही. मागील आठवड्यात सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव मांडण्यात येऊ नये, अशी मागणी कधी केली नाही. आम्ही आमच्या अधिकाराची माहिती दिली आहे. त्यासंदर्भात आपण सांगितल्यानुसार कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यास आमची हरकत नाही. पुढील आठवड्यात उक्त बैठक घ्यावी.

-------------

**तालिका सभाध्यक्ष :** आता सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा घेण्यात येईल. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य व त्यानंतर सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य यांना अनुक्रमे बोलण्याची संधी देण्यात येईल, असे आपले ठरले आहे. यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.रोहित पवार बोलले आहेत. त्यानंतर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्य यांना संधी दिली होती. आता सन्माननीय सदस्य श्री.रत्नाकर गुट्टे यांनी चर्चेस सुरुवात करावी.

असुधारित प्रत

**पृ.शी. :** अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा
**मु.शी. :** सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु......

श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री महोदय यांनी ५ लाख ४८ हजार कोटी रुपयांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा अर्थसंकल्प मांडला आहे.

अध्यक्ष महोदय, वित्त मंत्री महोदयांकडून मराठवाड्याला खूप अपेक्षा आहेत. मराठवाड्याच्या वॉटर ग्रीड प्रकल्पास मागील वेळी कोणताही निधी देण्यात आला नव्हता. तो यावेळी देण्यात येईल, असे मला वाटले होते. परंतु हा विषय मराठवाड्यातील एकाही सन्माननीय सदस्य यांनी मांडला नाही, ही दुर्दैवाची बाब आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्यातील वॉडर ग्रीड प्रकल्प हा अत्यंत महत्त्वाचा असून त्यामुळे आमच्या शेतीला व पिण्यासाठी पाणी मिळणार आहे. हा अतिशय चांगला प्रकल्प असल्याने त्यास निधी देण्यात यावा, ही माझी आग्रही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री महोदय हे जिल्हा परिषदेच्या डीपीडीसीच्या बैठकीस आले होते. त्यावेळी मी म्हणालो होतो की, जिल्हा परिषदेच्या निजाम कालीन शाळांसाठी डीपीडीसीमध्ये ५ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे. त्या अल्प निधीतून कामे होऊ शकणार नाहीत. कारण ७० टक्के शाळा पडकळीस आल्या आहेत, काही पडल्या आहेत, काही झाडाखाली भरवण्यात येत आहेत. त्यामुळे उक्त शाळांच्या पुनर्बांधकामासाठी कमीत कमी १५ टक्के निधी राखीव ठेवण्यात यावा, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, डीपीडीसीमधून स्मशान भूमी व दफन भूमीसाठी निधी देण्यात येतो, तो मिळत नसल्याने राखीव ठेवण्यात यावा. कारण उक्त निधी

श्री.रत्नाकर गुट्टे...

वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या कामांसाठी देण्यात येतो. माझ्या मतदारसंघामध्ये १७५ स्मशान भूमी असल्याने डीपीडीसीमध्ये किमान १० टक्के राखीव निधी स्मशान भूमी व दफन भूमीसाठी ठेवण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, अंगणवाडी सेविकांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. त्यांनी कोविड कालावधी खूप चांगले काम केले आहे. त्यांना ४,२०० रुपये मानधन देण्यात येते ते कमीत कमी १० हजार रुपये इतके करण्यात यावे. तसेच अंगणवाडी ताईंना ८,१०० रुपये मानधन देण्यात येते. त्या खूप काम करतात त्यांच्या एवढे काम कोणी करीत नसल्याने त्यांना कमीत कमी १५,००० रुपये मानधन देण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. गंगाखेड येथे मोठे आरोग्य उप केंद्र असून या भागामध्ये ३ ते ३.५ लाख लोक राहतात. उक्त केंद्राची दररोजची ओपीडी एक हजार ते बाराशे इतकी असून तेथे ५० खाटा असून १०० खाटांची मंजूरी देण्यात यावी, अशी माझी आग्रही विनंती आहे.

यानंतर श्री.तेलंग...

श्री. रत्नाकर गुट्टे....

सध्या सदर रुग्णालयामध्ये ५० खाटांची व्यवस्था आहे. त्यामध्ये वाढ करून १०० खाटा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये एकूण १७ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सर्व प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर आहे. परंतु सदर केंद्रांमध्ये डॉक्टर्स उपलब्ध नाहीत. जे डॉक्टर्स कार्यरत आहेत ते घरी बसून राहतात. त्यामुळे माझ्या मतदारसंघातील प्राथमिक आरोग्य केंद्र हे सिस्टर चालवतात, हे सांगण्यास मला खेद वाटतो आहे. त्यामुळे माझ्या मतदारसंघातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये लवकरात लवकर डॉक्टरांची पदे भरून डॉक्टर उपलब्ध करून देण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, या राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये क्रीडांगण संकुलन उभारण्यात आलेले आहे. माझ्या मतदारसंघामध्ये गंगाखेड येथे तालुका क्रीडांगण संकुलन उभारण्यासाठी मी माननीय श्री. सुनिल केदार यांची अनेक वेळा भेट घेतली आहे. मंत्री महोदय क्रीडांगण संकुलनाच्या जमिनीसाठी देखील निधी उपलब्ध करून देत असल्याची माहिती मिळाली आहे. परंतु आम्हाला जमिनीसाठी पैशाची काहीही आवश्यकता नाही. कारण संत जनाबाई देवस्थानकडून सात एकर जमीन देण्यात आलेली आहे. उक्त जमिनीवर क्रीडांगण उभारण्यात येणार आहे, त्यासाठी अंदाजे पाच कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. याबाबतचा प्रस्ताव लवकरच आपल्याकडे सादर करण्यात येणार आहे. उक्त प्रस्तावास मंजुरी द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. परंतु शेतकऱ्यांच्या सातबारावरील कर्जाचा बोजा कमी केलेला नाही. त्यामुळे कोणतेही बँक सदर शेतकऱ्यांना नवीन कर्ज देण्यास तयार नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांच्या सातबारावरील कर्जाचा बोजा लवकरात लवकर कमी करून त्यांना नवीन कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मी विनंती करतो.

श्री. रत्नाकर गुट्टे.....

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघासाठी सन २०१८ मध्ये दुष्काळ अनुदान मंजूर करण्यात आले होते. सदर निधी संबंधित पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करणार याच कालावधीमध्ये कोल्हापूर येथे पूर आल्यामुळे शासनास निधीची निकड भासली. त्यामुळे शासनाने सदर निधी कोल्हापूर येथे वर्ग केला. याबाबत आमची काहीही हरकत नाही. कारण तेव्हा कोल्हापूर येथे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्यामुळे तेथे निधीची नितांत गरज होती. परंतु आता राज्य सरकारची आर्थिक स्थिती चांगली असल्यामुळे राज्य सरकारने सन २०१८ मध्ये मंजूर केलेला निधी लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, जिल्हा परिषद हे ग्रामीण भागातील विकासाची नांदी आहे. ग्रामीण भागातील सर्व विकास हा जिल्हा परिषदेमार्फत केला जातो. परंतु जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जी विकास कामे होणे अपेक्षित आहेत, ती कामे केली जात नाहीत, असे मला खेदाने म्हणावे लागत आहे. कारण गल्लीतील रस्ते मुख्य रस्त्याला जोडण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत केले जाते. परंतु अशा प्रकारचे काम जिल्हा परिषद करीत नाही. त्यामुळे या सरकारने ग्रामपंचायतीला जास्तीत जास्त अधिकार प्रदान केले तर ते अशा प्रकारची सर्व कामे स्वतः करून घेतील, परिणामी गावातील विकास होण्यास मदत होईल.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत दहा हजार किलो मीटरचे रस्ते मंजूर करण्यात आलेले आहेत, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. परंतु सदर रस्ते वाटपात कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्व मतदारसंघासाठी समान पद्धतीने रस्ते वाटून देण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मागील सरकारच्या काळामध्ये एम. बी. तयार केल्यानंतर लगेच संबंधित कंत्राटदारास पैसे दिले जात होते. त्याच पद्धतीने आता देखील सदर रस्त्यांच्या कामांची एम. बी. तयार झाल्या नंतर लगेचच संबंधित कंत्राटदारांना पैसे देण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

श्री. रत्नाकर गुट्टे.....

अध्यक्ष महोदय, युक्रेन आणि रशियामधील युद्धामुळे डांबराच्या किमतीमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. पूर्वी एक टन डांबराची किंमत २५ हजार रुपये होती. परंतु आता त्याच एक टन डांबराची किंमत ७० हजार रुपये इतकी झालेली आहे. त्यामुळे कोणतेही कंत्राटदार रस्त्याची कामे करण्यास तयार होत नाही. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत येणारे सर्व रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. आपण याचा विचार करून सदर रस्त्यांची कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, परभणी येथे मेडिकल कॉलेज मंजूर करण्यात आलेले आहे. त्यासाठी मंत्रिमंडळाने ६५० कोटी इतक्या निधीची मंजुरी देखील दिलेले आहे. परंतु याबाबतची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पामध्ये सदर निधीची तरतूद करून लवकरात लवकर निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

श्री. रत्नाकर गुट्टे.....

अध्यक्ष महोदय, संत जनाबाई जन्मस्थळाच्या ठिकाणी लाखो भाविक दर्शनाकरिता येत असतात. त्या भाविकांकरिता भक्त निवास नाही. तेथे भक्त निवास बांधण्याकरिता २० ते २५ कोटी रुपयांचा निधी शासनाने दिला पाहिजे, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

धन्यवाद !

-------

असुधारित प्रत

श्री. नाना पटोले (साकोली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कोरोना महामारी सुरु झाल्यापासून दोन वर्षानंतर खऱ्या अर्थाने विधानसभेचे नियमित अधिवेशन सुरु झाले आहे. महाविकास आघाडी सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. या महाविकास आघाडी सरकारने शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली आहे. ही घोषणा करुन शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचे धोरण कोरोना काळातही राबविले आहे. शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका या सरकारने घेतली आहे. सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प सादर करुन राज्यातील सर्व स्तरातील लोकांना न्याय देण्याचे काम माननीय उप मुख्यमंत्री आणि महाविकास आघाडी सरकारने केले आहे. म्हणून मी सर्वप्रथम त्यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यातील जनतेच्या हिताचा हा अर्थसंकल्प आहे, अशी सर्व सामान्यातून प्रतिक्रिया येत आहे. पंचसुत्री कार्यक्रमामध्ये कृषि विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, मानव विकास विभाग, उद्योग व दळणवळण विभागाचा समावेश आहे. या पंचसुत्रीचा अवलंब करुन हा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. कोरोना महामारीनंतर राज्यात मोठे आर्थिक प्रश्न निर्माण झाले आहेत. असे असतानाही सरकार जनतेसाठी असते, अशी भावना या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जनतेच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारने केला आहे. केंद्र सरकार जीएसटीचा परतावा देत नाही. असे असतानाही राज्य शासनाने स्व उत्पन्नातून राज्यातील जनतेला मदत करण्याची भूमिका मांडली आहे. एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरेल, अशी भूमिका या सरकारने घेतली आहे. पुढील तीन वर्षात महाराष्ट्रातील सर्व भागाचा विकास झाला पाहिजे. अशी संकल्पना याद्वारे मांडण्यात आली आहे. जवळपास ४ लाख कोटी रुपये यावर खर्च करण्याचा मानस या अर्थसंकल्पातून दाखविण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, मी अधिक भाषण करणार नाही. परंतु मी काही मुद्दे मांडणार आहे. राज्य सरकारने नियमित कर्जदारांना ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान

असुधारित प्रत

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

श्री. नाना पटोले.....

देण्याचा निर्णय घेतला आहे. मी सांगू इच्छितो की, ५० हजार रुपयांचे अनुदान देत असताना राज्यातील सर्व ठिकाणी याबाबतचे पत्र पोहोचले आहे. या पत्रात सन २०१५ ते सन २०२१ या कालावधीत नियमित कर्ज भरणारा शेतकरी असेल तरच त्या शेतकऱ्याला ५० हजार रुपयांचे अनुदान मिळेल, असे म्हटले आहे. हे पत्र माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी पाठविलेले आहे किंवा नाही, हे मला माहिती नाही. परंतु सर्व जिल्हा बँकेने ते वितरित केले आहे. हे पत्र सहकार विभाग, कृषि विभागाने पाठविले आहे काय, याची मला माहिती नाही. परंतु जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून सन २०१५ ते सन २०२१ पर्यंत नियमित कर्ज भरणाऱ्यांचे फॉर्म मागविण्याचे काम सुरु केले आहे.

असुधारित प्रत

यानंतर श्री. चौधरी....

श्री.नाना पटोले.....

त्यामुळे आपण परवा अर्थसंकल्पामध्ये जाहीर केलेल्या योजनेबाबत अधिक स्पष्टीकरण दिले पाहिजे. कारण शेतकऱ्यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

अध्यक्ष महोदय, धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी ६ हजार कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली. परंतु त्यांना बोनस देण्याबाबत उल्लेख करण्यात आला नाही. त्यामुळे माननीय अर्थमंत्र्यांनी उत्तरामध्ये धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बोनसबाबत सुतोवाच करावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, या पंचसुत्री अर्थसंकल्पामध्ये रोजगारनिर्मितीबाबत उल्लेख करण्यात आला आहे. नोकऱ्या कमी होत असल्यामुळे बेरोजगारांची संख्या वाढत आहे. त्यामुळे रोजगारनिर्मिती करुन किती तरुणांच्या हाताला काम दिले जाईल याबाबत माननीय अर्थमंत्र्यांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, छत्तीसगड व राजस्थान सरकारने आपापल्या राज्यातील कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू केली आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. आपण कर्मचाऱ्यांकडून काम करुन घेतो परंतु त्यांना पेन्शन देण्याच्या विषयात आपण मागे पडत आहोत. त्यामुळे जुन्या पेन्शनच्या संदर्भातील भूमिका देखील मंत्री महोदयांनी स्पष्ट करावी व कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा ही मागणी मी या निमित्ताने करतो... (अडथळा...) आपण सरकार आहात व आपल्याकडे चावी आहे. ती चावी कशी फिरवायची ते आपण ठरवावे.

अध्यक्ष महोदय, पात्र-अपात्र शाळांचा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. काही शाळांना मान्यता दिली आहे तर काही शाळांना मान्यता देणे बाकी आहे. त्यामुळे अपात्र शाळांचे अहवाल मागवून त्यांना पात्र करुन कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील घरकुलांसाठी १ लाख ४० हजार रुपये दिले जातात. एका बाजूला मोठया प्रमाणात महागाई वाढत आहे. त्यामुळे १ लाख ४० हजार रुपयांमध्ये गरिबांचे घर बांधून होत नाही.

श्री.नाना पटोले.....

कोणी प्रधानमंत्री आवास योजनेचा दाखल देऊन पाठ थोपटत असेल परंतु एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, घरकुलांसाठी पैसे वाढवून देणे गरजेचे आहे... (अडथळा...) राज्य सरकार देत आहे. दिल्लीमध्ये आपला आवाज कमी पडत आहे. आपण केवळ राज्य पातळीवरच ओरडता...(अडथळा...) गरिबांच्या घरांचा प्रश्न सुटला पाहिजे. १ लाख ४० हजार रुपयांमध्ये गरिबांचे घर बांधून होत नाही. त्यामुळे विकासाच्या पंचसुत्रीमधून गरीब माणूस सुटता कामा नये. गरिबाला देखील न्याय मिळाला पाहिजे. गरिबांच्या घराला पैसे कमी पडू नयेत यासाठी माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या उत्तरामध्ये स्पष्टीकरण दिल्यास त्यांच्या हातून मोठे पुण्याचे काम होईल, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांचे देखील प्रश्न आहेत. माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री.राजेश टोपे यांना मी सांगू इच्छितो की, कोविड काळात आशा वर्कर्सच्या मदतीने आपण मोठया प्रमाणात काम करु शकलो. कोविडसारख्या महामारीमध्ये त्यांच्या मदतीमुळे आपण अनेकांचा जीव वाचवू शकलो. त्यामुळे या अर्थसंकल्पामध्ये आशा वर्कर्सला देखील स्थान मिळावे अशी माझी विनंती आहे. तसेच अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना देखील मदत करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करतो. महाराष्ट्राला दिशा देणारा एक चांगला अर्थसंकल्प मंत्री महोदयांनी मांडला आहे. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य विकासाकडे वाटचाल करील अशी अपेक्षा व सदिच्छा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. बबनराव लोणीकर (परतूर) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाडा वॉटरग्रीडच्या संदर्भात या बजेटमध्ये तरतूद करण्यात आल्याचे वाचण्यात आले नाही. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात मराठवाडा वॉटरग्रीड करण्यासंदर्भात निर्णय झाला होता. जगात सर्वात कमी पाऊस पडतो तो इस्त्रायलमध्ये आणि इस्त्रायलच्या पाणी पुरवठा विभागाने वर्षभर महाराष्ट्रातील पाणी पुरवठा विभागाला सोबत घेऊन कोणत्या जिल्ह्यात गेल्या ३५ वर्षात किती पाऊस पडला, कोणत्या धरणात किती पाणी साचले याचा अभ्यास केला. ५ जिल्ह्यांचा डीपीआर तयार करुन आपण मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांसाठी २२ कोटी रुपयांचा निधी दिला. तो डीपीआर तयार झाल्यानंतर मराठवाड्यातील संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांच्या निविदा प्रसिध्द झाल्या. परभणी, नांदेड आणि हिंगोली या ३ जिल्ह्यांचा डीपीआर शासनाकडे सादर झाला. मराठवाडा वॉटरग्रीड करण्यासंबंधी निर्णय झाला. कारण मराठवाड्यात वारंवार पडणारा दुष्काळ विचारात घेता आपण ४ हजार टँकरने ३ वर्षे पाणी पुरवठा केला. लातूरसारख्या शहरामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती. पशु, पक्षी, जनावरे मरत होती म्हणून आपण लातूर जिल्ह्याला रेल्वेने पाणी पुरवठा केला. मराठवाडा वॉटरग्रीड करणार असल्याचे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मागच्या बजेटच्या अधिवेशनावेळी सांगितले होते. मराठवाडा ही माझी सासरवाडी आहे आणि म्हणून मी मराठवाड्यावर अन्याय करणार नाही, असे माननीय उपमुख्यमंत्री म्हणाले होते. मात्र अडीच वर्षे झाली असताना मराठवाडा वॉटरग्रीडचे टेंडर होऊ शकले नाही. १०० रुपये सुध्दा मराठवाडा वॉटरग्रीडवर खर्च झाले नाहीत. मराठवाडा वॉटरग्रीड ही शासनाची अतिशय महत्त्वाकांक्षी असणारी योजना आहे. २५ हजार कोटी रुपयांची ही मराठवाडा वॉटरग्रीड योजना आहे. परतूरची ३०० गावांची योजना आहे. त्यामधील १५० गावांमध्ये फिल्टरचे पाणी वाटप सुरू आहे. उर्वरित ६ महिन्यांमध्ये ३०० गावांना फिल्टरचे पाणी मिळेल. म्हणून माझी मराठवाड्याच्या वतीने आपल्याला विनंती आहे की, आपण मराठवाडा वॉटरग्रीडला

श्री. बबनराव लोणीकर...

बजेट द्यावे. उपमुख्यमंत्री महोदय मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, आपण म्हणाला होतात की, "मी मराठवाड्यावर अन्याय होऊ देणार नाही."

अध्यक्ष महोदय, मराठवाडा वॉटरग्रीड ही मराठवाड्यातील आत्महत्त्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे भाग्य बदलणारी आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी मराठवाडा वॉटरग्रीड ही योजना पूर्ण झाली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली गेली. त्यामध्ये माननीय मंत्री अशोक चव्हाण, माननीय मंत्री राजेश टोपे, माननीय मंत्री श्री. अमित देशमुख अशा सर्व मराठवाड्यातील मंत्र्यांनी मराठवाडा वॉटरग्रीड करण्याबाबत मिडीयामध्ये सुध्दा बोलले आहेत. म्हणजे दोन्ही बाजूच्या दृष्टीने मराठवाड्यातील आत्महत्त्या थांबविण्यासाठी प्रयत्न होत आहे. पिण्याचे पाणी, उद्योगाचे पाणी, आणि शेतीचे पाणी एकत्रितपणे मिळेल अशा प्रकारची ही ग्रीड आहे. त्यामध्ये वीजेचे बिल कोण भरील असा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यामुळे त्यामध्ये ७० टक्के सोलर आणि ३० टक्के वीज वितरण कंपनीची वीज या धर्तीवर माझी ग्रीड आता चालू आहे. याच धर्तीवर इस्त्रायलचे तंत्रज्ञान वापरुन आपण ही मराठवाडा वॉटरग्रीड करण्याचा निर्णय घेतला होता.

अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, मराठवाड्यातील जी ११ धरणे आहेत ते मोठ्या बंद पाईपलाईनने एकमेकांना जोडून मराठवाड्याच्या शेतीचे पाणी, पिण्याचे पाणी आणि उद्योगाचे पाणी अशा प्रकारची ही एकत्रित अशा प्रकारची ग्रीड आहे. इतर ४ कामे कमी झाली किंवा ४ रस्त्यांची कामे कमी झाली तरी चालतील. पण शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे, त्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे व त्या दृष्टीने ही मराठवाडा वॉटरग्रीड योजना अतिशय महत्त्वाची आहे. आमचे मित्र पाणी पुरवठा मंत्री श्री. गुलाबराव पाटील यांनाही मी बऱ्याच वेळा भेटलो आणि सविस्तर चर्चा केली. यामुळे आपल्या काळात आपले आणि आपल्या सरकारचे नाव लिहिले जाईल. मराठवाड्यातील आत्महत्त्या थांबविण्यासाठी आपण ही ग्रीड केली पाहिजे, अशी मी सभागृहातही वारंवार मागणी केली आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. बबनराव लोणीकर....

मी सभागृहामध्ये वारंवार अशा प्रकारची मागणी केलेली आहे. मराठवाडा वॉटर ग्रीडचा आपल्या बजेटच्या भाषणामध्ये उल्लेख झाला नसला तरी देखील आपण उत्तराच्या भाषणामध्ये या संदर्भात निर्णय करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या व्हिजनमधून प्रत्येक घराला नळाने स्वच्छ पाणी देण्यासाठी केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्याला २४ हजार कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. १९३५ रुपयांचा पहिला हप्ता राज्य शासनाला दिलेला आहे. ५ हजार कोटी रुपयांचे टेंडर आता झालेले आहे. याचा अर्थ महाराष्ट्र राज्याला २४ हजार कोटी रुपये मिळत असताना राज्याने राज्याचा हिस्सा टाकणे आवश्यक आहे. कारण आपण जर हा हिस्सा टाकला नाही तर... महाराष्ट्रातील गोर-गरीब, दलित, एससी, एसटी, एनटी व्हिजेएनटी, शेतकरी, कष्टकरी गरीब लोकांना केंद्र सरकारची पिण्याच्या पाण्याची ही योजना आहे. प्रत्येक घराला, कुटुंबाला नळाने पाणी देण्यासाठीची ही योजना आहे. १९३५ कोटी रुपयांचा पहिला हप्ता प्राप्त झाला. परंतु यामध्ये अद्यापपर्यंत टेंडर झालेले नाही. माननीय मंत्री श्री. गुलाबराव पाटील यांना माझी विनंती आहे की, त्यांनी यामध्ये थोडे लक्ष द्यावे. केंद्र सरकारच्या गाईडलाईनप्रमाणे २५ ते ३५ टक्के अबाऊ असे हे टेंडर होत आहे. राज्याच्या हिताच्या दृष्टीने हे योग्य नाही. मी मंत्री असताना माननीय माजी मुख्यमंत्र्यांनी आम्हाला सूचना दिल्या होत्या की,....

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य तसेच आमचे मित्र म्हणत आहेत की, टेंडर २५ ते ३५ टक्के अबाऊ येत आहेत. परंतु अजून एकही टेंडर स्विकृत केलेले नाही. मग टेंडरच स्विकृत केलेले नाही आणि डीएसआर देखील झालेला नाही यामुळे त्यांची ही चुकीची माहिती रेकॉर्डवर येऊ नये.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, रेकॉर्डवर चुकीची माहिती येत आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, एकही टेंडर झालेले नाही. मग २६०० कोटी रुपयांचा खर्च आणि १३ टक्के काम झाले असे कसे दाखवले आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, टेंडर झालेले नाही आणि ३५ टक्के अबाऊ कसे दाखवले आहे ?

असुधारित प्रत

श्री. गुलाबराव पाटील :अध्यक्ष महोदय, आमच्याकडे १० टक्केच्या आतील अधिकार असतात. त्यापेक्षा जास्त टेंडर गेले तर ते आम्ही स्विकृत करीत नाही, असा नियमच आहे. त्यामुळे माननीय माजी मंत्र्यांना मी हे सांगण्याची गरज नाही.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, १३ टक्के म्हणजे १९०० कोटी पैकी १३०० कोटी रुपये खर्च झालेला आहे. मग टेंडर झाले नाही असे आपण कसे म्हणू शकता ? अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, यांचे म्हणणे आहे टेंडर झालेले नाही मग तुम्ही १ कोटी लोकांना कनेक्शन दिले असे म्हणत आहात. पूर्वीच्या काळात दरडोई ४० लीटर पाणी दिले जात होते. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून ५५ लीटर पाणी देण्याचा निर्णय झाला. यानंतर बिना टेंडरचे १ कोटी लोकांना कनेक्शन कसे दिले आहे, असा माझा प्रश्न आहे. केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्र राज्याला २४ हजार कोटी रुपयांचे बजेट मिळणार आहे. यामध्ये कामाला गती देण्याची आवश्यकता आहे. दोन वर्षापासून ही प्रक्रिया फक्त टेंडरमध्ये गुंतलेली आहे. पुढचे जे ५ कोटी रुपये येणार ते राज्याचा हिस्सा मिळल्यानंतर हे पैसे निश्चितपणे येऊ शकतात.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील दोन ते तीन मुद्दे मी सांगणार आहे. मराठवाडा आणि विदर्भातील १५ जिल्ह्यासाठी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये ४ हजार कोटी रुपये खर्च करुन ते काम सुरु झाले आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री.बबनराव लोणीकर ....

मागील २ वर्षांपासून काही जिल्ह्यांमध्ये काम थांबवले गेले आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या कामाला निधी प्राप्त करुन देणे आवश्यक आहे. शामाप्रसाद मुखर्जी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या एमआयडीसी करिता केंद्र शासनाचा ९ कोटी रुपयांचा हिस्सा आलेला आहे. राज्य शासनाने मागील २ वर्षात शेतकऱ्यांच्या एमआयडीसीकरिता निधी दिलेला नाही.

अध्यक्ष महोदय, २५१५ हेडअंतर्गत रस्ते, समाज मंदिर, सभागृह अशी कामे झाली आहेत. तर काही अर्धवट कामे आहेत. कंत्राटदाराला बिल न दिल्यामुळे बरीच कामे बंद आहेत. उद्या लोक खिडक्या काढून नेतील, पत्रे काढून नेतील. अर्धवट कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. या संदर्भात मंत्री महोदयांना मी भेटलो असून त्यांनी मान्य केले आहे की, याकरिता बजेट देऊन अपूर्ण कामे पूर्ण करु. माझ्या मतदारसंघातील परतूर येथे १५ कोटी रुपयांचे नाटयगृह बांधून तयार आहे. केवळ ईलेक्ट्रीक फिटींग व एसीचे काम बाकी आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या दृष्टीने हे नाटयगृह बांधून इमारत तयार झाली. निधी अभावी काम बंद पडले होते. हे काम पूर्ण करण्याकरिता निधी द्यावा. पर्यटन, तीर्थक्षेत्र विकासाची अनेक कामे आहेत. ही कामे ९० ते ८० टक्के पूर्ण झाली. कंत्राटदाराला निधी अभावी बिल न मिळाल्यामुळे तो पुढील कामे करीत नाही.

अध्यक्ष महोदय, आखणी लघु तलावाचे ९० टक्के काम झाले आहे. १० टक्के भरणीचे काम शिल्लक आहे. माननीय पालक मंत्री श्री. राजेश टोपे आखणी गावात जाऊन आले. येथील भरणी शिल्लक आहे. आखणी गावाच्या जमिनीचे पैसे अद्याप मिळाले नाहीत. ३ गावांचे पैसे मिळाले आहेत. आखणी गावाच्या जमिनीची रक्कम व घराची रक्कम मिळाली नाही. ( अडथळा )

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषण पूर्ण करावे.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, मागे ५ अधिवेशने झाली आम्हाला बोलण्याची संधी मिळत नाही. हे काम झाले तर ५-६ गावांच्या शेतीला पाणी मिळेल. अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाच्या कामासाठी निधी मंजूर करुन देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, नेर या गावात १३२ केव्ही सबस्टेशनकरिता जागा उपलब्ध करुन दिली. त्याचे भूमीपूजन झाले. काम सुरु झाले. सरकार बदलले. नेर हे गाव जालना जिल्ह्यातील शेवटचे, टोकाचे गाव आहे. विकासापासून वंचित असणारी अशी १०० गावे आहेत. येथे १३२ केव्ही सबस्टेशनचे काम मंजूर झाले, निविदा झाली, भूमीपूजन झाले. मात्र या नंतर आता जागा व ठिकाण बदलले. जरी सबस्टेशनची जागा बदलली असली तरी देखील नेर येथील १३२ के.व्ही सबस्टेशनकरिता निधी उपलब्ध करुन द्यावा.

अध्यक्ष महोदय, कोरोनाच्या काळात जवळपास दीड लाख लोकांचा मृत्यू झाला. तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालयात २ लाख लोक असतात. तेथे सीटीस्कॅन मशीन नाही. रक्त तपासण्याची लॅब नाही. सोनोग्राफी मशीन नाही. या बाबत आरोग्य मंत्री महोदयांनी निधी उपलब्ध करुन द्यावा. माननीय मंत्री श्री. टोपे यांनी या काळात खूप काम केले, रोज आम्हाला टी.व्ही वर ते दिसत होते. निधी कमी असताना देखील खाते जिवंत ठेवले, चर्चेत ठेवले . मी आता उच्च न्यायालयात गेलो. उच्च न्यायालयाने शासनाला प्रतिज्ञापत्र देण्यास सांगितले आहे. तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण रुग्णलयात सुविधा नसल्यामुळे सुमारे दीड लाख लोकांचा मृत्यू झाला. तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालयात सुमारे दोन लाख लोक असतात. तेथे सीटीस्कॅन मशीन नाही, सोनोग्राफी मशीन नाही, रक्त तपासण्याची लॅब नाही, २५ खाटांचे आयसीयु नाही. कोणत्याही सुविधा नसल्यामुळे ग्रामीण भगाातील लोकांचा मृत्यू झालेला आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.बबनराव लोणीकर ...

माननीय श्री.अजित पवार यांना विनंती आहे की, आरोग्य खात्याला थोडा निधी दिला पाहिजे. शासनाच्यावतीने प्रतिज्ञापत्र दिलेले आहे की, या सर्व सुविधा आम्ही ग्रामीण रुग्णालयात सहा महिन्यांच्या आत देऊ. त्याला आता ६ महिने झाले आहेत. या बजेटमध्ये अधिक पैसे देऊन या सर्व सुविधा दिल्या पाहिजेत, अशी मी अर्थ मंत्री महोदयांना विनंती करतो. धन्यवाद.

.......

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ...

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील विभागनिहाय चर्चेच्या वेळेस बोलता येईल. त्यामुळे मला असे वाटते की, आता सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे २-२ मिनिटांमध्ये मांडावे.

...........

असुधारित प्रत

श्री अबू आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विकास आघाडी सरकार के वित्त मंत्री सम्माननीय श्री अजित पवार जी ने जो सन २०२२-२३ का बजट पेश किया है, उस पर अपने विचार व्यक्त करने के लिए मैं खड़ा हुआ हुं.

अध्यक्ष महोदय, मैं सम्माननीय दादा को बधाई देना चाहता हूं. इन्होंने एक बहुत अच्छा बजट पेश किया. इसमें इंडस्ट्री, ट्रान्सपोर्ट, ह्युमन रिसोर्सेस यानी इस बजट का बुनियादी हक का मसला यह है कि इसमें डेव्हलपमेंट होना चाहिए. मैं इस बजट को सपोर्ट करने के लिए खड़ा हुआ हूं. मैं यह कहना चाहता हूं कि,

"एक ही फन तो हमने सीखा है,
जिससे मिलिए उसे खफा किजिये,
ये तकाजा मेरी तबीयत का है,
हर किसी को चिराग-पा किजिये."

अध्यक्ष महोदय, मायनॉरिटी कमजोर आबादी है, जो कि २० प्रतिशत है. हर बार ऐसा होता है कि इनको कम बजट मिला है. यह कोई नई बात नहीं है. आपने इसको सपोर्ट करना चाहिए. जब से मैं यहां पर बैठा हूं, इस सदन में यह तीसरी बार ऐसा हुआ है. मायनॉरिटी को हमेशा निग्लेक्ट किया गया है, नजरअंदाज किया गया है. ४ लाख २७ हजार करोड़ रुपये के बजट में, महसूल खर्च में, सरकार ने एससी, एसटी को जो कि एक तबका कमजोर है, मैं मानता हूं कि एससी, एसटी के लोग बहुत कमजोर है. उनके लिए २१,३१८ करोड़ रुपये बजट में दिए गए है. मैं इस बात के लिए ताली बजाकर स्वागत करता हूं. उनको और भी फंड मिलना चाहिए. मैं किसी की मुखालफत नहीं कर रहा हूं. लेकिन बजट का ३.९ प्रतिशत एससी, एसटी और बीसी को दिया गया. इसकी मुझे खुशी है. लेकिन जो २० प्रतिशत मायनॉरिटी है उनको ६७७ करोड़ रुपये दिए गए जो कि बजट का ०.१५ प्रतिशत है. सम्माननीय मंत्री श्री अब्दुल सत्तार जी, आपने इस ओर ध्यान देना चाहिए. आप माननीय मंत्री है. मायनॉरिटी का मतलब केवल मुसलमान नहीं है. मायनॉरिटी का मतलब मुस्लिम, ईसाई, बुध्दिस्ट, पारसी,जैन, सिख, ज्यू ये सभी मायनॉरिटी में आते है. इनको कम से

श्री अबू आजमी....

कम मरती हालात में ढ़ाई-तीन हजार करोड़ रुपये मिलने चाहिए, तब मैं समझता कि हमारी कुछ प्यास बुझी है.

अध्यक्ष महोदय, एज्युकेशन के लिए बजट का १४.५७ प्रतिशत दिया गया. हेल्थ के लिए ३.६३ प्रतिशत दिया गया. मैं याद दिलाना चाहता हूं कि जब एनसीपी का गठन हुआ था, तो तब आदरणीय श्री शरद पवार साहब रेडियो क्लब में आए थे. यह बात मुझे अच्छी तरह से याद है. उन्होंने और काँग्रेस ने भी वादा किया था कि यदि हमारी सरकार आ गई तो हम.... सर युसुफ ने सन १९२० में जोगेश्वरी में जमीन खरीद कर वहां एक कॉलेज बनाया था, इस्माईल युसुफ कॉलेज बनाया था और यह कहा गया था कि यह कॉलेज मायनॉरिटी के लिए और मुसलमानों के लिए है. ये अंग्रेजों के जमाने की बात है. उसमें मस्जिद है, होस्टेल है, वहां उर्दू, अरबी, सब की पढ़ाई होगी. लेकिन जैसे ही देश आजाद हुआ, तो सरकार ने उसको अपने कब्जे में ले लिया. दोनों पार्टियां सत्ता में है. ये पार्टियां कई बार सत्ता में आ चुकी है. इन्होंने वादा किया था कि हम ये कॉलेज देंगे. आज मुसलमानों की हालत बहुत खराब है. ये एज्युकेशन में पीछे है. सभी कहते है कि पढ़ाई किजिये. लेकिन आज नौकरियां ही नहीं है. आप किसी हॉटेल में जाएंगे, तो देखेंगे कि वहां कोई चाय बेच रहा है. कहीं कोई पंक्चर का काम कर रहे है. कोई गाड़ी चलाने का काम कर रहे है. किसी को कोई काम ही नहीं है. कोई नौकरी मिलती नहीं है. उनके बच्चों की पढ़ाई के लिए मैं कहना चाहता हूं. हमारा मानखुर्द-शिवाजीनगर मायनॉरिटी इलाका है. वहां पर कम से कम कुछ कॉलेजेस खोलने चाहिए. ये लोग वादा भूल गए. कहा जाता है कि,

" हर एक शब्द मेरी ताजा अजाद में गुजरी है,

तुम्हारे बाद तुम्हारे ख्वाब में गुजरी है.

मैं एक फुल और मुस्कुराकर भूल गया,

तमाम उम्र इसी की किताब में गुजरी है."

श्री अबू आजमी....

अध्यक्ष महोदय, जैसे गुलाब का फुल होता है, किताब में रखकर भूल गए. वैसा ही हमारे साथ हो रहा है. मैं याद दिला रहा हूं.

...यानंतर श्री.नितनवरे

असुधारित प्रत

श्री अबू आजमी........

पांच प्रतिशत आरक्षण, सच्चर समिति की सिफारिश, महेमुदूर रहेमान समिति की सिफारिश, इन सब चीजों को याद करते हुए मुसलमानों के साथ जो वादा किया था, वादा करने वाले ये ही लोग थे जो सत्ता में बैठे है. मैं इनको याद दिला रहा हूं कि मुसलमानों को आरक्षण मिलना चाहिए. इनके लिए बजट ६७७ करोड़ रुपये है. लेकिन हर साल के बजट में आधा पैसा इस्तेमाल ही नहीं होता है. दिया गया पैसा इस्तेमाल होना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं जुलाई, २०१६ के जी.आर. पर ध्यान दिलाना चाहता हूं. उस समय महाराष्ट्र के जो माननीय मुख्यमंत्री थे, उन्होंने उस समय सभी विभागों की संयुक्त बैठक ली थी और यह तय किया था कि सच्चर समिति, महेमुदूर रहेमान समिति, रंगनाथ मिश्रा समिति की सिफारिश के हिसाब से जिस तरह तमाम लोगों को हिस्सा मिलना चाहिए, उसी तरह मुसलमानों को भी हिस्सा मिलना चाहिए. ये सन २०१६ का जी.आर. है. सभी विभाग मिलकर, कम से कम १५ प्रतिशत फंड इस दुर्बल मायनॉरिटी को भी मिलना चाहिए. उच्च शिक्षा, वित्त विभाग, नगर विकास विभाग और सभी विभागों ने मिलकर इस जी.आर. में कहा था. मैं यह मांग करता हूं कि उस जी.आर. के अनुसार हर विभाग ने पैसा खर्च करना चाहिए. बी.सी, एस.सी., और एस.टी. के बजट में हर कम्पोनंट में उनका अलग से बजट होता है, उनका हिस्सा होता है. लेकिन मायनॉरिटी को किसी भी विभाग से अलग से हिस्सा नहीं मिलता है. क्यों, मायनॉरिटी की गलती क्या है ? मैं बताना चाहता हूं कि जो लोग मुसलमानों के खिलाफ चिल्लाते है, मैं उनको याद दिलाना चाहता हूं कि "भारत छोड़ो का नारा देने वाला मुसलमान था जिसका नाम श्री यूसुफ मेहरअली था. आप उनके साथ क्यों नाइंसाफी करते हो ? इस देश में "इंकलाब जिंदाबाद" का नारा देने वाला भी मुसलमान था. उसका नाम हजरत मुहालिस. "भारत माता की जय" का नारा देने वाला भी मुसलमान था. श्री अजीमुल्लाह खान ने सन १८५७ में नारा दिया था. शायद आपको मालूम नहीं या फिर इस बात को आप भूला रहे है. आप उसको याद किजिए.

श्री अबू आजमी........

"सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है,

देखना है जोर कितना बाजु-ए-कातिल में है."

अध्यक्ष महोदय, सन १९२१ में ये नारा देने वाला श्री बिस्मिल अजीमाबादी था. "सारे जहां से अच्छा, हिंदोस्ता हमारा, हम बुलबले है इसके, ये गुलसिता हमारा." जिन लोगों ने गद्दारी की वे वफादार बन रहे है और जिन्होंने वफादारी की उसको ६०० करोड़ रुपये दिए जा रहे है. मैं कहना चाहता हूं कि मुसलमानों के साथ इंसाफ किया जाना चाहिए. मैं आपसे वादा चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, आज कोई सम्माननीय सदस्य धर्म परिवर्तन के बारे में बोल रहे थे. अगर मोगलों ने मुसलमानों के राज में उन्होंने धर्म परिवर्तन किया होता तो याद रखना बीरबल नमाज पढ़ता. बीरबल नमाज पढ़ता और जोधाबाई हज करके आ गई होती. लेकिन उन्होंने कभी ऐसा काम नहीं किया. कभी किसी का धर्म परिवर्तन का काम नहीं किया. इस सदन में बार बार "छत्रपति शिवाजी महाराज की जय" कहा जाता है. इसके लिए मैं तालियां बजाता हूं. लेकिन मुंह में राम और बगल में छूरी. छत्रपति शिवाजी महाराज का कॅरेक्टर.... आप बात करते है. छत्रपति शिवाजी महाराज वे शख्स थें जिन्होंने मंदिरों और दरगाहों को चलाने के लिए जागिरे दिया. केलसी की दरगाह किसने दी ? दापोली, रत्नागिरी, बाबा याकूब खान की दरगाह के लिए महाराज ने ७०० एकड़ जमीन दी. इस बात के लिए मैं तालियां बजाता हूं. मुसलमानों के साथ नाइंसाफी इस देश में बिल्कुल नहीं चलेगी. आज मैं मांग करना चाहता हूं. सम्माननीय दादा से मैं कहना चाहता हूं कि सामाजिक न्याय विभाग से पोस्ट ग्रॅज्युएट, पीएचडी और पढ़ाई-लिखायी के लिए बच्चों को पैसा मिलना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मौलाना आजाद कार्पोरेशन बच्चों को पढ़ने के लिए छात्रवृत्ति देती थी. इस बोर्ड का गठन आज तक हुआ ही नहीं है. इस बोर्ड का गठन जल्द से जल्द किया जाना चाहिए. यहां से बिजनेस के लिए कर्जा मिलता था. कोविड के बाद

श्री अबू आजमी........

आज गरीब लोगों की हालत बहुत खराब है. बिजनेस के लिए कर्जा मिलना कई सालों से बंद है.  मेरी मांग है कि छोटे छोटे बिजनेस के लिए मौलाना आजाद कार्पोरेशन से जो फंड मिलता था वह जल्द से जल्द जारी किया जाए. "मरीज ए इश्क पर रहमत खुदा की मर्ज बढ़ता गया ज्यों ज्यों इलाज किया." महाराष्ट्र का कर्जा रोज बढ़ते जा रहा है.

अध्यक्ष महोदय, सम्माननीय दादा ने कहा है कि अमृत महोत्सव पर गेट ऑफ इंडिया पर लाईटींग और साऊंड का प्रोग्राम किया जाएगा, ऐसा मैंने सुना है. गेट वे ऑफ इंडिया अंग्रेजों की निशानी है. आजादी की जद्दोजहद में मुंबई में सन १८५७ में आजाद मैदान में दो सिपाही, एक हवालदार का नाम श्री अहमद हुसैन और दूसरे सिपाही का नाम श्री मंगल गडोरिया है. इन दोनों को अंग्रेजों ने आजाद मैदान में तोफ के सामने रखकर उड़ा दिया था. मैं यह कहना चाहता हूं कि उस आजाद मैदान में इनके बारे में कुछ न कुछ किया जाना चाहिए. उनकी निशानी वहां पर है. लेकिन मेट्रो के कारण निशानी टूट गई है. अमृत महोत्सव में वह निशानी बनायी जाए, न कि गेट वे ऑफ इंडिया पर... जो कि अंग्रेजों की निशानी है. मैं इस बजट का समर्थन करता हूं और अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

---------

....यानंतर श्री तेलंग

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, आज पूर्ण दिवस अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा करण्यात आलेली आहे. उद्या देखील प्रश्नोत्तराच्या तासानंतर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सुरु ठेवण्यात येणार आहे. आता जे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित आहेत परंतु त्यांना अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये सहभागी होता आले नाही, त्यांनाच उद्या संधी दिली जाणार आहे. त्यामुळे संबंधित सर्व माननीय प्रतोदांनी याबाबतची काळजी घ्यावी. याबाबतची काळजी घेतली नाही तर आज उशिरापर्यंत थांबलेल्या सन्माननीय सदस्यांना संधी मिळण्याऐवजी उद्या ऐनवेळी आलेले सन्माननीय सदस्य संधी घेऊ शकतात. त्यामुळे मी सर्व पक्षांच्या प्रतोदांना विनंती करतो की, त्यांनी आता उपस्थित असलेल्या आपापल्या पक्षातील सन्माननीय सदस्यांची नावे घेऊन ती अध्यक्ष महोदयांकडे देण्यात यावीत. आता ज्या सन्माननीय सदस्यांनी नाव दिले आहे, त्याच सन्माननीय सदस्यांना उद्या चर्चेची संधी देण्यात येईल.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, माननीय संसदीय कार्य ज्या पद्धतीने या सभागृहाच्या कामकाजाचे नियोजन करीत आहेत, त्यावर माझा आक्षेप आहे. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. माननीय श्री.अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पावर सर्व सन्माननीय सदस्यांना मत चर्चा करावयाची आहे. अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी मी सकाळपासून सभागृहामध्ये बसलो आहे. तरी आपण ऐवढ्या सहजपणे हे सभागृह स्थगित करण्याचा विचार करीत आहात. अर्थसंकल्पावर चर्चा करण्याचा फक्त वरिष्ठ सन्माननीय सदस्यांनाच अधिकार आहे काय? तो आम्हाला नाही काय? रात्रीचे बारा नाही तर पहाटचे चार वाजले तरी चालतील. परंतु सर्व सन्माननीय सदस्यांना चर्चा करण्याची संधी द्यावी, अशी मी विनंती करतो.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, उद्या प्रश्नोत्तराच्या तासानंतर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला पुन्हा सुरुवात करण्यात येणार आहे.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, मागील दोन वर्षापासून कोरोनामुळे अधिवेशन होऊ शकले नाही. त्यामुळे आम्हाला मागील दोन वर्षांपासून सभागृहामध्ये काहीही मत व्यक्त करता आले नाही. आता चांगली परिस्थिती असताना देखील आपण आम्हाला बोलण्याची संधी देत नाहीत, हा अतिरेक होत आहे.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्याच्या मनामध्ये गैरसमज निर्माण झालेला आहे. मी एवढेच सांगितले आहे की, आता जे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत व आज ज्यांना अर्थसंकल्पावर चर्चा करण्याची संधी प्राप्त नाही, त्याच सन्माननीय सदस्यांना उद्या प्रश्नोत्तराच्या तासानंतर प्राधान्याने अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा करण्याची संधी दिली जाणार आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आता मांडलेल्या विषयामध्ये एक सुधारणा करावी, अशी मी आपणास विनंती करतो. उद्या सकाळी ११ वाजल्यानंतर या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घ्यावा. परंतु आता रात्रीचे ०८.०० वाजत आहेत. मंत्री महोदयांना जावयाचे असेल तर त्यांनी जावे. परंतु आता एक तास या विषयावर चर्चा घ्यावी आणि उद्या सकाळी पुन्हा ११.०० वाजता ही चर्चा पुढे सुरु करावी. मला वाटते की, आता ०९.०० वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालवावे.

**उपाध्यक्ष :** सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी १० ते १०.४५ वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. उक्त बैठकीमध्ये लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री ०८ वाजून ०५ मिनिटांनी बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत